फलज्योतिष ग्रंथमाला पुष्प ५ वे

# विलंबी शनी

✍ द. मा. लेले ✍

किंमत : ₹ १२०.००

प्रगती बुक्स

PP317

© सर्व हक्क प्रकाशकाधीन क्रमांक : २८०६२१ (POD) ISBN 978-93-86353-76-4

**प्रकाशक**

**निराली प्रकाशन**

अभ्युदय प्रगती, १३१२, शिवाजीनगर,
जंगली महाराज रोड, पुणे ४११ ००५.
फोन : (०२०) २५५१ २३३६/३७/३९
फॅक्स : (०२०) २५५१ १३७९.
Email : niralipune@pragationline.com

**मुद्रक**

**योगिराज प्रिंटर्स ॲन्ड बाइंडर्स**

सर्व्हे नं. १०/१, घुले इंडस्ट्रिअल इस्टेट,
नांदेड गाव रोड, ता. हवेली,
पुणे - ४११ ०४१.
मो. : ९८५००४६५१७/९४०४२३३०४१

**प्रमुख वितरक : निराली प्रकाशन**

**पुणे**

➢ ११९, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिर मार्ग,
**पुणे** - ४११ ००२.
☎ (०२०) २४४५ २०४४, ६६०२ २७०८.
**फॅक्स** : (०२०) २४४५ १५३८.
Email : niralilocal@pragationline.com

**मुंबई**

➢ ३८५, एस.व्ही.पी. मार्ग,
रसधारा को. ऑप. हाउसिंग सोसायटी लि.,
गिरगाव, **मुंबई** - ४०० ००४.
☎ (०२२) २३८५ ६३३९/२३८६ ९९७६
**फॅक्स** : (०२२) २३८६ ९९७६.
Email : niralimumbai@pragationline.com

**धायरी (पुणे)**

➢ सर्वे नं. २८/२५ धायरी-कात्रज रोड, पारी कंपनीजवळ, **पुणे ४११ ०४१**.
☎ (०२०) २४६९ ०२०४ **फॅक्स** : (०२०) २४६९ ०३१६.
Email : bookorder@pragationline.com; dhayari@pragationline.com

**पुस्तक मिळण्याचे ठिकाण**

**प्रगती बुक सेंटर : पुणे :** Email : pbcpune@pragationline.com

➢ १५७, बुधवार पेठ, रतन टॉकिजसमोर,
**पुणे** ४११ ००२.
☎ (०२०) २४४५ ८८८७/६६०२ २७०७

➢ २८/अ, बुधवार पेठ, अंबर चेंबर,
अप्पा बळवंत चौक, **पुणे** ४११ ००२.
☎ (०२०) ६६२८ १६६९/२०२४ ०३३५

➢ ६७६/ब, बुधवार पेठ,
जोगेश्वरी मंदिरासमोर, **पुणे** ४११ ००२.
☎ (०२०) ६६०१ ७७८४/
६६०२ ०८५५

➢ १५२, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिराशेजारी,
**पुणे** ४११ ००२.
☎ (०२०) ६६०९ २४६३/२४४५ २२५४

**प्रगती बुक कॉर्नर : मुंबई**

➢ इंदिरा निवास, शारदाश्रम हायस्कूलजवळ, १११/अ, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम),
**मुंबई** ४०० ०२८. ☎ (०२२) २४२२३५२६/६६६२५२५४

**वितरक शाखा**

**निराली प्रकाशन :**

➢ ३४, व्ही. व्ही. गोलानी मार्केट, नवी पेठ,
**जळगाव** - ४२५ ००१.
☎ (०२५७) २२२ ०३९५.
**मो.** ९४२३४९१८६०

➢ न्यू महाद्वार रोड, केदार लिंग प्लाझा,
पहिला मजला, आय. डी. बी. आय.
बँकेसमोर, **कोल्हापूर** - ४१६ ०१२.
**मो.** ९८५० ०४६ १५५

**प्रतिभा बुक डिस्ट्रिब्युटर्स :**

➢ लोकरत्न कमर्शियल कॉम्प्लेक्स, दुकान नं. ३,
सीताबर्डी, **नागपूर** - ४४० ०१२.
☎ (०७१२) २५४७ १२९.

info@pragationline.com • www.pragationline.com

To Order * Email : bookorder@pragationline.com

# प्रस्तावना

शनी हा ग्रह दु:ख देणारा आहे व तो प्रत्येक कामास विलंब लावतो असा समज सर्वत्र आहे.

शनी हा शिस्तप्रिय असून तो न्यायी आहे. तसेच तो कायद्याचा कारक आहे. मनुष्य जेव्हा बेशिस्त वागतो, अन्याय करतो वा कायद्याविरुद्ध वागतो तेव्हा शासनाकडून तसेच आपापल्या दैवामुळे शिक्षा ही मिळतेच. म्हणून शनीस दोष देणे चुकीचे ठरते. आपण योग्य तऱ्हेने वागलो नाही, योग्य विचार व योग्य आचार केला नाही हे लक्षातच घेतले जात नाही. चूक व्यक्तीकडेच असते व त्या चुकीसाठी शनी बडगा उचलतो.

शनी हा संग्राहक आहे. तो द्वितीय स्थानांत असता धनाचा संग्रह दर्शवतो त्यामुळे त्यास लोभी असेही म्हटले जाते. शनी काटकसर करतो. कंजूषपणा नव्हे.

शनी तत्त्वज्ञ ग्रह आहे तो व्यक्तीस अध्यात्माकडे खेचतो.

शनी हा वृषभ, तूळ, धनु, मकर, कुंभ व मीन या लग्न राशीत चांगलीच फले देतो. याबद्दल या ग्रंथात अनेक उदाहरणे पाहण्यास मिळतील.

मी भावचलित कुंडलीचाच विचार करतो. भावचलित कुंडलीवरून ग्रह भावमध्यावर आहे का भावसंधित आहे हे पट्कन लक्षात येते. संधीतील ग्रह फले देत नाहीत. आकडे कुंडलीचा विचार केला जातो हे बरोबर नाही.

ग्रहांकित मासिकांतील १९९८ च्या जूनचे अंकात भावरंभ का भावमध्य हा लेख मी लिहिला होता. त्यामध्ये भावचलित कुंडलीचा विचार न केल्यास कशी फसगत होते हे सोदाहरण दर्शवले आहे.

भावचलित लग्न कुंडली इतकेच भावचलित चंद्र कुंडली व भावचलित रवी कुंडलीसही महत्त्व आहे. हे अनेक ज्योतिषी लक्षात घेत नाहीत. भावचलित चंद्र वा रवी कुंडलीची उदाहरणे या ग्रंथात आहेत.

**श्री. द. मा. लेले**

# ✍ अनुक्रमणिका ✍


| | | |
|---|---|---|
| 🕮 | शनी | १ ते १८ |
| १. | प्रथम भाव | १९ ते ४८ |
| २. | द्वितीय भाव | ४९ ते ६२ |
| ३. | तृतीय भाव | ६३ ते ७८ |
| ४. | चतुर्थ भाव | ७९ ते ९४ |
| ५. | पंचम भाव | ९५ ते ११० |
| ६. | षष्ठम भाव | १११ ते १३० |
| ७. | सप्तम भाव | १३१ ते १४६ |
| ८. | अष्टम भाव | १४७ ते १६४ |
| ९. | नवम भाव | १६५ ते १८२ |
| १०. | दशम भाव | १८३ ते २०२ |
| ११. | एकादश भाव | २०३ ते २१८ |
| १२. | द्वादश भाव | २१९ ते २३४ |


❂❂❂

# ⏩ शनी ⏪

शनी महाराजांची भीती सर्वांनाच वाटत असते. आपल्या राशीला शनी अनिष्ट आहे काय ? आपल्याला साडेसाती आहे काय ? याची चौकशी करण्याचे काम सर्व जण करीत असतात. पण तसे घाबरून जाण्याचे कारण नाही. सर्वांनाच शनी अनिष्ट नसतो. त्याप्रमाणे सर्वांनाच साडेसातीमध्ये त्रास होतो असेही नाही. काहींना तर साडेसाती केव्हा आली व केव्हा गेली हे कळूनच येत नाही. याचे कारण पाहिले तर शनी महाराज हे शिस्तप्रिय आहेत. कायदे व कानून सांभाळूनच चालले पाहिजे नाहीतर ते त्या व्यक्तीला त्याची जागा दाखवून देतात. तसेच साडेसातीमध्ये त्रास होतोच असे नाही. त्यातील काही म्हणजे २ $\frac{१}{२}$ वर्षे बरी जातात. नंतर २ $\frac{१}{२}$ वर्षे कष्टाची जातात. या काळात समाजातील व्यक्ती कशा आहेत. खरे मित्र कोण आहेत. गोड बोलून काम साधून घेणारे नी संधिसाधू कोण याची ओळख शनी महाराज या कालावधीमध्ये करून देतात. त्याप्रमाणे आपण आपल्या वागण्यात बदल करतो. तसेच काहींना २ $\frac{१}{२}$ वर्षे भरभराटीची व आर्थिक फायद्याची जातात. त्यामुळे साडेसातीमध्ये शनी महाराज एखाद्या शिक्षकाप्रमाणे असतात. तेव्हा आपण घाबरून न जाता त्यांच्याकडून शिकून घेतले पाहिजे. शनीची त्रोटक माहिती.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | भाग्यांक - ८ | २. | स्वगृहे - मकर व कुंभ रास |
| २. | उच्च रास - तूळ ० ते ३० अंश | ४. | परमोच्चांश - तूळ २० अंश |
| ५. | मूळ त्रिकोण - तूळ ० ते २० अंश | ६. | स्वगृह - कुंभ २१ ते ३० अंश |
| ७. | अधिकार - सेवकत्व | ८. | तत्त्व - वायुतत्त्व |
| ९. | देवता - ब्रह्मदेव | १०. | गुण - तमोगुण |
| ११. | अधिदेवता - यम | १२. | प्रत्याधिदेवता - प्रजापती |
| १३. | वर्ण - काळा | १४. | रत्न - इंद्रनील |
| १५. | वय - १०० वर्षे | १६. | ऋतू - शिशिर |
| १७. | स्थळ - पर्वत व अरण्ये | १८. | निवासस्थान - उकिरडा |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | दृष्टी - अधोदृष्टी | २०. | दिशाबल - पश्चिम |
| २१. | भाग्योदय - ३६ वे वर्ष | २२. | कर्मेंद्रिय - गुद्द्वार |
| २३. | शरीरांतर्गत धातू - स्नायू, सांधे पोटऱ्या, गुडघे, घोटे, नखे, दात, गुद्द्वार इत्यादी | २४. | ज्ञानेंद्रिय - त्वचा |
| २५. | दर्शकत्व - दुःख | २६. | अंमल - स्पर्श विषय (त्वचा) |
| २७. | लिंग - नपुंसक | २८. | मित्रग्रह - बुध व शुक्र |
| २९. | शत्रुग्रह - रवी, चंद्र, मंगळ | ३०. | स्थानबळ - सप्तम |
| ३१. | कालबळ - रात्री | ३२. | दोष - वात व कफ |
| ३३. | अनुकूल भाव - ३, ६, १० व ११ स्थाने | ३४. | प्रतिकूल भाव - १, २ व १२ स्थान |
| ३५. | भावकारकत्व - अष्टम स्थान, दशम व एकादश स्थान | ३६. | अनुकूल राशी - मीन, वृषभ, मिथुन, कन्या, तूळ, मकर |

३७. उद्योगधंदे - लोखंडाचा कारखाना, लोखंड, खनिज पदार्थ, खाणकाम, शेती, जमीनजुमला, तेलसंबंधित व्यवसाय, उदा., पेट्रोल, डिझेल, रॉकेल, खाद्यतेल, स्थापत्यसंबंधी, सिमेंट, पोलाद, भूगर्भ संशोधन, गुप्तहेर खाते, तुरुंगाधिकारी, संशोधक, तत्त्वज्ञानी

३८. गुणधर्म - मर्यादा घालणे, आकुंचन पावणे, पावित्र्य, शुद्धता, काटकसर, नियमितपणा, शिस्तप्रियता, दूरदृष्टी, दृढनिश्चय

३९. द्विपाद दृष्टी - पाचवे व नववे स्थान

४०. त्रिपाद दृष्टी - चौथे व आठवे स्थान

४१. संपूर्ण दृष्टी - तिसरे, सातवे, दहावे स्थान

४२. नीचरास - मेष ० ते २० अंश

## ⊙ शनीची नक्षत्रे

नक्षत्रामधील पुष्य, अनुराधा आणि उत्तरा-भाद्रपदा या तीन नक्षत्रांचे स्वामी शनीदेव आहेत. तेव्हा या नक्षत्रांचा विचार करताना ही नक्षत्रे कोणत्या राशींमध्ये येतात, त्या राशींचे स्वामी कोण असून ते शनीचे मित्र आहेत की शत्रू तसेच या नक्षत्रांचे गण कोणते. त्यांची तत्त्वे कोणती यांचा विचार करून फलादेश द्यावेत.

## ⊙ शनीचे आजार

प्रत्येक ग्रहाच्या अनिष्टतेमुळे कोणते ना कोणते तरी आजार होत असतात. त्याचप्रकारे साधारणपणे स्नायू, संधिवात, हाडे, नखे, दात, उजवा कान, त्वचा, मलोत्सरण इ. आजारांचा कारक शनी आहे. त्यामुळे या आजारांबाबत काळजी घ्यावी लागते. शनीसंबंधी कोणकोणते आजार होऊ शकतात याची माहिती या पुस्तकात षष्ठम भावामध्ये सविस्तरपणे दिलेली आहे. त्याचा अभ्यास करून फलादेश द्यावेत.

**होरा फलादेश :** पंचांगामध्ये होराकोष्टक दिलेले आहे. त्यानुसार प्रत्येक दिवशी शनीचा होरा एक-एक तास असतो. अशा वेळी शनीसंबंधीची कामे करावीत. म्हणजे त्याचे चांगले फल मिळते. ही कामे म्हणजे स्थावरसंबंधी पायाभरणी करणे. नवीन कारखान्यासंबंधी बोलणीस सुरुवात इत्यादी तसेच शनी हा कंजूष आहे. तेव्हा धनसंचय करणे, शेती, तेल व्यापार यासंबंधीची कामे करणे.

**महादशा व अंतर्दशा कालावधी :** प्रत्येकाला सर्वच ग्रहांची महादशा असते. तसेच या कालावधीमध्ये अंतर्दशाही येतात. महादशा व अंतर्दशा यांचे कालावधी प्रत्येक ग्रहाप्रमाणे निरनिराळे असतात. त्यांपैकी शनीच्या महादशेचा काळ १९ वर्षे आहे. या १९ वर्षांच्या काळामध्ये त्या व्यक्तीला निरनिराळ्या ग्रहांच्या अंतर्दशा येतात. त्या दशेमध्ये काय लाभ मिळतो व त्यांचा कालावधी किती असतो हे सांगितले आहे.

**अंतर्दशेमध्ये**

**(१) रवीची अंतर्दशा :** कालावधी ११ महिने १२ दिवस या काळात द्रव्यहानी, लोकनिंदा, नैराश्य या गोष्टी जाणवतात.

**(२) चंद्राची अंतर्दशा :** याचा कालावधी ७ महिने असून या काळात आरोग्याची तक्रार, स्त्रीविरह व गुप्तरोगांची शक्यता असते.

**(३) मंगळाची अंतर्दशा :** कालावधी एक महिना नऊ दिवस असून दुःखी काळ असून भरपूर कष्ट होतात.

**(४) बुधाची अंतर्दशा :** कालावधी ८ महिने ९ दिवस. यामध्ये व्यापारात बरकत, वाहनसुखाचा लाभ, अधिकारप्राप्ती, आर्थिक भरभराट होते.

**(५) गुरुची अंतर्दशा :** कालावधी ६ महिने १२ दिवस. याचे फल आर्थिक लाभ, गुरुकृपा, सौख्यदायी काळ.

**(६) शुक्राची अंतर्दशा :** आर्थिक लाभ, आप्तेष्ट व कौटुंबिक सुख.

(७) **शनीची अंतर्दशा :** आर्थिक टंचाई, अपमानित प्रसंग, शारीरिक पीडा.

(८) **राहू अंतर्दशा :** भांडणतंटा, अपमान, कौटुंबिक काळजी.

(९) **केतूची अंतर्दशा :** शारीरिक पीडा, अपघात, मानसिक अस्वास्थ्य.

वरील अंतर्दशांमध्ये काही ठिकाणी त्रास आहेत तर काही ठिकाणी भरभराट आहे. हा फलादेश पाहून निर्णय द्यावा.

**शनीची दाने :** अनिष्ट शनी असतात खालील दिलेल्या दानांपैकी जी आपणाला शक्य आहेत ती दाने संकल्पपूर्वक दिली असता शनीपीडा कमी होण्यास मदत होते.

**दाने :** सुवर्ण, लोखंड, उडीद, म्हैस, तेल, काळे कापड, काळ्या रंगाचे फूल इ. दाने आहेत.

**शनी शांती :** अनिष्ट शनी असताना शनीची शांती केली असता शनीपीडा कमी होते. ही शांत करण्यासाठी शनीचा वेदोक्त मंत्र खाली देत आहे. त्याचा २३,००० (तेवीस हजार) जप करून २,३०० (तेवीसशे फक्त) मंत्राचे हवन किंवा आहुती होमामध्ये द्यावी लागते. हा मंत्र गुरुजींच्याकडून दीक्षा घेऊनच म्हणावा लागतो. कारण त्याला स्वर आहेत. त्यामुळे दीक्षा घेऊन व्यवस्थित म्हटल्याशिवाय त्याचे फल मिळत नाही. याशिवाय व्यास ऋषींनी सांगितलेला शनीचा पुराणोक्त मंत्र खाली देत आहे. तो मंत्र व्यवस्थित कोणीही म्हटला तरी चालतो. त्या मंत्राचा २३,००० जप करून २,३०० मंत्राचे हवन करावे. मंत्र आपण स्वतः म्हटला तरी त्याचे फल मिळते. पण मंत्राचा जप करून हवन केले तर त्याचे अधिक जास्त फल मिळते. पण हवनकार्य गुरुजींच्याकडून शास्त्रशुद्ध पद्धतीने करावे.

**शनिमाहात्म्य :** शनिमाहात्म्य हे एक स्तोत्र असून याचे रोज किंवा किमान शनिवारी तरी वाचन करावे म्हणजे फल प्राप्त होते.

**शनीचा वेदोक्त मंत्र :**

**ॐ शमग्निरग्निभिः करच्छन्नस्तपतुसूर्यः ।**
**शंवातोवात्वरपाअपस्त्रिधः ।।**

**शनीचा व्यासांनी केलेला पुराणोक्त मंत्र :**

**ॐ नीलांजनसमाभासं रविपुत्रं यमाग्रजम् ।**
**छायामार्तंड संभूतम् तं नमामि शनैश्चरम ।।**

शनीस्तोत्र - पुढे शनैश्वरस्तोत्र व शनीकवच दिलेले आहे. त्याचे दररोज पाठांतर केले तरी शनीपीडा कमी होते.

# शनैश्चरस्तोत्रम् ।

अस्य श्रीशनैश्चस्तोत्रस्य दशरथ ऋषिः । शनैश्चरो देवता ।

त्रिष्टु छन्दः । शनैश्चरप्रीत्यर्थ जपे विनियोगः ।

दशरथ उवाच ।।

कोणोऽन्तको रौद्रयमोऽय बभ्रुः

कृष्णः शनीः पिंगलमन्दसौरिः ।

नित्यं स्मृतो यो हरते च पीडां

तस्मै नमः श्रीरविनन्दनाय ।।१।।

सुरासुराः किंपुरुषोरगेन्द्रा गन्धर्वविद्याधरपत्रगाश्च ।

पीडयन्ति सर्वे विषमस्थितेन तस्मै ।।२।।

नरा नरेन्द्राः पशवो मृगेन्द्रा वनाश्च ये कीटपतंगभृंगाः ।

पीड्यन्ति सर्वे विषमस्थितेन तस्मैं ।।३।।

देशाश्च दुर्गाणि वनानि यत्र सेनानिवेशाः पुरपत्तनानि ।

पीडयन्ति सर्वे विषमस्थितेन तस्मै ।।४।।

तिरोर्पखंभषिगुयान्नवानैर्लोहेन नीलांबरदानतो वा ।।

प्रीणाति मन्त्रैर्निजवासरे च तस्मै ।।५।।

प्रयागकूलेय मुनातटे च सरस्वतीपुण्यजले गुह्यायाम् ।

यो योगिनां ध्यानगतोऽपि सूक्ष्मतस्मै ।।६।।

अन्यप्रवेशात्स्वगृहं प्रविष्टस्तदीववारे स नरः सुखी स्यात् ।

गृहाद्गतो यो न पुनः प्रयाति तस्मै ।।७।।

स्रष्टा स्वयंभूर्भुवनत्रयस्य त्राता हरीशो हरते पिनाकी ।

एकस्त्रिधा ऋग्यजुःसाममूर्तिस्तस्मै ।।८।।

शन्यष्टकं यः प्रयतः प्रभाते

नित्यं सुपुत्रैः पशुबान्धवैश्च ।

पठेत्तु सौख्यं भूवि भोगयुक्तः

प्राप्नोति निर्वाणपदं तदन्ते ।।९।।

कोणस्थः पिङ्गलो बभ्रुः कृष्णो रौद्रौऽन्तको यमः ।

सौरिः शनैश्चरो मन्दः पिप्पलादेन संस्तुतः ।।१०।।

एतानि दश नामानि प्रातरुत्थाय यः पठेत् ।

शनैश्चरकृता पीडा न कदाचिभ्दविष्यति ।।११।।

इति श्रीब्रह्मांडपुराणे श्रीशनैश्चरस्तोत्रं संपूर्णम् ।

## शनीकवचम् ।

अस्य श्रीशनैश्चरकवचस्तोत्रमंत्रस्य कश्यप ऋषिः । अनुष्टुप्
छंदः । शनैश्चरो देवता । शीं शक्तिः । शूं कीलकम् ।
शनैश्चरप्रीत्यर्थ जपे विनियोगः ।।
नीलाम्बरो नीलवपुः किरीटी
गृध्रस्थितस्त्रासकरो धनुष्मान् ।
चतुर्भुजः सूर्यसुतः प्रसन्नः
सवा मम स्याद्वरदः प्रशान्तः ।।१।।
ब्रह्मोवाच ।।
शृणुध्वमृषयः सर्वे शनीपीडाहरं महत् ।
कवचं शनीराजस्य सौरेरिदमनुत्तमम् ।।२।।
कवचं देवतावासं वज्रपंजरसंज्ञकम् ।
शनैश्चरप्रीतिकरं सर्वसौभाग्यदायकम् ।।३।।
ॐ श्रीशनैश्चरः पातु भालं मे सूर्यनंदनः ।
नेत्रे छायात्मजः पातु पातु कर्णौ यमानुजः ।।४।।
नासां वैवस्वतः पातु मुखं मे भास्करः सदा ।
स्निग्धकंठश्च मे कंठं भुजौ पातु महाभुजः ।।५।।
स्कंधौ पातु शनीश्चैव करौ पातु शुभप्रदः ।
वक्षः पातु यमभ्राता कुक्षिं पात्वसितस्तथा ।।६।।
नाभिं ग्रहपतिः पातु मंदः पातु कटिं तथा ।
ऊरू ममांतकः पातु यमो जानुयुगं तथा ।।७।।
पादौ मंदगतिः पातु सर्वांगं पातु पिप्पलः
अङ्गोपाङ्गानि सर्वाणि रक्षेन्मे सूर्यनंदनः ।।८।।
इत्येतत्कवचं दिव्यं पठेत्सूर्यसुतस्य यः ।
न तस्य जायते पीडा प्रीतो भवति सूर्यजः ।।९।।
व्ययजन्मद्वितीयस्थो मृत्युस्थानगतोऽपि वा ।
कलत्रस्थो गतो वापि सुप्रीतस्तु सदा शनीः ।।१०।।
अष्टमस्थे सूर्यसुते व्यये जन्मद्वितीयगे ।
कवचं पठतो नित्यं न पीडा जायते क्वचित् ।।११।।
इत्येतत्कवचं दिव्यं सौरेर्यन्निर्मितं पुरा ।
द्वादशाष्टमजन्मस्थदोषान्नाशयते सदा ।
जन्मलग्नस्थितान्दोषान्सर्वान्नाशयते प्रभुः ।।१२।।
इति श्रीब्रह्मांडपुराणे ब्रह्मनारदसंवादे शनैःश्चरकवचं संपूर्णम् ।।

## ⊙ विस्तृत वर्णन

(१) युरेनस अथवा प्रजापती या ग्रहाचा शोध लागेपर्यंत नवग्रहामध्ये शनी हाच शेवटचा ग्रह होता. हा ग्रह प्रारब्धकर्म जातकापुढे ठेवतो व ते कर्मफल भोगावयास लावतो. तो विघ्नहर्ता आहे. विघ्ने आणून जातकास योग्य मार्गावर नेण्याचे, त्याच्या मानसिक शुद्धीकरणाचे कार्य शनी करतो.

(२) शनी हा ग्रह तमोगुणी आहे व तो पूर्णपणे पापग्रह अतएव अशुभ ग्रह आहे. तो शीत ग्रह असून धनीकरणाचा (Crystalisation) कारक आहे. राशिचक्रात पूर्ण भ्रमण करण्यास त्यास सुमारे ३० वर्षे लागतात. एका राशीत तो सुमारे अडीच वर्षे असतो. या त्याच्या सावकाश चालण्यामुळे त्यास 'मंद' असे नाव पूर्वाचार्यांनी दिले आहे. तो जातकास चटपटीत बनवित नाही. शनीप्रधान जातक आळशी असतो.

(३) शीत प्रकृती असल्याने आकुंचन करणे, आखडून धरणे हे त्याचे कार्य आहे. विघ्ने निर्माण करतो म्हणून प्रत्येक कार्यास दीर्घकाळ लावतो. अशाने जातक जेरीस येतो व त्यास नैराश्य प्राप्त होते आणि जातक दैववादी बनतो.

(४) शनीच्या याच कर्तृत्वामुळे जातक धिमा बनतो, तो चिकाटीने काम करू लागतो व दीर्घ परिश्रमाने कार्य करून घेतो. जातक चिकाटीने व दृढनिश्चयाने, योग्य धोरण आखून, सखोल विचार करून व चिंतन करून जर कार्याला लागला तर चांगली फले मिळतात. जीवनात स्थैर्य येते.

(५) मनुष्याच्या वासनांचे शुद्धीकरण घडवून आणून नम्रता, पूज्यभाव, सहनशीलता, चिकाटी, त्याग, शांतपणा आणि शरणभाव अंगात बाणवण्याचे कार्य शनी करतो.

(६) शनी मकर व कुंभ राशीचा अधिपती असून तूळ या समन्वयदर्शक राशीमध्ये उच्चत्व पावतो. कुंभ राशीतील शून्य अंश ते वीस अंशापर्यंतच्या भागात शनी मूलत्रिकोणी असतो. शिवाय वृषभ व तूळ राशींमध्ये बलिष्ठ असतो व बलिष्ठ शनी दुःखनाश दर्शवितो व तो शुभ फले देतो.

(७) शनी आयुष्य, उपजीविकेचे साधन, मृत्यूचे कारण दर्शवितो म्हणजे कुंडलीतील ८/१०/१२ या स्थानांचा तो कारक आहे. शिवाय ३/६/११ या उपचय स्थानी शनी अनुकूल फले देतो.

(८) शनीचे सद्‌गुण वर सांगितले आहेत. त्याचे दुर्गुण - लोभ, मोह, निष्ठुरता आहेत. तो दुर्दशा, दैन्य व दारिद्र्य, विपत्ती यांचा कारक आहे. शनीचा अंमल सर्व तऱ्हेच्या अवनती, ऱ्हास, अधःपात, हिणकसपणा व अपमानाच्या घटना यावर आहे. चोरीने धननाश होतो. जातक कर्जबाजारी होतो. त्यास भयगंड निर्माण होते.

(९) पण जातकाने प्रयत्नपूर्वक मानसिक शुद्धीकरण केल्यास पावित्र्य, सद्गुण व विनय, चिकाटी, दीर्घोद्योग या गुणांमुळे त्यावर देव प्रसन्न होतो. इंद्रियनिग्रह करून तप करावयास लावणे ही शनीची अपेक्षा असते.

(१०) शनी हा प्रामुख्याने दैव व नियती यांचा कारक आहे व खनिजसंपत्तीचा प्रधान दिग्दर्शक आहे. सुप्त गुण जागे करवून संपत्तीचा लाभ जातकास घडवून आणण्याचे कार्य शनी करतो. खनिजसंपत्ती काढण्यासाठी जी चिकाटी अथवा प्रयत्न व योजनाबद्ध काम लागते तशीच गोष्ट संपत्तीचा लाभ घडवून आणण्याचे काम शनी करवितो.

(११) शनीचा सर्वांत मोठा धर्म परिपूर्णत्व, निर्दोषपणा अगर सर्वोत्कृष्टपणा हा आहे. चौथ्या परिच्छेदात ही परिपूर्णता कशी येते याचे दिग्दर्शन केले आहे. जबाबदारी, अचूकता व सूक्ष्मता आणि निश्चितता हे शनीचे सद्गुण आहेत. यामुळे कोणत्याही गोष्टीचा शांततेने व दक्षतापूर्वक विचार व कारणमीमांसा व्यवस्थितपणे करण्याची क्षमता येते. मकर, कुंभ, तूळ व वृषभ राशींमधील बलिष्ठ शनी दूरदर्शित्व, मानसिक प्रगल्भता व प्रबुद्धता देतो.

(१३) भौतिक व वस्तुनिष्ठ यापासून मनाची पातळी जेवढी उंचावली जाईल तेवढा जातकाचा कल तुलना, भेदभाव, तारतम्य, युक्ती आणि निर्णय घेण्याकडे वळेल. शनी दूषित नसून बलिष्ठ असेल तेव्हा सत्य, प्रामाणिकपणा, निष्पक्षपातीपणा, सरळपणा, न्याय व कळकळ या गुणांचा विकास होत जातो. खरी शनीप्रधान व्यक्ती ही काटकसरी, भविष्याचा विचार करणारी, नासधूस वा सर्व तऱ्हेची उधळपट्टी टाळणारी असते आणि चिकाटीने, काळजीपूर्वक व वक्तशीरपणा यामुळे यशस्वी होण्याचा प्रयत्न करणारी असते. ती व्यक्ती विचारी व गंभीर असेल पण थिल्लर वा धुंद असणार नाही. सावध, दक्ष मनाची देणगी मिळालेली असल्याने जातकास अभ्यास आणि संशोधन वा तत्सम चिंतन-मनन करण्याची वृत्ती होत असल्याने कोणत्याही कामात त्यास गोडी लागते व आनंद वाटतो.

(१४) शनीचे शुभ परिणाम जातकास सहनशील, इतरांबद्दल आस्था, शिस्त, नियंत्रित भावना, धिमेपणा, आज्ञाधारक, कर्तव्याबद्दल आदर व दक्ष, नेमस्त बनवितो. त्यामुळे जातक पावित्र्य व शुद्धता हे शनीचे बलवर्धक गुण आत्मसात करतो. शुभ शनी व्यक्ती विश्वासू मित्र, एकपत्नीव्रती पती व न्यायी पिता होते.

(१५) शुभ शनीच्या व्यक्तीची कार्यपद्धती, हाती घेतलेले काम परिणामकारकरीत्या पूर्ण करण्याची असल्याने ती व्यक्ती कार्यकुशल व कर्तबगार असून आपले काम योजनाबद्धपणे, पूर्ण विचारांती नियोजन केल्याशिवाय कोणतेही काम हातात घेत नाही. घेतलेले काम पद्धतशीरपणे तडीस नेतात त्यामुळे संथपणे का होईना यश प्राप्त होते आणि मान व श्रेय मिळते. त्यास संपत्ती व समृद्धी प्राप्त होते.

(१६) शनीच्या आधिपत्याखाली सर्व तऱ्हेची धार्मिक व्रते, समारंभ येतात आणि भिक्षू, धर्मगुरू व तत्सम व्यक्तींवर शनीचा अंमल येतो.

(१७) त्याच्या अमलाखाली शरीरातील स्नायू, सांधे, पोटऱ्या, गुडघे, घोटे, गुद्‌द्वार, नखे, दात हे येतात. संधिवात, स्नायू, सांधे आखडणे यामुळे होणारे आजार व व्याधी दर्शवितो. शनी डाव्या कानावरही अंमल करतो. शनी वायुतत्त्वाचा असल्याने स्पर्शविषय-त्वचेस सुख किंवा दुःख देणारा व त्वचेने ग्रहण होणारा स्पर्श विषय त्वचा शनीच्या अमलाखाली येतात.

(१८) पूर्वायुष्यात शनीचा प्रभाव नसतो. उत्तरायुष्यात मात्र त्याच्या नियंत्रणाखाली जीवन व्यतीत होते.

(१९) अविकसित मनाच्या जातकांच्या बाबतीत शनीचे परिणाम अनिष्ट होताना दिसतात. त्यामुळे अशा जातकास तीव्र दुःख व पीडा होते. अशा बहुतांश जातकांच्या बाबतीत ते जर संकुचित व कोत्या मनोवृत्तीचे असल्यास त्यांची मने विद्वेषी व उद्विग्न बनलेली असतात. असे जातक जास्त निष्काळजी, दुराग्रही, कलहप्रिय, वितंडवादी व छिद्रान्वेषी बनतात. लोभ व अतितृष्णा यांनी मन भारलेले असते. अशात जर शनी दूषित असेल तर ती व्यक्ती कपटी, कावेबाज आणि फसवी बनते. दुसऱ्याचे विचार व लिखाण यांची चोरी करून खोटी प्रतिष्ठा व नावलौकिक मिळवून खऱ्या व्यक्तींऐवजी तोतयेगिरी करतात. त्यांचे विचार अप्रामाणिक व हीन असतात. मन आळशी व दीर्घसूत्री असल्याने जातक नालायक व कर्तृत्वशून्य बनतो अगर मन शंकेखोर असून वृत्ती धरसोडीची असते. स्वभाव अनिश्चित असतो. लहानपणीच अशा जातकांवर चांगले संस्कार झाले तर या व्यक्ती पुढे सुधारू शकतात.

(२०) दूषित शनीचा जातक निष्ठुर, दूराग्रही, ताठ वृत्तीचा व लुबाडणारा असतो. मनुष्य उद्धट व उग्र असतो. अविकसित व्यक्ती भित्र्या मनोवृत्तीच्या, संशयी आणि विश्वास न टाकणाऱ्या असतात. सदा संत्रस्त असतात व नैराश्य येते आणि त्यामुळे औदासीन्य, मंदपणा व थंडपणा अशा व्यक्तीत आढळतो. ही अशुभ शनीची फले आहेत.

### ⊙ ग्रह दृष्टियोग

पाश्चात्त्य ज्योतिषशास्त्रात दृष्टियोग ग्रहांच्या परस्परातील अंशात्मक अंतरावर आधारलेले आहेत. पण पौर्वात्य दृष्टियोग अंशात्मक पाहिले जात नाहीत. तर हे ग्रहांच्या राशी व भावस्थितीवर आधारलेले आहेत. शिवाय सर्व ग्रहांना सप्तम स्थानावर दृष्टी

असली तरी मंगळ, शनी व गुरु यांना अनुक्रमे ४ व ८, ३ व १० आणि ५ व ९ या स्थानावर पूर्ण दृष्ट्या दिलेल्या आहेत. आपापल्या पूर्ण दृष्टीशिवाय बाकीच्या ग्रहांना पाव, अर्धा, पाऊण अशा दृष्ट्या आहेत असे मानले जाते. पण पाव, अर्धा व पाऊण म्हणजे काय ? ते राशीचे भागावर आधारलेले आहेत का नक्षत्राच्या चरणावर आधारलेले आहेत याचा स्पष्ट खुलासा जुन्या ग्रंथातही नाही आणि नावाजलेले तज्ज्ञ, ज्योतिषी यांनीसुद्धा त्यावर प्रकाश टाकला नाही की त्यांच्या लेखनातूनही दिसून येत नाही.

असे असले तरी ग्रहांचे एकमेकांशी स्थानसंबंध कसे झाले असता काय फले मिळतात याचा उल्लेख आहे. पण तो फक्त चंद्राबद्दल व काही प्रमाणात रवीबद्दल असतो. तेव्हा त्यांचाच विचार येथे मांडला आहे.

ग्रंथात चंद्राबद्दल अन्य ग्रहांशी युती, द्विर्द्वादशा व त्रिरेकादश योग दिले आहेत.

**(१) चंद्र-शनी युती :** वराहमिहीर फक्त 'पुनर्भूसुतः' एवढेच सांगतात तर सारावलीकार 'जीर्णवधूजनरमणो गजाश्वसम्पावसम्पालिको विगतशीलः । वश्यो विधनः पुरुषः पराजितः स्याच्छशांकशनी योगे ।।' म्हणजे अशक्त पत्नी, जनतेस आवडणारा, हत्ती; घोडे असलेला व कुशीलवान, गरीब, दुसऱ्यांच्या अंकित व पराजित असा जातक असतो.

पण सी.ई. ओ. कार्टर यांच्या मतानुसार, शनीच्या दृष्टिकोनातून ही युती चांगली ठरते. कुंडलीचा दर्जा उच्च असता, जातक दीर्घोद्योगी असतो. तो आत्मविश्वासी असून स्वतःच्या हिमतीवर दीर्घ परिश्रमाने कार्य घडवून आणतो. त्याचा स्वभाव चिकित्सक, वागण्यात व बोलण्यात कठोरता असते. कोणतेही कार्य सर्वदृष्ट्या परिपूर्ण व्हावे असा आग्रह असतो. त्यास बुद्धी उत्तम असते व तो व्यवहारी असतो. कर्तव्य यथायोग्य बजावण्याकडे त्याचा कटाक्ष असतो. थोडक्यात वा संक्षिप्तरीत्या बोलणे व काम करणे त्यास आवडत नाही. मान मिळवतो व जनांना प्रिय होतो. अशा व्यक्ती आयुष्यात वरिष्ठ पदावर जातात पण तेही त्यांना सहज मिळत नाही. वरचा अधिकारी निवृत्त झाल्यानंतर वा बदली वा मृत झाल्यावरच यांचा नंबर लागतो. परंपरेने उत्तराधिकार मिळतो.

कुंडलीचा दर्जा उच्च नसता जातक असमाधानी असून संकुचित मनोवृत्तीचा असतो. फाजील आत्मविश्वास असतो आणि हाती घेतलेले वा सोपविलेले काम परिपूर्ण करण्याचे कसब आपल्यात आहे अशी घमेंड त्यास असते.

मातृसुख लवकर हरपते व जातकाचा सांभाळ अन्य नातेवाईक करतात. मातेचे प्रेम लाभत नाही. विवाह उशिरा होतो, पत्नी वयाने जातकाच्या बरोबरीची किंवा त्याच्याहून मोठी असते. हा योग शेती, खाणी व स्थावराच्या कामास चांगला असतो.

## (१) द्विर्दादश योग : सुनफा व अनफा योग

**(अ) चंद्राचे द्वितियांत शनी सुनफा योग :** जातक कसबी, हरहुन्नरी असतो. त्यांच्या संपर्कातील लोक त्यास मान देतात. तो कष्टाळू असतो व कर्तव्यदक्ष असतो. धैर्यवान असतो. काम मनापासून करतो. तो धनसमृद्ध असतो. संपत्ती चांगली मिळवितो.

**(ब) चंद्राचे व्ययस्थानी शनी अनफा योग :** जातक आडव्या बांध्याचा असून तो पुढारीपण करतो. पुढे-पुढे असतो. तो गुणवान असतो व आपले म्हणणे व वचन पूर्ण करतो.

दोन्ही योगात शिस्तप्रियता व कडक स्वभाव व आचार असतो.

## (२) त्रिरेकादश योग : कारक व बोधक

(अ) चंद्रापासून शनी अकरावा (म्हणजेच शनीपासून चंद्र तिसरा) यांत शनीची दृष्टी चंद्रावर येते. शनी हा कारक अवस्थेत मित्र. सर्वसाधारणपणे संपत्ती व निर्धनता आलटून-पालटून. मित्र असल्याने हलक्या दर्जाचे लोकांकडून त्राव व पीडा, अग्नीपासून भय व चोर-दरोडेखोरांपासून त्रास. मनाचा समतोल राहत नाही.

(ब) चंद्रापासून शनी अकरावा (म्हणजेच चंद्रापासून शनी तिसरा) चंद्र बोधक व मित्र असतो. अधिकारप्राप्ती, उत्तम लाभ, सरकारदरबारी आदर व मान, उच्च विद्या, विनोदी बुद्धी, सर्व सुख, मानसन्मान यांची प्राप्ती. धार्मिकता, त्रिरेकादशाची फले सर्वार्थ चिंतामणीमधून घेतलेली आहेत.

## ⊙ रवी-शनी दृष्टियोग

**युती : बृहज्जातक :** धातू व मृत्तिका यांचे पदार्थ तयार करणारा किंवा विकणारा व भांडी घडविणारा होतो.

**सारावली :** धातुशास्त्रज्ञ, धार्मिक, कर्तव्यपालन करणारा, पत्नी व पुत्र यांचे सौख्य कमी-लवकर जातात - पुत्रशोक होतो. स्वच्छता व टापटिपीचा असतो. खनिज पदार्थांचा व्यापार करतो. जातक विद्वान, लवकर प्रौढत्व - अकाली प्रौढ होतो. धनवान.

**नवाथे :** अपयशी, दिवाळखोर, अनेक प्रकारची संकटे भोगणारा व बापाचे सुख कमी. अशी कृत्ये करतो की, ती शेवटी अंगलट येतात व विफल होतात. मनुष्य मोठ्या योग्यतेस जातो पण केव्हातरी तो पडतो. बाप, वडीलधारी माणसे, आर्थिक अवकृपा होते व पक्षाघातासारखा विकार होण्याचा संभव असतो.

**कार्टर** : जातक स्वयंसिद्ध असतो व स्वकर्तृत्वावर उत्तम यश मिळते आणि मानसन्मानही प्राप्त होतात. परंतु पिता कठोर असतो व त्याचे जातकावर वर्चस्व व धाक असतो. जातकाबद्दल प्रेम नसते. पिता दुर्दैवी असतो. जातकास बालपणी सुख लाभत नाही.

रवी बलवान असता जातक बेजबाबदार व आळशी आणि महत्त्वाची कामे त्वरेने व काळजीपूर्वक केली जात नाहीत.

शनी बलवान असता फक्त कर्तव्याकडे लक्ष. त्यात तत्परता असते पण भावना (स्वतःच्या व इतरांच्या) मारल्या जातात.

### ⊙ द्विर्द्वादश योग – ग्रंथोक्त फले (सारावली)

**(१) वेशियोग** : रवीपासून शनी दुसरा असता जातक दुष्ट बुद्धीचा, प्रौढ, म्हातारा दिसतो. खोटारडा व कपटी व तुच्छतेने वागतो. पण संपत्ती मिळवितो.

**(२) वाशियोग** : रवीच्या व्ययात शनी असता - दुष्ट बुद्धी, धन चोरी करतो. वडीलधाऱ्यांचा मान राखत नाही. त्यांना तुच्छ लेखतो. व्यापारी असतो.

रवीपासून शनी ६ वा हा षडाष्टकाचा एक प्रकार असून तो रवीच्या षष्ठात शनी असणे शनी पाप ग्रह असून तो रवीचा शत्रू होतो. याचे फळ - स्थावर व संपत्ती तसेच अधिकार यांचा नाश, ऱ्हास होतो. त्यामुळे निर्धनता येते. मग कदान्न, कसलेही कपडे व निराशावादी होतो.

### शनी - युरेनस (हर्षल)

शनी स्थिरता, धिमेपणा, विचारीपणा, पुराणमतवादी आणि विलंबकारी तर युरेनस प्रबोधनकार, संशोधक, शास्त्रज्ञ, नवमतवादी विचारसरणी, अचानक-आकस्मिक कृती असते. शनी हा बुद्धी देणारा आहे पण युरेनस असामान्य बुद्धीचा. शनी कामगारवर्गदर्शक तर युरेनस मालक, यंत्रज्ञदर्शक आहे.

**युती** : गाढ, सखोल विचारसरणी, मानसिकदृष्ट्या बलिष्ठ, महत्त्वाकांक्षी, निग्रही. संशोधक बुद्धी, कल्पनाशक्ती, बुद्धिमत्ता, एकमेवाद्वितीय, यंत्रकौशल्य, एकाग्रता.

प्रवर्तक, विशाल दृष्टिकोन, मानसिक व शारीरिक उत्साह, उद्‌बोधक निश्चयीपणा, जबरदस्त आत्मविश्वास, स्वार्थीपणा, शारीरिक शक्ती व काटकपणा असतो परंतु अपघातप्रवण योग असतो. घातपातही होऊ शकतो. दोघे ज्या भावांचे अधिपती असतात त्या भावांसंबंधात अथवा ते ज्या भावांत असतात त्या भावफलाबद्दल चिंता.

शुभ ग्रहांच्या शुभयोगात दीर्घायुष्यदर्शक व या शुभग्रहांच्या माध्यमातून जातकास वेळोवेळी मदत मिळते. जीवनात अधूनमधून शुभाशुभ घटना घडतात.

**केंद्रयोग :** अशुभ असतो. द्विस्वभाव राशीतून होणाऱ्या केंद्रयोगापेक्षा चरराशी व स्थिर राशीतून येणारा केंद्रयोग जास्त अशुभ ठरतो. युरेनस ज्या भावात असेल त्या भावावरून विचारात घ्यावयाच्या गोष्टीत अशुभ फले मिळतात. व्यक्तीचा स्वभाव तिरसट, तापट, लहरी, हेकेखोर असतो. अपघातदर्शक, संधी न मिळाल्यामुळे अगर मिळालेल्या संधीचा उपयोग करण्याची क्षमता नसल्यामुळे दुर्भाग्य असते.

जातक विक्षिप्त, लहरी व चमत्कारिक, छंदिष्टपणा यामुळे दैवाचे फासे उलटे पडलेले दिसतात.

**प्रतियोग :** अशुभ फले मिळतात पण या योगाची फले व्यक्तीच्या जीवनात एकदम न मिळता एकामागून एक काही अंतराने मिळतात व स्थित्यंतरे होतात. व्यक्तीचे जीवन अपयशी होते. ४२ वर्षांनंतर जीवनात स्थित्यंतर होते.

हा योग जीवनात प्रवाहाविरुद्ध पोहण्यास लावणारा, प्रतिकूल वातावरणात काळ काढण्यास लावणारा व जिद्दीने अंगीकारलेल्या कार्यात हमखास यश देणारा असा हा प्रतियोग आहे.

स्वतःच्या विचाराचे विरुद्ध वर्तन असते. (Act in manner exactly opposit to the native's and theories and often to alter the eatter erratically ringing all the changes.)

अधिकार मिळविण्याची सुप्त इच्छा असते व ती व्यक्तीच्या कृतीत निरनिराळ्या तऱ्हेने प्रत्ययास येते.

**त्रिकोण योग :** निश्चयी वृत्ती व चिकाटी हे या योगाचे प्रमुख गुण आहेत. व्यक्ती बुद्धिमान असतात. बौद्धिक राशीतून होणारा योग शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात यश देतो.

**लाभयोग :** हा शुभ फले देणारा योग आहे. शनी केंद्रात असून होणारा लाभयोग जास्त उत्तम फले देतो. युरेनस केंद्रात असून शनीशी होणारा लाभयोग वरीलपेक्षा कमी फल देणारा, कमी प्रतीचा आहे. पण कोणताही ग्रह केंद्रात नसता होणारा लाभयोग कमी प्रतीचा योग आहे. आत्मिक बल, उत्साह, संघटना कौशल्य, मोठमोठ्या जबाबदाऱ्या पेलण्याची शक्ती, कामाचा उरक व लौकिक ही लाभयोगाची फले आहेत. हा योग सांपत्तिकदृष्ट्या शुभ असतो. बुद्धिमान व व्यवहारकुशल अशा व्यक्ती असतात.

### शनी-नेपच्यून

**युती :** ही युती शुभ वा अशुभ दोन्हीही होऊ शकते. या दोन ग्रहांशी शुभयोग असता जातकाचा उत्कर्ष होतो. मूलतः नेपच्यूनमध्ये शुभ व अशुभ असे गुण आहेत. तो

गूढवादी, अतिंद्रिय शक्ती व अन्य मानसिक शक्तींचा कारक आहे. कुंडली अध्यात्माची दिसत असल्यास जातक त्या मार्गात उच्च पदास जाऊ शकतो. संगीत, वाद्यवादन व सिनेमा यांच्याशी त्याचा संबंध असतो. रवीशी संबंध असता तंतुवाद्याचा संबंध येतो. शुक्राशी युती असता पहिल्या प्रतीचे गायन येते. तसाच सिनेमा व्यवसाय करणाऱ्यांचे कुंडल्यांत हा प्रामुख्याने दिसतो. गुरुशी शुभसंबंधित असता अतिंद्रिय शक्ती प्राप्त होते.

परंतु नेपच्यूनचे गूढत्व कारस्थानीपणा दर्शविते. शनी, नेपच्यून युती असणारा जातक धूर्त, कावेबाज, कारस्थानी असतो.

अन्य ठिकाणी तो खोटेपणा, बनवाबनवी, फसवेगिरी करणारा दिसतो. मनाचा गोंधळ करतो. योग्य मार्ग दिसत नाहीत. जातक चुकीच्या मार्गाने जातो.

नेपच्यून कुलंगडी करण्यात प्रमुख असतो. त्याच्यामुळे जातकाची मानहानी, कुप्रसिद्धी होते. वैवाहिक जीवनात त्याचा संबंध दिसल्यास तो अनैतिक मार्गाकडे नेतो. मद्य, मदिराक्षी यांचे व्यसन चंद्र-नेपच्यून संबंधात दिसते.

शनी-नेपच्यून युती शुभ असता चिकाटी, सतत काम करण्याची शक्ती व आत्मविश्वास असतो. राजकारण, समाजकारण वा धर्मकारण यांच्याशी संबंध असतो. युती पीडित असते. अपयश, बंधनयोग, मानसिक पीडा, आर्थिक उलाढाली व अपकर्म, गुप्त शत्रुत्व, गृहसौख्य व वैवाहिक सौख्यात कमतरता व जीवनात मोठी स्थित्यंतरे घडतात.

प्रतियोग व केंद्रयोग दोन्हीही अशुभ आहेत. प्रतियोगात शनीचे आयुष्यकारकत्व व जीवनलौकिक बिघडविण्याचे काम केले जाते. दर दहा वर्षांनी स्थित्यंतरे, दगदग, कोणतेही काम सरळ न होणे, व्यवसायात वा नोकरीत अनपेक्षित बदल, आर्थिक बाबतीत प्रतिकूल काळ अनुभवास येतो. मोठी स्थित्यंतरे, मानसिक ताण व दौर्बल्य निर्माण होते. या योगामुळे वातविकार, अर्धांगवायू हे रोग होण्याची शक्यता असते.

केंद्रयोगात भरभराट व अपकर्ष होतो. आयुष्यात स्थैर्य मिळत नाही. कौटुंबिक अनास्था, दीर्घ मुदतीचा आजार, स्थावरसंबंधी अपयश येते, जनमानसात जातकाची बदनामी, अपकर्ष हे अनुभवास येतात. दगदग, कष्ट व प्रतिकूल परिस्थिती अशा गोष्टी सतत घडतात.

**त्रिकोण योग :** उत्तम मानसिक शक्ती, अंतर्ज्ञान, विचारीपणा, धोरणीपणा, आत्मसंयम, धर्मप्रेम व रूढिप्रियता असते. महात्मा गांधींच्या कुंडलीत शनी-नेपच्यूनचा पूर्ण त्रिकोण आहे, त्यामुळे त्यांचा आतला आवाज, प्रार्थना, योगसाधना यांचा प्रत्यय येतो.

**लाभयोग** : आर्थिक उत्कर्ष, लौकिकदृष्ट्या शुभ फले मिळतात. कारखाने, रसायनशाळा, हॉस्पिटल्स, खाणी, तेलाच्या विहिरी, सहकारी संस्था, सामाजिक व धर्मसंस्था वगैरेंशी जातकाचा संबंध येतो.

राहू-केतू आणि शनी यांचे योग आपत्ती आणणारे व सर्वांत वाईट योग ठरतात. शनी राहू युतीवर गुरुची दृष्टीसुद्धा उपयोगी पडत नाही.

शनीची मंगळाशी युती असल्यास भावंडांना मारक ठरते. युती व प्रतियोग चांगली फले देत नाहीत. शनी-मंगळ प्रतियोग लग्न सप्तमातून होत असता तीव्र मतभेद, घटस्फोट वा द्विभार्या योग, वैधव्य योग असे प्रकार घडताना दिसतात.

## शनी-प्लूटो

**युती** : आयुष्यात मोठमोठी स्थित्यंतरे घडवून दैवदुर्विलास उत्पन्न करते. बधंन योग, गुन्ह्यात सापडणे, दुःस्थानी इतर पापग्रह असता अपघातदर्शक. मोठे गृहकलह वा घराण्यातील संकटेदर्शक युती असते. जमावात, गर्दीत, स्फोटात वा इतर प्रकारे सार्वजनिक स्थानी अपघात होणे, काही कुंडल्यांत आत्मघाताचा प्रत्यय येतो. शनी ज्या भावाचा अधिपती असतो तद्दर्शक फलात दैवदुर्विलासदर्शक अगर ज्या भावात युती येते त्या भावांची अशुभ फले. उंचावरून पडणे, वृक्ष अंगावर पडणे, जुनी वास्तू पडणे.

**त्रिकोण योग** : रसायनशास्त्र, धातुशास्त्र, अर्थशास्त्र वा तत्त्वज्ञान वगैरे विषयांतील संशोधनास उत्तम.

**लाभयोग** : मोठमोठ्या खाणी, कारखाने, संप्रदाय, सहकारी चळवळी वा राजकीय व शैक्षणिक चळवळींशी वा संस्थांशी संबंध येतो. गूढ चळवळीत भाग.

**केंद्रयोग** : सदैव खूप श्रम केल्यावर यश, वातविकार उद्‌भवतात अगर कॅन्सरसारखा रोग होणे वा अपघात, राजकीय बंधन योग.

**प्रतियोग** : काही वेळा फारच पीडित असा प्लूटो अशुभ युतीयोगासारखी फले देतो. उंचावरून पडणे, वृक्ष अंगावर पडणे, जुन्या वास्तूत ती पडल्यामुळे अपघात होणे, रेल्वेच्या मोठ्या अपघातात सापडणे.

संसर्गजन्य रोग वा दीर्घ मुदतीचा रोग होणे वा त्यात अनास्था होणे, गुंडांच्या मारामारीत सापडणे.

## गुरु व शनी

या दोन ग्रहांमध्ये युती, लाभयोग व त्रिकोण योग असता चांगली फले मिळतात.

**केंद्रयोग** : दोन तऱ्हेने होतो. (१) गुरुच्या चतुर्थात शनी व (२) गुरुच्या दशमात शनी.

दोन्ही योगांवर माणूस कष्टी होतो व ध्येय गाठण्यास श्रम पडतात. केंद्रयोगावर मान मिळेल पण पैसा नाही.

**(१) गुरुचे चतुर्थात शनी :** मुले वाईट चालीची निघतात. त्यांच्यापासून सुख नाही वा संतती चिंता राहते.

**(२) गुरुचे दशमात शनी :** वरीलपेक्षा बरा. एखाद्या पुत्राचे सुख मिळेल.

सर्वसाधारणपणे केंद्रयोगात अपयश मिळते. सांसारिक अव्यवस्था, नुकसान व विवंचना, धंद्यात किंवा नोकरीत अडथळे व त्रास, शेअरच्या धंद्यात पैसे गुंतविणे अत्यंत धोक्याचे ठरते. अविश्वासाने किंवा फसवणुकीने नुकसान होते. नैराश्य वृत्ती येते वा बेफिकीरपणा असतो.

**षडाष्टक :** बेफिकीरपणाने वागणे व कोणत्याही कामात फार अडथळे जाणवणे. विद्येच्या कामी अडथळे येतात, परीक्षेत अपयश येते.

**शश योग**

पंचमहापुरुषयोगांपैकी शनीच्या विशिष्ट राशिस्थान स्थिती यामुळे होणारा हा योग आहे. शनी हा १,४,७,१० या केंद्रभावात स्वगृही अगर उच्च राशीत असता जो योग होतो त्यास 'शश योग' असे नाव आहे. याची फले ग्रंथात दिली आहेत ती अशी :

दात लहान, चेहरा बारीक, भरभर चालणारा, मुत्सद्दी, पराक्रमी असून जातकास वन, दुर्ग, पर्वत यातून हिंडण्याची आवड असते. उदर कृश, आत असते व शरीरयष्टी उंच असते. तो सैन्याचा सेनापती असून प्रसिद्ध असतो व होतो. कोणत्याही कार्यात यशस्वी होतो. दात थोडे पुढे असतात. तो धातुशास्त्रज्ञही असतो. डोळे सुंदर, 'कमळाक्ष' असे म्हणतात, तसे असतात. जातक चंचल असतो. परधन, परगृह व परस्त्री यांचा अभिलाषी असतो पण तो मातृभक्त असतो. कंबर बारीक, सिंहकटी असून महाबुद्धिमान असतो. प्रतिपक्षाचे दुर्बल स्थान अगर दोषावर नेमके बोट ठेवतो. त्याच्या हातावर शंख, पद्म, चक्र, माला व मृदंग यांपैकी कोणती तरी चिन्हे असतात.

अशा वर्णनाचा जातक एखाद्या देशाचा राज्यकर्ता असून वयाच्या ७० व्या वर्षी मरण पावतो. कै. डॉ. रामनचे म्हणण्याप्रमाणे प्रत्यक्ष राजा असण्याचा योग दुर्मीळ असतो. एखाद्या शहराचा मुख्य होणेही या योगात बसते.

पण जातक तत्त्वशून्य व अनीतिमान असतो. चंद्र जर बलवान असेल व शुभ असेल तर पराधन, परस्त्री यांची अभिलाषा राहत नाही. जातक प्रसिद्ध होतो. नीतिमत्ता प्रभावी असेल तर असा जातक लोकप्रिय व नेता होतो.

हल्लीच्या युगात अशा योगावर मंत्रिपदारूढ व्यक्तीही असू शकेल. पण भ्रष्टाचारमुक्त असा जातक असावा लागेल.

**ग्रहांच्या पाचकादी अवस्था व परिणाम**

| ग्रहसंबंध | रवी | चंद्र | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. पाचक | शनी ६ वा | शुक्र ७ वा | रवी २ रा | चंद्र २ रा | शनी ६ वा | मंगळ २ रा | शुक्र ३ रा |
| २. बोधक | मंगळ ७ वा | मंगळ ९ वा | चंद्र ६ वा | गुरु ४ था | मंगळ ५ वा | बुध ६ वा | चंद्र ११ वा |
| ३ कारक | गुरु ९ वा | शनी ११ वा | शनी ११ वा | शुक्र ५ वा | चंद्र ७ वा | रवी १२ वा | गुरु ६ वा |
| ४ वेधक | शुक्र ११ वा | रवी ३ रा | बुध १२ वा | मंगळ ३ रा | रवी १२ वा | शनी ४ था | मंगळ ७ वा |

**पाचकादी अवस्थांतील ग्रहांचे शत्रू-मित्रत्व**

(१) **पाचक ग्रह :** रवी, चंद्र आणि गुरु यांचा शत्रू, बाकीचे मित्र

(२) **बोधक ग्रह :** बुधाचा शत्रू, बाकीचे मित्र

(३) **कारक ग्रह :** शुक्र आणि शनी यांचा शत्रू, बाकीचे मित्र

(४) **वेधक ग्रह :** मंगळ, गुरु आणि शुक्र यांचा शत्रू, बाकीचे मित्र

**पाचकादी अवस्थेतील ग्रहांची फले**

(१) **पाचक ग्रह :** मित्र असता जातकास उत्तम अन्न, चांगले दूध-दुभते, भारी व उंची वस्त्रे, दागिने, अधिकार, संपत्ती आणि स्थावर यांचा लाभ असतो. तो सुखी असतो. जातक धैर्यवान, आशावादी, भरपूर उत्साही आणि यशस्वी होतो.

शत्रू असता - स्थावर व संपत्ती, अधिकार यांचा नाश व ऱ्हास आणि वरील सर्व बाबतीत पीडा, दुःख प्राप्त होते.

**(२) बोधक ग्रह :** मित्र असता - अधिकारप्राप्ती, उत्तम लाभ, सरकार-दरबारी आदर व मान, उच्च विद्या, विनोदी बुद्धी, सर्व सुख, मान-सन्मान यांची प्राप्ती व धार्मिकता.

शत्रू असता -वर दिलेले शुभ परिणाम मिळत नाहीत व यांच्या उलट परिस्थिती प्राप्त होते.

**(३) कारक ग्रह :** सर्वसाधारणतः संपत्ती व दारिद्र्य आलटून-पालटून. मित्र असता हलक्या लोकांकडून त्रास, अग्नीपासून भय व चोर-दरोडेखोरांपासून त्रास.

**शत्रू असता -** वरील फले मिळत नाहीत आणि जीवन सुखी व यशस्वी होते.

**(४) वेधक ग्रह :** मित्र असता - चोर, अग्नी व शत्रू यांचे भय, शासनाची अवकृपा, परदेश प्रवास, संपत्तीचा ऱ्हास व सुखाचा अभाव असतो.

**शत्रू असता -** वरील फले मिळत नाहीत, उलट जातक यशस्वी व सुखी होतो आणि त्याबद्दल आदर असतो व त्यास मान मिळतो.

**टीप :** वेधक म्हणजे अडथळे आणणारा, त्रास देणारा ग्रह. वेधक ग्रह मित्र असता मित्राकडे वरील दुर्गुण असतात आणि जातकास दरोडेखोरांची भीती असते.

**वेधक ग्रह** मित्र असता - तो नकारात्मक असतो. मित्र म्हणून जवळ येतो व त्रासदायक ठरतो. संगतीचा परिणाम होतो. ग्रह शत्रू असता आपले मित्र तरी वाईट नसतात.

सुख व दुःख, मान व अवमान व्यक्तीच्या स्वभावावर अवलंबून असतात. योग्य तऱ्हेने वागणे आणि चांगले मित्र जोडणे हा खरा मार्ग असतो.


सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता । परोददाति शति कुबुद्धीरेषा ।।

❂ ❂ ❂

१

# प्रथम भाव

**(शरीरसंपदा, बालपण, स्वभाव)**




सोबतच्या कुंडलीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी एक हा अंक लिहिलेला आहे त्या स्थानाला कुंडलीतील किंवा पत्रिकेमधील प्रथम स्थान किंवा पहिले स्थान म्हणतात.

कोणत्याही ग्रहाची भावफले राशिपरत्वे व योगपरत्वे भिन्न-भिन्न असतात. तसेच त्याच्या भावेशत्वाचाही परिणाम फल निर्णय करताना विचारात घ्यावा लागतो.

शनी हा जुन्या सहा ग्रहांपैकी शेवटचा बहिर्वर्ती ग्रह आहे. त्याला सूर्याभोवती प्रदक्षिणा घालण्यास म्हणजे बारा राशींतून भ्रमण करण्यास सुमारे ३० वर्षे लागतात. एकेका राशीत त्याचे वास्तव्य अडीच वर्षे असते. म्हणजे दर महिन्यास सुमारे एक अंश ही शनीची मध्यम गती असते. तशात तो वक्री मार्गी असला म्हणजे एका अंशावर बराच काळ राहतो व त्याच त्या अंशास पीडा, त्रास देत असतो आणि 'दुःखं दिनेशात्मजाम्' हे आपले कारकत्वाचे ब्रीदवाक्य सार्थ करतो. हे साडेसातीवरून दिसून येते. म्हणून शनीच्या नक्षत्रगत व नवांशगत फलांचा विचार करीत असताना षष्ठ्यांशही विचारात घ्यावेत असे सुचवितो.

वरील सर्व गोष्टी समोर ठेवून व तारतम्याने शनीच्या भावफलांचा विचार ज्योतिष्याभ्यासूने करावा. त्यास मार्गदर्शक म्हणून द्वादश भावांची राशिपरत्वे फले काय असू शकतील याचे दिग्दर्शन यापुढे करीत आहे.

शनी हा नैसर्गिक पापग्रह आहे. नैसर्गिक पापग्रह कुंडलीतील ३, ६, १० व ११ या स्थानांत चांगली फले देतात. सप्तम स्थानात शनीस दिग्बल असते व तेथे राशिबल असता त्याची शुभ फले मिळतात. ५ व ९ या त्रिकोण स्थानातही त्यास राशिबल, भावेशबल यांची आवश्यकता असते. शनी ८ व १२ या स्थानांचा कारक असतो. एक व चार या दोन केंद्रस्थानात शनी योगकारक वा लग्नेश असता चांगली फले मिळतात. दोन व बारा या स्थानात शनी मिश्रफले देतो.

## प्रथम भाव (तनुस्थान)

या स्थानावरून जातकाचा शरीरबांधा, शरीरयष्टी, रंग, रूप, शरीरसंपदा, बालपण, आरोग्य, जन्मकाळची परिस्थिती, स्वभाव आणि कुंडलीचा दर्जा, जातकाची क्षमता आणि त्याचा कल कोणत्या गोष्टींकडे आहे व त्याच्या आवडी-निवडी काय आहेत यांचा विचार होतो.

जेव्हा लग्नेश उच्च राशीत शुभ संबंधित व बलवान असून केंद्रात असेल व शुभ ग्रहांच्या दृष्टीत असेल तेव्हा जातक निरोगी, देखणा असून त्याचे आयुष्य सुखाचे जाते. लग्नेश लग्नात असणे, अगर त्याची दृष्टी तरी लग्नावर असावी असे शास्त्रकार सांगतात, म्हणजेच त्याची शुभ फले मिळतात.

जर लग्नेश अशुभ ग्रहांच्या युतीत असून अष्टमात असेल तर जातकाचे आयुष्य सुखी नसते. तसेच लग्नेश ६, ८, १२ या स्थानात असेल अथवा त्यांच्या अधिपतींनी युक्त असेल तर जातकाच्या आरोग्यसंबंधी काहीना काही तक्रारी असतात वा तो रोगट प्रकृतीचा, अपघातप्रवण, अगर काही त्रास, व्यंग असलेला असतो.

राहू लग्नी असून पापग्रहाच्या युतीत असेल तर जातक चोर वा लबाड लोक यांच्याकडून फसविला जातो.

लग्नी शुभ ग्रह असणे अगर लग्नावर शुभ ग्रहांची दृष्टी असणे हेच महत्त्वाचे असते. असा जातक सुदृढशरीराचा, निरोगी असतो व त्याची उन्नती लवकर होते.

लग्नी शनी असता सर्वसाधारणपणे काय फले मिळू शकतात हे वराहमिहीर पुढीलप्रमाणे दर्शवितात :

**अदृष्टार्थो रोगी मदनवशगोऽत्यन्त मलिनः ।**
**शिशुत्वे पीडार्त्तः सवितृसुतलग्नेऽत्य अलसवाक् ।।**

म्हणजे - दरिद्री, रोगट प्रकृतीचा जातक असतो, त्यास विषयवासना जास्त असते, त्याची राहणी गलिच्छ असते. तो बाल्यावस्थेत पीडित असतो आणि आळशी असून अस्पष्ट बोलणारा जातक शनी लग्नी असता होतो.

सर्वच लग्नराशीतील शनीची फले वरीलप्रमाणे मिळत नसतात, अशी वस्तुस्थिती असल्याने वराहमिहीर पुढे सांगतात :

**गुरुस्वर्क्षोच्चस्थे नृपतिसदृशो ग्रामपुरवः ।**
**सुविद्वांश्चार्थङ्गो दिनकरसमोऽन्य च कथितः ।।**

म्हणजे - गुरुच्या राशीत (धनू व मीन लग्नी), स्वतःच्या राशीत (मकर व कुंभ), उच्च राशीत (तुळेत) अशा राशीत लग्नी शनी असता जातक विद्वान, सुडौल शरीराचा असून राजासमान मोठा होतो व ग्रामाधिपती (नगराध्यक्ष, महापौर, सरपंच) होतो व आपल्या गावात मोठा मान मिळवितो.

सारावलीकार हेच सांगतात :

**स्वोच्चस्वकीय भवने क्षितिपालतुल्यो**
**लग्नेऽर्कजे भवति देशपुराधि नाथः ।**
**शेषेशु दुःखगदपीडित एव बाल्ये**
**दरिद्रच कर्मवशगो मलिनोऽलसश्च ।।**

सारावलीकार स्वोच्च, स्वकीय भवने म्हणजे स्वभवने मकर व कुंभ, उच्च भवने-तूळ, स्वकीय भवने-धनु व मीन या राशीतील लग्नी शनी जातकास राजासमान करतो. वा पुराचा म्हणजे गाव, शहरे यांचा मालक होतो असे स्पष्टपणे सांगतात. वृषभ लग्नास शनी नवमेश व दशमेश असल्याने राजयोगकारक असतो. त्यामुळे वृषभ लग्नी असताही शुभ फले मिळतात. या सर्व लग्नास शनी धनयोग व भाग्ययोग देणारा होतो. जातक स्वकर्तृत्वाने, स्वतःच्या मेहनतीवर धन-दौलत, मान-सन्मान मिळवितो.

परंतु अन्य राशींचा शनी लग्नी असता जातकास बाल्यावस्थेत त्रास, व्याधी होतात व तो दुःखी-कष्टी असतो आणि असा जातक गरीब असतो. राहणी मलीन असते. आळशी असतो आणि कर्मवश - जुगारी, व्यसनी, कामवश असतो. त्याच्या संपत्तीचा ऱ्हास होतो. त्यास नाकाच्या वा अन्य व्याधी होतात. क्वचित पंगूही होतो.

अन्य आचार्यांच्या म्हणण्याप्रमाणे जातक अभागी असतो. पत्नीचा तिरस्कार करतो व कुटुंबीयांपासून दूर जातो पण दीर्घायू असतो. लग्नातील शनीची तृतीयेवर दृष्टी येते त्यामुळे भावंडांची भरभराट होत नाही. दशमावर दृष्टी असल्याने उद्योग-व्यवसायात कमनशिबी ठरतो. सप्तमावरील दृष्टीमुळे तो प्रवासी असतो व पत्नीशी पटत नाही. तो जननिंदेस पात्र होतो. त्यास वातविकार होतात. कानाचे विकार होतात. कमी ऐकू येते.

पण अशा शनीवर शुभ ग्रहांची दृष्टी असता ठीक असते. परिस्थिती सुधारते. जातक कष्टाळू असतो. सतत उद्योग करतो. इतरांनाही मदत करतो. कर्क व सिंह लग्नी शनी असता जातकाची विशेष कर्तबगारी दिसून येते.

**डॉ. बी. व्ही. रामन** लग्नातील शनीबाबत स्थूलमानाने असे सांगतात - जातक परकीयांच्या चालीरीती सहज उचलतो व त्यांची नक्कल करतो. शनी दूषित नसता इतरांच्या कल्याणाबद्दल आस्था व काळजी असते. त्यास आत्मविश्वास असतो व तो समर्थनीय ठरतो. जातकास नैतिक अधिष्ठान व स्थैर्य असते. कोणत्याही कार्यात सावकाश पण निश्चित प्रगती असते. पण जातक स्वतः जबाबदारी घेण्याचे टाळतो. स्वभाव शांत, गंभीर व विचारी असतो. शरीर दुबळे व कृश असते. निष्क्रिय सवयी असतात. लहान वयात संकटे येतात. संधी न मिळाल्याने अगर निष्काळजीपणाने नुकसान होते.

## प्रथमस्थ शनीची राशीनिहाय भावफले

**(१) मेषेचा शनी :** प्रथम स्थानामध्ये जेव्हा एक हा अंक येतो तेव्हा तेथे असलेल्या शनीला 'मेषेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मेषेतील शनीबद्दल वरामिहीर ''मूर्खोऽटनः कपटन्विसुहृद्धमेऽजे'' असे सांगतात.

म्हणजे - त्यांच्या मते, असा जातक मूर्ख व नित्यप्रवासी असतो. तसाच तो कपटी असून त्याला कोणी मित्र नसतात. गुणाकर यांचे मते, मातृसुख नसलेला व सदा दुःखी असा जातक असतो आणि सारावलीकार त्याचा विस्तार पुढीलप्रमाणे करतात -

**व्यसनपरिश्रमतप्तः प्रपंचशीलः स्वबन्धुपक्षघ्नः ।**
**निष्ठूर धृष्टातिवचा विगर्हितो निर्धनः कुवेषश्च ।। १ ।।**
**मेषेऽर्कजे सुरोषो जघन्यकर्मा व लब्धदोषोऽपि ।**
**प्रियवैरो नैकृतिको नृशंसकोऽ सूयकः पापः ।। २ ।।**

त्यांच्या मते, मेष लग्नी शीन असलेला जातक दुर्गुणी असतो पण कष्टाळू असतो. तो खोटारडा असून आपल्या नातेवाइकांचा तिरस्कार करतो. जातक निष्ठुर व अतिवाह्यात बोलणारा आणि भांडणे उकरून काढतो. दिसण्यात कुरूप असून वेषही घाणेरडा करतो; त्यास इतर लोक नावे ठेवतात. स्वपक्षीयांचे वैर ओढवून घेतो आणि तो मत्सरी व पापकर्मा असतो व हलकी कामे करतो.

काही आचार्यांच्या मते, मेषेतील लग्नी शनी महाधूर्त असतो. जातक पटकन रागावतो. लहानपण कष्टात जाते अशी वस्तुस्थिती असते. मातृसुख कमी मिळते त्यामुळे जातकाचे संगोपन नीट होत नाही.

मेष लग्नास शनी दशमेश व लाभेश असतो. चर लग्नास एकादश स्थान हे बाधक स्थान आहे. त्यामुळे शनी एकादशाचा अधिपती असल्याने तो बाधकेश असतो आणि लग्नी नीच राशीत येतो. शरीरसुखास शनी बाधक ठरतो पण संपत्ती मिळण्याची वानवा असते. शिवाय मित्रवर्गही नसतो. जातकास सांपत्तिक लाभ होत नाहीत व त्याच्या आकांक्षाही पुऱ्या होत नाहीत. जातकाच्या कपटी स्वभावामुळे व दुर्वर्तनाने मित्र नसतात. वाताचे विकार, क्षय, दमा, मूळव्याध व सर्दी-पडशाचा त्रास सतत सहन करावा लागतो.

शनीच्या तिसऱ्या दृष्टीने भावंडांचे सौख्य लाभत नाही. दशमेशाची दशमावर दृष्टी येते पण पूर्व प्रारब्धामुळे त्यास हलकी कामे करावी लागतात व त्यास कष्टही फार होतात.

अशा वेळी मंगळाच्या बलाबलास महत्त्व येते आणि गुरूची कृपादृष्टी असता परिस्थिती सुधारते. गुरु भाग्येश असतो व त्याची भाग्यातून वा सप्तमातून येणारी दृष्टी सर्व काही बदलून टाकले जाते आणि दशमेश शनी लग्नी, भाग्येश गुरुच्या दृष्टीत हा मोठा कार्यान्वित होतो. अशी कुंडली पुढे दिली आहे -


## कुंडली : श्री. बापूसाहेब मिटकर

जन्म शनिवार, दि. १४ जानेवारी, १९११ रोजी दुपारी १२.१५ वा. चिरनेर. अयनांश २२° ३६' ४१'' सां.स. १९ ता. २३ मि. १ से.

अतिंद्रिय शक्ती लाभलेले साधू पुरुष. माळी बाबांचे शिष्य, भक्तिमार्गी, योगाभ्यास, स्थल कालातीत दृष्टी.

लाइफ इन्शुअरन्स कार्पोरेशनमध्ये पुण्यास मोठ्या अधिकार पदावर होते.

स्वतःचा प्रशस्त बंगला होता. त्यातील तळघरात त्यांची ध्यानाची जागा त्यांनीच आम्हास दाखविली होती. महान दत्तभक्त होते. स्त्री, संतती, संपत्ती यांनी युक्त पण पुढे स्त्रीस व्याधी झाली त्यामुळे स्त्रीसौख्य लाभले नाही. याचे कारण बाधकेश शनीची मकरेतील शुक्रावर दहावी दृष्टी.




लग्नबिंदूनजीक शनी मिथुन नवांशी आहे. दशम बिंदूजवळ बुध वक्री प्रतियोग चंद्र नेपच्यून. चंद्र व बुध यांचा अंश साम्याने प्रतियोग. त्या दोघांचा गुरुशी शुभयोग.

रवी-हर्षल युती अद्‌भुतता दर्शविणारी. चंद्र-नेपच्युन युती, अतिंद्रिय शक्ती दर्शविते व त्यावर गुरुची पूर्ण दृष्टी आहे.

भाग्येश गुरुची सप्तमातून शनीवर पूर्ण दृष्टी असल्याने धर्मकर्माधिपती परस्परसंबंधात व संपर्कात आले व सारे चित्रच पालटले गेले.

**(२) वृषभेचा शनी :** प्रथम स्थानामध्ये दोन हा अंक असेल व तेथे शनी असेल तर त्याला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

वृषभ व तूळ ही दोन शुक्राची लग्ने आहेत आणि या दोन्ही लग्नाला शनी एकटा राजयोगकारक असतो. या दोन्ही लग्नांना शनीची लग्न राशीतील उपस्थिती शुभच ठरते. पण तूळ लग्नी शनी उच्च असतो म्हणून तुळेत शनी जास्त फलदायी ठरतो.

या लग्नास शनी नवमेश व दशमेश आहे. पण 'भावार्थ रत्नाकर' या ग्रंथात शनी योगप्रद होत नाही, असे प्रतिपादन आहे.

**वृषभजातस्य च शनीः भाग्यकर्मेश्वरोऽपि वा ।**
**सूर्यसोमसुताभ्याम् वा न युक्तौ नैव योगदः ।।**

वृषभ लग्नी जन्म असता शनी जरी नवमेश-दशमेश असला तरी तो योगकारक होत नाही. तसेच रवी व बुध (चतुर्थेश व पंचमेश) हे लग्नी एकत्र असले तरी ते योगप्रद होत नाहीत.

स्थिर लग्नास नवम स्थान हे बाधक स्थान असते. म्हणून शनी येथे बाधकेशही आहे तसेच तो नैसर्गिक अशुभ ग्रह आहे. त्यामुळे राजयोग पूर्णपणे अनुभवास येत नाही. त्यात न्यूनता राहते.

या श्लोकावरील भाष्यात डॉ. बी. व्ही. रामन, हे वरील सारखे मत प्रदर्शित करतात. त्यांचे आजोबा प्रो. बी. सूर्यनारायण राव यांचे वृषभ लग्न असून शनी द्वितीयेत व रवी, बुध व गुरु तिघेही दशमात होते. त्याच संदर्भात रामन व सूर्यनारायण राव यांचे जे संभाषण झाले त्यातील शब्द त्यांच्या (रामनचे) कानात घुमत आहेत. सूर्यनारायण राव म्हणाले, शनी जरूर राजयोग करतो पण त्याची राजकीय व भौतिक फले पूर्णपणे अनुभवास येत नाहीत. (He would not enable the person to consolidate his gains-political and material)

राजयोग निर्दोष ठरत नाही. मात्र कीर्ती, पैसा मिळतो पण त्याचा ऱ्हास या ना त्या रूपाने होत असतोच.

भावार्थ रत्नाकरमध्ये चौथ्या श्लोकात (वृषभ लग्न विचार यामधील) ''वृषभे जायमानस्य कुजस्ससप्तमगश्शुभ:'' म्हणजे मंगळ सप्तमात असताही तो शुभ फले देतो. सप्तमाच्या बाबतीत तो अशुभ ठरत नाही.

वृषभ लग्नी शनी असता जातकास उत्तम संपत्ती मिळते. तसेच नाव व प्रसिद्धी मिळते आणि बाकी ग्रहांचे शुभयोग असता जातक बऱ्यापैकी नावारूपास येतो. शरीरबांधा आडवा असतो व मान जाड असते. उंची मध्यम असते. शुक्राचा शुभयोग असता व्यक्तिमत्त्व उजळ असते. जातक स्वभावाने हट्टी असतो आणि आपले म्हणणे खरे करण्याचा प्रयत्न करतो.

लहानपणी शरीरप्रकृती दुर्बल असते आणि वारंवार आजारी असतो. नंतर जातकाची प्रकृती सुधारते व दणकट बनते. जातक कष्टाळू असून दुसऱ्यांची सेवा, शुश्रूषा करण्यास तत्पर असतो. त्याची नीतिमत्ता उच्च दर्जाची असून आत्मविश्वास चांगलाच असतो.

स्वच्छता व टापटिपीची आवड असते. स्वभाव शांत व गंभीर असतो. जातक आपणहून जबाबदारी अंगावर घेण्यास तयार नसतो. आलेल्या संधीचा पटकन उपयोग करीत नाही. जबाबदारी पत्करल्यावर मात्र ती जबाबदारी व्यवस्थित पार पाडतो. त्यास लागणारी चिकाटी व धिमेपणा हे गुण अंगात असतात.


त्याचा व्यवसाय स्वतंत्र असतो व स्वप्रयत्नाने उत्तम पैसा मिळवितो. त्यास वारसारूपाने मोठी मालमत्ता मिळते.

जातकास बहिणी असतात. मोठ्या व धाकट्या.

## कुंडली : श्री. ग. पु. ऊर्फ प्रकाश गोगटे

जन्म रविवार दि. १५ नोव्हेंबर, १९४२ रोजी सायंकाळी ६ वा. ५० मि. प्र. वेळ सोलापूर. अक्षांश १७° ५४′ पूर्व, अयनांश २३°३′ २५″ सां. स. २१ ता. ५९ मि. ४४ से.

स्पष्ट चंद्र कुंभेत २° ५२′ ५८″ जन्मकाळी मंगळ महादशाभोग्य वर्षे १ महिने ११ दि. २५ जातक ६ महिन्यांचा असताना त्याचे वडील मयत झाले.




नवम (पितृस्थान) स्थानावर व नवमेश रवीवर मंगळाची पूर्ण दृष्टी. पिताकारक रवी युती शुक्र आहे व रवी तूळ राशीत आहे. जातकास ४ मोठ्या बहिणी, लाभेश गुरु कर्केत वर्गोत्तम. त्यास दोन सुकन्या आहेत. जातकास वारसा हक्काने फार मोठी मालमत्ता, शेतजमीन, मोठा वाडा व चाळी अशी मालमत्ता मिळाली. जातक तंत्रज्ञ होते. फ्रीज व तत्सम दुरुस्तीचा व्यवसाय होता. जातक कष्टाळू, दुसऱ्यास मदत करण्यास मदत करण्यास तयार. स्वभावाने शांत, विचारी, आत्मविश्वासू होता. फलज्योतिषाचा विशेषतः कृष्णमूर्ती पद्धतीचा अभ्यासू.

वर नमूद केल्याप्रमाणे जातक जवळजवळ सर्व गुण संपन्न.

**(३) मिथुनेचा शनी :** प्रथम स्थानामध्ये तीन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मिथुन व कन्या या बुधाच्या राशी आहेत. एक बौद्धिक आहे तर दुसरी व्यावहारिक आहे. शनी हा बुधाच्या दोन्ही राशीत मित्रक्षेत्री येतो. असे असले तरी, वराहमिहीर अशा शनीची फले चांगली शुभ वर्तवित नाहीत. ते म्हणतात -

**निर्हीसुखार्थतनयः स्खलितश्च लेख्ये ।**
**रक्षापतिर्भवती मुख्यपतिश्च बौधे ।।**

म्हणजे जातक निर्लज्ज असतो. तो सुख, संपत्ती व संतती नसलेला असतो. लिहिताना त्याचा हात कापतो. पण असा जातक द्वारपाल, पोलीस अगर जास्तीत जास्त मुख्य अधिकारी होतो. ही सर्व फले लागू पडतीलच असे नाही.

सारावलीमध्ये मिथुन व कन्या राशीतील शनीच्यासाठी स्वतंत्र फले दिली आहेत.

**मिथुन लग्न :**

**बहुऋणबन्धनतप्तः श्रमान्वितो दाम्भिकोऽनुमंत्री च ।**
**शस्तगुणैः सन्त्यक्तः सदैव गुह्यश्च कामशीलश्च ।।**
**छलकृच्च मन्युदुष्टः क्रियातिशायि शठःकुशीलश्च ।।**
**बन्धन विहारसक्तो बाह्यक्रीडानुगो मिथुने ।।**

मिथुन लग्नास शनी अष्टमेश असून त्याची लग्नातील उपस्थिती चांगली नाही. अशा दुर्बल शनीची दृष्टी ३, ७, १० या स्थानांवर येते. त्यामुळे ही तीनही स्थाने बिघडतात. या दृष्टिकोनातून वरच्या श्लोकाचा अर्थ जाणून घ्यावा लागेल.

असा जातक दरिद्री असतो. कर्जबाजारी होतो. त्यामुळे त्याचा स्वभावही चिडखोर बनतो. त्यास कष्ट करावे लागतात पण त्यामानाने पैसा मिळत नाही. त्यामुळे सुखही लाभत नाही. असा जातक जेरीस येतो. त्याची कामवासना जास्त असते. तो दांभिक असतो. दुष्टबुद्धीचा व धूर्त असतो. त्यास कामासाठी सारखे फिरावे लागते.

अन्य आचार्यांच्या म्हणण्याप्रमाणे दोन गोष्टी स्पष्ट असतात. त्यास संतती अत्यल्प असते आणि त्याची मूर्ख जनांशी मैत्री होते.

मिथुनेतील लग्नी शनी असलेला जातक कुरूप असतो आणि तो दुष्टांचे संगतीत असतो. तो स्वतः दुष्प्रवृत्तीचा असतो आणि त्यास सुख लाभत नाही. हात-पाय जन्मतः दुबळे असतात.


शनी हा केवळ खलग्रह आहे व तो फक्त अष्टमेशच आहे. या आधारे सारावलीतील व बृहज्जातकातील वचनांचा अर्थ बरोबर ठरेल, पण शनी मिथुन लग्नास अष्टमेश आहे.

तसाच तो नवमेशही आहे आणि नवमावर कुंभ ही रास असते. कुंभ ही शनीची मूल त्रिकोण रास आहे. त्यामुळे मकरेपेक्षा कुंभेच्या व नवम स्थानाच्या स्वामित्वाची फले शुभ मिळावयास हवीत. जेव्हा ग्रह दोन स्थानांचा अधिपती असतो तेव्हा तो मूल त्रिकोण राशीच्या स्वामित्वाची फले देतो आणि दुसऱ्या म्हणजे मकरेच्या पर्यायाने अष्टमेशत्वाची फले देत नाही. किमान ती गौण असतात असे तज्ज्ञ ज्योतिषी सांगतात.

शेवटी शनीच्या अष्टमेशत्वाची वा भाग्येशत्वाची फले मिळण्याची क्षमता मिथुनेचा अधिपती बुध त्याचे स्थानबल, राशिबल यावरच अवलंबून राहणार असते. शिवाय कुंडलीतील अन्य ग्रहांची स्थिती विचारात घेतलीच पाहिजे.

## कुंडली : श्री. हिराचंद नेमचंद

जन्म बुधवार दि. ५ नोव्हेंबर, १८५६ रोजी ९ वा. सोलापूर अ. १७° ४०′ उत्तर रे. ७५° ५४′ पूर्व. अयनांश २१°५१′ २८″ सां. स. ० ता. ०. मि. १९ से.




सोलापूरचे सुप्रसिद्ध उद्योगपती. काटेकोर, मितभाषी, वक्तशीर, सेवापरायण, स्वधर्मनिष्ठ, कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय, बुद्धिमान, तीर्थाटन, दानशूर.

काटेकोर, मितभाषी, शिस्तप्रिय, धर्म व कर्तव्यनिष्ठ हे गुण विशेष शनीचे असून ते नवमेशत्वामुळे प्राप्त झालेले आहेत व दिसून येतात. लग्नेश बुध पंचमात तूळ या बौद्धिक राशीमध्ये आहे. शिवाय मिथुन, तूळ व कुंभ राशीतून नवमेश शनी, तृतीयेश रवी व नेपच्यून या उत्तम त्रिकोणाचे परिणाम म्हणजे बुद्धिमत्ता व कर्तबगारी दिसून येते. लग्न पंचम, नवम या स्थानांतून या मोठ्या ग्रहांचे त्रिकोण योग महत्त्वाचे आहेत.

धनेश चंद्र, लाभेश मंगळ व सप्तमेश, दशमेश गुरु यांची धनस्थानावर पूर्ण दृष्टी येते. हा मोठा धनयोग, दशमस्थ गुरु दशम बिंदूवर आहे त्यामुळे उद्योगपती.

पण षष्ठेश व लाभेश मंगळ सप्तमात असून त्याची सप्तमेश गुरुवर दृष्टी तसेच शनीचीही गुरुवर, सप्तमावर आणि मंगळवार दृष्टी आणि शुक्र षष्ठात मंगळ व रवी यांच्या मध्ये व नेपच्यूनच्या केंद्रयोगात आहे. त्यामुळे द्विभार्या योग झाला.

म्हणजे या ठिकाणी नवमेशत्वाची व अष्टमेशत्वाची फले मिळाली आहेत. मिथुनेतील शनी बहुऋण म्हणजे कर्जबाजारी असतो असे आचार्य सांगतात. पण एकटा शनी दरिद्रयोग-कर्जबाजारीपणा देत नाही. डॉ. बी. व्ही. रामन सांगतात की, लग्नी शनी असून तो जर पापमध्यस्थ असेल तर दारिद्र्य योग येतो, पण गुरु तेथे असल्यास अगर त्याची दृष्टी शनीवर अगर धनस्थानावर असल्यास दारिद्र्य योगाची तीव्रता कमी होते.

तसेच बंधन या शब्दाचा शब्दशः अर्थ बंदिस्त, कारावास असाच घेणे योग्य होणार नाही. तुरुंगवास हा न्यायालयीन आदेशामुळे व शिक्षा झाल्यामुळे भोगावा लागतो. त्यासाठी व्ययस्थान व राहूचा संबंध यावा लागतो. असे एक उदाहरण वृश्चिक लग्नी शनी असल्याचे दिले आहे. तसेच शेख मुजीबूर रहमानच्या कुंडलीत वृश्चिक लग्न, लग्नेश मंगळ व्ययस्थानात राहूसह आहे व शनीच्या दृष्टीत आहे. तो अनेक वेळा तुरुंगात गेला होता. झुल्फिकार अली भुट्टोचे मिथुन लग्न, सप्तमात रवी-बुध व व्ययात चंद्र राहू, षष्ठातील शुक्र, केतू, मंगळ व शनी यांच्या दृष्टीत होता. जनरल झियाने त्यास तुरुंगात ठेवले व नंतर फाशी दिले.

परंतु शनी हा व्यावसायिक जगापासून दूर राहणे, स्वतःवर बंधने घालून आपखुशीने एकटे राहणे - आश्रमांत, रानावनात, डोंगरात वगैरे संन्यासी व योगाभ्यासी जगापासून अलिप्त व एकांतवासात राहून साधना करतात. कडक शिस्त पाळतात तसेच अनेक अडथळे येणे व ते पार करता-करता जातक थकतो व कष्टी होतो. शिवाय दोन्ही बाबतीत शुभ बाबतीत शुभ ग्रहांचे शुभयोग, नीचभंग योग व लग्नेशाची स्थिती राशी, स्थान व दृष्टियोग यांचाही विचार झाला पाहिजे.

**(४) कर्केचा शनी :** प्रथम स्थानामध्ये चार हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कर्केचा शनी' म्हणतात त्याचे फल पुढीलप्रमाणे -

''कर्किण्यस्वो विकल दर्शनो मातृहीनोऽसुतोऽज्ञः'' असे वराहमिहीर कर्केतील शनीचे वर्णन करतात. कर्केत शनी असता जातक धनवान नसतो, गरीब असतो. त्याचे दात लवकर पडतात. त्यास मातेचे सुख अल्प मिळते. संतती नसते आणि तो अज्ञ-अडाणी - शिक्षण फारसे नसते असे याचे भाषांतर आहे.

निर्धन, संततीहीन व अशिक्षित ही फले अनुभवास येत नाहीत. मातृहीन म्हणजे मातृसुख अल्पकाळ असते. हे मात्र अनुभवास येते.

सारावलीकारांच्या मतानुसार कर्केतील शनी बरीच चांगली फले देतो. ते म्हणतात -

**सुभगान्वितो दरिद्रो बाल्ये रोगातिपीडितः प्राज्ञः ।**

**जननीरहितोऽति मृदुर्विशिष्ट निरतः सदातुरश्चापि ।।**

**परबाधको विशिष्टो बन्धु विरुद्धो विलोमशीलश्च ।**

**मध्ये भूपतितुल्यः परिभोग विवर्धितः शशिभे ।।**

शनी हा कर्केत स्वगृहसन्मुख राशीत येतो म्हणून तो निर्बल असा दिसत असला तरी कर्क या राजराशीत येत असल्याने त्याची बरीच चांगली फले मिळतात. म्हणूनच सारावलीकार 'भूपतितुल्य' असेही म्हणतात.


या श्लोकाचा सरळ अर्थ असा आहे, सुभगान्वितो म्हणजे चांगले नशीब बरोबर घेऊन आलेला हे म्हणणे जास्त बरोबर आहे. भाषांतरकार त्याचा अर्थ प्रेमळ पत्नी लाभलेला असा करतात. हा संकुचित अर्थ झाला. सुभग यात अनेक गोष्टी येऊ शकतात. त्यापैकी उत्तम पत्नी हा एक भाग आहे.

परंतु लहानपणी निर्धन असतो व मोठेपणी भूपतितुल्य होतो, धनवान होतो. जातकास व्याधी, आजार होतात. कारण जन्म निर्बल राशीत आहे. जातक प्राज्ञ म्हणजे सुशिक्षित व विद्वान होतो. मातृसुख लवकर हरपते. जातक मृदू बोलणारा असतो. आपल्या कार्यात कुशल व नावारूपास येतो. परंतु प्रकृती निरोगी नसते. जातक दुसऱ्यांना बाधक ठरतो. नातेवाइकांशी पटत नाही. दुष्ट प्रवृत्तीचा असतो. कुटील नीती असते. मध्य आयुष्यात त्याचे चांगले नशीब उदयास येते. तो मोठ्या अधिकार पदावर पोहचतो व सर्व सुखे उपभोगतो.

## कुंडली : श्रीमती इंदिरा गांधी

जन्म सोमवार दि. १९ नोव्हेंबर, १९१७ रोजी रात्री ११.१० अलाहाबाद येथे अक्षांश २५° उत्तर २६′ रेखांश ८१° पूर्व ५२ अयनांश २२° ४२′ ५६″ सां. स. ३ तास २ मि. ८ से.

शनी लग्नबिंदूपासून ५° ३६′ मागे आहे. म्हणजे तो भावमध्याचे निकट आहे. हर्षल मात्र सप्तम भाव बिंदूवर आहे. चतुर्थबिंदूचा हर्षलशी केंद्रयोग, चतुर्थेश शुक्र षष्ठात असून त्याचा शनीशी षडाष्टक आहे. शनी हा चंद्र लग्नाचा अधिपती आहे व त्याचा शुक्राशी षडाष्टक आहे यामुळे मातृसुख फारसे मिळाले नाही. सन १९३७ मध्ये आई वारली. पंडित जवाहरलाल नेहरू राजकारणात सारखे गुंतलेले असत त्यामुळे पित्याचा सहवासही फारसा लाभला नाही.




इंदिराजींना शिक्षण मात्र उत्तम मिळाले. त्या सुशिक्षित व प्राज्ञ होत्या. बुधावर गुरुची पूर्ण दृष्टी आहे. बुधाचा नेपच्यूनशी पूर्ण त्रिकोण आहे. यामुळे मुत्सद्दी, कार्यकुशल व शनी-नेपच्यून युतीमुळे कारकस्थानी व पाताळयंत्री होत्या. मध्यायुष्यात त्या सर्वार्थाने नशीबवान, कर्तृत्ववान ठरल्या. फिरोज गांधी या बुद्धिमान व कर्तृत्वान पुरुषाशी विवाह-राजीव गांधी व संजय गांधी हे सुपुत्र लाभले. त्या काँग्रेसच्या अध्यक्षा व नंतर भारताच्या पंतप्रधान झाल्या. त्यांची जगभर कीर्ती झाली. भूपतीतुल्यच काय साक्षात भूपतीत्व लाभले होते. हिंदुस्थानच्या राजकारणावर आपला ठसा उमटविला. पाकिस्तानचा पराभव करून बांगला देश स्वतंत्र होण्यास मोलाची मदत केली. लहानपणी काही आजार झाले असले तरी प्रकृती शेवटपर्यंत निरोगी होती. रूपसंपदाही लाभली होती. लोकप्रियताही मिळविली. सारावलीकारांचे प्रतिपादन सर्वार्थाने बरोबर ठरले आहे.

(५) **सिंहेचा शनी :** प्रथम स्थानामध्ये पाच हा अंक येतो तेव्हा तेथे असलेल्या शनीला 'सिंहेचा शनी' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सिंह लग्न हे रवीचे आधिपत्याखाली येते. शनी हा रविपुत्र असला तरी तो शत्रू आहे असे मानले जाते व सर्वसाधारणपणे लग्नातील शनी शुभ फले देत नाही असे संस्कृत ग्रंथावरून दिसते.

वराहमिहीर १८ व्या अध्यायातील १८ व्या श्लोकात 'सिंहेऽनार्थो विसुखतनयो विष्टिकृत सूर्यपुत्रे' असे सिंहेतील शनीबद्दल म्हणतात. म्हणजे असा जातक हलक्या मनोवृत्तीचा, दुःखी व संततीहीन असून भारवाहक असतो असा या वचनाचा भावार्थ आहे. या लग्नातील शनी षष्ठेश व सप्तमेश असतो. षष्ठेश लग्नी असता शत्रू, आजार यांनी त्रस्त व दुःखी होतो असे म्हणता येईल. संततीबद्दल गुरुवर बरेच अवलंबून राहील.

सारावलीमध्ये सिंहेच्या शनीबद्दल असे म्हटले आहे -

**लिपिपाठ्यपरोऽभिज्ञो विगर्हितो विगतशीलस्य ।**

**स्त्री वियुतो भृतीजीवि स्वपक्षरहितो मुदाहीन ः ।**

**नीच क्रियासु निरतो विवृद्धरोषो मनोरथैर्दान्तः ।**

**भाराध्वश्रमदुःखैः प्रकीर्णदेहो यमे सिंहे ।।**

म्हणजे जातकास लिहिण्याची व वाचनाची आवड असून तो शिक्षित व सुसंस्कृत असतो. पण तो तिरस्कृत, अपमानित होतो. सद्‌गुणांचा अभाव असतो. स्त्रीसुख मिळत नाही आणि नोकरी-चाकरी करून उपजीविका करतो. स्वकीयांनी दूर लोटलेला असतो त्यामुळे दुःखी असतो. त्यास हलक्या, नीच कृत्यांची आवड असते. स्वभावाने तो रागीट आणि तुसडा असतो. नसत्या आकांक्षा व वासना असतात. तो भारवाहक असून त्यास कठोर परिश्रम करावे लागतात. तो पुष्ट शरीराचा नसतो. शरीर किडकिडीत व सुरकुतलेले असते.

सिंहेचा दुसरा त्रिशांश कुंभेचा असतो व तेथे शनी स्वतःच्या त्रिशांशात येतो पण त्याचीही फले चांगली दिलेली नाहीत. त्याबद्दल वराहमिहीर म्हणतात,

**'रोगी मृतस्वयुवतिर्विषमोऽन्यदारो ।**

**दुःखी परिच्छद युतो मलिनोऽर्क पुत्रे ।।'**


म्हणजे जातक रोगट प्रकृतीचा, त्याची पत्नी लवकर मृत्यू पावते. जातकाचा स्वभाव क्रूर असून अन्य स्त्रियांकडे आकर्षित होतो. तो व कुटुंब दुःखी असून राहणी गलिच्छ असते.

निसर्ग कुंडलीतील मकर या राजभुवनदर्शक राशीचा अधिपती असून सिंह या राजराशीत एवढी उलटी फले पाहिल्यावर मन विषण्ण होते. खरोखर अशी फले पाहण्यास सापडतात का ?

ॲलन लिओसारखा जगद्विख्यात ज्योतिषी सिंह लग्नी-लग्नात शनी बुध यावर जन्मलेला. मोठा थिऑसॉफिस्ट होता.

## कुंडली : श्री. बंडप्पा बाबुराव पुंडीफले

जन्म गुरुवार दि. २ डिसेंबर, १९४८ रोजी रात्रौ ११.३० आष्टा कासार. अक्षांश १८° उत्तर रेखांश ७५° ५३' पूर्व अयनांश २३° ८' २९'' सां. स. ४ ता. ६ मि. ९ से.




जातक B.Com. असून एल. एल. बी. चे पहिले वर्ष करून तो नाद सोडून दिला. जातक बुद्धिमान, त्यास वाचनाची आवड, स्वतःचे मोठे ग्रंथालय, अध्यात्माचीही आवड आहे. वडिलोपार्जित शेती असून स्वतःही शेती घेतली आहे. कारखाना व घर उत्तम बांधले आहे. सुरुवातीस बँकेत नोकरी केली. ती सोडून यंत्रमागाच्या व्यवसायात प्रवेश केला. तेथे चांगला जम बसविला आहे. टर्किश टॉवेलचे उत्पादन करून त्याची निर्यात ऑस्ट्रेलिया व अन्य परदेशात केली जाते. समाजकार्याची आवड, रोटरी क्लबचा सदस्य असून पदाधिकारी पदही भूषविले आहे. परदेश प्रवासही झालेला आहे पण आषाढी व कार्तिकीची पंढरपूरची वारी कधी चुकविली नाही. आपल्या भावांनाही त्याने मदत केली आहे. पत्नी स्वभावाने चांगली असून पुत्रसंतती आहे. मुले स्वभावाने चांगली व शिक्षणात पुढे आहेत. त्यांना उत्तम वळण लावले आहे. जातक सोलापुरात मान्यवर आहे. स्थावर आहे तशी मोटारकारही आहे.

सप्तमेश शनीची सप्तमावर व शुक्रावर दृष्टी आहे. शुक्र तूळ राशीत तृतीयांश शनीशी लाभयोग व पंचमातील चंद्र मंगळ गुरुचेही लाभात आहे. शुक्र दशमेश तृतीयेत स्वगृही आहे त्यामुळे कापडाच्या उत्पादनाचा व्यवसाय आहे. पंचमेश गुरु पंचमात - पुत्रसंतती आहे. पंचमातील चंद्र, गुरु, मंगळ या त्रयींचा लग्नबिंदू व शनीशी त्रिकोण योग आहे. भाग्येश मंगळ पंचमेश गुरुसह त्रिकोणात आहे. हा मोठा योग आहे. पंचम हे विद्यास्थान आहे. तेथे गुरु व चतुर्थात बुध रवीची युती आहे. लग्नेश रवी चतुर्थात उभयचरी योगात आहे. चतुर्थातील लग्नेश रवी, धनेश-लाभेश बुध यामुळे स्थावर, वाहन यांचा लाभ आहे.

''सिंह लग्नेतु जातस्य तृतीयस्थो भृगुश्शुभः'' हे भावार्थ रत्नाकरमधील विधान येथे पूर्णपणे लागू पडले आहे. तृतीयेत शुक्र शुभ फलदायी असतो कारण तो दशमेश तृतीयेत स्वगृही येतो.

जातक दिसावयास काळा असला तरी व्यक्तिमत्त्व प्रसन्न, हसतमुख व आर्जवी स्वभाव कारण चंद्र, मंगळ गुरुचे सान्निध्यात आहेत.

येथे शनी गुरुच्या त्रिंशांशात आहे आणि शनी गुरुच्या पूर्ण दृष्टीत आहे. तसेच राजयोगकारक मंगळ गुरुच्या युतीत पंचम या त्रिकोणात असल्याने परिश्रमाने यश प्राप्त झाले आहे.

**(६) कन्येचा शनी :** प्रथम स्थानामध्ये सहा हा अंक येतो तेव्हा तेथे असलेल्या शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कन्या लग्नास शनी पंचमेश व षष्ठेश असतो व लग्नी मित्रगृही येतो. पण येथील शनीची फले बहुतांशी अशुभच आहेत. सारावलीकारही फारसे चांगले बोलत नाहीत, ते म्हणतात -

**षंढाकारो ऽतिशठः परान्नवेश्यारतोऽल्प मित्रश्च ।**
**शिल्पकलास्वनुभिज्ञो विकृत्यचेष्टो-लसत्सुतार्थरचः ।**
**अलसः परोपकारी कन्याजनदूषक-क्रियानुरतः ।**
**कन्यायां रवीतनये ह्यवेक्षकारी पुमान् जातः ।।**

असा कन्या लग्नातील शनी दिसावयास तृतीयपंथी (षंढ) दिसतो. (असा अनुभव आला नाही) जातक कुटील स्वभावाचा असून त्यास परान्नाची आवड (हल्लीच्या काळात हॉटेलातील व रस्त्यावर फिरणाऱ्या गाड्यातील पदार्थांची आवड-स्वच्छ व अस्वच्छ हे बघितले जात नाही) असते. तसेच वेश्यागमनी असतो. त्यास मित्र फारसे नसतात. (शत्रूच जास्त असतात - षष्ठेश लग्नी) कलेचे व त्याचे वाकडे असते. खोड्या करणे, चेष्टा करणे वगैरेची आवड असते. जातक आळशी असतो पण दुसऱ्यास मदत करतो. (त्यातून लभ्यांश साधावयाचा असतो) त्यास संतती, संपत्ती लाभते व तो आपल्या कामाच्या बाबतीत मात्र जागरूक असतो.

'कन्याजनदूषकः' याचा अर्थ भाषांतरकार आर. संथानम् असे देतात - जातक तरुण अविवाहित मुलींना फशी पाडतो व त्यांना बिघडवतो. या वाक्प्रयोगाची फोड करावी व 'कन्या' (कन्या संतती) व 'जनदूषक' म्हणजे दुसऱ्या लोकांवर टीका/निंदा करणारा असा अर्थ बरोबर ठरेल.


मिथुनेतील शनी संततीला बाधक ठरतो पण कन्या लग्नातील शनी संतती देतो कारण तो पंचमेश लग्नी असतो. शनीच्या षष्ठेशत्वामुळे त्यास शत्रू बरेच असतात तसेच आपल्या कुटुंबीयांचाही रोष ओढवून घेतो. तृतीय स्थानावर शनीची दृष्टी असल्याने तो भावंडांवर वर्चस्व गाजवू पाहतो.

शरीरवर्ण काळा व काही वेळा कुरूपही दिसतो. दात पुढे आलेले असतात. या सर्वच गोष्टी अनुभवास येत नाहीत. मात्र तो भाषण अडखळत करतो. बुधाशी संयोग असता बुद्धिमत्ता असते. पण त्याचा दुरुपयोग होण्याची शक्यता असते.

## कुंडली : श्री. भास्कर द. वैद्य

जन्म गुरुवार दि. १७ जानेवारी, १९२३ रोजी रात्रौ ११.३९ स्थाने अहमदनगर अक्षांश १९° उत्तर रेखांश ७४° ४५'' अयनांश २२° ४६' ५५'' सां. स. ७ ता. २३ मि. ३७ से.

वर्ण काळा, शरीर मजबूत पण बुटका. स्वभावाने खोडकर पण प्रेमळ होता. भावंडांत थोरला. ४ लहान भाऊ व दोन बहिणी. शिक्षण जेमतेम मॅट्रिक. शिक्षणात डोके चालले नाही.




वडील डॉक्टर, ते मयत १९४६. त्यांनी पैसा चांगला मागे ठेवला. घर भाड्याचे पण प्रशस्त. मातृसुख भरपूर. जातकास द्विभार्या योग आला. दोन मुलगे. एकेका पत्नीपासून एकेक. नोकरी बँकेत.

शनी लग्नबिंदूवर आहे पण द्वितीयेवर गुरु आहे. काळा वर्ण असला तरी सतेज. बुध, शनी अन्योन्य क्षेत्रांत आहेत पण अभ्यासात बुद्धी चालली नाही. बुध पंचमात पण त्याचा नेपच्यूनशी प्रतियोग आहे व गुरुशी केंद्रयोग आहे. गुरु या लग्नास फारसा शुभ नसतो. तो केंद्राधिपती म्हणून दोषास्पद तसाच सप्तमाधिपती म्हणून बाधकेश आहे.

दशमेश दशमाच्या अष्टमात प्रतियोग नेपच्यून व केतूयोग गुरु. दशमाचा अष्टमेश शनीची दशमावर दृष्टी आहे. पितृकारक रवी अर्धकेंद्र (४५°) मागे. जन्म अमावस्येचा आहे. यामुळे पितृसुख लवकर संपले.

सप्तमेश गुरु सप्तमाच्या अष्टमात तूळ राशीत आहे. त्याचा नेपच्यून व बुध यांच्याशी केंद्रयोग शिवाय गुरुचे व्ययात शनी आणि शुक्राच्या चतुर्थात हर्षल त्या दोघांचा अंशात्मक केंद्रयोग यामुळे द्विभार्या योग (सप्तम द्विस्वभाव राशीचे)

मंगळ षष्ठबिंदूपासून ६° पुढे व सप्तम बिंदूच्या मागे २३° म्हणून मंगळ षष्ठातच आहे. त्याची लग्नस्थ शनीवर आठवी दृष्टी आहे. मंगळ अष्टमेश असून राहूच्या प्रतियोगात आहे. १९६४ साली टायफॉईडने आजारी पण शेवटी दोष आतड्यातच निघाला. आतड्याचे ऑपरेशन झाले तेव्हा आतडी कुजलेली आढळली व १९६४ सालीच मृत्यू झाला.

गुरुची धनस्थानातून दशमावर पूर्ण दृष्टी व त्रिकोण योग. बँकेत कारकून म्हणून १९४७ साली नोकरी लागली.

**(७) तुळेचा शनी :** प्रथमस्थानात जेव्हा सात हा अंक येतो तेव्हा तेथील शनीला तुळेचा शनी म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

या लग्नी शनी उच्च राशीत येतो. तो चतुर्थेश व पंचमेश असतो आणि लग्नी बलवान होत असल्याने जातक उच्चविद्याविभूषित व विद्वान असतो. असा जातक मृदू बोलतो. तो धनवान असतो आणि तो प्रसिद्धीस येतो. जातक सद्गुणी असतो. त्यास परदेशातूनही पैसा व मान मिळतो.


पंचमहापुरुष योगापैकी शनीमुळे होणारा 'शश' नावाचा महापुरुष योग होतो. शनी पंचमेशही असल्याने असा जातक मोठ्या पदावर जातो. तो त्यागी आणि न्यायी असतो. त्यास पूर्वजन्मीचे पुण्य लाभलेले असते. असा जातक स्त्री, संतती आणि संपत्ती यांनी युक्त असतो. तो समाजकारण व राजकारणातही भाग घेतो.

जातकास वारसारूपाने मालमत्ता मिळते व स्वतःही संपत्तीत भर टाकतो. भाग्येश बुधाची जोड मिळाल्यास या गोष्टी सहज प्राप्त होतात. मोठे प्रासाद व वाहने प्राप्त होतात.

पुढील कुंडल्यांतून यांपैकी एकेका पैलूचा प्रत्यय येतो.

## कुंडली : श्री. गोपाळ कृष्ण गोखले

जन्म बुधवार दि. ९ मे, १८६६ रोजी सायंकाळी ४ वा. ३० मि. स्था. वेळ. कोतळूक (गुहागरजवळ) अक्षांश १७° ३०' उ रेखांश ७३° पूर्व १०. अयनांश २१° ५९' २६'' सा.स. ७ तास ४६ मि. १५ से.




थोर देशभक्त - महात्मा गांधींचे गुरू. नेमस्त राजकारणी आणि भारतसेवक समाजाचे संस्थापक, कायदे कौन्सिलचे सदस्य, आयुष्य मात्र ५० वर्षांचे.

चतुर्थेश शनी लग्नी उच्च आणि चतुर्थात गुरु यामुळे उच्च शिक्षण, विद्वत्ता दिसून येते. लग्नेश शुक्र, अष्टमात स्वगृही व त्याच्या नवमात गुरु आहे. हा योग संस्था स्थापन करणे, लोकशिक्षण दर्शवतो. भाग्येश बुध सप्तमकेंद्री उत्तम वक्ता, सप्तमात मेषेचा उच्च रवी आहे. चंद्र त्रिकोण, हर्षल, चंद्र त्रिकोण शनी, शनी त्रिकोण हर्षल असे योग दशमेश चंद्राशी झालेले आहेत. उच्च नीतिमत्ता व परदेश प्रवास या योगावर होतात. कर्तव्याला प्राधान्य देणे हे या त्रिकोण योगाचे फल आहे. गोखले यांचे गणित विषयावरील उत्तम पुस्तक गेल्या शतकात व या शतकाचे अर्ध्यावर पावेतो सर्वमान्य होते.


केंद्रातील उच्च रवीमुळे राजकारण व कौन्सिल सदस्यत्व लाभले.

लग्नेश अष्टमात व मंगळाची लग्नावर दृष्टी यामुळे दीर्घायुष्य लाभले नाही.

## कुंडली : श्री. ॲन्ड्र्यू कार्नेजी

जन्म बुधवार दि. २५ नोव्हेंबर, १८३५ रोजी पहाटे ६ वाजता ग्रीनिच वेळ, टुमफर्म लाईन अक्षांश ५६° ५' उत्तर रेखांश ३° २५' पश्चिम अयनांश २१' ३३' ५६'' सां.स. ९ तास ५९ मि. ४८ से.

चंद्र मकरेत १६° ५४' ने ९.५८




स्कॉटिश उद्योगपती व दानशूर. सन १८४८ मध्ये वडिलांबरोबर अमेरिकेत आले. वडिलांचा लिनन कापड विणण्याचा व्यवसाय, नशीब काढण्यासाठी अमेरिकेत आले व पेनसिल्व्हानियामधील पीटस्बर्ग येथे स्थायिक झाले. छोट्या कार्नेजीने एका लिननच्या गिरणीत बॉबिन बॉय म्हणून नोकरी धरली. नंतर ते पेनसिल्व्हानिया रेल्वे कंपनीत टेलिग्राफ क्लार्क म्हणून नोकरीस व चढत-चढत तेथे सुपरिंटेंट झाले. सन १८६५ मध्ये त्यास अधिकार पद प्राप्त होऊन पैसा मिळू लागला. सन १८७२ मध्ये त्याने बेस्मियर स्टील प्रोसेस अमेरिकेत सुरू केले. सन १८८८ मध्ये होमस्टीड स्टील वर्क्स या बड्या कंपनीचा प्रमुख सूत्रधार झाला. १८९८ साली कार्नेजी स्टील कंपनी या फार मोठ्या बड्या उद्योगसमूहाचा मालक झाला. १९०१ पर्यंत त्याने अमाप संपत्ती मिळविली व निवृत्त झाला. त्याने स्टील उद्योगातील आपला हिस्सा हितसंबंध जे.पी. मॉर्गन (सीनिअर) या भांडवलदारास विकले. निवृत्तीनंतर कार्नेजी स्कॉटलंडमध्ये आले व स्किबो कॅसल हे आपले निवासस्थान केले. मिळालेला प्रचंड पैसा समाजोपयोगी कार्यासाठी खर्च केला. अमेरिका व इंग्लंडमध्ये अनेक ग्रंथालये उघडली. जागतिक शांततेसाठी प्रतिष्ठान स्थापले. हाग येथे पॅलेस ऑफ पीस बांधले. देशामध्ये वीरांसाठी पुरस्कार फंड आणि आपल्या जन्मगावी सर्व सुधारणा करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर देणग्या दिल्या. अनेक प्रतिष्ठाने, ट्रस्ट्स स्थापून देणग्या दिल्या. जवळजवळ १०,००,००,००० पौंडाची रक्कम त्यांनी विविध कार्यांसाठी दान दिली आहे. दिनांक ११ ऑगस्ट, १९१९ रोजी मयत झाले. मृत्युसमयी ५०,००,००,००० डॉलर्स शिल्लक होते.


साध्या कारकुनापासून सुरुवात करून ६५ व्या वर्षी अपार संपत्तीचा धनी होते.

गुरु नवम भावमध्याचे निकट, शुक्र द्वितीय भाव मध्यावर, मंगळ (धनेश) धन भावमध्याचे मागे, ६° ३०' हर्षल भाव मध्यावर, बुध भावमध्याजवळच २° ४३' पुढे आहे. शनी प्रथम भावाच्या आरोहणात - उदित आहे. तो शीघ्र गतीत असून परमोच्चाभिलाषी आहे. गुरुही उच्चांशाकडे जाणारा आहे. वक्री ग्रह प्रथम फल देत नाहीत. बरेच वर्षांनी फलद्रूप होतात.

शनी परमोच्चांशी असता तो १०० टक्के फल देतो पण तो सुमारे ११° मागे आहे. म्हणजे त्यास ९३% गुण मिळतील. गुरु परमोच्चांशाचे मागे १२° आहे. त्यासही ९३% गुण असतात.

राजयोगकारक ग्रह लग्नी आहे तर लग्नेश शुक्र धनेशासह धनभावात आहे. दशमेश रवी धनभावाजवळच आहे.

लग्नकुंडलीबरोबरच चंद्रकुंडली मांडली जाते. पण ती भावचलित मांडली जात नाही, कारण ती कशी मांडावयाची हे अनेकांना माहीत नाही. येथे भावचलित चंद्रकुंडली मांडली आहे. ती १८ अक्षांशावर मांडावी लागेल. ती अशी -




राश्याधिपती व धनाधिपती शनी उच्च असा भाग्यभुवनात आहे. भाग्येश बुध दशम भावबिंदूच्या निकट आहे. दशमेश शुक्र लाभस्थानी लाभेशाबरोबर आहे.

बुध षष्ठेश आहे व तो दशमात आहे म्हणजे नोकरीच्या माध्यमातून धनलाभ व जातक पुढे येतो. षष्ठातून गुरुची धनस्थानावर व दशम स्थानावर पूर्ण दृष्टी आहे. उत्तर कालामृतात सांगितल्याप्रमाणे तो सहज (तृतीय) व अंत्य (व्यय) यांचा अधिपती असला तरी तो योग पातळीवर जाणे लागतो. शनी व हर्षल यांचा त्रिकोण योग आहे. हा योग मोठी यंत्रे व पोलादाचा कारखाना दर्शवितो. या ठिकाणी आणखी एक मजेदार धनयोग

आहे. षष्ठात गुरु, दशमात बुध व लाभात शुक्र असे तीन शुभ ग्रह उपचय स्थानात आहेत. हाही उत्तम धनलाभ दर्शवितो. तसेच येथे चंद्र लग्नेश, शनी भाग्येश बुधाच्या साहचर्यात तुळेत आहे. हाही मोठा योग आहे.

गुरु व्ययेश आहे व त्याची व्ययस्थानावर दृष्टी आहे. यामुळे धनाचा व्यय उदारतेने चांगल्या कामासाठी झालेला आहे. खरे दानशूरत्व येथे प्रत्ययास येते.

**(८) वृश्चिकेचा शनी :** प्रथम स्थानामध्ये जेव्हा आठ हा अंक येतो तेव्हा तेथील शनीला 'वृश्चिकेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

वृश्चिकेतील शनीबद्दल ''कीटे तु बन्धनवशभाक् चपलोऽघृणश्च'' असे वराहमिहीर सांगतात. त्याचा अर्थ - अशा जातकास आयुष्यात केव्हातरी तुरुंगवास घडतो आणि त्याला जबर मारहाणही सोसावी लागते. जातक अस्थिर स्वभावाचा व निष्ठुर असतो. त्यास दया-माया नसते. सारावलीकार याचा विस्तार पुढीलप्रमाणे करतात -

**द्वेष परो विषमो वा विषशस्त्रहन: प्रचण्ड कौपश्च ।**
**लुब्धो दृप्तोऽर्थयुत: परस्वहरणे समर्थश्च ।**
**बहवो मंगलवाद्यैर्नृशंसकर्मा ह्यनेकदु:खस्यात् ।**
**अष्टम् राशौ रविजे क्षयव्ययव्याधि भिस्तप्त: ।।**

असा जातक मत्सरी व द्वेष्टा असतो, तो सरळ वागत नाही. त्याची चाल नेहमी वाकडी असते. त्याला विषबाधा वा शस्त्रास्त्रापासून इजा होते. जातक अति रागीट असून पैशाचा लोभी व कृपण असतो. दुसऱ्याची संपत्ती लुबाडण्याचा त्याचा प्रयत्न असतो. पैसे सांगले जमविलेले असतात. गर्विष्ट व दुष्टप्रवृत्ती असते. त्यास अनेक दु:खांस तोंड द्यावे लागते. अंतिमत: व्याधी, दु:ख आणि व्यय, नुकसान हेच जातकाच्या नशिबी येतात.

अशा जातकाच्या शरीरावर शस्त्राचे व्रण असतात. हे व्रण भांडण-तंटा करताना अगर कारागृहात मारहाणीने होतात अगर शस्त्रक्रियेमुळेही होतात अथवा अपघातात होतात. त्याला संपत्ती मिळते. परंतु ती टिकत नाही. जातक कायद्याच्या कचाट्यात सापडतो. वृश्चिकेतील शनी शांत व सन्मानाने जीवन जगू देत नाही. शनी हा व्ययाचा, संहाराचा, ऱ्हासाचा, कारक आहे आणि तो स्वत:चा नाश स्वत:च ओढवून घेणारा आहे. आयुर्मर्यादा फार नसते. त्याला व्याधी होतात त्यामुळे तो दु:खी होतो.

कारागृहवास एकट्या शनीमुळे येत नाही. लग्नेश मंगळाचा वा राहूचा तेथे संबंध येतो. वृश्चिकेतील शनीची दशमावर - सिंह राशीवर दृष्टी येते आणि असा जातक सरकारी नोकरीत शिरतो अगर राजकारणात भाग घेतो. जातकाचे पैसे मिळविण्याचे मार्ग चांगले नसतात. त्यास अपघातासही तोंड द्यावे लागते.


वृश्चिक लग्नास शनी तृतीयेश असतो. तृतीयेश लग्नी असता जातक स्वत:च्या परिश्रमाने व कष्टाने पैसे मिळवितो. जातक सूडबुद्धीचा असतो. शरीर कृश असून उंच असतो. तो धीट व पराक्रमी असतो पण सदा प्रकृतीची रड असते. जातक दुसऱ्याच्या हाताखाली काम करतो.

शनी चतुर्थेशही असतो. त्यामुळे जातक सुशिक्षित असतो. वारसाने मिळालेली मालमत्ता घालवून बसण्याची शक्यता असते. चतुर्थेश शनी, रवी, गुरुच्या शुभयोगात असता जन्म श्रीमंत कुटुंबात होतो. शनीशी असलेल्या शुभाशुभ योगावर जातकाची श्रीमंतीची श्रेणी अवलंबून असते.

## कुंडली : श्री. प्रकाश गुरुनाथ मुरगोड

जन्म गुरुवार दिनांक १४ नोव्हेंबर, १९५७ रोजी सकाळी ७ वा. ३० प्र. वेळ, जमखिंडी येथे अ. १६° उत्तर ३१′ रे. ७५° पू. २१′

अयनांश २३° १६′ १८″ सांपातिक समय १० तास ३३ मि. २ से.




पोलीस खात्यात नोकरी, पोलीस सब इन्स्पेक्टर, कस्टडीतील कैद्याच्या खुनाचा आळ जातकावर आला. तो कैदी यांच्या चौकीतला नव्हता. दुसऱ्या ठिकाणच्या चौकीतल्या कैद्यास यांच्या ठाण्यात आणून टाकले. तो मेलेलाच होता. पण आळ आला व त्यास निलंबित करून ५/६ महिने कारावासात ठेवले. ही घटना १९९२ मधील आहे. त्यांची सुटका होईल व केव्हा होईल हेही सांगितले होते. शुक्र महादशा - शनी भुक्तीमध्ये.

लग्नेश मंगळ व्ययस्थानात राहूच्या युतीत आहे व तो राहूच्याच नक्षत्रात आहे. ही युती ६° दीप्तांशातील आहे पण मंगळ व नेपच्यूनची युती अंशात्मक आहे. नेपच्यूनमुळे

फसवणूक, विश्वासघात यामुळे या घटना घडल्या. जानेवारी १९९५ मध्ये मोटारीस अपघात. जातकाच्या गुडघ्याची वाटी फुटली. पण वेळीच वैद्यकीय मदत मिळून गुडघा पुन्हा व्यवस्थित झाला. कोर्ट-कचेऱ्याही संपल्या, एक बढतीही मिळाली. शनी चतुर्थेश लग्नी आहे. पदवी परीक्षा उत्तीर्ण आहे. द्वितीयेतील शुक्रामुळे बोलणे-वक्तव्य प्रभावी आहे.

**(९) धनुचा शनी :** प्रथम स्थानामध्ये जेव्हा नऊ हा अंक येतो तेव्हा तेथील शनीला 'धनुचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

गुरु व शनी हे एकमेकांचे शत्रू वा मित्र नाहीत. ते सम आहेत म्हणून शनी गुरुच्या धनु व मीन राशीत अशुभ फले देत नाहीत. उलट शुभफले देणारा असतो. वराहमिहीर म्हणतात,

**'स्वन्तः प्रत्ययितो नरेन्द्रभवने सत्पुत्रजाया धनो ।**
**जीवक्षेत्रऽर्कजे पुरबलग्रामाग्रनेताऽथवा ।।**

जातकाचे सरकार-दरबारी वजन असते. तो विश्वासू असून त्यास चांगली पत्नी व उत्तम संतती लाभते आणि त्याजपाशी संपत्तीही असते अथवा जातक गावातील मोठा पुढारी, महापौर अगर तत्सम वजनदार असामी होतो. त्याचे उत्तरायुष्य सुखाचे जाऊन मृत्यू शांतपणे होतो. असा जातक लोकप्रिय व गुणवान असतो असे थोडक्यात म्हणता येईल. त्याचा व्यवसाय दशमेशाच्या स्थितीवरून निरनिराळा असू शकतो.

शनी एका राशीत अडीच वर्षे राहतो. त्यामुळे सगळ्याच कुंडल्यांत वरील तऱ्हेची सर्व फले मिळतील हे शक्य नाही. कुंडलीतील अन्य ग्रहांच्या व लग्नेशाच्या स्थितीचे व योगाचे निरनिराळे परिणाम दिसू शकतील हे अभ्यासूंनी लक्षात घ्यावे.

सारावलीकार धनु व मीन लग्नातील शनीची स्वतंत्र फले देतात व ती निरनिराळी आहेत.

**व्यवहार बोध्यशिक्षाश्रुतार्थ विद्याभिधानुकूलमतिः ।**
**पुत्रगुणैर्विख्यातः स्वधर्मवृत्तैश्च शीलेश्च ।।**
**अन्त्येवयसिच लक्ष्मीभुनक्ति परमां प्रलब्धमानस्तु ।**
**अल्पवचा बहुसंज्ञो मृदुर्यमे कार्मुकस्थे स्यात् ।।**

**अर्थ :** धनु राशीत शनी असलेला जातक विद्वान असून वैदिक सूत्रांचे अर्थ जाणणारा व शिकविणारा असून व्यवहारी असतो. त्याचे पुत्र गुणवान असल्याने अशा गुणी पुत्रांमुळे, व्यवसायामुळे व स्वतःच्या सद्‌गुणांमुळे तो नाव कमावतो. उत्तरायुष्यात चांगला श्रीमंत होतो. असा जातक मोजकेच बोलतो पण तो बुद्धिमान व उत्तम वक्ता असतो.


जातकालंकारच्या मतानुसार त्यास पत्नी चांगली मिळते व तो विधवा स्त्रियांना आश्रय देतो. जातकास सन्मान प्राप्त होतात व तो लोकप्रिय होतो. या संदर्भात काही कुंडल्यांचा अभ्यास करणे योग्य ठरेल.

### कुंडली : श्री. श्रीधर रघुनाथ

जन्म मंगळवार दि. १५ एप्रिल, १९३० रोजी रात्री १२.१५ प्र. वे. अक्षांश १८° १७' उत्तर रेखांश ७३° ५५' पूर्व

अयनांश २२° ५२' ५६'' सां. स. ११ ता. १३ मि. २७ से.

जातक प्रथम लष्करात भरती झाला पण तेथून निवृत्त होऊन सरकारच्या अबकारी खात्यात Excise Inspector म्हणून नोकरी. नोकरी प्रामाणिकपणे व विश्वासूपणाने केली. अबकारी खात्याबद्दल वाटणारे दुर्गुण काहीही नव्हते. सरळ स्वभाव व स्पष्टवक्तेपणा आहे. मित्रही चांगले भेटले. जातकास यंत्रांचे उत्तम ज्ञान, व्यवहारी, पत्नी कष्टाळू व सालस. कुटुंब मोठे. जातक सर्वांत मोठा असून त्यास दोन बहिणी व चार भाऊ. वडिलांना झालेले कर्ज पूर्ण फेडले. भावंडांकरिता पुष्कळ कष्ट व त्रास सोसले.




दोन मुलगे, एक मुलगी. सर्व उच्चशिक्षित, थोरला मुलगा डॉक्टर, दुसरा इंजिनिअर, दोघांनी आपल्या क्षेत्रात उत्तम नाव व यश प्राप्त केले आहे.

घरची शेती असून ती स्वतःच्या देखरेखीखाली विकसित केली आहे. मोटारकारही घेतली आहे. चांगली पत्नी, उत्तम संतती, स्वतः सद्‌गुणी उत्तरायुष्यात यश व सुख-पूर्वायुष्यात कष्ट. वराहमिहीर व सारावलीकर यांचे निवेदन येथे पूर्णपणे लागू पडले आहे. सप्तमेश बुध व लाभेश शुक्र यांची युती लग्नाच्या पंचमात आहे. त्यामुळे हे सर्व फलद्रूप झाले. भाग्येश रवी मेषेत उच्च आहे. त्याचा नेपच्यूनशी त्रिकोण आहे.

अष्टमेश चंद्र वृश्चिकेत नीच राशीस आहे. त्याच्या षष्ठात रवी, राहू, बुध, शुक्र आहेत. त्यामुळे एक मिठाचा खडा सर्व सुखात पडला. जातकास वारसारूपाने संपत्तीचा लाभ होण्याऐवजी वडिलांचे कर्ज डोक्यावर बसले. जातक नीतिमान म्हणून त्याने त्याचा अंगीकार केला व स्वप्रयत्नाने सर्व कर्ज पूर्ण फेडले. त्यास बुध शुक्र युती त्रिकोण शनी कारणीभूत झाले.

तसेच लग्नेश षष्ठात शनीच्या पूर्ण षडाष्टकात आहे. गुरु शनी षडाष्टक योग चांगला नाही. १५०° चा योग काबाडकष्ट व अपयश देणारा आहे. कर्जास हा योगही कारणीभूत आहे. चंद्राचा शनीशी ४५° चा अर्धकेंद्र हर्षलशी १३५° चा असे दोन अशुभ योग आहेत.

कुंडली क्र. २२ मध्ये शनी धनुराशीत १'' ३० ' व गुरु वृषभेत १७'' ५१' आहे. राशीत षडाष्टक वाटला तरी त्यामध्ये १५०° चे अंतर नाही तर १६५° चा एक लहान का होईना शुभयोग आहे.

हा दोन्हीमध्ये फरक आहे. यासाठीच दृष्टियोग अंशात्मक पाहावेत.

क्र. २३ मध्ये शनीचा हर्षलशी केंद्रयोग आहे. त्यामुळे जातकास भावंडशोक झालेला आहे. आता कोणीही भाऊ उरला नाही.

**(१०) मकरेचा शनी :** प्रथम स्थानामध्ये जेव्हा दहा हा अंक येतो तेव्हा तेथील शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मकर आणि कुंभ या दोन्ही राशी शनीच्याच स्वामित्वाखाली असल्याचे मानले जाते आणि स्वतःच्या राशीत शनीची चांगलीच फले मिळतात. स्वगृहीचा व उच्च राशीचा शनी केंद्रस्थानी असता 'शशयोग' नावाचा महापुरुष योग होतो. महापुरुष योग हे दुर्मीळ असतात व ते फार क्वचित पूर्णपणे पाहण्यास सापडतात.

**अन्यस्त्रीधनसंवृत्तः पुरबल ग्रामाग्रणीर्मन्ददृक् ।**
**स्वक्षेत्रे मलीनः स्थिरार्थ विभवो भोक्ता च जातः पुमान् ।।**

पत्नीशिवाय अन्य स्त्रियांच्या संपत्तीवर चैन, मलीन राहणी, दृष्टिदोष असे दुर्गुण असले तरी जातक स्वतः संपत्ती मिळवितो व वैभवात राहतो. त्याची संपत्ती व वैभव दीर्घकाल टिकणारे असते आणि जातक गावात मोठा, महत्त्वाचा नागरिक अगर सैन्यात अधिकारी अगर ग्रामाधिपती होतो.

शनी हा लोभी आहे. त्यामुळे परस्त्रीचा व तिच्या संपत्तीचा लोभ धरतो. त्याची राहणी गबाळी असते. उत्तमोत्तम कपडे व प्रसाधने, अत्तरे वगैरेंचा उपयोग करून वागणारा शुक्र असतो. त्यामानाने शनी गबाळा वाटतो. पण तो शिस्तप्रिय असतो. शनी मुळातच काटकसरी व कंजूष आहे. त्यामुळे संपत्ती दीर्घकाळ न टिकली तर नवलच.

शनीच्या दोन्ही राशीतील गुणावगुणांची फले यामध्ये फरक असणारच. सारावलीकारांनी तो फरक दाखविला आहे.

**परयोषित्क्षेत्राणां प्रभुः श्रुतिगुणैर्युतश्च बहुशिल्पः ।**

**श्रेष्ठश्च वंशजातैः पूज्यः परवृन्दसत्कृतः ख्यातः ।।**

**स्नानविभूषणनिरतः क्रियाकलाज्ञः प्रवासशीलश्च ।**

**कोणे मृगभे जातः प्रजातशौर्योपचारः स्यात् ।।**

विधवा वा अन्य असाहाय्य स्त्रियांच्या स्थावर मिळकती बळकावतो, एवढा दुर्गुण सोडला तर शनी मकरेत असलेला जातक श्रुती, वेदपरायण असतो. विविध तऱ्हेच्या कलांचे उत्तम ज्ञान त्यास असते. आपल्या कुलात तो मोठा होतो. त्यास अन्य लोक मान देतात व तो प्रसिद्ध होतो. स्नाननिरतः = स्वच्छतेची आवड, विभूषणनिरतः - उत्तम वस्त्रालंकारांची आवड असून त्यास प्रवासाची आवड असते. तो आपल्या कामात कुशल असतो. स्वभाव विनम्र व धैर्यवान असतो. जातक परदेशात राहतो.

जातकालंकार कर्त्यांच्या मते, 'त्याचे डोळे लहान (बारीक) असतात. (विशाल नसतात व जातकास डोळ्यांचे विकार होतात. त्याचा बांधा मध्यम असून अध्यात्माकडे कल असतो. असे असले तरी तो चोर असतो.

वराहमिहिरापेक्षा जास्त स्पष्ट शब्दांत वरील मत आहे.


मकर लग्नात शनी असता तो तापत्रयाने पीडित असतो, त्यास संपत्ती मिळते पण संपत्तीचा सतत ओघ नसून तो खंडित होत राहतो. प्रकृती दुर्बल असते आणि माता-पित्यांचे सुख दीर्घकाळ मिळत नाही.

## कुंडली : श्री. .................

जन्म शुक्रवार दि. ११ मार्च, १९३२ रोजी पहाटे ४ वा. ३ मि. हथरस येते. अक्षांश २७° उत्तर ३६' रेखांश ७८° पूर्व ६'

अयनांश २२° ५४' ३८'' सां. स. १५ ता. १२ मि. ४५ से.

उत्तर प्रदेशातील सरकारी नोकरीतील इंजिनिअर. चीफ इंजिनिअरिंग हायडेल डिपार्टमेंट म्हणून वरच्या पदापर्यंत चढले व तेथून निवृत्त झाले. भाग्येश बुध व लग्नेश शनी यांचा लाभयोग आहे. लग्नेश शनीची दशमावर दृष्टी आहे. दशमेश शुक्र चंद्राच्या युतीत आहे व त्यांची दशमावर दृष्टी अष्टमेश रवी पूर्ण त्रिकोण दशम बिंदू. गुरुची लग्नावर बुध व हर्षल यांच्यावर पूर्ण दृष्टी आहे. मंगळाचा दशमाशी त्रिकोण आहे. बुध, मंगळ व शनी यांचा एकमेकांशी व दशमेशाशी संबंध आहे.




राजयोगकारक शुक्राची दशमावर आणि तृतीयेश गुरुची लग्नावर दृष्टी यामुळे उच्च पदास पोहचले.

**(११) कुंभेचा शनी :** प्रथम स्थानामध्ये जेव्हा अकरा हा अंक येतो तेव्हा तेथील शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. याचे फल पुढीलप्रमाणे -

सारावलीकारांच्या म्हणण्यानुसार

**बह्वनृत सुमहान् स्यान्मद्यस्त्री व्यसन सम्प्रसक्तश्च ।**

**धूर्तो वंचनशीलः कुसौहृदो ह्यतिदृढश्चण्ड : ।।**

**ज्ञान कथा स्मृतिबाह्यः परारंगनार्थः सुकर्कशाभाषी ।**

**रवितनये कुम्भस्थे बहुक्रियारंभकृतयत्नः ।।**

कुंभेत शनी असलेला जातक खोटे बोलतो पण प्रसिद्ध असतो. मद्य व मदिराक्षीच्या आहारी गेलेला असतो. तो कुटील व दुष्ट असून कुटिलांच्या संगतीत असतो. ज्ञान, कायदे व कथा, पुस्तके यांचा तिटकारा असतो. कठोर बोलतो आणि अनेक योजनांचा फक्त आरंभशूर असतो. त्या सिद्ध होत नाहीत.

ही सर्व अनिष्ट फले आहेत. कुंभ लग्न सदोष असते असे एक मत आहे. पण ते सर्वच आचार्यांना मान्य नाही. शनी कुंभेत असल्यास शुभ फले देत नाही असे सारावलीकारांचे म्हणणे दिसते.


पण असा शनी राजयोगाची फले दिल्याशिवाय राहत नाही. शनी त्याच्या व्ययेशत्वामुळे काही वेळा मारक ठरतो अथवा मृत्युसम पीडा देतो. जातकाच्या कुटुंबात बरेच मृत्यू घडतात.

## कुंडली : श्री. माधव अनंत

जन्म शनीवार दि. २८ सप्टेंबर, १९३५ रोजी दुपार ४ वा. ३० मि. प्र. वेळ अक्षांश १७° ४३' उत्तर रेखांश ७४° २' पूर्व.

अयनांश २२° ५७' २२'' सां.स. १६ ता. २७ मि. ११ से.

जातक B.E. Mechanical. मोठ्या चांगल्या कंपनीत नोकरी व अधिकार पदावर.




लग्नी शनी, दशमात मंगळ, शनी मंगळ परस्परावर दृष्टी आहे. बुध त्रिकोण योग शनी आणि शुक्र केंद्रयोग, मंगळ आणि प्रतियोग शनी लाभयोग बुध. बुध, मंगळ, शनी यांचा संबंध शुक्र त्रिकोण हर्षल. शनी लाभयोग हर्षल, बुध प्रतियोग हर्षल, हर्षलमुळे मोठ्या यंत्राशी संबंध व विद्युत उपकरणाशीही संबंध येतो.

**(१२) मीनेचा शनी :** प्रथम स्थानामध्ये जेव्हा बारा हा अंक येतो तेव्हा तेथील शनीला 'मीनेचा शनी' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

**प्रिययज्ञशिल्पविद्यः स्वबन्धुसुहृदां प्रधान शांतश्च ।**

**संवर्धितार्थ सुनयो रज्नपरीक्षासु कृतयत्नः ।।**

**धर्मव्यवहाररतो विनीतशिलो गुणैः समायुक्ताः ।**

**मीने भास्कर तनये पश्चाद्भावास्पदं पुरुषः ।।**


मीनेत शनी असलेला जातक शिल्पकलानिपुण असतो व त्यास यज्ञयागाची आवड असते (धार्मिक असतो.) तो आपल्या स्वकीयांत, बंधुवर्गात व मित्रपरिवारात प्रमुख असतो. शांत व धिमा स्वभाव असून संपत्ती साठवित वाढवित असतो. धर्म, कायदा

व्यवहार जाणून घेऊन धोरणे ठरवितो. त्याच्या अंगी चांगले गुण असून तो विनम्र असतो व उत्तरायुष्यात मोठे पद मिळवितो. मीन ही शेवटची रास आहे आणि शनी हा विलंबाने काम करणारा असल्याने अधिकार व मान मात्र उशिराच मिळतो.

मीन लग्नास शनी व्ययेश असतो व तो लग्नी असता शरीरात दोष, पंगुत्व वगैरे असण्याची शक्यता असते. त्याची प्रकृती चांगली नसते. विशेषतः सर्दीचा विकार व पोटाचे विकार होतात. भावंडांमुळे नुकसान होते.

## कुंडली : श्री. मनोज मुकुंद

जन्म सोमवार दि. २५ नोव्हेंबर, १९६८ रोजी दुपारी २.२८ प्र. वेळ अक्षांश १६° ५५’ उत्तर व रेखांश ७४° ३७’ पूर्व अयनांश २३° २५’ २०’’ सां.स. १८ ता. १३ मि. ५६ से. चंद्र महादशा भोग्य वर्षे २ महिने १० दिवस २१




जातक हरहुन्नरी आहे. इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिकचे उत्तम ज्ञान व कौशल्य आहे. दूरदर्शन संचही दुरुस्ती करतो. चित्रकला व हस्तकला अवगत आहे. शिवणकलाही चांगली येते. अनेक विषयांची गोडी असून आकलन शक्ती चांगली आहे. स्वभावाने विनयशील असून दुसऱ्यास मदत करण्यास तयार असतो. पण अयुष्यात स्थिरता प्राप्त झाली नाही. दशमात तृतीयेश शुक्र, शनी व मंगळ दोघांच्याही दृष्टीत आहे. परस्परविरोधी ग्रहांची दृष्टी दशम भाव व शुक्र यावर आहे.

पण भाग्येश मंगळ सप्तमात व सप्तमेश भाग्यात आहे. असा अन्योन्य क्षेत्र योग आहे. त्यामुळे प्रगती होणार असून गुरुच्या महादशेतच जातकास स्थैर्य लाभेल व तो नावारूपास येईल.

त्यास सर्दीचे विकार आहेत, पोटाचीही तक्रार आहे, शरीराने सडपातळ असून उंच आहे. व्यक्तिमत्त्व चांगले आहे. हसतमुख व आशावादी आहे.


शनी व  मंगळ या दोन ग्रहांशी पंचमेश चंद्राचा शुभयोग आहे त्यामुळे शनी-मंगळ प्रतियोगाची तीव्रता बरीच कमी झाली आहे. पंचमेश चंद्र व भाग्येश मंगळ हा त्रिकोण आहे. हा सर्वांत उत्तम योग आहे. जातकास २९ वे वर्ष ३० वर्ष ते ३८ वर्षेपर्यंतचा काल प्रगतिपथावर नेणारा आहे. ३४ व ४३ ही वर्षे उत्तम जातील.

शनीच्या एकादशांतील चंद्र अधिकारप्राप्ती, उत्तम लाभ, आदर व मान वगैरे सर्व शुभ फले देईल व सर्व सुखाची प्राप्ती होईल.

# २

# द्वितीय भाव

**(धन, वाणी, कुटुंब स्थान)**




सोबतच्या कुंडलीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी दोन हा अंक लिहिलेला आहे त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीतील द्वितीय स्थान किंवा दुसरे स्थान असे म्हणतात.

या स्थानावरून प्रामुख्याने कुटुंब, वाणी, विद्या, धन, वदन, भोजन यांचा विचार होतो. द्वितीय, दशम व षष्ठ भाव मिळून अर्थ त्रिकोण होतो. दशम हे केंद्र असून व्यवसाय कर्मदर्शक आहे. द्वितीय हे कणफर स्थान आहे व त्यावरून अर्थसंचय, अर्थप्राप्तीचे माध्यम यांचे निदर्शन होते आणि षष्ठस्थान हे साहाय्यक, नोकर, कामगार व नोकरीदर्शक पोषकस्थान आहे, असा हा अर्थ त्रिकोण होतो.

वराहमिहिरांनी द्वितीयस्थ शनीबद्दल तो रवीप्रमाणे फल देतो असे सांगून रवीबद्दल 'भूरिद्रव्यो, नृपहृतधनो व वक्त्ररोगी द्वितीये' असे सूत्ररूपाने सांगितले आहे. म्हणजे द्वितीयातील रवी पुष्कळ धन दर्शवतो पण शासनाकडून, सरकारकडून त्यातले धन हरण केले जाते आणि जातक मुखरोगी असतो आणि हीच फले द्वितीयेतील शनीबद्दल घ्यावयाची आहेत. म्हणजे शनी हा धनसंचय दर्शवितो. तो राजाचा खजिना असतो. अनेक उद्योगपतींच्या धनस्थानी शनी हा गुरुदृष्ट असलेला दिसतो. त्यामुळेच धनाची व व्यवसायाची वृद्धी, समृद्धी होत असल्याचे प्रत्ययास येते.

सारावलीकार द्वितीयस्थ शनीबद्दल असे सांगतात -

**विकृतवदतोऽर्थभोक्ता जनरहितो न्यायकृत कुटुंबगते ।**
**पश्चात्परदेशगतो धन वाहन भोगवान् शौरे ।।**

विकृत वदन - चेहरा कुरूप अगर व्याधिग्रस्त असतो. निराळ्या अर्थाने जातकाचे बोलणे कटू असते. धनसमृद्धी असते पण स्वजन नसतात - कमी असतात, कटू-कडवट बोलण्याने, टीकात्मक वक्तव्यामुळे लोक फारसे जवळ येत नाहीत. जातक परदेश प्रवास करतो आणि त्यास स्थावर वाहनादी सुखोपभोग मिळतात.

द्वितीयेतील शनीची चतुर्थावर दृष्टी असते म्हणून गृह, स्थावर यांचा लाभ होतो. तसेच त्याची दृष्टी लाभस्थानावर असते. चतुर्थ व लाभावरील दृष्टींमुळे वाहन लाभ होतात. तसेच उद्योगापासून मिळणारे धन लाभभावावरून कळते. तसेच अष्टम स्थान हे अकल्पित व वारसारूपाने मिळणारे धन दर्शविते. म्हणजे शनीची लाभस्थान व अष्टम स्थान यावर असणाऱ्या दृष्टीची ही फले आहेत. अष्टम स्थान हे दशमाचे लाभस्थान आहे.

जातकास धनप्राप्ती झाली तरी त्यात घट, नुकसानही होते. जातकास कौटुंबिक सौख्य मिळत नाही. आप्तस्वकीय व मित्रपरिवार जातकापासून दुरावतात. त्यास भावंडे नसतात (कारण तो तृतीयाच्या व्ययात असतो). मानसिक स्वास्थ्य लाभत नाही. दंत विकार होतात.

द्वितीयेतील शनी गुरु वा बुधाशी शुभसंबंधित नसता जातक अडखळत बोलतो. बुध, शनी एकत्र असता जातक मुद्देसूद बोलणारा असतो.

जातक हा शिस्तप्रिय असतो त्यामुळे शिस्तभंग दिसल्यास तो कडक बोलतो. त्याचे बोलणे, टीका, कटू व कठोर वाटते.

जातकाच्या कुटुंबाचा संकोच होत राहतो. सप्तम नीट नसल्यास अगर शनी मारकेशाच्या नक्षत्रात असल्यास त्यास पत्नीसौख्य लाभत नाही. पत्नी आजारी असते अथवा लवकर मृत्यू पावते. द्विभार्या योग येतो.

आयुष्याच्या उत्तरार्धात जन्मस्थान सोडून परदेशात वा अन्य ठिकाणी जातो. विरक्ती होते, सुख नसते.

जातकास चांगली विद्या प्राप्त होते. तो सुशिक्षित, विद्वान असतो आणि शास्त्रांचे मर्म जाणतो. तो न्यायी असतो. कोणावर अन्याय करीत नाही.

येथून पुढे द्वितीयस्थ शनीची राशिनिहाय भावफले काय असतात याचा विचार केला जाईल.

### द्वितीयस्थ शनीची राशिनिहाय भावफले

**(१) मेषेचा शनी :** द्वितीय स्थानात एक हा अंक असेल तर तेथील शनीस 'मेषेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


मीन या लग्नास शनी व्ययेश व लाभेश असतो व द्वितीयेत मेष या नीच राशीत येतो. त्याचा नीचभंग झाला तर ठीक असते नाही तर व्ययेश (मूळ त्रिकोणाचा अधिपती) द्वितीयात नीचराशीस येणे हा योग संपत्तीच्या दृष्टीने चांगला ठरणार नाही. त्यातून तो शत्रू राशीत येतो.

### कुंडली : डॉ. एस. आर. वाडिया

जन्म ११ नोव्हेंबर, १९१० रोजी दुपारी ३ वा. ४५ मि. प्र. वेळ मुंबई. सां. स. १८.२४.४२ अयनांश २२° ३६' ३२''.

भारतीय होमिओपॅथीमधील निष्णात. आंतरराष्ट्रीय होमिओपॅथी संघाचे कार्यकारी मंडळाचे सदस्य. ब्रिटिश होमिओपॅथी फॅक्टरीचे फेलो. आश्विनीकुमार पारितोषिक.

लाभेश शनी द्वितीयभाव मध्यानजीक असून त्यावर गुरु व मंगळाची पूर्ण दृष्टी.




तुळ राशीत गुरु, मंगळ, शुक्र, बुध, रवी असे पाच ग्रह शनीच्या समोर व द्वितीयेसमोर.

लग्नेश गुरु व भाग्येश - धनेश मंगळाची शनीवर व द्वितीय भावावर दृष्टी आहे. त्यामुळे शनीची अशुभ फले नाहीत. चंद्राच्या नवम स्थानात पाच ग्रह यामुळे त्यांना परदेशातूनही मान व हिंदुस्थानातही पारितोषिक मिळाले.


**(२) वृषभेचा शनी** : द्वितीय स्थानात दोन हा अंक असेल तर तेथील शनीला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मेष लग्नास शनी दशमेश व लाभेश असतो आणि द्वितीयेत वृषभ या मित्रक्षेत्री येतो. ही स्थिती मात्र सन्मान व उद्योगात उत्तम प्राप्ती दर्शविते. दशम व षष्ठातील ग्रहयोग व खुद्द शनीशी असलेले ग्रहयोग यावर शुभाशुभ फले अवलंबून राहतात.

### कुंडली : श्री. जॉर्ज ईस्टमन

जन्म मंगळवार दिनांक १२ जुलै, १८५४ रोजी रात्रौ ० वा. १५ मि. वॉटरव्हिले येथे. अक्षांश ४२° उ. ४२' रेखांश ७३° प. ४४' अयनांश २१° ४९' ३३'' सां. स. १९ ता. ३४ मि. ४३ से.

अमेरिकन संशोधक. १८८० साली सेन्सिटिव्ह प्लेट्स तयार केल्या. १८८४ साली फोटोग्राफीचे रोल तयार केले आणि १८८८ साली कॅमेरा तयार केला. आणखी संशोधन करून फोटोग्राफीचा धंदा उभा केला. दीड कोटी पौंडाचे दान केले. संशोधन हर्षल लग्नी, सर्वप्रथम यशस्वी. हे प्लूटोचे कार्य. जगप्रसिद्ध ईस्टमन कोडॅक कंपनी.




दशम केंद्री गुरु असून त्याची षष्ठस्थ लग्नेशावर पूर्ण दृष्टी व द्वितीय भावावरही दृष्टी आहे. दशमेश शनी व धनेश शुक्र यांची अंशसाम्याने युती आहे व त्या दोघांशी बुधाचा व चंद्राचा शुभयोग आहे. अमाप संपत्ती मिळविली आणि त्यापैकी दीड कोटी पौंड एवढी प्रचंड रक्कम दान दिलेली आहे. दशमेश, धनेश, चतुर्थेश यांच्या सहकार्याने प्रचंड काम केले. सिनेमा धंद्याचे कारक नेपच्यूनचा रवीशी त्रिकोण योग आहे. सिनेमा धंद्याचा पाया म्हणजे छायाचित्रण फोटोग्राफी हे आहे.


**(३) मिथुनेचा शनी :** द्वितीय स्थानात तीन हा अंक असेल तर तेथील शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

वृषभ व तुळ या दोन शुक्राच्या राशी आहेत. ही लग्ने उदित असता एकटा शनी राजयोगकारक असतो. तो अनुक्रमे भाग्येश व पंचमेश असतो. त्यामुळे द्वितीय स्थानातील वास्तव्य उत्तम फलदायी ठरते.

द्वितीयात मिथुन रास असते आणि भाग्येश व दशमेश शनी मिथुनेत मित्रक्षेत्री येतो. भाग्येश धनस्थानात असल्याने पैसा चांगला मिळतो पण मिथुनस्थ शनी बहुऋण बंधनतप्त असतो. त्यामुळे जातक सढळ हाताने पैसा खर्च करतो आणि परिणामत: उत्तरायुष्यात पैशाची अडचण भासते. कर्ज काढावे लागते व त्यामुळे मानहानी होण्याची शक्यता असते. त्यातून व्ययस्थानी मंगळ व राहू असता वरील फलांची शक्यता निश्चित असते.

## कुंडली : श्री. बी. सूर्यनारायण राव

जन्म मंगळवार दिनांक १२ फेब्रुवारी, १८५६ रोजी दिवसा १२ वा. २१ मि. स्था. वेळ चिकाकोल (गंजम जिल्हा). अक्षांश १८° उत्तर १८' रेखांश ८३° पूर्व ५८' अयनांश २१° ५७' ५२'' सां. स. २१ ता. ४७ मि. ११ से.




सुप्रसिद्ध ज्योतिषी, ॲस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिनचे संस्थापक. जगप्रसिद्ध ज्योतिषी कै. बी. व्ही. रामन यांचे आजोबा. जातक स्वत:च आपल्या पुस्तकात लिहितात की, माझी मिळकत पुष्कळ आहे. पैसे चांगले मिळतात पण माझा खर्चही काही कमी नाही. माझा उदार स्वभाव आहे. मी सढळ हाताने खर्च करतो व नडलेल्या व्यक्तींना चांगली मदत करतो. द्वितीयस्थ शनीचे व व्ययस्थ चंद्र-हर्षलचे फल त्यांच्याच शब्दात दिसते. व्ययेश मंगळ असून त्याची व्ययस्थानावर पूर्ण दृष्टी आहे.

रवी-शनी त्रिकोण योग आहे. बुध-गुरु युती त्रिकोण शनी - उच्च शिक्षण, उत्तम वक्तृत्व, भाषाप्रभुत्व, सखोल ज्ञान हे त्या शुभयोगाचे फल आहे. मिथुन आणि कुंभ या बौद्धिक राशीत ५ ग्रह आहेत. संस्कृत ग्रंथांची भाषांतरे करताना त्यांचे विवरण जे त्यांनी केले आहे ते वाचण्यासारखे व मनन करण्यासारखे आहे.

लग्नेश शुक्र अष्टमात धनू राशीत आहे. हा योग उत्तम विद्वत्ता देणारा आहे. एका इंग्रज लेखिकेने विस्मृतीत गेलेले साम्राज्य असे म्हणून विजयनगरच्या इतिहासावर पुस्तक लिहिले. त्या पुस्तकाला (Never to be forgotten empire) या शीर्षकाचे पुस्तक प्रसिद्ध करून उत्तम प्रत्युत्तर दिले. सर्वार्थ चिंतामणी व बृहज्जातक यावरील त्यांचे भाष्य प्रत्येक ज्योतिषाभ्यासूने जवळ ठेवून मनन करण्यासारखे आहे.

मिळकतीचा मार्ग फलज्योतिषाचा व्यवसाय, लेखन, पुस्तके हे सर्व मिथुनेतील द्वितीयस्थ शनी त्रिकोण बुध दर्शवितो.

व्ययस्थानात राहू मंगळाच्या दृष्टीत. यामुळे खर्च फार होत असे. उत्तरायुष्यात पैशाची चणचण भासू लागली असे रामन लिहितात, शनी योगकारक आहे त्यामुळे व चतुर्थावर रवी-बुध-गुरु आणि शनी यांची दृष्टी असल्याने उत्तम व प्रशस्त स्थावर होती.

शनीची अष्टमावर व अष्टमस्थ लग्नेशावर दृष्टी आहे त्यामुळे त्यांना दीर्घायुष्य लाभले. मृत्यू दिनांक १२ मार्च, १९३७. ८१ वर्षे व एक महिना पूर्ण. शनी-रवीचा अंशसाम्याने त्रिकोण योग आहे. शनी ८ व रवी १ यामुळे ८१ वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभले.

यांच्याबद्दलची एक हकीकत अशी आहे. यांच्या वडिलांच्या मनात यांचे नाव वेंकटरमणया असे ठेवावयाचे होते पण जन्मानंतर ४ थ्या दिवशी हे अत्यंत आजारी झाले व सर्वांनी आशा सोडली. रात्री वडिलांना स्वप्न पडले. त्यात प्रत्यक्ष सूर्यनारायणाने त्यांस सांगितले की, 'हे बालक रथसप्तमीस दुपारी १२ वाजता झालेले असल्याने याचे नाव सूर्यनारायणच ठेवा. इतर नाव ठेवाल तर बालक जगणार नाही. म्हणून यांचे नाव सूर्यनारायण असेच ठेवले.

(पण यांच्या नातवाचे नाव व्यंकटरमण ठेवले होते. ते न म्हणता सर्वजण रामन असाच उल्लेख करीत.)

पाचव्या वर्षी सूर्यनारायणरावास स्वप्न पडले की, ''मी सूर्यलोकी असून प्रत्यक्ष सूर्यनारायणाच्या मांडीवर बसलो आहे व सूर्यदेव स्वत: मजला पायस (खीर) पाजीत आहेत.'' नंतर सूर्यदेव म्हणाले, ''तू प्रसिद्ध, दीर्घायू, विद्वान व पुत्रपौत्रवान होशील.''

**टीप :** ज्योतिषाभ्यासूंनी श्री. वि. गो. नवाथे यांचे जातक संग्रह जरूर वाचावे. त्यात सूर्यनारायणरावांची कुंडली क्र. १५ ची आहे. त्यामध्ये ते लिहितात, ''वयाच्या ८१ व्या वर्षी प्रोग्रेस रवी जन्मचंद्रास मिळेल. वयाच्या ८० व्या वर्षी प्रोग्रेस बुध (बुध सायन कुंडलीत लग्नेश आहे) जन्म हर्षलला मिळून, प्रोग्रेस हर्षलला ८२ व्या वर्षी मिळेल. यावरून त्यांची ८०-८२ पर्यंतची वर्षे शरीरसुखास उत्तम नाहीत.''


**(४) कर्केचा शनी :** द्वितीय स्थानात चार हा अंक असेल तर तेथील शनीला 'कर्केचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मिथुन व कन्या या दोन बुधाच्या राशी आहेत. ही लग्ने उदित असता द्वितीयेवर कर्क व तुळ या राशी येतात. त्यापैकी तुळेत शनी उच्च असल्याने उत्तम फले मिळतील. कर्केत शनी निर्बली असतो.

द्वितीयेवर कर्क रास येते, शनी तेथे निर्बली असतो. शनी अष्टमेश व भाग्येश असतो. त्यामुळे संपत्तीच्या बाबतीत अगदीच अशुभ फले मिळणार नाहीत. पण शुभाशुभत्व व संपत्तीचे परिणाम अन्य ग्रहांचे दृष्टियोग, सहयोग यावर अवलंबून राहतात. शनीबरोबर रवी व मंगळ असता असलेल्या संपत्तीचा ऱ्हास असतो. पण मंगळाची लाभातून दृष्टी असता परस्पर दृष्टियोगाने संपत्तीसंचय चांगला होतो. शुभ ग्रहांचे साहचर्य वा दृष्टियोग यामुळे निरनिराळ्या मार्गाने पैसा कमावला जातो. शनी एकटा द्वितीयेत असता बुधाची दृष्टी असता चांगली संपत्ती मिळते.

### कुंडली : जयललिता

जन्म मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी, १९४८ रोजी दुपारी २ वा. ३४ मि. प्र. वेळ मद्रास येथे. अक्षांश १३° उत्तर ५' रेखांश ८०° पूर्व १८' सां. स. ०.३७.५० अयनांश २३° ७' ४५''




सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री. एम. जी. आर. नंतर अण्णाद्रमुक पक्ष प्रमुख व त्यानंतर तमिळनाडूची मुख्यमंत्री दिनांक २४-०६-१९९१. सिनेअभिनेत्री म्हणून पैसा चांगला मिळविला. नंतर मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत अमाप संपत्ती वाममार्गाने मिळविली असा आरोप आहे. दशमात उच्चांशाचे निकट असलेला शुक्र त्याच्याशी अष्टमेश व भाग्येश शनीचा द्वितीयातून पूर्ण त्रिकोण योग आहे. अष्टमेशत्वामुळे वाममार्गाने पैसा जमविला. धनेश चंद्र व लाभेश मंगळ यांची युती गुरुच्या त्रिकोणात व लग्नेश बुधाच्या दृष्टीत हाही संपत्तिदायी योग आहे.


**(५) सिंहेचा शनी :** द्वितीय स्थानात पाच हा अंक असेल तर तेथील शनीला 'सिंहेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कर्क लग्नास शनी सप्तमेश व अष्टमेश असतो व द्वितीयेत सिंह राशीस येतो. तो शत्रुगृही येतो त्यामुळे अशा शनीकडून धनसंचय सहसा संभवत नाही. पण अशा शनीवर गुरुची दृष्टी असता अगर लाभेश व चतुर्थेश शुक्राची दृष्टी वा सहयोग असता उत्तम धनलाभ होतो.

पंडित जवाहरलाल नेहरू हे अत्यंत श्रीमंत घराण्यात जन्मले व वाढले पण त्यांनी राजकारणाशिवाय दुसरा उद्योग केला नाही. वडिलोपार्जित संपत्ती होतीच पण त्याशिवाय त्यांनी जी पुस्तके लिहिली त्यातूनही अर्थप्राप्ती चांगली झाली.

## कुंडली : हेमामालिनी

जन्म शुक्रवार दिनांक १५/१६ ऑक्टोबर, १९४८ रोजी रात्रौ १२ वा. ३० मि. तिरुचिरापल्ली. अक्षांश १०° उत्तर ५०' रेखांश ७८° पूर्व ४६'



हिंदी चित्रपटातील विलोभनीय व लोकप्रिय अभिनेत्री. हसरा चेहरा, विशाल व बोलके डोळे, सोज्वळ अभिनय, स्वप्नसुंदरी व नृत्यांगना. पंचमेश पंचमात असून त्रिकोण चंद्र आहे. द्वितीयारंभी शनी, चतुर्थेश व लाभेश शुक्राच्या युतीत गुरुची द्वितीयेवर व शनीवर दृष्टी. सिनेमा, नृत्य व अभिनय यावर व त्याच्या माध्यमातून संपत्तीचा लाभ, शिवाय शनी लाभयोग हर्षल व दशमावर राहू व धनेश रवी-नेपच्यूनच्या युतीत. राहू नेपच्यून सिनेमाधंद्याचे कारक. शुक्र सिंह या नाट्यकलादर्शक राशी द्वितीयात आहे. त्याचे माध्यमातून संपत्ती, लाभ-प्राप्ती.


**(६) कन्येचा शनी :** द्वितीय स्थानात सहा हा अंक असेल तर तेथील शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सिंह लग्नास शनी षष्ठेश व सप्तमेश असून द्वितीयेत कन्या राशीस मित्रक्षेत्री येतो. बुध हा स्वत:च धनेश व लाभेश आहे. त्याचा अगर योगकारक मंगळाचा अगर पंचमेश गुरुचा दृष्टियोग सहयोग असता उत्तम संपत्ती लाभ होतो. दशमेश शुक्राशी शुभयोग असताही संपत्तीच्या दृष्टीने उत्तम राहील. पुढे कुंडली दिली आहे ती अभ्यासनीय आहे.

### कुंडली : श्री. मोरारजी गोकुळदास

जन्म मंगळवार दिनांक २८ ऑक्टोबर, १८३४ रोजी पहाटे २ वा. ३० मि. स्था. वेळ मुंबई.

महान उद्योगपती. कापड उद्योगाच्या गिरण्या. मोरारजी मिल्सचे मालक. षष्ठेश शनी द्वितीय भाव मध्यावर दशमेश शुक्राशी लाभयोग. शनीची शुक्रावर पूर्ण दृष्टी. शनीवर योगकारक. मंगळाची व पंचमेश गुरुची पूर्ण दृष्टी आहे. तसेच शनीचीही मंगळावर दृष्टी आहे. शुक्र कापड उद्योगाचा कारक आहे.




**(७) तुळेचा शनी :** द्वितीय स्थानात सात हा अंक असेल तर तेथील शनीला 'तुळेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


शनी पंचमेश व षष्ठेश असतो आणि तो द्वितीयेत तूळ या उच्च राशीत येतो. पंचमाने दर्शविलेल्या मार्गाने म्हणजे सट्टा, लॉटरी, रेसेस, शेअर्स खरेदी-विक्री याद्वारा उत्तम पैसा मिळू शकतो. शनी षष्ठेशही असल्याने विधिनिषेध नसतो. वारसा हक्कानेही पैसा मिळतो वा अचानक धनप्राप्ती होते. शिवाय द्वितीयस्थ शनीची दृष्टी अष्टम व लाभ भावावर येते त्यामुळे एकट्या उच्चस्थ शनीमुळे द्वितीय, पंचम, अष्टम व एकादश भावावर अधिकार मिळविला जातो आणि हे खालील उदाहरणांवरून स्पष्ट होते.

## कुंडली : पुरुष जातक

जन्म दिनांक २० जानेवारी, १८९४ रोजी रात्रौ २२ वा. ३० मि. जांळे.

लग्नेश बुध, पंचमात. पंचमेश शनी द्वितीयात उच्च राशीत - अन्योन्य क्षेत्री अष्टमेश मंगळ, तृतीयात स्वगृही, त्याची लाभेश चंद्रावर दृष्टी.

बहिणीच्या (तृतीयेश मंगळ) मृत्यूनंतर तिचे वारसदार म्हणून १९३३ साली रु. २५,०००/- मिळाले. विवाह जून १९१८ साली, संतती ३ मुलगे २ मुली कुलकर्णी पदाची नोकरी. निवृत्त झाला. १७.१०.५० रोजी तीन क्रमांकाच्या सुनेस इस्टेट मिळाली पण त्याबद्दल खटला झाला. एक मोठा भाऊ होता. शेते विकली. ट्रक मालकीचा होता.



**(८) वृश्चिकेचा शनी :** द्वितीय स्थानात आठ हा अंक असेल तर तेथील शनीला 'वृश्चिकेचा शनी' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तूळ लग्नास द्वितीय स्थानावर वृश्चिक रास येते. तेथे शनी शत्रू राशीत येतो पण तो चतुर्थ पंचमाचा अधिपती असून शनी धनस्थानी वृश्चिकेत येतो. येथे शनी भरपूर संपत्ती देतो व वारसारूपानेही मालमत्ता मिळते.

चतुर्थेश द्वितीयात असणे सुदैवाचे असते. जातक सुखी व धैर्यवान असतो पण त्याचा स्वभाव व बोलणे उपरोधिक असते. तेथे शनीबरोबर मंगळ असता अगर मंगळ शुभस्थितीत असता कौटुंबिक सुख लाभते. जातक हा उत्तम वक्ता होतो.


पंचमेश शनी शुभदृष्ट असता जातकास सुंदर पत्नी मिळते व सद्‌गुणी संतती होते. जातक विद्वान असतो व सरकार वा प्रशासनाकडून लाभ होतो.

महात्मा गांधी यांचे तूळ लग्न असून लग्नी बुध, शुक्र व मंगळ आहेत. पैकी शुक्र व मंगळ यांची पूर्ण युती असून त्या युतीवर सप्तमातून गुरुची पूर्ण दृष्टी आहे. शनी वृश्चिकेत द्वितीय स्थानात असून त्याचा षष्ठस्थ नेपच्यून व दशमस्थ चंद्र या तिघांचा महात्रिकोण आहे.

महात्मा गांधी हे विद्वान होते. त्यांचे वक्तृत्व प्रभावी होते. त्यांचा प्रभाव भारताच्या जनतेवर पडला होता. हा महात्मा जगद्वंद्य झाला. त्यांना कौटुंबिक सुखही लाभले. त्यांची कुंडली पुढीलप्रमाणे आहे.

## कुंडली : श्री. मोहनदास करमचंद गांधी

जन्म रविवार दिनांक २ ऑक्टोबर, १८६९ रोजी सकाळी ७ वा. ४५ स्था. वेळ पोरबंदर येथे. अक्षांश २१° उत्तर ३७' रेखांश ६९° पूर्व ४९' अयनांश २२° २' १८'' सां. स. ८ ता. २७ मि. ४३ से.



चंद्र-शनी-नेपच्यून महात्रिकोण आहे. हा त्रिकोण कर्क, वृश्चिक, मीन या मोक्ष त्रिकोण राशीतून झाला आहे. याचा परिणाम गांधींच्या जीवनप्रवाहामधून व्यक्त झालेला आहे. ते प्रथमतः संत होते. यमनिमांचे पूर्ण पालन करण्याचा कसोशीने प्रयत्न त्यांनी केला. चंद्राच्या नवमातील नेपच्यूनने त्यांना आतला आवाज दिला. योगासनांचाही अभ्यास त्यांनी केला होता. कर्क, वृश्चिक, मीन याच तीन राशी योग निवारणास उपयोगी पडतात. निसर्गोपचार पद्धतीचा म. गांधींनी केलेला प्रयोग वृश्चिकेतील शनीवरून दिसून येतो. कर्केतील चंद्रामुळे भक्तियोग व त्यांची रोजची प्रार्थना हे त्यांचे निदर्शक आहे. वृश्चिकेतील शनी रोगोपचाराकडे नेतो.

**(९) धनुचा शनी :** द्वितीय स्थानात नऊ हा अंक असेल तर तेथील शनीला 'धनुचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

वृश्चिक लग्नास शनी चतुर्थेश व तृतीयेश असतो आणि द्वितीयात धनु राशीत मित्रक्षेत्री येतो. वृश्चिक लग्नास गुरु व बुध यांचे संबंध संपत्ती दर्शवितात. अन्य ग्रहांच्या स्थितीवर फलांची व्याप्ती व दिशा दर्शवितात.


चतुर्थ व लाभस्थान यावरील दृष्टी विद्या, शिक्षण, गृह व वाहनांची प्राप्ती दर्शविते. अष्टमावरील दृष्टी आयुर्मर्यादा वाढविणारी असते. मात्र मंगळ, हर्षल, नेपच्यून यांच्याशी अशुभ संबंध असल्यास अपघात व अपमृत्यू दर्शवितो.

## कुंडली : श्रीमती नंदिनी सत्पथी

जन्म सोमवार दिनांक ९ जून, १९३० रोजी सायंकाळी ५ वा. ३० मि. कटक येथे. अक्षांश २०° उत्तर २८' रेखांश ८५° पूर्व ५४' अयनांश २२° ५३' ४'' सां. स. १० ता. ५१ मि. ४५ से.

ओरिसामधील काँग्रेस पुढारी. राज्यसभा सदस्य १९६२-७२.

१९७२ आमदार, मुख्यमंत्री १९७२-७३ व १९७४-१९७६.



लघुकथा लेखक व संपादक. दशमेश रवी सप्तमात म्हणून राजकारणात व मानाच्या जागा मिळाल्या आहेत.

लग्नेश मंगळ व तृतीयेश, चतुर्थेश शनी यांचा त्रिकोण योग. धनेश गुरुची शनीवर दृष्टी, चंद्र व बुध परस्परांवर दृष्टी. लेखक, संपादक. रवी उभयचरी योगात, मागे बुध व पुढे गुरु-शुक्र. शनी शुभयोगात त्यामुळे उत्तम विद्या, धन, वाहनयोग भाग्यवान आहे. भाग्येश चंद्र लग्नी-लाभेश बुधाच्या दृष्टीत. शनी-गुरु दृष्टियोगाने वक्तृत्व आहे.


**(१०) मकरेचा शनी** : द्वितीय स्थानात दहा हा अंक असेल तर तेथील शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

धनु लग्नास द्वितीय स्थानावर मकर रास येते व शनी तेथे स्वगृही येतो. शनी द्वितीयेश व तृतीयेश असतो. शनी या ठिकाणी संपत्तीच्या दृष्टिकोनातून चांगली फले देतो. पण कौटुंबिक सुख बिघडते. शिस्त व टापटीप असते. शनीची चतुर्थावर, मीन राशीवर व लाभावर तूळ राशीवर दृष्टी असते. लाभेश व दशमेश यांची साथ मिळाली तर संपत्ती उत्तम जमा होते. गुरुच्या दृष्टीनेही पैसा कमावला जातो.

**कुंडली : श्री. ज. ना.**

जन्म गुरुवार दिनांक २ नोव्हेंबर, १९३३ रोजी सकाळी १० वा. ३४ मि. पुणे. सां. स. १२.४७-७. अयनांश २२° ५६' ४''.

बी. ई. फर्स्टक्लास फर्स्ट. त्यानंतर इंडियन रेल्वे सर्व्हिसमध्ये नोकरी. डेप्युटी चीफ इंजिनिअरच्या पदावरून मुदतपूर्व स्वेच्छा निवृत्ती. सध्या सल्लागार म्हणून काम करीत आहे.





धनेश शनी धनस्थानात स्वगृही दशमस्थ गुरुचे पूर्ण दृष्टी अधिष्ठित त्रिकोण योग. तसेच पंचमेश मंगळाशी लाभयोग. भाग्येश रवी, लाभात शनीच्या दृष्टीत. स्वत:ची स्थावर दोन गावी आहे. एक पुत्र अमेरिकेत आहे.

**(११) कुंभेचा शनी :** द्वितीय स्थानात अकरा हा अंक असेल तर तेथील शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मकर या लग्नास द्वितीयावर कुंभ रास असून शनी तेथे नुसता स्वराशीचा नव्हे तर मूलत्रिकोण राशीचा अधिपती होतो. हा शनी संपत्तियोगास चांगला ठरतो. भाग्येश बुध व दशमेश शुक्र यांचे सहयोग व युती उत्तम लाभदर्शक ठरते.

**कुंडली : श्री. अनंत गजानन जोशी**

जन्म बुधवार दिनांक २९ सप्टेंबर, १९६५ रोजी दुपारी २ वा. ३० मि. प्र. वेळ पुणे. अक्षांश १८° उत्तर ३४' व रेखांश ७३° पूर्व ५८' सां. स. १४.२७.२१. अयनांश २३° २२' २७''.




B. E. Petrochemicals शनी, दशमेश. दशमात गुरुचे दृष्टीत हर्षच्या प्रतियोगात दशम भावबिंदूवर शुक्र व नेपच्यून यांची युती. शनीचा या युतीशी त्रिकोण योग. राजयोगकारक शुक्र दशम केंद्री. हर्षलच्या लाभयोगात पेट्रोल नेपच्यूनच्या अमलाखाली असून शनीही जमिनीखालील पेट्रोल दर्शवितो. पण नेपच्यून महासागराशी संबंधित अंतर्गत पेट्रोल दर्शवितो.

**(१२) मीनेचा शनी :** द्वितीय स्थानात बारा हा अंक असेल तर तेथील शनीला 'मीनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कुंभ या लग्नास मीन रास द्वितीयावर व धनु रास एकादशावर येते. शनी लग्नेश तसाच व्ययेशही आहे. लग्नेश द्वितीयात असता लाभ बरेच होतात. जातक सुस्वभावी, आदरणीय व उदारहृदयी असतो. पण व्ययेश असल्याने गुप्त शत्रूंकडून त्रास होतात. जातकाचे बोलणे, वागणे, धोरणी व मुत्सद्दीपणाचे असते. तो आयुष्यात मोठ्या पदावर येतो.


## कुंडली : पुरुष जातक

जन्म बुधवार दिनांक १६ एप्रिल, १९०९ रोजी पहाटे ४ वा. पुणे येथे झाला. अयनांश २२° ३५' ९''. सां. स. १६ ता. ५९ मि. ४५ से.

योगकारक शुक्र धनस्थानी मीन या त्याच्या उच्चराशीत उच्चांशाचे निकट आहे. सप्तमेश रवी मेषेत २° ४२' ४८'' आहे. शुक्र व शनी यांचा युतियोग ३ अंश दीप्तांशात आहे.

सप्तमाचा धनेश बुध धनस्थानी शुक्राच्या युतीतच आहे. धनेश सप्तमात व सप्तमेश उच्च द्वितीयातच आहे. लग्नेश शनी धनस्थानी २२° २' बुधाच्या युतीत आहे. बुध सप्तमाचा धनेश आहे. त्यामुळे सासऱ्याकडून उत्तम धनलाभ.

शुक्र नवमेश व चतुर्थेश धनस्थानी उच्च असल्याने विवाहाबरोबरच स्थावर, धनप्राप्ती जातक घरजावई झाला. जन्मकाळी मंगळ महादशा भोग्य १ वर्ष ७ महिने १० दिवस असून दिनांक २६.११.१९२८ रोजी राहून महादशा संपून धनेश व लाभेश गुरुची महादशा सुरू झाली. गुरुचेच अंतर्दशेत विवाह होऊन जातक घरजावई झाला. त्यास घर व संपत्ती मिळाली.





द्वितीयस्थ शनी संपत्ती चांगली देतो.

३

# तृतीय भाव

## (पराक्रम-प्रवास-लेखन-बंधु स्थान)




सोबतच्या कुंडलीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी तीन हा अंक लिहिलेला आहे त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीतील तृतीय स्थान किंवा तिसरे स्थान म्हणतात.

कुंडलीच्या तिसऱ्या स्थानावरून शरीरबल, मनोबल आणि पराक्रम तसेच शरीरसौष्ठव, भावंडे, सर्व प्रकारचे लेखन, लहान-सहान प्रवास, खेळ, कसरती, दुय्यम वा जोड व्यवसाय यांचा प्रामुख्याने विचार होतो. मनोबलाचा संबंध चित्तभ्रमाशीही (उलट अर्थाने) येतो. सैनिक, पराक्रम, दाय भागवाटणी, मोठा उद्योग, स्वत:चे धार्मिक कर्तव्य, दस्तऐवज, करारनामे यांचाही विचार या स्थानावरून होतो.

शरीरावयवांपैकी कर्ण, कंठ, खांदे, बाहू (दंड) यांचा विचार केला जातो.

लेखनाचा विचार याच स्थानारून होत असल्याने साहजिकच हस्ताक्षराचीही ओळख या स्थानावरून होते. यातील प्रत्येकाचा कारक ग्रह निरनिराळा आहे. शरीरबल मंगळावरून पाहिले जाते. पण मनोबल, जिद्द, धिमेपणा यासाठी शनीचा विचार तसाच धार्मिक कर्तव्यासाठीही शनीचाच विचार करावा असे वाटते.

वराहमिहीर तृतीय भावासाठी शनीची फले स्वतंत्ररीत्या देत नाहीत. सूर्यपुत्रासाठी सूर्याचीच तृतीय भाव फले घ्यावीत असे सुचवितात आणि तृतीयस्थ रवीबद्दल बलवान वा बळकट शरीर, पराक्रमी, व्यक्तिमत्त्व चांगले, विद्वान व शत्रूवर विजय मिळविणारा आणि ज्याचे भाऊ-बंधू हे नष्ट झालेले असतात असा रवी असतो पण जातक लोकांचा आवडता असतो असे म्हणतात.

सारावलीमध्ये रवी व शनीकरता स्वतंत्र फले दिली आहेत. शनीबद्दल असे म्हणतात, जातक काळा असतो. पण शारीरिक शुद्धता, स्वच्छता असते पण तो हलक्या मनाचा व त्याचे नोकर वा साहाय्यक आळशी असतात. जातक स्वत: पराक्रमी, धैर्यवान, दानशूर व उत्तम बुद्धिमत्ता असलेला असतो.

अन्य आचार्यांच्या मते, उत्तम बुद्धिमत्ता असते. तो इतरांना मदत करतो व आश्रयही देतो, त्याचे दैव व नशीब अडथळ्याचे असते. जातक दीर्घायू व धनवान असतो. मिताहारी व विवाह होण्यात अडथळे, अडचणी, विलंब होतो पण वैवाहिक जीवन सुखी राहते. पति-पत्नीमध्ये प्रेम कायम राहते. त्याचा मित्रपरिवार मोठा असतो. पण त्याचे भाऊ शत्रुवत असतात. लहानपणी सुखी नसतो. आजार असतात पण तो नंतर निरोगी असतो. संतती लवकर होत नाही व संततीपासून सुख मिळत नाही. त्याच्याजवळ वाहने असतात व तो प्रसिद्ध असतो. पित्याबरोबर राहत नाही. हातात व्यंग्य वा दोष असतो. हस्ताक्षर बारीक असते.

स्त्री जातकीचे बाबतीत ती सुगरण व कुशल असते. तिचे कुटुंबीयांशी चांगले संबंध असतात. कुटुंबीय तिचे कौतुक करतात व कुटुंबात मुख्य होते पण गुरु व शनी यांच्या संबंधावर अवलंबून राहते.

शनी दूषित असता मानसिक संतुलन बिघडते व भावंडांना चांगला नसतो.

### तृतीयस्थ शनीची राशिनिहाय भावफले

**(१) मेषेचा शनी :** तृतीय स्थानी जर एक हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मेषेचा शनी' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तृतीयावर मेष रास येते. शनी लग्नेश व व्ययेश असतो व तृतीयात मेष राशीत येतो. (शनी नीच राशीत असतो) लग्नेश तृतीयात म्हणून पराक्रमी, धाडसी वगैरे गुण मकर लग्नाच्या वेळी सांगितले आहेत. पण या ठिकाणी तो नीच असल्याने ही सर्व शुभ फले मिळतीलच असे नाही.

अशा वेळी गुरु, शुक्र वगैरेंचे शुभयोग असतील तरच शुभ फले मिळतील नाही तर फुप्फुसे, स्वरयंत्र वगैरेंचे दोष उत्पन्न होतात. बोलताना अडखळणे, कंप वगैरे दोष दिसतात. हस्ताक्षर मात्र चांगले असते.


### कुंडली : डॉ. बा. नी. पुरंदरे

जन्म २७ ऑक्टोबर, १९११ रोजी दुपारी ३ वा. १५ मि. मुंबई येथे. सां. स. १६.५५.०१ अयनांश २२° ३७′ २५″.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे स्त्रीरोग तज्ज्ञ व ज्योतिषी.

लग्नेश शनी व तृतीयेत त्रिकोण भाग्येश वक्र, प्रतियोग लाभेश गुरु, गुरुची लग्न, तृतीया व पंचम या स्थानावर दृष्टी असल्याने तीन स्थानांची शुभ फले मिळाली. सप्तमेश व भाग्येश अन्योन्य क्षेत्र योग. शनीचा नीचभंग झाला आहे. मेषेचा अधिपती मंगळ

वृषभेत चतुर्थ केंद्री आहे. त्यामुळे व शुक्र व गुरुच्या शुभयोगामुळे अशुभ फले मिळाली नाहीत. भाग्येश व चतुर्थेश शुक्र सप्तम केंद्रात व दशमेश मंगळ चतुर्थातून दशमावर दृष्टी टाकीत आहे.




**(२) वृषभेचा शनी :** तृतीय स्थानी जर दोन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तृतीयावर वृषभ रास आणि शनी लाभेश व व्ययेश असून तृतीयात मित्रक्षेत्री येतो.

जातकास संपत्ती चांगली मिळते व तो दीर्घायू होतो असे आर. संथानम सारावलीच्या भाषांतरातील विवरणात सांगतात. याचा अर्थ जातक संपत्ती चांगली मिळवतो. त्याची कर्तृत्व शक्ती उत्तम असते. अनेकविध कामे करून तो पुढे येतो. लाभेश शनी वृषभ या अर्थदर्शक राशीत येतो म्हणून संपत्ती. गुरुचे साहचर्य असता शिक्षण उत्तम होते. पदव्युत्तर शिक्षण. चतुर्थेश बुध असतो. तो व शनी त्रिकोणात असणे शिक्षणाच्या दृष्टीने चांगलेच ठरते.


## कुंडली : स्त्री जातक

जन्म सोमवार दि. २९ सप्टेंबर, १९४१ रोजी सायंकाळी ५ वा. ५४ मि. ॲस्ट्रॉलॉजिकल मॅगेझीन १९८६ पान ७१८ वरून.


Lady Doctor मेडिकल कॉलेजमध्ये फिजिओलॉजी भागाची प्रमुख. पंचमेश चंद्र त्रिकोण हर्षल, नेपच्यून व शनी.

चतुर्थेश बुध त्रिकोण चतुर्थ भाव बिंदू व षडाष्टक शनी हर्षल. पण बुध हा चंद्राचा नवमेश असून चंद्राच्या दशमात आहे.

चंद्र कुंडलीचा विचार करता चंद्राच्या पंचमेश शुक्र व लग्नाचा चतुर्थेश बुध हे दोघेही चंद्राच्या दशमात आहेत. म्हणून प्राध्यापकाचा व्यवसाय. राश्याधिपती शनी हा हर्षलसह तृतीयात असून त्यांचा रवीशी त्रिकोण योग आहे.




**नवमांश**




दशम धनु ९° ५०′ आहे म्हणजे तो मिथुन नवांशात आहे. त्याचा अधिपती बुध हा राहूसह आहे. नवमांशात केतू दशमात आहे.

नवमांशात बुध धनु नवांशात आहे व तो निसर्ग कुंडलीचा नवमराशी आहे. यामुळे अध्यापनाचाही मार्ग दर्शवितो.

नवमांशात दशमात केतू, षष्ठांत शनी व नेपच्यून आणि व्ययेश रवी अष्टमात हे योग वैद्यकीय व्यवसायदर्शक आहेत.


**(३) मिथुनेचा शनी :** तृतीय स्थानी जर तीन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तृतीयेवर मिथुन रास येते. शनी दशमेश व लाभेश असतो व तो तृतीयेत मित्रक्षेत्री येतो.

मिथुन ही बुधाची रास आहे व निसर्ग कुंडलीत तृतीयेत मिथुन रासच असते. तार्किकता, बुद्धिमत्ता व शाहणपण या मिथुनेवरच पाहिल्या जातात व दर्शविल्या जातात. दशमेश तृतीयेत मिथुन राशीत शिक्षण व्यवसाय या दृष्टीने चांगला ठरतो. तसेच शनी हा लाभेश असल्याने मिथुन दर्शक व्यवसायातून उत्तम लाभ मिळवू शकतो. बुधाशी सहयोग उत्तम ठरतो.

## कुंडली : श्री. एस. बी. वेलणकर

जन्म दिनांक २२ जून, १९१५ रोजी पहाटे ३ वा. रत्नागिरी येथे. सां. स. २० ता. ३५ मि. २१ से. अयनांश २२° ४०′ ४७″.




दशमेश शनी व तृतीयेश बुध यांची युती तृतीयेत मिथुन राशीत. तृतीय स्थान पोस्ट खाते दर्शकच आहे. धनेश शुक्र धनस्थानातच आहे. पंचमेश रवीही मिथुनेत शनीच्या युतीकडे चालला आहे. ४ ग्रह वायुराशीत. लग्नेश लग्नात. पोस्टखात्यात नोकरीस लागून पोस्ट मास्तर जनरल या पदावर गेले आणि त्यानंतरही भारत सरकारचे अतिरिक्त सचिव म्हणून बढती झाली. दशमेश शनीने मिथुन राशिदर्शक व्यवसायात पदार्पण करून बुधाच्या साहचर्याने अत्युच्च पद गाठले. नवमांश कुंडलीत लग्न वृश्चिक नवमांशात व शनी तृतीयांत मकर नवमांशात आहे.

**(४) कर्केचा शनी :** तृतीय स्थानी जर चार हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कर्केचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी हा लग्नेशांचा मित्र व दोन्ही लग्नांना राजयोगकारक असतो. एकात शनी कर्केत निर्बल तर दुसऱ्यात तो धनु राशीत येतो.

या लग्नास शनी नवमेश व दशमेश असून तृतीयेत कर्क या स्वराशीसन्मुख राशीत येतो. कर्केतून शनीची दृष्टी नवमावर, व्ययस्थानावर मेषेवर आणि पंचमावर कन्या राशीवर येते.

**कर्केत शनी असताना इतर ग्रहांशी होणारे योग :** रवीची दृष्टी असता पितृसुखास बाधक - रवी-शनी परस्पर दृष्टियोग असतो व त्या वेळी रवी मकरेत दुर्बल राशीत असतो.

चंद्राची दृष्टी असता मातृसुखास घातक राहतो. यावेळी चंद्र मकरेत येतो. पण अन्य ठिकाणी शनीच्या दृष्टीत असलेला चंद्र काय फले देतो ? कन्येत चंद्र पंचमात येतो. शनीची तिसरी दृष्टी व दहाव्या दृष्टीच्या वेळी चंद्र व्ययात मेषेत येतो. त्या वेळी मातृसुख व भातृसुख दोन्हीसही घातक असतो.

मंगळाची दृष्टी मकरेतून असता उत्तम फलदायी ठरते. पण व्ययातून मंगळ, शनी यांचा परस्पर दृष्टियोग चांगला ठरत नाही. भावंडांस अनिष्ट, पैशाची उधळपट्टी व कर्जबाजारीपणा येतो. काही व्यंग्य राहते. नातेवाईकपण चांगले नसतात.


गुरुची दृष्टी असता जातकास जमिनी, घरे, मित्रपरिवार, संतती, संपत्ती लाभते.

शुक्राची दृष्टी असता घराणे चांगले असते पण सुख व सौंदर्य नसते.

बुधाची दृष्टी असता कठोरहृदयी, भांडखोर पण शत्रूवर विजय मिळवितो व आत्मप्रौढी असतो.

**कुंडली : श्री. अ. स. सा.**

जन्म रविवार दिनांक २९ सप्टेंबर, १९४६ रोजी रात्रौ १० वा. ५० मि. प्र. वेळ माथेरान. अयनांश २३° ६′ ३२″. अक्षांश १८° ५९′ उत्तर रेखांश ७३° २८′ - ३६ मि. ८ से. सां. स. २२ ता. ४५ मि. २० से.



शनी तृतीय भावमध्याजवळ आहे. त्याची दृष्टी रवीवर आहे. रवी हा नेपच्यूनच्या युतीत आहे. पिता १३/१४ व्या वर्षी मृत. माता दीर्घायू. बुध विद्याकारक पंचम या विद्यास्थानात उच्चस्थ, त्रिकोण हर्षल. पदवी परीक्षा. मुंबईस एका प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत नोकरी. अनेक पुणेकरांप्रमाणे रोज डेक्कनक्वीन वा प्रगती एक्सप्रेसने मुंबईस जाणे-येणे. दशमेश तृतीयात कर्क या चर राशीत प्रवास स्थानात.

**(५) सिंहेचा शनी :** तृतीय स्थानी जर पाच हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'सिंहेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तृतीय स्थानावर सिंह रास येते. शनी अष्टमेश व नवमेश असून तो तृतीयेत सिंह या शत्रू राशीत येतो. येथे शनीस राशिबल नाही. भावंडे राहत नाहीत. पित्याशी पटत नाही.

शनीशी रवीचा दृष्टियोग रवी नवमात असताना होतो. दोघे एकमेकांच्या राशीत येतात. पण रवी शनी प्रतियोग होतो. जातकाचे पित्याशी पटत नाही पण रवी शनीबरोबर तृतीयेतच असता, तो स्वगृही असतो. तृतीयातील स्वगृहीचा रवी असता जातक विद्वान असतो. उत्तम वक्तृत्व असते. निरोगी प्रकृतीचा व प्रसिद्ध असतो. कोर्ट-कचेऱ्यातील खटल्यात तो यशस्वी होतो. तो पराक्रमी व बलवान असतो. लोकप्रिय होतो पण भावंडांचे सौख्य लाभत नाही.

रवी-शनी युती अगर प्रतियोग स्त्री जातकीचे बाबतीत चांगला ठरत नाही. तिच्या विवाहास फारच विलंब लागतो. वैवाहिक जीवन सुखाचे जात नाही. पण ती निरोगी व दणकट प्रकृतीची असून उन्नत उरोज असतात.

धनेश चंद्राच्या शुभयोगात वा दृष्टीत असता भरपूर धनप्राप्ती होते व प्रसिद्धी होते.

मंगळाची दृष्टी वा युती चांगली ठरत नाही. जातक कमनशिबी असतो व तो भटकंती करतो.

बुधाचा सहयोग वा दृष्टी - लग्नेश - नवमेशाचे संबंध येतात व ते शुभदायी ठरतात.

गुरुची दृष्टी चांगली ठरते. युती असता जातक वैद्यक क्षेत्राकडे वळतो.


शुक्राची दृष्टी वा सहयोग - पंचमेश - नवमेश संबंध शुभ ठरतात.

तृतीय स्थान प्रवास, दळणवळण, टपाल, तारा, क्रीडा, लेखन, साहित्य, वाङ्मय वगैरेंचे दर्शक आहे. त्याचप्रमाणे भावंडांचाही विचार याच स्थानावरून होतो.

मिथुन लग्न असता लेखन व बौद्धिक आणि क्रीडा हेच विषय प्रामुख्याने असतात. पुढील कुंडली एका प्रसिद्ध स्त्री साहित्यिकेची आहे.

## कुंडली : श्रीमती अमृता प्रीतम

जन्म रविवार दिनांक ३१ ऑगस्ट, १९१९ रोजी रात्रौ १ वा. ३० मि. गुजराणवाला येथे. अक्षांश ३२° ६′ रेखांश ७४° ११′. सां. समय २३ ता. २९ मि. १४ से. अयनांश २२° ४४′ २१″.




ख्यातनाम पंजाबी कवयित्री. १६ व्या वर्षापासून कविता, डझनाहून जास्त संग्रह, ओज, प्रेम व स्त्रीवरील अन्यायाला वाचा फोडणारे साहित्य, उच्च श्रेणीतील कादंबरीकार, लघुकथाकार व इतर लेखन. इतर भाषांत भाषांतरे. जागतिक कीर्ती, परदेशगमन, साहित्य अकादमी सदस्य, सा. पंजाब सरकार व ज्ञानपीठ पारितोषिके, रवी, शनी युती सिंहेत (५° दीप्तांश) प्रामयोग हर्षल, धनेश चंद्र, पंचमात मंगळ-गुरु युती धनस्थानी.

**(६) कन्येचा शनी** : तृतीय स्थानी जर सहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तृतीयेवर कन्या रास असून शनी सप्तमेश व अष्टमेश असतो व तृतीयेत बुधाच्या राशीत येतो. शनी आपल्या स्थानांपासून पंचमेश व षष्ठेश आहे.


मंगळ या लग्नास पंचमेश व दशमेश असा राजयोगकारक आहे. त्याचा शनीशी शुभयोग चांगलाच ठरेल.

गुरु भाग्येश असतो व त्याची सप्तम व नवमावरूनची दृष्टी शनीचे जे काही अशुभत्व निर्माण झाले असेल त्यास पायबंद घालणारी राहते.

कुंडलीत इतर कुयोग नसता अष्टमेश तेथून अष्टमात म्हणजे तृतीय स्थानात असता जातक दीर्घायू असतो.

## कुंडली : श्री. दिनकर बी. देवधर

जन्म गुरुवार दिनांक १४ जानेवारी, १८९२ रोजी सायंकाळी ६ वा. ९ मि. स्थानिक वेळ पुणे येथे. अयनांश २२° २०′ ५७″ सां. स. १ ता. ४४ मि.




सुप्रसिद्ध क्रिकेटपटू. क्रिकेटचे भीष्माचार्य. जुन्या काळातील एक सर्वश्रेष्ठ फलंदाज, कर्णधार, परदेशगमन, लोकप्रिय, सुदृढ. व्यवसायाने प्राध्यापक पण क्रिकेटपटू म्हणून प्रसिद्ध. दशमेश पंचमात स्वगृही-प्राध्यापक. भाग्येश गुरु भाग्य भाव बिंदूपासून थोडे मागे. लग्नेश लग्नात पौर्णिमेचा चंद्र. चंद्र लाभयोग शनी व मंगळ तृतीयस्थ शनी त्रिकोण रवी व नेपच्यून, प्लूटो आणि मंगळावर दृष्टी व लाभयोग.

देवधर शतायू झाले. त्यांनी आयुष्याचेही शतक झळकावले.

**(७) तुळेचा शनी :** तृतीय स्थानी जर सात हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'तुळेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


तृतीयेवर तूळ रास येते. शनी षष्ठेश व सप्तमेश असून तृतीयेत उच्च राशीस येतो. ही स्थिती जातकाच्या दृष्टीने बरीच अनुकूल असते. बुध धनेश व लाभेश असतो. त्यांचे शुभसंबंध धनलाभ दर्शवितो. शुक्र दशमेश असतो. त्याचा शुभसंबंध उद्योग-व्यवसाय भरभराटीचा दर्शवितो. गुरु पंचमेश असल्याने त्याची दृष्टी शुभच राहते.

रवी शनीबरोबर येतो तेव्हा तो लग्नेश तृतीयेत म्हणून चांगला असला तरी नीच राशीस येतो. पण उच्च शनीमुळे त्यात फरक पडतो. चंद्र-शनी युती वा दृष्टी शुभ ठरत नाही. चंद्र व्ययेश असतो. संपत्तीत चढ-उतार होतो.

मंगळ राजयोगकारक असतो. त्याचा शनीशी दृष्टी योग संपत्तीचे मान चांगले ठेवतो. कौटुंबिक सौख्य लाभते. त्याचे बोलणे स्पष्ट व मोकळे असते.

## कुंडली : श्रीयुत ब्रीजलाल

जन्म शुक्रवार/शनिवार दिनांक २०/२१ नोव्हेंबर १९५३ रोजी मध्यरात्रीनंतर ० वा. ५३ मि. प्र. वेळ अहमदनगर येथे. सां. स. ३ ता. ५७ मि. ९ से. अयनांश २३° १३′ ९″.




व्यापारी घराण्यात जन्म. वडिलोपार्जित व्यवसाय कापडाचा. शुक्र दशमेश तृतीयेश जातकाचा चंद्र उच्चांशी निकट, गुरु त्रिकोण नेपच्यून अध्यात्माकडेही कल. सप्तमेश शनी उच्च. पत्नी मोठ्या घराण्यातून आलेली. गुरुची तुळेतील ग्रहावर दृष्टी आहे. वाहन सुख आहे. एका मोटार कंपनीची डीलरशीप मिळाली. मित्रपरिवार मोठा. सहकार क्षेत्रातही उतरलेला आहे. बुध-शुक्र युती त्रिकोण हर्षल म्हणजे दशमेश शुक्र व धनेश लाभेश बुध यांची युती हर्षलसारख्या ग्रहाचे शुभयोगात.

**(८) वृश्चिकेचा शनी :** तृतीय स्थानी जर आठ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृश्चिकेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तृतीयेवर वृश्चिक रास. शनी पंचमेश व षष्ठेश असून तृतीयेत शत्रू राशीत येतो. ही स्थिती शनीस प्रतिकूल आहे. वृश्चिक ही अष्टम रास असून नाश क्षय याची घातक आहे. त्यामुळे पंचमेश शनी वृश्चिकेत संततीचा नाश दर्शवितो. तो षष्ठेश आजाराचे उगमस्थान असल्याने क्षयासारखा आजारही होईल. तृतीय स्थान मानसिक स्थितिदर्शक असल्याने शनी चांगली बुद्धी देत नाही. शनीची दृष्टी व्ययस्थानावर पडते. त्यामुळे पैशाचा व्यय, संपत्ती ऱ्हास दर्शवितो. तसेच शनीने दर्शित दुष्ट बुद्धीमुळे जातक अघोर कृत्य करण्याची


शक्यता नाकारता येत नाही. कुंडलीतील अन्य ग्रहांचा विचारही घ्यावा लागेल. गुरु कुंडलीचा मारक आणि बाधक असल्याने त्याचे सहयोग वा दृष्टियोग वरील वाईट फलांची तीव्रता फारसी कमी करणार नाही. रवी व्ययेश असल्याने त्याची दृष्टी सुधारणा करणारी दिसत नाही.

## कुंडली : सौ. ..........

जन्म शुक्रवार दिनांक ५ जून, १९३१ रोजी सायंकाळी ६.३० पुणे येथे. अयनांश २२° ५३′ ४१″ सांपत्तिक समय १० ता. ४४ मि. ८ से.

सुगृहिणी, शिस्त, टापटीप, स्पष्टव्यक्ती. रवीच्या दोन्ही बाजूस शुभ ग्रह, उभयचरी योग.

शनी वर्गोत्तम धून राशीत आहे. धनेश गुरुची शनीवर पूर्ण दृष्टी आणि शनीचा बुध शुक्राशी त्रिकोण योग आहे.




विवाहानंतर महाविद्यालयीन शिक्षण पुणे केले. अक्कलहुशारीने पैसे गुंतवत, व्याज वाढवत, उत्तम धन कमावले आहे. धनसंचय करण्यात कुशल, वडिलांचेही मोठे घर व अन्य स्थावर होती. पतीगृही देखील मोठे घर. उभयचरी योगाचा शुभ परिणाम दिसतो.

**(९) धनुचा शनी** : तृतीय स्थानी जर नऊ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'धनुचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –

तृतीयावर धनु रास येते. शनी या लग्नाचा चतुर्थेश व पंचमेश (योगकारक आहे) असून तो धनु या गुरुच्या राशीत येतो. या लग्नास शनी हा राजयोगकारक आहे व तो

तृतीय या उपचय स्थानात येतो. तेथे शनीस आपले योगकारकत्वाचे शुभ फल दर्शविण्यास पूर्ण संधी मिळते.


या लग्नास गुरु हा तृतीय व षष्ठस्थानाचा अधिपती असला तरी तो शुभ फल देणारा आहे असे भावार्थ रत्नाकरकार आवर्जून सांगतात.

शिवाय रवी व बुध हे लाभेश व भाग्येश असतात आणि ते मंगळाशी संबंधित असता धनयोगकारक असतो.

दशमेश चंद्र शनीच्या शुभ संबंधात असल्यासही उत्तम लाभ मिळतात. या दृष्टिकोनातून पुढील कुंडलीचा विचार करू.

## कुंडली : श्रीयुत बी.

जन्म सोमवार दिनांक ९ मार्च १९३१ रोजी रात्री १० वा. उज्जैन येथे झाला. अयनांश २३° ११′ उत्तर रेखांश ७५° ५०′ पूर्व. अयनांश २५° ५३′ ४१″ व सांपत्तिक समय ८ ता. ३८ मि. १७ से.




राजयोगकारक शनी तृतीयेत आहे. त्याचा अधिपती गुरु नवमात मिथुनेत आहे. त्याचा अधिपती बुध कुंभेत आहे. त्याचा अधिपती शनी तृतीयेत आहे तेव्हा Dispositers ची साखळी शनीपासून निघून शनीपाशीच पोहोचली. बुध त्रिकोण गुरु, रवी लाभयोग, शनी, चंद्र त्रिकोण मंगळ व चंद्र लाभयोग शुक्र असे उत्तम ग्रहयोग आहेत. तृतीयेवर प्रवास, लेखन तसेच पोस्टखातेही आहे. शिक्षण योगही उत्तम आहे. बुध त्रिकोण गुरु धनयोग, बुध त्रिकोण गुरु व चंद्र त्रिकोण मंगळ. जातक पोस्ट खात्यात नोकरीस

लागला व चढत-चढत पोस्टमास्तर जनरल झाला आणि आरोग्य खात्याचे खास सचिव म्हणूनही काम केले. तसेच उपसचिव यु. प. स. कमिशन वगैरे ठिकाणी काम केले. गुरु षष्ठेशही आहे म्हणून आरोग्य खात्यात.

**(१०) मकरेचा शनी** : तृतीय स्थानी जर दहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


तृतीयेत मकर रास येते. शनी तृतीयेश व चतुर्थेश असतो आणि तृतीयेत स्वगृही येतो. शनी जरी येथे पराक्रमी व जिद्दी वाटत असला तरी तो घाई करीत नाही. धिमेपणाने पण निश्चितपणे एक-एक पाऊल पुढे टाकीत जातो व आपले ध्येय गाठतो. शनीचे जोडीस मंगळ असता लग्नेश पराक्रम स्थानात उच्च राशीस येतो आणि मग जातक भराभर वरच्या श्रेणीवर जातो. रवी दशमेश असतो व तो शनीबरोबर असताही फलदायी होतो पण ही युती दशमाचे षष्ठात होत असल्याने व्यवसाय नोकरीत अवनती वा खाली-वर होण्याची शक्यता असते. बुध-शुक्र असता मिश्र फले मिळतील कारण बुध लाभेश तसा अष्टमेशही असतो आणि शुक्र हा सप्तमेश तसा व्ययेशही असतो. गुरु चंद्राचा सहयोग चांगला व उन्नतीकारक ठरतो.

जातक फार शिकलेला (पदव्युत्तर) नसतो व तो पित्यापासून लांब राहतो. तृतीयेतून शनीची दृष्टी पंचमावर पडते. त्यामुळे संततीपासून सुख मिळत नाही तर त्रासच होतो. जातकाचे पत्नीस फुफ्फुसाचे, श्वसनाचे वगैरे विकार होतात. शनीबरोबर राहू असता पायात व्यंग असते. असे सारावलीच्या टीकेमध्ये आर. संथानम सांगतात.

### कुंडली : श्री. श्रीधर (संजीव) कुलकर्णी

जन्म शनिवार दिनांक १४ एप्रिल, १९६२ रोजी रात्रौ १०.१४.१२ प्र. वेळ जळगाव येथे २१° उ. १′ पूर्व ३९° पूर्व सां. स. ११ ता. १६ मि. १७ से.

जातक पदवीधर B. E. Metallugry, दशमेश रवी मेषेत त्रिकोण चंद्र, हर्षल, तृतीयेत शनी व राहू आहेत पण जातकात व्यंग नाही. जातक महत्त्वाकांक्षी आहे. १९९५ पर्यंत ३ कारखान्यांत नोकरी केली व चौथी नोकरी मित्राच्या फाउंड्रीमध्ये.




वृश्चिक लग्नास बुध व गुरु २, ५, ८, ११ या संपत्तीस्थानांचे अधिपती आहेत. या ठिकाणी बुध गुरुच्या राशीत पंचमात मीनेत आहे. पण तो वर्गोत्तम आहे. गुरु कुंभेत शुभ फलदायी (उच्च असल्यासारखा वराहमिहीर मते) असतो आणि भाग्येश चंद्र सिंहेत आहे. गजकेसरी योग होतो. सुमारे १९९४ पासून भाग्येश चंद्राची महादशा सुरू झाली असून जातकाने स्वत:चा कारखाना काढला. दशमेश रवी उच्च असल्याने तो अधिकार गाजवेल.

**(११) कुंभेचा शनी :** तृतीय स्थानी जर अकरा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तृतीयेवर कुंभ रास असते व शनी द्वितीयेश व तृतीयेश असतो.

द्वितीयेश तृतीयेत असता जातक धीट व पराक्रमी असतो. बुद्धिमान असतो. स्वभावाने चांगला असतो. पण अनीतिमान होतो. निरीश्वरवादी व अधार्मिक असून चैनबाजीकडे वळतो. आयुष्याच्या उत्तरार्धात तो कृपण होतो.

तृतीयेश तृतीयात असता मित्रपरिवार असतो व नातेवाईकही बरेच असतात. संपत्तिमान, सुखी, समाधानी असतो. तृतीयेश शुभयुक्त वा दृष्ट असता भावंडे असतात परंतु तेथे शनी असल्याने भावंडे अल्पायुषी ठरतात.


शनी हा अन्य ग्रहांच्या अशुभ योगात असता जातकाच्या हातांना इजा पोहोचते, मार लागतो, फ्रॅक्चर्स होतात. जातक मृदू आवाजी नसतो. कर्कश बोलतो. कौटुंबिक स्वास्थ्य नसते.

## कुंडली : श्री. अनिमेष विठ्ठल पाटील

जन्म शुक्रवार दिनांक १२ नोव्हेंबर, १९६५ रोजी सकाळी ९ वा. ५५ मि. प्र. वेळ. सां. स. १२ ता. ५२ मि. २२ से. सोलापूर येथे. अयनांश २३° २२′ ३३″ मंगळ महादशा भोग्य वर्षे ० म. १० दि. १८.

भावंडांत जातक धाकटा, १ मोठा भाऊ व बहीण. जातक भाभा अणुकेंद्रात तंत्र टेक्निकल बाजूकडे नोकरीस होता. दिनांक ०७..०९.१९८७ पासून बेपत्ता आहे. त्याचा ठावठिकाणा नाही.

तृतीयेतील शनी सप्तमेश बुधाचे केंद्रयोगात. बुध अत्यंत कमी गतीत. १९.११.६५ रोजी वक्री झाला. शिवाय बुध शनीचे दृष्टीत आहे. शनी केंद्र राहू केतू प्रतियोग हर्षल, बुध प्रत्यक्षत: एका बाजूस मंगळ व दुसऱ्या बाजूस केतू व रवी नेपच्यूनचे पापकर्तरित आहे. बेपत्ताचे वेळी गुरु महादशा व शनी भुक्ती केतू अंतर चालू होते. रेल्वे अपघातात सापडला असावा असे वाटते. त्या दिवशी गोचर नेपच्यून लग्नी, गोचर मंगळ शनी समोर.




**(१२) मीनेचा शनी** : तृतीय स्थानी जर बारा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मीनेचा शनी' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

या लग्नास मीन रास तृतीयेवर येते व शनी लग्नेश व द्वितीयेश असा तृतीयेत गुरुच्या राशीस येतो.

लग्नेश तृतीयेत असता जातक पराक्रमी व धाडसी असतो. तो नशीबवान व आदरणीय होतो. जातक बुद्धिमान व सुखी होतो. जातकास पुढे येण्यास भाऊ मदत करतात. जातकास काही कला अवगत होतात.


मकर लग्नास शुक्र दशमेश व पंचमेश असतो आणि तो मीनेत उच्च राशीस असतो. त्यामुळे शुक्राचा जर शनीशी शुभ संबंध येईल तर जातक कलावंत असेल आणि गुरुची दृष्टी त्यामुळे जातक व्यवसायात पुढे येतो, यशस्वी होतो.

## कुंडली : नट संजीवकुमार

जन्म शुक्रवार दिनांक ९ जुलै, १९३७ रोजी रात्रौ ९ वा. प्र. वेळ मुंबई. अयनांश २२° ५९′ २१″ सां. स. १५ ता. ३० मि.

लग्नेश शनी मीनेत लाभयोग योगकारक शुक्र व त्रिकोण चंद्र. रवी बुध युती, लाभयोग हर्षल व नेपच्यून, हर्षल त्रिकोण नेपच्यून, भाग्येश शुक्र चतुर्थात स्वगृही शनीचे दृष्टीत आहे.

व्यापक रेंज असलेला व अभिनयाची उत्तम जाण असलेला रूपेरी पडद्यावरील महान कलावंत.





❂ ❂ ❂

४

# चतुर्थ भाव

## (मातृ-स्थावर-वाहन-विद्या स्थान)




सोबतच्या कुंडलीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी चार हा अंक लिहिलेला आहे, त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीतील चतुर्थ स्थान किंवा चौथे स्थान म्हणतात.

चतुर्थ स्थानावरून जरी अनेक गोष्टींचा विचार होत असला तरी प्रामुख्याने खालील गोष्टी व त्यांचे कारक ग्रह आहेत. मातृ-माता-जननी-आई याचा कारक चंद्र आहे.

जमीन-मंगळ, गृह-गुरु व मंगळ

विद्या-बुध, ज्ञान-गुरु.

मंगळ भूमिपुत्र असल्याने तो जमिनीचा कारक, त्यातील विहिरी, तळी यांचा कारक चंद्र आहे. चतुर्थावर शेती व बाग यांचाही विचार होतो. शनी हा जमिनीखालील भूगर्भातील खाणी वगैरेंचा कारक आहे.

चतुर्थ हे महाविद्यालयीन पदवी परीक्षेपर्यंतच्या शिक्षणाचे स्थान आहे. बुध हा प्रामुख्याने विद्येचा कारक असून गुरु हा ज्ञानाचा कारक आहे. विद्येसंबंधी प्रत्येक ग्रह निरनिराळे विषय दर्शवितो. प्रमुख विषय असे : कायदा, इतिहास, समाजशास्त्र, भूगर्भशास्त्र (खनिजे), कृषिशास्त्र शिवाय तो दशमाचा दर्शक व कारक ग्रह असल्याने राज्यशास्त्र त्याच्याकडे रवीबरोबरच येते. औषधी विद्येशीही व वैद्यकशास्त्राशी शनीचा संबंध येतो. पण प्रधान कारक म्हणून नव्हे तर दुय्यम कारक. चतुर्थावरून वाहनाचा विचार व त्याचा कारक शुक्र आहे. चतुर्थास सुखस्थान असेही म्हणतात.

उत्तर कालामृतात शनीची जी अनेक कारके दिलेली आहेत त्यामध्ये 'संजीवनोपायका' असाही वाक्यप्रयोग आहे. त्याचा नवतारूण्य देणारे उपाय असा अर्थ होतो.

बृहज्जातकात शनीचे प्रथम लग्न भावासंबंधीचे फल देऊन बाकीच्या भावांबद्दल रवीचा दाखला दिला आहे. चतुर्थातील रवी 'विसुख: पीडित मानसश्चतुर्थे' अशी फले देतो. त्याचा अर्थ सुख मिळत नाही. चित्त संत्रस्त असा आहे व तेच शनीसही लागू आहे. पण सारावलीमध्ये चतुर्थस्थ शनीबद्दल स्वतंत्ररीत्या असे सांगितले आहे.

**पीडितहृदयो हिबुके निर्बान्धव वाहनार्थ मतिसौख्यः ।**
**बाल्ये व्याधितदेहो नखरोमधरो भवेत सौरे ।।**

पीडित हृदयो = हृदयविकार, अगर संत्रस्त - दुःखी.

नातेवाईक फार नसतात. (असतील तर ते जातकास जवळ करीत नाहीत, वाहन सुख नसते, संपत्तीही नसते, बुद्धिमत्ता कमी असते) आणि तो दुःखीच असतो. (सदा काळजी) लहानपणी व्याधी, आजार होतात. पण त्यास केस व नखे असतात. त्याचा विस्तार असा -

मातृसुख लवकर हरपते, अगर आईपासून दुरावला जातो. जातकाचे माता-पित्यांना जातक हा त्रास, कष्ट देणारा ठरतो. त्यास व्याधी, सतत आजार यामुळे आई-वडील नेहमीच चिंताग्रस्त, त्यास वडिलोपार्जित असे काही मिळत नाही. भावंडांशी शत्रुत्व पण शत्रूपासून त्यास सुख लाभते. नेहमी त्रासलेला, चिडचिड, त्यास राहण्यासाठी चांगले घर मिळत नाही. स्थावर मालमत्ता नसते आणि जातक वारंवार जागा बदलतो. वातविकार, अपस्मार, छातीचे विकार वगैरे आजार असतात. याच्या बाबतीत माय मरो मावशी जगो अशी बऱ्याच ठिकाणी पाळी येते. त्याची माता लवकर जाते त्यामुळे जातकाची आबाळ होते. संगोपन नीट होत नाही. सावत्र आई असते.

एकूण चतुर्थात शनी असणे म्हणजे दुःखाला आमंत्रण असते. शनी बलवान वा शुभयोगात असता परिस्थिती निराळी होते.

चतुर्थेश कसा असतो, कारक हा ग्रह शुभ स्थानात शुभयोगात असता ती-ती कारके सुधारतात.

सर्वसाधारणपणे चतुर्थातील शनी खालील फले देतो. जातक लहानपणी आजारी असतो. शनी बलवान नसता मातृसुख लवकर हरपते. जातक दुःखी असतो. त्यास वात व कफ यांचे विकार होतात. तो स्वभावाने आळशी असतो. नातेवाईक त्यास जवळ करीत नाहीत. घर व वाहने यामुळे त्रास, कटकटी असतात. घर जुनाट असते. एकटेपणा वाढतो व एकटे राहण्याची प्रवृत्ती होते. त्यामुळे जातक इतरांत मिसळत नाही. शुभदृष्ट वा शुभयोगात नसता घरातले वातावरण व कौटुंबिक सुख बिघडते. शनीबरोबर मंगळ असता आई अपघाताने वा घातपाताने मृत्युमुखी पडते. केतूशी संबंधित असता मातृसुख लवकर हरपते व सावत्र माता, सावत्र भावंडे असा योग येतो.

शनी-राहू, शनी-केतू असे योग असता मानसिक रोग-हिस्टेरिया वा वेड अशा व्याधी उत्पन्न होतात.

चतुर्थात शनी स्वगृही अगर उच्च असता व शनी तेथे एकटाच असता सर्व ठीक होते. हा शशयोग असतो व जातक नावारूपास येतो आणि सुखी होतो.

शनी चतुर्थात असता अगर त्याची चतुर्थावर दृष्टी असताही घर जुनाट व पडके असते. नंतर ते नीट बांधले जाते पण चतुर्थावर गुरुची दृष्टी असता.

## चतुर्थस्थ शनीची राशिनिहाय भावफले

**(१) मेषेचा शनी :** चतुर्थस्थानी जर एक हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मेषेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


चतुर्थावर मेष रास आहे. शनी लग्नेश व धनेश असून तो चतुर्थावर मेष या नीच राशीत येतो. शनीचा नीचभंग न झाल्यास जातक दरिद्री होतो व तो मातृसुखास पारखा होतो. असा जातक महाधूर्त असून चिडचिडा असतो. आपल्या नातेवाइकांशी नीट वागत नाही पण त्याजपाशी वक्तृत्व असते.

मातृसुख हरपण्यासाठी नुसता शनी मेषेत चतुर्थात असून चालत नाही पण त्याचे चंद्राशी, चंद्राचे चतुर्थाशी अशुभ संबंध असावे लागतात. चंद्र गुरुचे, मंगळाचे शुभ संबंध वा सुस्थिती असता मातृसुख मिळते.

पण शनी एकदा चतुर्थात असून बाकीच्या ग्रहांचा शुभयोग नसता, धनेश नीच याचे फल दरिद्रता हे मात्र मिळते.

### कुंडली : जातक

जन्म गुरुवार, १ जानेवारी, १९७० रोजी सकाळी ५ वा. ५५ मि. अ. १८/५१ उ. रे. ७३/५५ पू.




शिक्षण एम. कॉम. वडिलांची स्थावर. विवाह झाल्यानंतर स्वत:चा फ्लॅट. शनी प्रतियोग गुरु.

**(२) वृषभेचा शनी :** चतुर्थस्थानी जर दोन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी चतुर्थात वृषभ राशीस येतो. शनी या राशीत मित्रक्षेत्री असतो. वृषभ रास चतुर्थात असता घर चांगले असते पण तेथे शनी आल्याने जुने घर लाभते. वृषभ ही शुक्राची रास (धनदर्शक) असल्याने सुखाची साधने तसेच विद्याही लाभते.

येथे शनी रवीचे दृष्टीत असता स्पष्टवक्ता, विद्वान असतो. पण संपत्ती कमी होते. दुर्बल शरीर असते आणि तो दुसऱ्याचे घरी राहतो व भोजन करतो.

चंद्राने युक्त वा दृष्ट असता उत्तम संपत्ती मिळते. त्यास राजाकडून सन्मान प्राप्त होतात. कुटुंब मोठे असते. मातृसुख लवकर संपते.

मंगळाने युक्त वा दृष्ट असता तो युद्धाच्या तयारीत तज्ज्ञ असतो. पण स्वत: युद्धावर जात नाही. खूप बोलतो. त्यास संपत्ती व कुटुंबसौख्य मिळते.


बुधाचे सहयोगात असता विनोदी बोलणारा असतो.

गुरुच्या दृष्टीत वा सहयोगात असता इतरांच्या सुख-दु:खात सहभागी होतो. तो लोकांचा आवडता होतो. उदार व उद्योगी आणि दुसऱ्यांना मदत करणारा होतो.

शुक्राच्या दृष्टीत असता संपत्ती, रत्ने याच्याजवळ असतात व स्त्रीसुख मिळते.

## कुंडली : कै. श्री. डॉ. बी. व्ही. रामन

जन्म दिनांक ८ ऑगस्ट, १९१२ रोजी सायंकाळी ७ वा. ३५ मि. प्र. वेळ बंगलोर. अक्षांश १२° ५८′ उत्तर रेखांश ७७° ३८′ पूर्व अयनांश २२° ३८′ ८″ सां. स. १६ ता. २२ मि. ५२ से.




आंतरराष्ट्रीय कीर्तीचे महान ज्योतिषी. बंगलोरच्या ॲस्ट्रॉलॉजिकल मॅगेझीनचे संस्थापक. यांची ही कुंडली आहे.

त्यांची आई ते दोन वर्षांचे असतानाच वारली. पित्यास नंतर अंधत्व आले होते. रामनचा सांभाळ त्यांचे आजोबा बी. सूर्यनारायण राव यांनी केला. ते त्यांचे ज्योतिष विद्येतील गुरुच होते. शिक्षण पदवीपर्यंत पण व्यासंग दांडगा होता.

चंद्र वृषभेत उच्च गुरुच्या दृष्टीत असल्याने कुटुंब मोठे होते. संततीही चांगली व वडिलांचा वारसा पुढे चालविणारी. त्यांचे स्वत:चे मोठे घर आहे. लग्नेश चतुर्थात असणे चांगले ठरते पण शनी हा पापग्रह आहे म्हणून तो शुभ नाही. त्यात चंद्रामुळे शनी दूषित झाला कारण चंद्र षष्ठेश आहे.

मातृकारक चंद्र षष्ठेश असल्याने व शनीसारख्या ग्रहाचे सहयोगात असल्याने दूषित आहे. चतुर्थेश शुक्र, सप्तमात बुध व मंगळाने दूषित. त्यातच रवी व केतू यांचेमुळे पाप कर्तरी योग झाला.

जातकाने एक चांगले घर व चांगली मोटार घेतली आहे.

दशमातील गुरुमुळे कीर्ती, मान, यश लाभले.

मृत्यू दिनांक २० डिसेंबर, १९९८.

**(३) मिथुनेचा शनी :** चतुर्थस्थानी जर तीन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


चतुर्थावर मिथुन रास, शनी लाभेश व व्ययेश असून तो चतुर्थात मित्रक्षेत्री येतो. चतुर्थावर मिथुन ही बौद्धिक रास विद्यादर्शक आहे. जातक उत्तम शिकलेला व विद्वान असतो. तो आपल्या व्यवसायात यशस्वी होतो पण आयुष्यात चढ-उतार असतात.

या जातकाचे संगोपन आईने केलेले असते असे नाही. शनी चतुर्थाचा अष्टमेश व नवमेश असतो. पण मीन लग्नाचा लाभेश व व्ययेश असतो त्यामुळे उत्तम शिक्षणाशिवाय बाकीची फले अशुभ ठरतात असे प्रथमदर्शनी वाटेल. पण बाकीचे ग्रह कसे आहेत त्यांचे शनीशी शुभाशुभ योग काय आहेत हे पाहिल्याशिवाय निर्णय घेता येत नाही.

**कुंडली : श्री. एल. के. नारायणस्वामी**

जन्म दिनांक १२ जुलै, १९१४ रोजी रात्रौ ११ वा. २५ मि. पालघर (केरळ) येथे. अ. १०° उ. ४६′ रे. ७६° पूर्व ४२′ सां. स. १८ ता. २० मि. ५७ से. अयनांश २२° ३९′ ५६″.

इंडियन पोस्टल सर्व्हिसेसमधून चढत-चढत भारत सरकारचे अतिरिक्त सचिव म्हणून जुलै १९७२ मध्ये निवृत्त झाले.



चतुर्थात मिथुनेत शनी त्याचा अधिपती बुध नेपच्यूनसह पंचमात कर्केत, त्याचा अधिपती शनी हा चतुर्थात मिथुनेत, गुरु व शनी यांचा त्रिकोण योग ५° दीप्तांशात आहे शिवाय रवी व चंद्र यांचाही त्रिकोण योग अंशात्मक आहे. (१° ४६′ फरक) रवी षष्ठेश चतुर्थात. नोकरीच्या माध्यमातून चढत-चढत उच्च पदास पोहोचले. बुद्धिमत्ता चांगली. शिक्षण उच्च. मेहनत व परिश्रम करणारा शनी यामुळे जातक उच्च पदास पोहोचला. डिसपोझिटरचा विचार. (ग्रहांचा खोखोचा खेळ) हा क्रमप्राप्त ठरतो.

**(४) कर्केचा शनी** : चतुर्थस्थानी जर चार हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कर्केचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

चतुर्थावर कर्क रास येते. शनी दशमेश व लाभेश असतो आणि तो चतुर्थात कर्क या दुर्बल राशीत येतो. त्यामुळे त्याची शुभ फले फारशी अपेक्षित नसतात. या शनीची लग्नावर, षष्ठावर आणि दशमावर दृष्टी येते.

शनीच्या लग्नावरील दृष्टीमुळे जातकावर कष्टाचा, श्रमाचा बोजा असतो. त्यामुळे तो त्रासलेला असतो.

स्त्रीच्या बाबतीत तिला सुख मिळत नाही व कष्ट मात्र करावे लागतात. दुसऱ्याच्या खस्ता खाव्या लागतात. विशेषत: विवाहानंतर तिची स्थिती केविलवाणी होते.

मातृसुख मिळत नाही. गरिबी असते. पण आर्थिक स्थिती नंतर सुधारते व तीसुद्धा जातकाच्या कष्टाने व काटकसरीपणाने.

कर्केतील शनी अन्य ग्रहांच्या दृष्टीत असता खालील फले मिळू शकतात :

रवीच्या दृष्टीत असता रवी-शनी प्रतियोग पित्यास अनिष्ट ठरतो. शनी पंचमाच्या व्ययात असल्याने व पंचमेशाच्या दृष्टीत असल्याने संततीसुखही नसते. पिता बालपणीच जातो. कदान्न खावे लागते.

चंद्राच्या योगात असता मातृसुख बिघडते. भावंडांकडून त्रास होतो पण संपत्ती जमा होते. बुधाच्या दृष्टियोगात असता भांडखोर, कठीण हृदयी होतो. शत्रुहंता होतो. उगीचच गर्व दाखवितो.

शुक्राच्या शुभयोगात असता जातक चांगल्या घराण्यापासून जन्मास आलेला असतो. पण तो कुरूप व दु:खी असतो. वागण्यात दिमाख नसतो.

गुरु भाग्येश असतो व त्याचे शुभयोगात वा युतीत असता त्यास सर्व सुखे - श्री, स्त्री, संतती, स्थावर जंगमादी मिळतात.


पूर्ण चंद्राचे योगात शनी असता उपजीविकेचे साधन उत्तम लाभते.

पुढे दिलेली कुंडली प्रत्यक्ष मेष लग्नाची नाही तर वृषभ लग्नाची आहे. पण चतुर्थावर कर्क रास आहे.

## कुंडली : स्त्री जातक

जन्म सोमवार १८ फेब्रुवारी, १९४७ रोजी सकाळी ११ वा. १२ मि. (E.S.T.) अक्षांश ४१° उ. ३१′ रेखांश ८१° प. अयनांश २३° ७′ १२″.

ॲस्ट्रॉ मॅगेझीन १९८६ पान ७३२ वरून कुंडली घेतली आहे.




मेष व तूळ या राशी लुप्त आहेत. धनु रास ८ व ९ भावावर तसेच मिथुन रास २ व ३ भावावर आहे. पण ग्रहयोग असे आहेत. चंद्र प्रतियोग शनी, गुरु त्रिकोण शनी, मंगळ १६५° शनी, बुध १३७° शनी.

शनी ४५° हर्षल, रवी १५° शनी. या स्त्रीचा विवाह होऊन घटस्फोटही झाला होता. त्यानंतर तिने नर्सिंग कोर्स सुरू केला पण तो पूर्ण होण्याआधीच खाजगीरीत्या नर्स म्हणून काम केले. १९६६ पासून १९८६ पर्यंत वीस वर्षांचे वर नर्सिंग व्यवसायावर उपजीविका. गुरुशिवाय अन्य ग्रहांशी अशुभ योग आहेत. दशमेश शनी चतुर्थात कर्क राशीत व चंद्राचे पूर्ण दृष्टीत आहे. कर्क रास व चंद्र यांचा नर्सिंगशी संबंध येतो.

**(५) सिंहेचा शनी :** चतुर्थस्थानी जर पाच हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'सिंहेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


चतुर्थावर सिंह रास येते. शनी नवमेश दशमेश असून तो चतुर्थात सिंह राशीत येतो. भाग्येश केंद्रात येणे हाही राजयोगच आहे. शनी चतुर्थात सिंहेत असता रवीचे युतीत चांगले फल देतो. पण पिता अल्पायुषी असतो. जातक हा सरकारी नोकरीत मोठ्या पदावर जाऊ शकतो. चंद्र तृतीयेश असतो त्यामुळे जातकास व्यवसायानिमित्त प्रवास करावे लागतात.

बुध हा पंचमेश असतो. तो शनीचे युतीत वा शुभ योगात असता जातक महाबुद्धिमान असतो. या ठिकाणी बुध द्वितीयेश व पंचमेश असतो. दोन्ही विद्यास्थाने आहेत आणि तो चतुर्थ या विद्यास्थानातच शनीचे बरोबर असतो.

गुरुची दृष्टी वा सहयोग मानमान्यता देणारा व धन देणारा ठरतो.

## कुंडली : सौ. ..........

जन्म शुक्रवार, दिनांक ११ मार्च, १९४९ रोजी सकाळी ११ वा. ७ मि. प्र. वेळ सां. स. २१ ता. ४८ मि. २ से. अयनांश २३° ८′ ७″.




बुध त्रिकोण हर्षल वायू राशीतून. कुंभेत ४ ग्रह. अभ्यासात हुशार. फर्स्ट क्लास एम. एस्सी. मायक्रोबायॉलॉजीपर्यंत उच्च शिक्षण.

शनी बुध प्रतियोग आहे. शनी शत्रू राशीत गुरु नीच राशीमध्ये आहे. चंद्र केंद्रयोग राहू केतू प्रतियोग, गुरु तसेच चंद्राचे दोन्ही बाजूस पापग्रह शनी व हर्षल. चंद्र बिघडला आहे. चंद्र कोणाच्याही शुभयोगात नाही. मानसिक अवस्था ठीक नाही. त्यामुळे शरीर दुबळे झाले आहे. यकृत बिघडले.

चतुर्थस्थ शनी कोणाच्याही शुभयोगात नाही. जातकी मनाने दु:खी त्यामुळे शरीराने दुर्बल झाली आहे. एक पुत्र पुढील शिक्षणासाठी अमेरिकेत गेला आहे. मातृ-पितृ सुखात कमी नाही.

**(६) कन्येचा शनी :** चतुर्थस्थानी जर सहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मिथुन या लग्नास शनी अष्टमेश व नवमेश असून तो चतुर्थात कन्या या मित्रक्षेत्री येतो. अष्टमेश व चतुर्थात ही स्थिती चांगली नाही. तसेच चतुर्थाचे षष्ठस्थान कुंभ येते. दोन्ही दृष्टीने मातृसुखात बिघाड येतो. माता लवकर जाते वा ती दीर्घकाळ आजारी असते.

पण विद्याकारक बुधाची कन्या ही उच्च रास असल्याने व चतुर्थ हे विद्यास्थान असल्याने नवमेश चतुर्थात असण्याने उत्तम विद्या प्राप्त होते पण विद्येसाठी बुध-गुरुचे योग असावेत.

मातृसुखाचे वेळी चंद्राचा विकार व्हावा व विद्येच्या संदर्भात बुध व गुरु यांचा विचार व्हावा.

शनी बुधाने युक्त वा दृष्ट असता तो संपत्तिमान होतो व कलावंत होतो व विद्येत यश देतो. गुरुची दृष्टी संपत्ती, मान, ज्ञान व समृद्धी देईल. पत्नीसुख मिळेल तसेच व्यवसायाची वृद्धी होईल.

मंगळ षष्ठेश असतो व लाभेशही असतो. त्यामुळे तो वैद्यकीय क्षेत्राकडे वळतो अगर तो हुकमत गाजविणारा अधिकारी होतो.

शुक्राचे शुभयोग व दृष्टियोग असता पंचमेशामुळे विद्या, ज्ञान व यास पोषक तर व्ययेश असल्याने जातक तत्त्वज्ञान व अध्यात्म क्षेत्राकडेही वळेल.


चंद्र कुंडलीचा धनेश व चतुर्थाचा लाभेश असल्याने व्यवसायात उत्तम धन लाभते. चंद्राचा सहयोग वा दृष्टियोग असावा.

रवी चतुर्थाचा व्ययेश असल्याने त्याची दृष्टी व युती सुखविघातक ठरेल. तो सद्‌गुणी असतो. क्रोध जिंकतो. धैर्यवान व सहिष्णू असतो. कष्ट करण्यास मागे-पुढे पाहत नाही.

हर्षलशी अशुभ योग अपघात व गंडांतरे आणतात. नेपच्यूनचा शुभयोग वा युती असता जातक कारस्थानी असतो.

## कुंडली : पुरुष जातक

जन्म शनिवार दिनांक २४ फेब्रुवारी, १९५१ रोजी १३ वा. ५३ मि. अक्षांश ३०° उत्तर १९′ रेखांश ७६° ४९′ सां. स. २२ ता. ४३ मि. ५४ से. अयनांश २३° १०′ ३३″.





मंगळ दशम भाव मध्यावर पूर्णपणे आहे. शनी त्याच्या प्रतियोगात चतुर्थ भाव मध्याजवळ आहे. मंगळ जास्त बलवान आहे. चंद्र प्रतियोग मंगळ व शुक्र. पोलिसांचा संबंध कायदा, न्यायखाते व गुन्हेगार यांचेशी येतो म्हणून शनीचा संबंध पोलीस खात्याशी येतो. शनी व मंगळ दोघांचीही दृष्टी लग्नावर. मंगळ-शनीमुळे अधिकार योग. शिवाय नवमभावात तृतीयेश रवी त्रिकोण हर्षल (धडाडी व साहसी वृत्ती).

**(७) तुळेचा शनी** : चतुर्थस्थानी जर सात हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'तुळेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कर्क या लग्नात शनी सप्तमेश व अष्टमेश असतो आणि चतुर्थावर तूळ या उच्च राशीत येतो. शनी चतुर्थात उच्च असल्याने जातकाचे कुटुंब मोठे असते. मातृसुख चांगले मिळते. उच्चस्थ शनीची दशमावर पूर्ण दृष्टी येते त्यामुळे उद्योग-व्यवसायातही जातक पुढे येतो व नाव कमावतो. जातक स्वभावाने धिमा, विचारी असतो. बुद्धिमत्ता चांगली असते. पण लहानपण सुखावह जात नाही. शिक्षण उत्तम मिळते. पत्नीही अनुरूप, रूपवान व कष्टाळू असते. स्थावरही मोठी असते. त्यातही वाढ होते. समाजात मान असतो. बोलणे मृदू पण स्पष्ट असते.

## कुंडली : श्री. माधव विष्णू लेले

जन्म बुधवार, दिनांक १८ मार्च, १८९६ रोजी दुपारी ३ वा. १८ मि. टेंभुर्णी (करमाळा तालुका, सोलापूर जिल्हा) सां. स. २ ता. ३० मि. १३ से. अयनांश २२° २४′ ४९″.




गुरु लग्न मध्यापासून १२° मागे, शनी उच्च चतुर्थात, मंगळ उच्च सप्तमात, दोघांची चंद्रावर व लग्नावर पूर्ण दृष्टी. रवी त्रिकोण गुरु अशी उत्तम ग्रहस्थिती.

शनी व मंगळ आपापल्या ठिकाणी उच्च आहेत. दोघांची दशमावर व चंद्रावर दृष्टी. मातृसुख भरपूर पण पितृसुख २२ व्या वर्षी संपले.

जातक B. A. L.L.B. व वकिली व्यवसायास सुरुवात १९२० पासून. १९२१-२२ साली विवाह. पत्नी सुंदर, कष्टाळू व अनुरूप. जातकाने लवकरच वकिलीत जम बसविला आणि थोड्याच अवधीत नामांकित वकील झाले.

वाडा मोठा पण जुना होता. तो पुन्हा नीट बांधला. स्वत: शेजारचे घर विकत घेतले. २ लहान भाऊ व तीन बहिणी, थोरला भाऊ १९१६ साली मयत. भावंडांचे शिक्षण, बहिणींचे विवाह केले. ५ मुलगे व २ मुली. जातकाने हिंदुस्थानभर प्रवास केला. मितभाषी, आदरयुक्त भीती, पत्नी मृत १९७१. जातक मृत १९७४. ७८ वर्षे पूर्ण.

चतुर्थातील शनीमुळे (उच्च) मातृसुख १९४० पावेतो. सप्तमातील उच्चस्थ मंगळ. पत्नी मोठ्या घराण्यातील. सुंदर, देखणी व अनुरूप. एक मुलगा वकील, एक मुलगा डॉक्टर, एक मुलगा मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह.

**(८) वृश्चिकेचा शनी :** चतुर्थस्थानी जर आठ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृश्चिकेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


शनी सप्तमेश व षष्ठेश असून तो चतुर्थात वृश्चिकेत येतो. शनीला वृश्चिक रास चांगली नसते. शनीची चतुर्थातून लग्नावर दृष्टी येते. जातक गर्विष्ठ असतो. पण श्रीमंत असतो. स्वभाव कोपिष्ट, लोभी व आजार तसेच व्याधी यांनी पीडित असतो. शनी षष्ठेश असून चतुर्थात शत्रू राशीतून लग्नावर दृष्टी त्यामुळे व्याधी होतात. दुष्टबुद्धीचा असतो.

चतुर्थ स्थान विद्येचे स्थान असल्याने शनी शुभयोगात असता विद्या उत्तम प्राप्त होते. तो प्रशासकीय खात्यात वरच्या पदावर जाण्याची शक्यता असते. तो इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसमध्ये अगर पदव्युत्तर प्रबंधामुळे सन्मान प्राप्त करून घेतो.

परंतु शनी अशुभ दृष्टीत वा अशुभ योगात असता मातृसुख नसते. सुख लाभत नाही. विद्या होत नाही व त्यास सदा काहीतरी कमी पडत असते.

**कुंडली : श्री. एस. डी. जहागीरदार**

जन्म रविवार १३ मार्च, १९२७ रोजी सायंकाळी ५ वा. ३७ मि. प्र. वेळ नंदुरबार येथे. अ. २१° उत्तर २३′ रेखांश ७४° पूर्व १९′. सां. स. ४ ता. २४ मि. २९ से. अयनांश २२° ५०′ ८″.




सिंह लग्नास मंगळ हा एकटा राजयोगकारक असल्याने त्याचे दशमातील वास्तव्य अधिकार गाजविणारे राहते. लग्नेश रवीची लग्नावर दृष्टी आहे. त्यामुळे जातक सरकारी खात्यात बडा अधिकारी होण्यास पात्र असतो. पंचमेश गुरुची लग्नावर दृष्टी जातकास

मान मिळवून देणारी व गुणी संतती मिळवून देणारी आहे. या कुंडलीत शनी, मंगळ व गुरु या तीन प्रमुख ग्रहांची दृष्टी एकाच वेळी लग्नावर आहे. शुक्र उच्च राशीत आहे व सप्तमात गुरु यामुळे पत्नीही सुविद्य, सुंदर व अनुरूप आहे. मंगळ-रवीच्या लग्नावरील दृष्टीने जातक तांबूस गोऱ्या वर्णाचा व उग्र व्यक्तिमत्त्वाचा वाटतो. जातकाने कायद्याची पदवी संपादन करून वकिलीस सुरुवात केली आणि थोड्याच अवधीत न्याय-खात्यात प्रवेश केला व चढत-चढत जिल्हा न्यायाधीश व नंतर मुंबई येथे सिटी सिव्हिल ॲन्ड सेशन्स कोर्टात न्यायाधीश म्हणून काम केले. शनी षष्ठेश वृश्चिकेत त्याचा अधिपती मंगळ दशमात नोकरीच्या माध्यमातून अधिकार पद.


बुध धनेश व लाभेश आहे आणि बुध रवी (लग्नेश) युतीचा लग्नावर, शनीची लग्नावर दृष्टी, बुध, शनी, मंगळ यामुळे वकिली व त्यातून अधिकार पद.

**(९) धनुचा शनी :** चतुर्थस्थानी जर नऊ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'धनुचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

चतुर्थावर धनु रास येते आणि शनी पंचमेश व षष्ठेश असतो आणि चतुर्थात धनु या गुरुच्या राशीत समक्षेत्री येतो. येथे शनी शुभ फले देतो. जातकाचे शिक्षण उत्तम होते. शनी पंचमेश चतुर्थात आहे. त्यामुळे जातक उच्च विद्याविभूषित असतो. वक्तृत्व असते. द्वितीयेवर शुक्राची रास असून जातक गोड बोलणारा असतो. त्याच्या बोलण्याची छाप पडते. शुक्र भाग्येश असतो व त्याचा शनीशी शुभयोग असता जातकास संपत्ती उत्तम प्राप्त होते. गुरुचे साहचर्य शुभ फलात वाढ करील.

## कुंडली : डॉ. हेमंत साठे

जन्म गुरुवार ३ मार्च, १९६० रोजी सोलापूर येथे. रात्रौ ८ वा. १५ मि. प्र. वेळ. सां. स ६ ता. ३१ मि. ५० से. अयनांश २३° १८′ १″.



बुटका आहे. गोरापान तांबूस गोरा. शैक्षणिक प्रगती उल्लेखनीय. प्रथमपासून पहिला क्रमांक. शाळा, कॉलेज, पदव्युत्तर सगळीकडे. M.B.B.S., M.D. बालरोगतज्ज्ञ. राश्याधिपती मंगळ पंचमात उच्च राशीस. सप्तमेश गुरु स्वगृही. पत्नी अनुरूप. तीही बालरोगतज्ज्ञ. संतती २ मुली व मुलगा. स्वत:चे हॉस्पिटल आहे. वाहन आहे. पंचमेश शनी चतुर्थात त्रिकोण चंद्र (लाभेश) व्ययेश रवी षष्ठात शनी चतुर्थात गुरुसह. भाग्येश धनेश शुक्र पंचमात प्रतियोग हर्षल. व्यवसाय करून शेतीकडेही लक्ष देण्यास सुरुवात. द्विस्वभावराशी केंद्रात चंद्र उच्चाभिलाषी फक्त ४° मागे आहे. उच्चांशापासून फक्त ४ अंश मागे आहे.


**(१०) मकरेचा शनी :** चतुर्थस्थानी जर दहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

चतुर्थावर मकर रास येते. शनी चतुर्थेश व पंचमेश असून चतुर्थात स्वगृही येतो. ही स्थिती जातकाच्या दृष्टीने चांगलीच ठरते. जातकास पैसा चांगला मिळतो. तो सुशिक्षित असून स्वभावाने मनमिळाऊ व आदरणीय असतो. त्याच्या व्यावसायिक कामात तो तज्ज्ञ व यशस्वी ठरतो. तो आपल्याच गावी विशेष यशस्वी होतो.

तूळ लग्नाचा शनी योगकारक असतो व शनी चतुर्थेश चतुर्थात असतो. त्यास मातृसुख चांगले लाभते. माता दीर्घायुषी असते व जातक आईचा मान राखतो. जातक स्वत: दीर्घायुषी होतो. त्यास स्थावर असते. वाहनसुख असते. संततीही चांगली होते.

## कुंडली : श्री. ए.

जन्म रविवार दिनांक २४ सप्टेंबर, १९३३ रोजी सकाळी ७ वा. ४६ मि. सां. स. ८ ता. २७ मि. ५० से. अयनांश २२° ५६′ ३″.




चतुर्थस्थ शनीची लग्नावर व लग्नेश शुक्रावर पूर्ण दृष्टी. शनी त्रिकोण बुध अंशात्मक. बुध भाग्येश असून व्ययात उच्च स्थितीत आहे.

शनी बुध त्रिकोण यामुळे द्वितीयेश मंगळाची शनीवर दृष्टी यामुळे जातक एल.एल.बी. होऊन वकिलीचा व्यवसाय चालू झाला. त्यामध्ये जातक आपल्या गुणांमुळे व वक्तृत्वामुळे यशस्वी झाला आहे. चतुर्थेश चतुर्थात कारक चंद्र नीच पण त्याच्या राशीचा अधिपती मंगळ लग्नी असल्याने नीच भंग झाला आहे. माता दीर्घायू आहे. पण पिता मात्र अल्पायुषी. दशमेश चंद्र नीच व पितृकारक रवी व्ययात दुर्बल राशीत आहे.

जातकास वडिलोपार्जित स्थावर मिळाली व त्यानेही त्यात भर घातली. संपत्ती चांगली मिळाली. श्री, स्त्री व संतती व वाहन यांनी युक्त आहे. शनीवर रवीची दृष्टी हा प्रतियोग अर्थातच चांगला ठरत नाही. असा जातक आजारी असतो. पत्नी कुरूप असते. जातक दु:खी-कष्टी व भटक्या होतो. चंद्राचे दृष्टीत असता जातक खोटारडा, पापी असून आईबरोबर संबंध बिघडलेले असतात पण धनवान असतो. मंगळाचे दृष्टीत असता जातक तेजस्वी, शूर, प्रसिद्ध होतो व मोठा होतो. बुधाची दृष्टी असता तामसी पण व्यक्तिमत्त्व चांगले. विद्वान, नित्य प्रवासी पण फारशी संपत्ती नसते. गुरुची दृष्टी असता तो अंगच्या सद्‌गुणांनी प्रसिद्ध व राजबिंडा व प्रशासनात जातो. दीर्घायुषी व निरोगी असतो. शुक्राची दृष्टी असता नशीबवान व धनवान, सुखी असतो पण अन्य स्त्रियांचे नादी लागतो.

**(११) कुंभेचा शनी** : चतुर्थस्थानी जर अकरा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

चतुर्थावर कुंभ रास येते. शनी तृतीयेश व चतुर्थेश स्वगृही येतो. ही ग्रहस्थिती विद्या व व्यवसाय या दृष्टीने चांगली ठरते. पण लहानपण फारसे चांगले जात नाही. जातकास कष्ट व श्रम करावे लागतात व कष्ट करून स्वत:च्या कर्तबगारीवर पुढे येतो. पण जातक रागीट व तापट असतो. बोलणे कडक असते व अनेक उद्योग करतो.

सारावलीनुसार असा जातक विद्वान, बहुश्रुत असतो पण तो मूळव्याध, संधिवात यासारख्या व्याधींनी पीडित होतो. चंद्र बलवान नसता मातृसुख मिळत नाही.


अन्य आचार्यांच्या मते जातक गावात पुढारी असतो, दृष्टी दुर्बल असते. त्यास संपत्ती चांगली मिळते व ती शेवटपर्यंत राहते. जातक स्वत: उत्तम स्थावर बांधतो. मध्यम उंची. अध्यात्माकडे कल असतो.

## कुंडली : श्री. नारायण विनायक

जन्म दिनांक १७ नोव्हेंबर, १९०५ रोजी सकाळी ६ वा. २५ मि. स्था. वेळ पुणे, सां. स. १० ता. ६ मि. ४७ से. अयनांश २२° ३२′ २५″.

जातकास मातृसुख फारसे लाभले नाही. मोठ्या भावाने वाढविले, शिक्षण दिले. जातक माइनिंग इंजिनिअर, जमशेटपूर, बिहार, मध्य प्रदेश यातील खाणीवर काम केले. जमिनीखाली जाऊन कामगारांकडून कोळसा काढण्याचे कष्टाचे कामावर देखरेख.

आयुष्याचे मध्यावर राहण्यासाठी स्वतंत्र बंगला. निवृत्त झाल्यावर पुणे येथे स्वत:चा बंगला बांधला. तीन मुले. तिघेही इंजिनिअर झाले. पत्नी सोशीक व कष्टाळू होती. जातकाचा अध्यात्माकडे ओढा होता. निसर्गोपचाराची आवड. अल्सरचा त्रास पण कडक पथ्य करून तो आटोक्यात ठेवला. तांबूस वर्ण, स्वभावाने रागीट होते. ९२ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले.




लग्नेश मंगळ तृतीयेत मकरेत, त्याची व शनीची दृष्टी दशमावर. लग्नेश व धनेश यांचा त्रिकोण योग. मकर व कुंभ या दोन्ही शनीच्या राशींना प्राधान्य येऊन अधिपती शनी हा प्रबल व प्रभावी आहे. तो चतुर्थात आहे. चतुर्थाचा संबंध जमिनीशी येतो. मंगळ हा भूमिपुत्र आहे. मंगळ व गुरु दोघेही पृथ्वीराशीत आहेत. शनी हा खनिज पदार्थ दर्शवितो. उच्च मंगळ व शनी मिळून भूगर्भशास्त्राशी संबंध येतो. मंगळापेक्षा शनीस प्राधान्य असल्याने शनी दिग्दर्शित कोळसा या खनिज पदार्थाशी संबंध येतो.

चतुर्थात शनी केतू युती. मातृसुख कमी. मातृकारक चंद्र अष्टमात नेपच्यूनच्या युतीत आहे. नवांशात शनी वृश्चिक, चंद्र वृषभ व मंगळ कुंभ नवांशात आहेत. नवांश लग्न सिंह आहे. शनी व मंगळ दोघांचीही दृष्टी चंद्रावर येते.

**(१२) मीनेचा शनी :** चतुर्थस्थानी जर बारा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मीनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

चतुर्थावर मीन रास येते. शनी धनेश व तृतीयेश असून चतुर्थावर मीन या जल राशीत येतो. चतुर्थ हे विद्यास्थान आहे. समक्षेत्री शनी उत्तम विद्या देईल. शनी द्वितीय स्थानचा अधिपती असल्याने पैसाही उत्तम मिळेल व तो पैसा स्वत:च्या हिमतीवर व श्रमातून मिळवितो. स्थावर व वाहन यांचे सुख लाभते.

रवी भाग्येश असतो. त्याचा शनीशी योग वा सहवास चांगला ठरतो. धन व भाग्य यांचे संबंध प्रस्थापित होतात. जातक विद्वान, उदार व श्रीमंत असल्याने तो लहान मुलांना आश्रय देतो व सांभाळतो आणि त्यामुळे जातक मान, कीर्ती व आदर संपादन करतो.


चंद्राचा शनीशी योग असता मातेला अनिष्ट ठरतो. जातकास दोन नावे असतात व संतती, स्त्री व संपत्ती मिळते. मंगळाची दृष्टी असता वातविकार होतात. तो हलक्या वृत्तीचा, दुष्ट प्रवृत्तीचा होतो. बुध सप्तमेश व दशमेश असतो. त्याची शनीवर दृष्टी शुभयोग असता जातक सुखी, नशीबवान, धनवान, शिक्षक, उपदेशक होतो.

गुरु-शनी शुभ संबंध असता जातक राजा, राजाचा मंत्री अथवा सेनापती होतो व त्यास आपत्ती येत नाहीत. शुक्र-शनी संबंध असता तो शुक्र दशमातून नीच राशीतून दृष्टी टाकतो. तो योग मातृविघातक व सापत्न मातेचा द्योतक ठरतो. पण शुक्र-शनीच्या युतीत असता शुक्र उच्च राशीला येतो व ही युती शुभ ठरते.

येथे चतुर्थात शनी मीन या सर्वसंग्राहक सागराच्या राशीत असतो. काही राशी इस्पितळे, तुरुंग, आश्रमशाळा, अनाथालये व कैद्यांत सुधारणा करण्याची इच्छा असणाऱ्यांचे द्योतक आहे असे मला वाटते. शुक्र हा कोमल स्वभावाचा ग्रह धनु लाभास षष्ठेश असतो. याचा शनीशी संबंध वरील गोष्टींना पोषक ठरतो.

## कुंडली : सौ. माधवी

जन्म गुरुवार २ जून, १९६६ रोजी रात्रौ ७ वा. ५० मि. प्र. वेळ बेळगाव येथे. अक्षांश १५° उत्तर ५२′ रेखांश ७४° ३०′ अयनांश २३° २३′ ३″. सां. स. १२ ता. १ मि. १४ से.





लग्नेश गुरु लग्नावर पूर्ण दृष्टी. पंचमेश मंगळ लग्नावर पूर्ण दृष्टी. षष्ठातून मंगळाची दृष्टी शिवाय मंगळ व्ययेशही आहे.

द्वितीयेश शनी-लग्नावर पूर्ण दृष्टी. चंद्र व्ययात, नीच राशीत. त्यासमोर मंगळ षष्ठांत चंद्र प्रतियोग मं. अंशसाम्याने आहे. परंतु चंद्र व मंगळ दोघेही शनीच्या शुभयोगात. विवाह मे १९८५, पती खानदानी घराण्यातील. व्यवसाय वकिली. मोठी स्थावर घर व शेती. जातकीच्या माहेरची स्थितीही अशीच चांगली आहे. संतती एक कन्या व एक पुत्र. वाहने आहेत.

# ५

# पंचम भाव

## (संतती-बुद्धिमत्ता-विद्या-उपासना स्थान)




सोबतच्या कुंडलीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी पाच हा अंक लिहिलेला आहे, त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीतील पंचम स्थान किंवा पाचवे स्थान म्हणतात.

पंचम स्थानावरून जातकाची मनोवृत्ती, भावना, बुद्धिमत्ता, शालेय विद्या, प्रेम, प्रणय, उपासना (मंत्रविद्या), सट्टा आणि सर्वांत मुख्य संतती यांचा विचार होतो. शनी यांपैकी कशाचाही कारक नाही.

पंचमस्थ शनीबद्दल वराहमिहीर स्वतंत्र असे फल न सांगता रवीप्रमाणे फले घ्यावी असे सुचवितात व रवीबद्दल ''असुतो धनवर्जितस्त्रिकोणे'' एवढेच सुचवितात. सारावलीकार रवीबद्दल

**''सुखसुतवित्तविहीन: कर्षण गिरीदुर्ग सेवकश्चपल: ।**

**मेधावी धनरहित: स्वल्पायु: पंचमे तपने ।।''** असे सांगतात.

म्हणजे पंचमस्थ रवी असता जातकास धन नसते. संतती नसते व तो दु:खी असतो आणि रानावनात भटकत असतो आणि त्याचे आयुष्यमान थोडे असते.

पण पंचमस्थ शनीबद्दल सारावलीकार स्वतंत्रपणे असे सांगतात -

**सुखसुतमित्रविहीनं मतिरहितमचेतसं त्रिकोणस्थ: ।**

**सोन्मादं रवितनय: करोति पुरुषं सदा दीनम् ।।**

म्हणजे पंचमात शनी असता जातकास संतती नसते. मित्र नसतात. संपत्ती नसते. बुद्धिमत्ता नसते. दीन असतो व संत्रस्त असतो त्यास सुख मिळत नाही.

संततीपासून सुख नसते. जातक मूर्ख व कोणाशीही मित्रत्व करीत नाही. सदा आजारी, शत्रू व कर्ज यांनी संत्रस्त असतो. वैवाहिक जीवन सुखी नसते. धननाश होतो.

गर्गऋषी असे सांगतात, पंचमात शनी शत्रुराशीत असता झालेली सर्व संतती नाश पावते. शनी अस्तंगत नसून उच्च राशीस असता संतती विलंबाने होते. कुंभ राशीतील पंचमस्थ शनी पाच पुत्र व मकरस्थ शनी तीन कन्या संतती देतो.

आणखी एका पूर्वाचार्यांच्या मते पंचमात शनी, मिथुन, कन्या, धनु व मीन या द्विस्वभाव राशीस असता जातक दत्तक घेतो व स्वत: दत्तकपुत्र होतो. या सर्व परिस्थितीचे मूळ शनीच्या दृष्टीत आहे. शनीची तीन, दहा व सात या स्थानांवर दृष्टी असते आणि पंचमस्थ शनी आपल्या त्रिविध दृष्टीने दुसरे, सप्तम व एकादश स्थान बिघडवितो. द्वितीय स्थान कुटुंब व धनदर्शक म्हणून दहाव्या दृष्टीने विवाहास अडथळे, विलंब होतो व विवाहसुख मिळत नाही आणि सप्तम दृष्टीने मित्र व लाभ हेही मिळत नाहीत व स्वत: शनी पंचमात असल्याने त्यास बुद्धी कमी असते. त्यामुळे शिक्षण होत नाही व संततीसुख बिघडते. सुखाची सर्व अंगे (स्थाने) बिघडतात म्हणून वरील प्रकारची फले मिळतात. फक्त स्वराशी व उच्च राशी त्यास अपवाद ठरतात.

समग्र कुंडलीचा नीट अभ्यास करून शनीचे भावेशत्व, त्याच्याशी असलेले शुभाशुभ योग यांचा साकल्याने विचार करूनच पंचमस्थ शनीच्या फलाचा निर्णय घ्यावा लागेल.

विवाहाच्या बाबतीत शनी अशुभ फले देताना दिसतो. दु:ख, घटस्फोट, जाच असेही प्रकार घडतात. विवाहास विलंब लावणारा शनी हाच ग्रह आहे. पुरुष कुंडलीत पत्नीकारक चंद्र व स्त्रीच्या कुंडलीत पतीकारक रवी यांचे शनीशी युती केंद्र प्रतियोग असताना व सप्तमावर आणि सप्तमेशावर शनीची दृष्टी असताना विवाहास अडथळे व विलंब लागताना पाहण्यास मिळते.

यापुढे पंचमस्थ शनीचा राशिनिहाय भावफलांचा सोदाहरण विचार केला जाईल व वाचकांपुढे येईल.

वृषभ व तूळ लग्नांना शनी एकटाही राजयोगकारक ग्रह असतो. राजयोगी ग्रह जर कुंडलीच्या पंचम स्थानात असला तर पंचमासंबंधी अशुभ फले मिळावयास नकोत.

तसेच शनी स्वत: लग्नेश असून पंचमात असला तरीही पंचमाची अशुभ फले मिळावयास नकोत. तेथे पंचमेशाचा व त्यावरील दृष्टी करणाऱ्या ग्रहांचा विचार होऊनच पंचमस्थ शनीच्या शुभाशुभ फलाचा निर्णय घ्यावा लागेल.

## पंचमस्थ शनीची राशिनिहाय भावफले

**(१) मेषेचा शनी :** पंचमस्थानी जर एक हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मेषेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


धनु लग्नाच्या सुमारे १७/१८ अंशापर्यंत लग्न असता पंचमावर मेष रास येते. शनी तेथे शत्रुराशीत व नीचक्षेत्री येतो. त्याची फले अशुभच मिळतात असे वाटण्याचा संभव आहे. येथे शनी शुभ फले देणारा ठरतो. व्यवसायात अधिकार पद येते पण संतती थोडी होते.

**''पंचमे मन्द संयुक्त तत्पाके शुभयोगदम्**
**अधिकारयुतेद्योगी स्वल्पसंतानवान्भवेत् ।''**

परंतु धनु लग्न सुमारे २० अंशाच्या वर उदित होत असता दशमावर तूळ रास (चतुर्थावर मेष) व लाभस्थानावर वृश्चिक रास म्हणजे पंचमावर वृषभ रास येते. शनी येथे पंचमात वृषभेत येत असता तो मित्रक्षेत्री येतो. शनी शुभदृष्ट वा शुभयुक्त असता पुष्कळ लाभ व भरपूर संपत्ती जातकास मिळते. पण शनी अशुभ ठरत असता संतती होत नाही. पण शुभ व बलवान शनी असता संततीसौख्य चांगले मिळते. संतती चांगली व सुखी होते व समृद्धीला हातभार लावते.

**कुंडली : श्री. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर**

जन्म सोमवार, २८ मे, १८८३ रोजी रात्रौ ९ वा. २१ मि. (स्था. वेळ) भगूर (नाशिक) येथे. अक्षांश २०° उ. ००′, रेखांश ७३° ५१′ पूर्व. अयनांश २२° १३′ ४३″. सां. स. १३ ता. ४ मि. ३० से.





येथे रवी-शनी युती पंचम भाव मध्याचे निकट आहे. दोन्हीची फले 'सुख सुत मित्र विहित:' असे सांगितले जाते.

एका उच्च ध्येयाने भारलेले क्रांतिकारक. यांना कष्ट व दु:ख, स्वजनांचा वियोग यांना तोंड द्यावे लागले. त्यांनी ते धैर्याने सहन केले ही गोष्ट वेगळी. मोठ्या खटल्यांना तोंड दिले, बोटीतून समुद्रात बुडी मारूनही केलेली स्वत:ची सुटका अल्पकालीन ठरली. परत कैद झाली हीच मोठी दु:खाची गोष्ट. शिवाय अंदमानात हाल, कुटुंबीयांचा वियोग, तेथून सरकारने त्यांना हलवून रत्नागिरीस स्थानबद्ध ठेवले व बंधने घातली. अष्टमेश रवी व द्वितीयेश शनी यांची युती चंद्राच्या चतुर्थकेंद्रात हाच दुर्धर योग. सामान्य जनांच्या दृष्टीने अत्यंत दु:खदायक व कष्टदायक पण केवळ ते सावरकर होते म्हणून त्यांनी जिद्दीने सहन केले.

येथे भावचलित चंद्र कुंडली मांडणे योग्य ठरले.

**चंद्रकुंडली**

अक्षांश १२° ३२′. सां. स. १६ ता. २ मि. १६ से.




येथे चतुर्थ भाव मध्यबिंदू १०° २५′ वृषभेचा असून त्याच्या मागे शनी ८° १८′ व पुढे रवी १४° ४३′ रवी शनी युती. ही चतुर्थकेंद्री झालेली. शनी लग्नेश तसा व्ययेशही आहे. हाच योग दुर्धर आहे.

शनीची मातृकारक चंद्राशी दृष्टी अधिष्ठित केंद्रयोग व पितृकारक रवीशी युती यामुळे माता-पिता दोघेही जातकाच्या लहान वयातच मरण पावले. चलित रवीचा हर्षलशी केंद्रयोग होतो तो काल १२-१३ व्या वर्षी.

व्ययेश शनी चतुर्थात कृत्तिका नक्षत्रात आहे. तसेच चतुर्थेश शुक्र हा मंगळ व केतू यांच्याबरोबर मध्यभागी आहे. षष्ठेश चंद्र लग्नी शनीच्या दृष्टीत, हे योग व शनी-रवी युती यामुळे सावरकरांना कारागृहवास व नंतर स्थानबद्धता यामध्ये बरीच वर्षे काढावी लागली.

**(२) वृषभेचा शनी :** पंचमस्थानी जर दोन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


पंचमावर वृषभ रास येते. शनी लग्नेश व धनेश असून तो वृषभेत मित्रक्षेत्री येतो. शनी बलवान असता संतती होते व ती सुखी असते आणि मुले समृद्धीला हातभार लावतात.

धनेश शनी वृषभ या निसर्ग कुंडलीतील धनदर्शक राशीत येतो. पंचम व लाभ ही दोन्हीही धनस्थाने आहेत. शनीची धनस्थानावर व लाभस्थानावर पूर्ण दृष्टी असते व इतर योग पोषक असता चांगली संपत्ती मिळते.

शनीची सप्तम स्थानावरील दृष्टी फारशी शुभ ठरत नाही. सप्तमेश चंद्राचा शुभयोग असता वैवाहिक जीवन ठीक राहते अन्यथा बिघडते.

## कुंडली : श्रीमती वैजयंती

जन्म रविवार, दिनांक १२ जुलै, १९४२ रोजी रात्रौ ८ वा. १५ मि. प्र. वेळ. अक्षांश १७° उ. ४२′ रेखांश ७५° पूर्व ५४′. सां. स. १५ ता. २ मि. २८ से. अयनांश २३° ३′ १०″.





सप्तमात मंगळ नीचक्षेत्री नीचभंग नाही. सप्तमेश चंद्र सप्तमाच्या व्ययात रवीच्या युतीकडे अमावास्या. सप्तमेश निर्बल. शनीची सप्तमावर दृष्टी यामुळे वैवाहिक जीवन ताणतणावाचे. मतभेद व भांडणे आणि शेवटी विभक्तपणा झाला. शिक्षण वैद्यकीय झाले व तो व्यवसाय आहे. संतती आहे. मुख्य म्हणजे अमावस्येचा जन्म. सप्तमेश चंद्राच्या व्ययात शनी व पुढे मंगळ हा पापमध्यस्थ त्याचबरोबर राहू-केतूच्या मध्ये सर्व ग्रह.

**(३) मिथुनेचा शनी :** पंचमस्थानी जर तीन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमावर मिथुन रास शनी लग्नेश तसाच व्ययेश असून पंचमात मिथुन या बौद्धिक राशीत येतो. या योगावर भरपूर लाभ प्राप्त होतात आणि नशीब चांगले उघडते. हा योग विद्याप्राप्तीला चांगला ठरतो. संततीस हा योग चांगला नाही. संतती होत नाही व शेवटी दत्तक घेण्याचा योग येतो. पंचमात द्विस्वभाव राशी असून पंचमात शनी असता असा योग येतो. लग्नेश मिथुनेत असल्याने साहित्य, लेखन अशा बौद्धिक गोष्टींकडे जातक वळतो व अध्यापक होतो.

## कुंडली : श्री. वि. वि. पटवर्धन

जन्म सोमवार दिनांक ८ मार्च, १९१५ रोजी सूर्योदयी ६ वा. ५० मि. प्र. वेळ ६ वा. १८ मि. स्था. वेळ, दूधगाव, सांगली जिल्हा. अक्षांश १६° उत्तर ५४′ रेखांश ७४° ३४′ पूर्व. अयनांश २२° ४०′ ५१″. सां. स. १७ ता. १६ मि. ४१ से.




जातक M.A.,B.T., व्यवसाय अध्यापक व लेखन. लग्नी ग्रह - लग्नेश शनी मिथुनेत-शनी त्रिकोण बुध दशमेश मंगळ कुंभेत आहे. चंद्र गुरु केंद्रयोग. हा गजकेसरी योग आहे. रवी बरोबर लग्न बिंदूवर आहे व रवी-गुरु युती आहे.

चतुर्थावर वृषभ २७° २४′ आहे. तेथून ५° २३′ अंतरावर शनी मिथुनेत आहे म्हणजे तो चतुर्थ भावाचे फल देणारा आहे. शनीची दृष्टी ही दशमावर आहे. लग्नेश शनी चतुर्थात त्रिकोण बुध यामुळे उच्च शिक्षण द्विपदवीचे, यामुळे व्यवसाय अध्यापनाचा आहे तसेच लेखनही केले आहे. चंद्र कुंडलीचा विचार करता चंद्राचा दशमेश रवी, चंद्राचे चतुर्थात चंद्र लग्नाचा धनेश गुरुचे युतीत आहे. त्यामुळेही व्यवसाय ज्ञानदानाचा-अध्यापनाचा झाला.

**(४) कर्केचा शनी :** पंचमस्थानी जर चार हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कर्केचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमावर कर्क रास असते, शनी लाभेश व व्ययेश होऊन पंचमात स्वगृहसुख व शत्रुराशीत येतो. त्यामुळे संतती नसते. शनी व्ययेश म्हणजे सप्तमाचा षष्ठेश व त्याची सप्तमावर दृष्टी म्हणून पत्नीस काही दीर्घ व्याधी असतात. त्यामुळे वैवाहिक सुख वेळोवेळी खंडित होते.

येथे रवी षष्ठेश असतो व त्याची शनीवर दृष्टी चांगली ठरत नाही. त्यासाठी तो लाभात मकरेत असावा लागतो. रवी-शनी प्रतियोग पितृसुखास विघातक असतो. जातकाच्या बालपणातच पिता जातो.


चंद्राची दृष्टी असणे म्हणजे चंद्र-शनी प्रतियोग हा मातेच्या दृष्टीने घातकच ठरतो. पण संपत्ती मिळते.

मंगळ मीन लग्नास भाग्येश व धनेश असतो. धनेश व लाभेश यांचा परस्पर दृष्टियोग संपत्तीच्या दृष्टीने चांगला ठरतो पण भावंडांच्या दृष्टीने अशुभ ठरतो. जातकास व्यंग उत्पन्न होते. नातेवाईक व पत्नी यांचे संबंध चांगले नसतात.

गुरुची दृष्टी शुभ ठरते. स्थावर, संतती, मित्रपरिवार, संपत्ती व स्त्री यांचे सुख लाभते. शुक्राची दृष्टी असता जातक चांगल्या खानदानी घराण्यातून आलेला असतो. या ग्रहांची युती असता ही फले व पंचम स्थानची फले मिळतील.

## कुंडली : कन्हैय्यालाल मुन्शी

जन्म शुक्रवार दिनांक ३० डिसेंबर, १८८७ रोजी दुपारी ११ वा. ४५ मि. भडोच येथे. अक्षांश २१° उ. ४४′ रेखांश ७२° पूर्व ५८′. अयनांश २२° २७′ ३४″. सां. स. १८ ता. १८ मि. ३० से.




उत्तम वकील. राजकारणी व मंत्री १९५०-५१ अन्नमंत्री. उत्तर प्रदेशचे राज्यपाल. स्वतंत्र पक्ष स्थापकापैकी, प्रख्यात लेखक. भारतात विद्याभवनचे संस्थापक. दशमावर बुध, रवी व सप्तमातून मंगळाची दशमावर व रवी बुध यावर दृष्टी यामुळे वकील व राजकारणी. मंत्रिपदे भूषविली. नवम भाव बिंदूजवळ गुरु (शुक्रयुक्त) त्यामुळे स्वतंत्र पक्षाचे संस्थापकापैकी एक व भारतीय विद्याभवनचे संस्थापक. गुरु अर्ध केंद्र मंगळ, पंचमेश पंचमाचे व्ययात व तो चंद्र मंगळाच्या केंद्रात, पंचमात वक्री शनी या तीन योगांमुळे पंचम स्थान बिघडले आहे. शिवाय पंचमात शनी-राहू युती आहे. गुजराथीत बरीच पुस्तके लिहिली.

**(५) सिंहेचा शनी :** पंचम स्थानी जर पाच हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'सिंहेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


पंचमावर सिंह रास येते. शनी दशमेश व लाभेश असून तो पंचमात सिंह या शत्रु राशीत येतो.

अशा जातकास जठराचे विकार, अपचन, बद्धकोष्ठ, स्मरणशक्तीचा ऱ्हास, संतती जाते. मूर्ख असतो. स्वत:च्या पत्नीशी व मुलाशी चांगले संबंध नसतात आणि कौटुंबिक आघाडी दु:खद असते. त्यास संपत्ती फारसी मिळत नाही. अशी फले आर. संथानम यांनी सारावलीच्या भाष्यात सांगितली आहेत.


पण शनी दशमेश व लाभेश असतो. त्याची धनस्थान व लाभस्थान यावर दृष्टी असते. मग संपत्ती नसते हे म्हणणे बरोबर होणार नाही.

**कुंडली : श्री. ज. मा.**

जन्म दिनांक २९ मे, १९२० रोजी पहाटे ३ वा. ५२ मि. ३६ से. सां. स. १९ ता. ५० मि. ५७ से. अयनांश २२° ४४′ ५७″.




**नवांश कुंडली**



मोठ्या श्रीमंत घराण्यात जन्म. विशाल बंगला, चाळी, बंगले आणि स्थावर, वाहने अशी वडिलोपार्जित मालमत्ता मिळाली.

जातक स्वतः उंच, देखणा व गोडभाषी. स्वतः काही व्यवसाय केला नाही. फक्त मोठ्या मालमत्तेची व्यवस्थित देखरेख. एक कन्या. पत्नी चांगल्या घराण्यातील पण आजारी. सप्तमावर व सप्तमेशावर शनीची दृष्टी. चर्तुर्थातील उच्च गुरुमुळे मोठी स्थावर वगैरे. धनेश, पंचमेश यांची युती धनस्थानात. पंचमात सिंह रास तेथे शनी, संतती एकच व मुलगी. मुलगी मोठ्या घराण्यात दिली. ती स्वतः उच्चशिक्षित व सामाजिक कार्यात रस घेत आहे.

म्हणजे आर. संथानमनी सांगितलेली अशुभ फले मिळाली नाहीत. नवमांश कुंडलीही मुद्दाम दिली आहे. रवी, चंद्र व मंगळ वर्गोत्तम आहेत.

**(६) कन्येचा शनी :** पंचमस्थानी जर सहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


वृषभ व तूळ या लग्नांना शनी हा राजयोगकारक असतो आणि पंचमात तो कन्या व कुंभ राशींना अनुक्रमे येतो. येथील शनीची शुभ फले मिळतील.

पंचमावर कन्या रास असून नवमेश व दशमेश शनी पंचम या त्रिकोणात मित्रक्षेत्री येतो. येथे शनी असलेला जातक बऱ्याच बाबतीत नशीबवान असतो. त्याच्या उद्योग-व्यवसायात तो चांगलाच पुढे येतो. नाव कमावतो. शिक्षण क्षेत्रही चांगले ठरते. जातक बुद्धिमान, व्यवहारी असून तो संपत्ती चांगली मिळवितो. द्वितीयावर मिथुन रास येते. पंचमस्थ शनीची दृष्टी द्वितीयेवर येते. संपत्तीचा लाभ होतो. सातवी दृष्टी लाभस्थानावर येते. या दोन्ही संपत्ती स्थानांवर भाग्येशाची दृष्टी उत्तम लाभदायक ठरते. तिसरी दृष्टी सप्तमावर येते. त्यास पत्नीही चांगली व नशीबवान मिळते. संतती होते व त्यांच्यापासूनही सुख मिळते.

## कुंडली : श्री. आशुतोष मुखर्जी

जन्म बुधवार दिनांक २९ जून, १८६४ रोजी पहाटे ३ वा. ५५ मि. कलकत्ता येथे. अक्षांश २२° उ. ३४′ रेखांश ८८° २४′ पूर्व. अयनांश २१° ५७′ ५३″. सां. स. २२ ता. २४ मि. १० से.

प्रकांड बुद्धिमत्ता, गणितज्ञ लग्न बिंदूबरोबर उदय पावलेला बुध यामुळे गणितज्ञ. बुध त्रिकोण शनी यामुळे वकिली. नंतर कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सन १९०४ ते १९२३. बुध-शुक्र अन्योन्य योग. कलकत्ता विश्वविद्यालयाचे कुलगुरू. भाग्येश पंचमात, पंचमेश लग्नी व लग्नेश मिथुनेत. बुध द्वितीयेश व पंचमेश त्रिकोण नवमेश शनी, मिथुनेतील ग्रह शनी व गुरुच्या दृष्टीत त्यामुळे प्रकांड बुद्धिमत्ता. पंचमात शनी व पुत्रकारक गुरु राहूचे युतीत यामुळे पंचम स्थान सुदैवी ठरले नाही. पंचमेश बुध बलवान असल्याने संततीपैकी एक पुत्र पुढे प्रसिद्धीस आला.





**(७) तुळेचा शनी :** पंचमस्थानी जर सात हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'तुळेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –

मिथुन व कन्या या बुधाच्या राशी आहेत. त्यांच्या पंचमावर अनुक्रमे तूळ व मकर या राशी येतात.

पंचमावर तूळ रास, शनी अष्टमेश व नवमेश असतो आणि पंचमात आपल्या उच्च राशीत येतो. येथे संतती, संपत्ती व पत्नी यांचे पूर्ण सुख मिळावयास पाहिजे व ते मिळतेही. पिता धनवान असतो. वडिलोपार्जित वारसा चांगला मिळतो व संपत्तीचा भरपूर लाभ होतो.

## कुंडली : श्री. मधुकर विष्णू

जन्म शनिवार १९ एप्रिल १९२४ पुणे येथे. सकाळी १० वा. २८ मि. प्र. वेळ. अयनांश २२° ४७′ ५१″. सां. स. २३ ता. ४१ मि. ३० से.



शिक्षण B.Sc. Agriculture पण लहानपणापासून यंत्राचा नाद. उत्कृष्ट यंत्रज्ञ. सिनेमाचा प्रोजेक्टर तयार केला व पेटंट मिळविले. वडिलांनी याच्यासाठी स्थावर ठेवली पण विवाह अति उशिरा ३८ वर्षे पूर्ण झाल्यावर झाला. कारण पंचमावर चंद्र-शनी युती. विवाह मिळवत्या पत्नीबरोबर. पत्नी स्वत: स्त्री रोगतज्ज्ञ असून हॉस्पिटलमध्ये नोकरी. तिची स्वत:ची मोटारकार होती. जातक जपान व जर्मनीत जाऊन आलेला होता. एका कारखान्यात नोकरी केली पण ती सोडून सिनेमा थिएटर्सची देखभाल, यंत्रदुरुस्तीची कामे गावोगाव जाऊन करीत असे. स्वत: नवीन बंगला बांधला. एक कन्या व एक पुत्र. दोघेही मिळवते आहेत. कुंडलीत शनी उच्च, मंगळ उच्च, रवी उच्च अशी स्थिती आहे. पण आयुष्यभर कष्ट केले. संपत्ती, संतती, स्थावर व मिळवती पत्नी, वाहन यांनी युक्त. विवाह उशिरा झाला व लहानपण कष्टात, श्रमात गेले. वडिलांची बोलणी खाऊन यंत्राचा नाद जोपासला. बुद्धिमान.

मृत्यू ६९ वे वर्षी. अष्टमस्थ मंगळामुळे शस्त्रक्रिया व एक वर्ष आजार व हॉस्पिटलमध्ये काढले.

**(८) वृश्चिकेचा शनी :** पंचमस्थानी जर आठ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृश्चिकेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


शनी या कर्क लग्नास सप्तमेश व अष्टमेश असतो आणि तो पंचमात वृश्चिक व द्वाड व शत्रुराशीत येतो. येथे शनीची चांगली फले मिळण्याची शक्यता जवळ-जवळ नाहीच. सप्तमावर त्याचीच मकर रास आहे आणि शनीची स्वस्थानावरील दृष्टी विवाह करवेल पण तो सुखावह होईल की नाही हे अन्य ग्रहांवर अवलंबून आहे. पण संततीच्या बाबतीत जातक दु:खी राहील. एकतर संततीच होणार नाही आणि झालीच तर त्यांच्यापासून सुखाऐवजी दु:खच पदरी पडेल. जातकास जठराचे विकार, आतड्याचा अल्सर, मूळव्याध अशा तऱ्हेच्या व्याधी होतील. तो अकाली वृद्ध होतो आणि त्यास गरिबीतच दिवस काढावे लागतात.

येथील शनी विवाहास प्रतिकूल राहतो. विवाह होत नाही किंवा अतिविलंब होतो.

### कुंडली : श्रीमती क्ष.

जन्म शनिवार दिनांक १ जून, १९५७ रोजी सकाळी ९ वा. ५० मि. प्रमाण वेळ पुणे येथे. अक्षांश १८° उ. ३०′ रेखांश ७३° पूर्व ५२′. सांपतिक समय १ ता. ५३ मि. २४ से. अयनांश २३° १५′ ५७″.

लग्नेश चंद्र व्ययात मिथुनेत व मंगळाचे युतीत लग्नेश चंद्र व सप्तमेश शनी हे षडाष्टक आहे पण पतीकारक रवी व पंचमस्थ शनी यांचा अंशसाम्याने प्रतियोग. शनीची द्वितीयावर, लाभावर, रवीवर आणि सप्तमावर दृष्टी. यामुळे विवाह झाला नाही व होणार नाही. संपत्ती, समृद्धी (यामध्ये पती/पत्नी, संतती अंतर्भूत आहेत) पंचमात अगर सप्तमात (लग्नाच्या अगर चंद्राच्या) शुभ ग्रह असले तरच लाभते अन्यथा नाही.




म्हणजे तसे नसल्यास. पती/पत्नी, संतती, संपत्ती यांचा लाभ होतच नाही. समृद्धीच नसते, असे वराहमिहीर अनिष्टाध्याय, तेविसावा श्लोक १ मध्ये सांगतात. या कुंडलीत ते बरोबर लागू पडते. शिवाय बुध केतू युती मेष राशीत आहे. त्यामुळे मतिभ्रंश होऊ शकतो.

**(९) धनुचा शनी** : पंचमस्थानी जर नऊ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'धनुचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमावर धनु रास आहे व शनी सप्तमेश व षष्ठेश असून पंचमात समक्षेत्री येतो. शनीची सप्तमावर स्वत:च्या मूळ त्रिकोण राशीवर दृष्टी येते. त्यामुळे विलंबाने का होईना विवाह होतो. शिवाय संतती अल्प का होईना होण्यास अडचण येत नाही. त्यातच गुरुची दृष्टी शनीवर असता संतती होईल. गुरु नवमातून लाभातून व लग्नातून शनीवर शुभदृष्टी देतो पण शनी षष्ठेशही असल्याने आजार होतील. गुरु षष्ठात मकरेत असतो त्या वेळी गुरु-शनी अन्योन्य योग होतो. त्या वेळी मात्र संततीसंबंधात प्रतिकूलता, संतती चांगली निपजत नाही व संततीसौख्य बिघडते. धननाश होतो व आयुर्मर्यादा कमी होते.


येथील शनीची चंद्रावर दृष्टी असल्यास मातृसुख बिघडते पण श्री, स्त्री, संततीचा लाभ होतो. जातकास दोन नावे असतात. मंगळाची दृष्टी चांगली ठरत नाही. वातव्याधी होते. इतरांचा तिरस्कार होतो. मन व बुद्धी कोती असते.

बुधाशी शुभयोग दृष्टियोग असता धनेश व लाभेश यांच्याशी संबंध येतात व त्यामुळे चांगला संपत्ती लाभ होतो. जातक सुखी व नशीबवान असतो.

गुरुची दृष्टी असता शनीची अशुभ फले जवळजवळ नाहीशी होतात.

## कुंडली : श्री. यशवंत बु. कुलकर्णी

जन्म शनीवार दिनांक ३ ऑक्टोबर, १९३१ रोजी पहाटे ३ वा. ४५ मि. पुणे येथे. अयनांश २२° ५४′ १७″. सां. स. ३ ता. ५३ मि. ३८ से. दत्तक योग.




लग्नेश रवी व दशमेश शुक्र द्वितीयेत कन्या राशीत त्यावर पंचमस्थ धनु राशीतील शनीची पूर्ण दृष्टी. हा दत्तक योग.

दत्तकामुळे संपत्ती व स्थावरचा लाभ होतो. लाभेश व धनेश बुध व दशमेश तृतीयेश शुक्र धनस्थानात शनीचे पूर्ण दृष्टीत. चतुर्थेश व नवमेश मंगळ तूळ राशीत तृतीय स्थानात असून त्याची दृष्टी दशमस्थ उच्च अशा चंद्रावर आहे. १९४९ साली आजीस दत्तक, इनाम जमीन, गणपती मंदिर मिळाले. शुक्र केंद्रयोग शनी व प्रतियोग हर्षल (शुक्र दशमेश) जनक वडिलांचा अचानक मृत्यू.


**(१०) मकरेचा शनी :** पंचमस्थानी जर दहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमावर मकर रास - शनी पंचमेश व षष्ठेश असून पंचमात स्वगृही येतो. शनी थोडासा अशुभही असतो. पण लग्नेशाच्या स्थितीवर अवलंबून राहतो.

या ठिकाणी जातकास तापत्रयामुळे अडचणी उत्पन्न होतात. आध्यात्मिक, अधिभौतिक व अधिदैविक प्रकारचे हे त्रिविध त्रास आहेत. आध्यात्मिक ताप आत्म्याची स्थिती, (आध्यात्मिक उन्नतीची श्रेणी) अधिदैविक पूर्व प्रारब्धामुळे होणारा त्रास आणि अधिभौतिक प्राणिमात्रांकडून होणारे दुःख जातकास व्यवसाय-नोकरीत अडथळे, चढ-उतार होतात. तो दुर्बल असतो. त्यास व्याधी असतात.

**कुंडली : श्री. यशवंत मा.**

जन्म बुधवार दिनांक ८ नोव्हेंबर, १९३३ रोजी पहाटे ३ वा. ५५ मि. सोलापूर येथे. अयनांश २२° ५६′ १०″ सां. स. ६ ता. ३३ मि. ४० से. अक्षांश १७° उ. ४३′ रेखांश ७५° ५५′ पूर्व.




बुधाची गती अत्यंत कमी होत होती व तो दिनांक ८ नोव्हेंबर रोजीच वक्री झाला. जातक ६ महिन्यांचा असता त्यास डायरिया झाला. आजार तीव्र होता. षष्ठेश शनीची नीच रवीवर पूर्ण दृष्टी. अधिष्ठित केंद्रयोग.


लग्नेश बुध तृतीयात गतिहीन व वक्री. केंद्रयोग नेपच्यून. चंद्राचे षष्ठात मंगळ व अष्टमात शनी. तीव्र आजार त्यामुळे मेंदूवर परिणाम झाला. समज कमी. बुद्धी अगदीच कमी. शिक्षणात प्रगती नाही. चतुर्थाचे दोन्ही बाजूस पापग्रह. चालणे व बोलणे सर्व उशिरा झाले. टायपिंग शिकला. टायपिस्ट म्हणून निवृत्त झाला. विवाह जून १९६१. संतती दोन मुलगे, दोघेही अभ्यासात मागेच. पंचमस्थ शनीचे (जो चंद्राचा अष्टमेश आहे) हे सर्व परिणाम. लग्नातील गुरुने वाचला व वाढला. वडिलोपार्जित स्थावरमधील हिस्सा मिळाला आहे. दोन मोठे भाऊ, दोन लहान भाऊ. लहान २ बहिणी. बुध २० व्या वर्षी मार्गी झाला. १९५३ नंतरच हळूहळू प्रगती. त्या वेळी चलित रवी युती बुध यामुळे थोडे बल प्राप्त झाले.

**(११) कुंभेचा शनी :** पंचमस्थानी जर अकरा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमावर कुंभ रास येते. शनी चतुर्थेश व पंचमेश असून पंचमात स्वगृही येतो. पंचमेश पंचमात वायुराशीत बौद्धिक राशीत आहे. शनी चतुर्थेश व पंचमेश असतो. दोन्ही विद्यास्थाने शनीचीच आहेत. त्यामुळे जातक बुद्धिमान व त्याच्याकडून उत्तम विद्या मिळविली जाते. संतती विलंबाने पण निश्चितपणे होते. पत्नी संपत्तिमान घराण्यातील असते. योगकारक ग्रहाची दृष्टी सप्तमावर येते.

## कुंडली : श्री. त्र्यंबक वामन गरुड

जन्म सोमवार दिनांक ९ सप्टेंबर, १९३५ रोजी सकाळी ९ वा. २७ मि. प्रमाण वेळ २०° उ. २′ रेखांश ७३° ५०′ पूर्व. अयनांश २२° ५७′ ५१″. सां. स. ८ ता. ८ मि. ४५ से.




जातक M.B.B.S. होऊन अमेरिकेत उच्च शिक्षण घेतले आहे. प्रॅक्टिस चांगली. पत्नी उत्तम घराण्यातून आली असून तिची चांगली साथ. शनीवर, गुरु, शुक्र (लग्नेश) व रवी लाभेश अशा सर्व महत्त्वाच्या ग्रहांची दृष्टी आहे. शिवाय शनी व हर्षल यांचा लाभयोग पंचम व सप्तम स्थानातून आहे. भाग्येश बुध व्ययात उच्च आहे.

दशमावर कर्क रास आहे. त्याचा अधिपती चंद्र चतुर्थात आहे. शुश्रूषा, औषधे कर्क राशीने दर्शविली जातात. चंद्राचे नवमात (कुंडलीचे व्ययात) बुध कन्या या आरोग्यविषयक राशीत आहेत. धनेश मंगळ द्वितीयात असून त्याचा दशम बिंदूशी त्रिकोण व चंद्राशी लाभयोग आहे. दशमाशी कन्या-वृश्चिक-बुध-मंगळाचा संबंध येतो. वैद्यकीचा व्यवसाय रवीवर येतो. रवी हा षष्ठेश नेपच्यून (हॉस्पिटलचा द्योतक) याचे युतीत आहे.


पंचमेश पंचमात आहे पण तो वक्री आहे. गुरुचे पंचमातील शनी संततीस प्रतिबंधक ठरतो. तसेच मंगळाचीही पंचमावर आणि शनीवर दृष्टी आहे. चंद्राचा पंचमेश शुक्र सिंह या वंध्या राशीत आहे व नेपच्यूनचे युतीत व शनीचे दृष्टीत आहे. संतती चिंता दर्शविणारे योग आहेत.

**(१२) मीनेचा शनी :** पंचमस्थानी जर बारा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मीनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

पंचमावर मीन रास असते. शनी तृतीयेश व चतुर्थेश असून पंचमात गुरुच्या राशीत येतो. शनीच्या वास्तव्याने संततीवर अनिष्ट परिणाम होतो. संपत्तीचे नुकसान व कर्जाचे ओझे असते व वैवाहिक जीवन सुखी होत नाही असे आर. संथानम म्हणतात.

### कुंडली : श्री. व. पु.

जन्म शुक्रवार १० मार्च, १९३९ रोजी रात्रौ ११ वा. ४५ मि. प्र. वेळ सोलापूर. अक्षांश १७०° उ. ४२′ रेखांश ७५° पू. ५५′. अयनांश २३° ००′ ३९″. सां. स. १० ता. २६ मि. ६ से.




पितृसुख लवकर हरपले. मातृसुख भरपूर मिळाले. बहिणी लहान-मोठ्या. कर्ता पुरुष लवकर गेल्याने कौटुंबिक स्थिती कठीण झाली. नोकरी करीत जातक पदवीधर झाला व शिक्षकाचा व्यवसाय. त्यात यश प्राप्त. स्वतंत्र बंगला घेतला. सोलापुरात कॉलेजमध्ये लेक्चरर. पत्नी टेलिफोन खात्यात नोकरी. दोन कन्या. कठीण परिस्थितीतून जातक वर आला. शनी-गुरु अन्योन्य योग. चतुर्थातील कुंभेचा गुरु (कुंभेत गुरु कर्क राशीसारखी फले देतो अर्थ वराहमिहीर सांगतात) रवी-गुरुच्या दोन्ही बाजूस शुक्र व बुध हे शुभ ग्रह त्यामुळे विद्यायोग मोठा झाला. चंद्र तूळ त्रिकोण गुरु कुंभ.

प्रारंभीची दैन्यावस्था. पंचमस्थ शनीची द्वितीयावर दृष्टी व द्वितीयात मंगळ. भाग्येश चंद्र, व्ययात राहूने युक्त.


सर्व ग्रह क्षितिजाचे खाली त्यामुळे कष्ट व परिश्रमाने यश लाभले. उत्तरायुष्य सुखाचे समृद्धीचे.

६

# षष्ठम भाव

## (शत्रू-रोग-ऋण-नोकर स्थान)

सोबतच्या कुंडलीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी सहा हा अंक लिहिलेला आहे, त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीतील षष्ठम स्थान किंवा सहावे स्थान म्हणतात.




सहाव्या स्थानावरून जातकाचे शत्रू, त्यास होऊ शकणारे आजार व व्याधी, त्यास झालेल्या कर्जामुळे जातक त्रस्त झालेला असतो. ते कर्ज त्याच्या हाताखाली असणारे नोकर, गुमास्ते व कामगार यांचा प्रामुख्याने विचार होतो.

अर्थ त्रिकोणाची जी तीन स्थाने आहेत त्यापैकी षष्ठस्थान हे पोषकस्थान आहे. स्वतंत्र व्यवसाय, उद्योगधंदे यांत जे नोकर-चाकर, कामगार, कारागीर असतात, त्यांच्या मदतीने जातक उद्योगधंदा-व्यवसाय करीत असतो.

तसेच अधिकारदर्शक दशम स्थान असले तरी त्या अधिकारापर्यंत पोहोचण्यास जातकास कनिष्ठ स्तरापासून सेवा-नोकरी करावी लागते. मग तो आपल्या कर्तृत्वाने बढती घेत-घेत अधिकार पदापर्यंत पोहोचतो. त्याही दृष्टीने षष्ठस्थान पोषक व महत्त्वाचे आहे.

षष्ठस्थान हे दशमाचे नवम स्थान तर भाग्यस्थानाचे दशम स्थान असते आणि त्यांचे अधिपतीचे परस्परांशी असलेले संबंधही योगकारक ठरतात. कुंडलीमध्ये योगकारक ग्रह तीन श्रेणींचे आहेत. नवमेश व दशमेश असलेले ग्रहांचे परस्पर तीन-चार संबंधांमुळे श्रेष्ठ राजयोग होतो. मध्यम श्रेणीचे योगकारक ग्रह हे भाग्यस्थानचे जे नवम व दशम यांचे अधिपती म्हणजेच पंचमेश व षष्ठेश यांचे परस्परसंबंधामुळे योगकारक होतात आणि दशमाचे नवम व दशम म्हणजे षष्ठेश व सप्तमेश असलेले ग्रहांचे परस्परसंबंधांमुळे होणारे योगकारक ग्रह हे तृतीय श्रेणीचे असतात.

असे संबंध (१) युती व सहयोग (२) अन्योन्य क्षेत्र संबंध (३) परस्परांचे दृष्टिसंबंध आणि (४) असे ग्रह परस्परांचे केंद्रात असणे असे चार प्रकारचे आहेत. तसेच लग्नेश

ज्या भावात आहे. त्याच्या अधिपतीचे युतीत असताही जातक संपत्तिमान होतो व त्यास मान-सन्मान प्राप्त होतात. याप्रमाणे प्रतिपादन 'उत्तरकालामृत' या ज्योतिषग्रंथात ४ थ्या खंडातील चौथ्या श्लोकात आहे.

यामुळे षष्ठस्थान हे त्याही दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठरते. शनी हा खालच्या दर्जाच्या सेवेपासून हुकूमशहापर्यंतचे सर्व प्रकार व प्रवास दर्शवितो.

सारावलीमध्ये षष्ठस्थ शनीचे वर्णन असे केले आहे -

**प्रबलमदनं सुदेहं शूर बह्माशिने विषमशीलम् ।**

**बहुरिपुपक्षक्षपितं रिपुभवनोऽर्कजः कुरुते ।।**

**अर्थ :** षष्ठातील शनी मदनाने (वासनेने) पीडित असतो व वाममार्गाकडे वळतो. जातक सुदेही (कुरूप नाही) असतो व स्मार्ट दिसतो. त्याचा आहार दांडगा असतो. तो खादाड असतो. स्वभावाने दुष्ट असतो परंतु आपल्या सर्व शत्रूवर विजय मिळवितो.

आणखी आचार्यांचे मते जातक संततीचे बाबतीत सुखी असतो पण त्याचे पत्नीचे आजारपणामुळे दु:खीकष्टी होतो. पैसा चांगला मिळवितो, तो नशीबवान असून प्रसिद्ध लेखक होतो. त्यास मूत्राशयाचे विकार व गुप्तरोग असतात.

स्त्री जातक श्रीमंत असते. तिला उंची वस्त्रे-प्रावरणे, रत्ने, दागदागिने मिळतात. संतती असते व त्यापासून सुख व प्रेम लाभते.

षष्ठातील शनी भांडखोर, हट्टी, धैर्यवान, खादाड असतो. त्यास शत्रू नसतात. दूषित असता निष्काळजीपणा व उपासमारी यांनी आजार होतात. हाताखालचे नोकरांचा त्रास होतो. मंगळाने दूषित असता गंभीर आजार व शस्त्रक्रिया होतात. राहूने दूषित असता भ्रमिष्टपणा असतो. पण शनी शुभग्रहांचे दृष्टीत वा त्यांचे संबंधात असता खाणी, कंत्राटे, बांधकाम यांत यश मिळते.

शनी षष्ठेश असून षष्ठात असता त्या भावासंबंधीची अशुभ फले मिळत नाहीत. सर्व शुभ फले मिळतात.

षष्ठ, अष्टम व व्यय स्थानाचे अधिपती एकमेकांचे स्थानात असता विपरीत राजयोग होतो.

शनी शत्रू राशीत वा नीच राशीत असता हलक्या दर्जाच्या व्यक्तींकडून त्रास व भय असते. अन्य राशीत असता कर्जफेड होते. शत्रूंना जिंकतो व जातकास संतती व संपत्तीचे सुख मिळते.

षष्ठस्थान हे आजाराचे स्थान असल्याने तेथील शनीमुळे हिवताप वगैरे ताप होतात व जातकास चोरीचे भय असते.

षष्ठस्थानावरून आजोळचे नातेवाईक मामा, मावश्या यांचा बोध होतो. षष्ठस्थानातील शुभाशुभ ग्रह व षष्ठेशाचे शुभाशुभत्व यावरून त्यांचेशी असलेल्या संबंधांचा फायदा, नुकसान यांचा बोध होतो.

शरीरावयवांपैकी कुक्षी, कमर, उदर, पोकळी, हाताचा पंजा यांचा व आतडी व आंत्रपुच्छ या अंतर्गत अवयवांचा बोध होतो.

षष्ठातील शनीची दृष्टी अष्टमस्थान, व्ययस्थान व तृतीयस्थान यावर पडते.

## षष्ठमस्थ शनीची राशिनिहाय भावफले

**(१) मेषेचा शनी :** षष्ठमस्थानी जर एक हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मेषेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी तृतीयेश व चतुर्थेश असून षष्ठात मेष राशीत शत्रू क्षेत्री व नीच राशीत येतो. वृश्चिक लग्नास बुध व गुरु हे धन देणारे ग्रह आहेत. षष्ठातून शनीचा दशमाशी व दशमस्थ ग्रहाशी त्रिकोण योग होतो व जातकास नोकरीमध्ये सहज प्रवेश मिळून त्याची प्रगती होत जाते. तसेच द्वितीय भाव व द्वितीयस्थ ग्रह यांचेशी त्रिकोण योग होतो व त्यामुळे दशम, द्वितीय व षष्ठ असा अर्थ त्रिकोणात शनीचा महत्त्वाचा भाग राहतो.


चतुर्थेश षष्ठात येतो तेव्हा मातृसुखावर परिणाम होतो तसेच तृतीयेश षष्ठात तेव्हा भावंडे-भाऊ नसतात.

### कुंडली : श्री. विजयचंद्र विश्वनाथ


जन्म शनिवार दिनांक २८ सप्टेंबर, १९४० रोजी सकाळी ११ वा. १५ मि. प्र. वेळ पुणे. अक्षांश १८° उ. ३०′ रेखांश ७३° पूर्व ५८′. अयनांश २३° १′ ५१″. सां. स. ११ ता. ९ मि. १६ से.

जातक बी. ई. सिव्हिल झालेला आहे. तृतीयेश चतुर्थेश शनी आणि धनेश पंचमेश गुरु यांची युती षष्ठभावावर असून त्या दोघांचा दशम भावबिंदूशी पूर्ण त्रिकोण योग आहे. बुध वर्गोत्तम आहे. लग्नेश मंगळ दशमात बुधाच्या राशीत व नेपच्यूनचे युतीत आहे व ते दोघे हर्षलशी त्रिकोण योगात आहेत. नवांश कुंडली जास्त चांगली आहे. शनी उच्च, मंगळ उच्च, शुक्र उच्च, रवी उच्च.

बुध मंगळ त्रिकोण आहे. चंद्र गुरु त्रिकोण. शुक्र, बुध व मंगळाशी लाभयोगात आहे. जातकास तमिळनाडूतील ग्रॅनाईट फॅक्टरीत नोकरी लागली. तेथे बरीच वर्षे काम करून तो मुंबई टाटा कन्स्ट्रक्शनमध्ये नोकरीस लागला. सध्या टाटामार्फत बेंगलोरला काम करतो आहे. भाग्येश चंद्र भाग्यात आहे.




**नवमांश कुंडली**




**(२) वृषभेचा शनी :** षष्ठमस्थानी जर दोन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


धनु या लग्नास शनी द्वितीय व तृतीय या स्थानांचा अधिपती असतो. षष्ठस्थानात वृषभेमध्ये येतो. द्वितीय हे पैशाचे तर तृतीय हे पराक्रम, बुद्धिमत्ता यांचे स्थान आहे. षष्ठांश शनी मित्रक्षेत्री येतो. या कुंडलीत शुक्र शनीचा शुभयोग दृष्टिसंबंध असता धनेश, लाभेश यांचा उत्तम सहयोग आयुष्य लाभते. अधूनमधून आर्थिक ओढाताण होते. जातक स्वत:च्या परिश्रमाने पैसा कमावतो. युती धनु राशीत व गुरुच्या दृष्टीत आहे. शनी त्रिकोण दशम आहे. चंद्र षष्ठात पण उच्च राशीत त्यास सहसा आजार होत नाही. पण षष्ठातील शनी घशाचे विकार, फुप्फुसाचे आजार दर्शवतो.

## कुंडली : डॉ. बाबू राजेंद्रप्रसाद

जन्म बुधवार, ३ डिसेंबर, १८८४ रोजी सकाळी ८ वा. ४५ मि. स्था. वेळ झिरादेई येथे. अक्षांश २५° उ. ३६′ रेखांश ८५° पूर्व १०′. अयनांश २२° १५′. सां. स. १३ ता. ३४ मि. ३० से.

घटना तयार होऊन ती लागू झाल्यानंतरचे भारताचे पहिले राष्ट्रपती आहेत. २६ जानेवारी, १९५० पासून ते १३ मे, १९६२ पावेतो राष्ट्रपती होते. त्यांची सायन कुंडली मांडतो.

**सायन जन्म कुंडली**




लग्न मकरेच्या ११ व्या अंशात उदय पावत आहे. या अंशाचे दृश्य मजेदार आहे -

''शिरावर मुकुट धारण केलेला राजा दूताजवळून पत्रे घेत आहे. कातड्याच्या कागदांची गुंडाळी मोहोरबंद करून राजदंडावर आडवी ठेवली आहे.''

डॉ. राजेंद्रप्रसाद राष्ट्रपती झाल्यावर परदेशच्या राजदूत - ॲम्बॅसेडरकडून नेमणुकीची पत्रे घेत असल्याचे छायाचित्र त्या वेळी प्रसिद्ध झाले होते. त्याची आठवण या अंशाच्या दृश्याने होते. स्वतंत्र भारताचा पहिला राष्ट्रप्रमुख राजदूतांना मुलाखती देतो हे दृश्य त्या वेळी अभिमानास्पद वाटत होते.


लग्नेश षष्ठात आहे व त्याचा दशमबिंदूशी त्रिकोण योग आहे. राजयोगकारक शुक्र दशमात आहे आणि त्याचा गुरु व लग्नबिंदू यांचेशी ६०° अंशाचा शुभ लाभयोग आहे.

२६ जानेवारी, १९५० रोजी चलित दशम धनु राशीत २८° ५४′ असून त्याची भाग्येश बुध व लाभेश मंगळ यांच्याशी युती. चलित रवी द्वितीय भाव व त्रिकोण जन्म चंद्र व चलित शनी चलित चंद्र लाभयोग जन्म लग्न असे चलितात योग चालू होते. गोचर गुरु व गोचर शुक्र कुंभेत १२° व १३° अनुक्रमे होते. त्यांचा जन्म रवीशी लाभयोग व जन्म रवीशी त्रिकोण योग असून ते दोघे जन्म चंद्राच्याही त्रिकोणात (दीप्तांशात) आहेत.

दिनांक १३ मे, १९६२ रोजी राष्ट्रपती पदाची मुदत संपली.

मृत्यू २८.०२.१९६३ त्या दिवशी गोचरीने बुध व शनी दोघेही तंतोतंत द्वितीय भाव बिंदूवर होते.

**निरयन कुंडली**




धनु लग्न असून लग्नेश गुरु सिंहेत असून लग्नबिंदूचे त्रिकोण योगात व दशमेश शुक्राचे लाभयोगात आहे.

लग्नावर कोणत्याही पापग्रहाची दृष्टी नाही. भाग्येश बुध व चतुर्थेश लाभेश मंगळ यांची युती धनु राशीत व गुरुचे दृष्टीत आहे. शनी त्रिकोण दशम आहे. चंद्र षष्ठात पण उच्च राशीत असून भाग्येश रवीचे दृष्टीत आहे. चंद्र कुंडलीचा योगकारक शनी चंद्राचे युतीत आहे. आयुष्याचे उत्तरार्धात यांचे उत्तम फल मिळते.

मूळची परिस्थिती गरिबीची होती. पण त्यांनी चिकाटीने शिक्षण पूर्ण केले. प्रत्येक परीक्षेत पहिल्या वर्गात उत्तीर्ण होऊन वकील झाले आणि १९०९ ते १९२० वकिली केली. त्यात उत्तम लाभ झाला. पण १९२० साली वकिली सोडून स्वातंत्र्य चळवळीत उतरले. काँग्रेसचे दोन वेळा अध्यक्ष झाले.

अंतरिम मंत्रिमंडळात मंत्री होते. स्वातंत्र्यानंतरही मंत्री होते. घटना मंजूर झाल्यावर राजेंद्रबाबू पहिले राष्ट्रपती. दोन वेळा राष्ट्रपती पद एकूण १२ वर्षे भोगले.

दिनांक २८.०२.१९६३ रोजी न्यूमोनियाचे आजारात निधन घाले. चंद्राचे सप्तमात रवी सप्तमेश मंगळ व द्वितीयेश बुध, बुध-मंगळ दोघेही केतूच्या मूळ नक्षत्रात. केतू मीनेत केंद्रयोग रवी. केतू व रवी दोघेही बुधाचे (लग्नाचा सप्तमेश) नक्षत्रांत. केतू महादशा रवी अंतर मध्ये निधन.

**(३) मिथुनेचा शनी** : षष्ठमस्थानी जर तीन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


मकर लग्नामध्ये शनी लग्न व द्वितीया या दोन भावांचा अधिपती असून तो षष्ठस्थानात मिथुन राशीत येतो. मिथुनेतील शनी बहुऋण बंधन तप्त:'' असतो. लग्नेश

षष्ठात हीच स्थिती आरोग्याचे दृष्टीने चांगली नसते. दम्याचे विकार, फुप्फुसाचे विकार होतात. धनेश षष्ठात असणे संपत्ती लाभाच्या दृष्टीने चांगले ठरत नाही. पण शनी मिथुन या बौद्धिक राशीत असणे यामुळे बुद्धिमत्ता, लेखनकला, कायद्याचे ज्ञान, मर्मभेदक, निर्व्यसनी हे गुण असतात. शनी येथे शत्रू उत्पन्न करतो. मकर लग्नास शुक्र योगकारक असतो व तो दशमेश असतो. त्याच्याशी शुभ संबंध असल्यास व भाग्येश बुध-शनी यांचे योग आल्यास जातक प्रसिद्धीस येतो.

''षष्ठमस्थ शनेर्दाय शत्रूरोग ऋणवहं ।'' अशी एक उक्ती आहे. ती मकर लग्नास लागू पडते.

## कुंडली : श्री. विसाजी रघुनाथ लेले

जन्म शुक्रवार दिनांक १७ ऑगस्ट, १८२७ रोजी दुपारी ४ वा. ३९ मि. ग्वाल्हेर येथे. अक्षांश २६° १२′ उ. रेखांश ७८° ९′ पू. अयनांश २१° २७′. सां. स. १४ ता. १९ मि. १६ से. मंगळ महादशा भोग्य वर्षे ० महिने ११ दि. ०.




भारतीय ज्योतिषशास्त्राच्या इतिहासात पृष्ठ ३०३ यांत शंकर बाळकृष्ण दीक्षित या जातकाबद्दल असे गौरवोद्गार काढतात, ''हे एक विलक्षण बुद्धिमान आणि कल्पक असे पुरुष या देशात होऊन गेले. लहानपणीच नाशिक येथे मराठी शाळेत ११ वर्षांच्या वयापर्यंत यांचा पूर्णांक-अपूर्णांकाचा अभ्यास झाला व मातुलगृही थोडा संस्कृतचा अभ्यास झाला. यांचे गुरुमुख अध्ययनतेइतकेच. परंतु यांचा स्वत:चा प्रयत्न व बुद्धी यांनी ते इंग्रजीतील विश्व विद्यालयीन पदवीधरासही असाध्य असे गणित करीत.'' अशा या बुद्धिमान पुरुषाचे जीवन मात्र कष्टाचे व दु:खाचे गेले.

बांधा उंच पण शरीरयष्टी दुर्बल, दम्याची व थंडीची व्यथा होती. त्यांचे हस्ताक्षर अत्यंत सुबक असून ते छापील अक्षरासारखे दिसे.

इ. स. १८८० च्या सुमारस त्यांची पत्नी व प्रथम पुत्र थोड्या काळात एकाएकी वारले. त्यानंतर त्यांनी दुसरा विवाह केला नाही.

ते सायनवादी होते व पंचांगे सायनप्रमाणे असावीत असा त्यांचा आग्रह होता व त्या संबंधात त्यांचा बापूदेवशास्त्री व केरोपंत छत्रे यांच्याशी वर्तमानपत्रातून बराच काळ वाद झाला. सायन गणना सशास्त्र आहे असे तोंडाने म्हणणाऱ्या बापूदेवशास्त्री व सायन गणना ऋतूसंबंधाने खरी आहे असे म्हणणारे केरोपंत छत्र्यांनी निरयन पंचांग काढण्यास सुरुवात केली. त्यामुळे ते निराश झाले. सायन पंचांगाच्या प्रयत्नात त्यांना यश आले नाही. इवल्लीच्या शिलालेखाच्या आधारे गणित करून त्यांनी महाभारत युद्धाचा काळ निश्चित केला. पण लोकमान्य टिळक व अन्य विद्वानांना तो पसंत पडला नाही. शंभर वर्षे झाली तरी विद्वानांत एकमत होत नाही. अलीकडे डॉ. वर्तकांनी तो काल सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

उंच बांधा मकर रास लग्नी व तेथेच हर्षल यामुळे सडसडीत शरीरयष्टी. लग्नेश शनी षष्ठात व चंद्रही षष्ठात साडेसाती यामुळे दुर्बल शरीरयष्टी.

मिथुनेतील चंद्र शनी यामुळे थंडीचा व दम्याचा विकार होता.

तृतीय स्थानावर गुरुची दृष्टी यामुळे हस्ताक्षर सुबक. त्यांनी जे लेख लिहिले ते सर्व टोपण नावांनी. तृतीयेश नेपच्यूनही आहे. नेपच्यूनचा संबंध टोपणनावाशी येतो असा अनुभव आहे.

त्यांची बुद्धिमत्ता केंद्रातील शुक्र-मंगळ-बुध व मिथुनेतील चंद्र यामुळे दिसते. योगकारक शुक्र, भाग्येश बुध आणि चतुर्थेश लाभेश मंगळ यांची युती आहे व त्याचा गुरुशी लाभयोग आहे. हा मोठा योग आहे. बुध मंगळ युती गणित प्रज्ञा दर्शविते.

त्यांचे आयुष्य कष्टात गेले. यास कारण षष्ठातील शनीचा गुरुशी केंद्रयोग व नेपच्यूनशी प्रतियोग हे आहे. त्याचमुळे आयुष्यात यश लाभले नाही.

सप्तमेश षष्ठात मंगळामुळे शुक्र व बुध दोघेही बिघडले त्यामुळे पत्नीचा व मुलाचा अकाली मृत्यू झाला.

सप्तम हे वादाचे, वादविवादाचेही स्थान आहे आणि बुध-मंगळ पूर्णपणे मुद्देसूद वाद घालणारे व अचूक युक्तिवाद करणारे आहेत. त्यांचा स्पष्टवक्तेपणा व दुसऱ्याचे दोष चटकन लक्षात येऊन त्यावर टीका करणे हे सर्व बुध-मंगळाचेच काम आहे. बुध-मंगळ युतीत दोष दिग्दर्शन हा गुण (वा दुर्गुण) आहे.

वादात कार्यकारण भाव योग्य रीतीने मांडणे व युक्तिवाद हे काम बुध-मंगळ करतात व त्यांना उत्तर देण्यास प्रतिपक्षाला जड जाते.

शिकता आले असते तर ते उत्तम वकील झाले असते.

लेले यांना परिस्थिती अनुकूल मिळाली नाही. त्यामुळे त्यांची विद्वत्ता झळकली नाही.

गुरु व शनी यांचा केंद्रयोग आहे. हा योग फारसा चांगला नाही. केंद्रयोगावर पैसा मिळत नाही पण मान मिळतो. मनुष्य कष्टी होतो व त्यास आपले ध्येय गाठण्यासाठी फार श्रम पडतात.

येथे गुरुच्या दशमात शनी आहे. असा केंद्रयोग जास्त चांगला आहे. त्यामुळे हे अप्रसिद्ध कुलात जन्म घेऊन प्रसिद्धीस आले.

चंद्र षष्ठात तर रवी अष्टमात व शनीच्या दृष्टीत आहे. चंद्र व रवी हे दोन्ही ग्रह बिघडले आहेत. त्यामुळे आयुष्य कष्टी झाले. चंद्र, रवी हे जवळजवळ अस्तकेंद्री आहेत.

हर्षलचा लग्नाबरोबर उदय आहे. हा ग्रह सामान्य मनुष्यापेक्षा काही विशेष प्रकारच्या गुणांचा मनुष्य उत्पन्न करतो. सामान्यांचे जे मार्ग असतात त्याहून हर्षलचे मार्ग निराळेच असतात. बुद्धीची तीव्रता या ग्रहामुळे उत्पन्न होते.

साधारण शिकलेल्या मनुष्यात विश्वविद्यालयीन पदवीधरासही असाध्य. गणित करण्याची शक्ती असणे हा चमत्कार लोकविलक्षण समजला पाहिजे.

यांचा मृत्यू दिनांक ८ नोव्हेंबर, १८९५ रोजी दुपारी १ वाजता ग्वाल्हेर येथे झाला. मरणकाळाच्या थोडा वेळ पूर्वी हे गृहस्थ आपल्या चिरंजीवाकडून एका महामहोपाध्यायास उत्तर लिहवीत होते. त्या पत्राचा शेवट होत असताना देह विसर्जन झाला. बुध महादशेत शनी अंतर्दशा संपत आली असताना मृत्यू. (चलित दशम युती नेपच्यून व प्रतियोग शनी).

**(४) कर्केचा शनी :** षष्ठमस्थानी जर चार हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कर्केचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कुंभ या लग्नास शनी लग्नेश व व्ययेश असून तो षष्ठात कर्क या निर्बली राशीत येतो. लग्नेश षष्ठात असणे आरोग्याच्या दृष्टीने चांगले नसते. कर्केचा अंमल जठरावर असल्याने जठराग्नी प्रदीप्त नसतो. त्यामुळे अन्नपचन नीट होत नाही. अग्निमांद्य असते. कर्क राशी षष्ठावर असल्याने मातृसुख बिघडण्याची शक्यता असते. आजोळचे नातेवाईक यांच्याबरोबर संबंध चांगले नसतात. पण व्ययेश षष्ठात असणे यामुळे हर्ष योग होतो. जातकास शत्रू नसतात. तो बलिष्ठ शरीराचा असतो. श्रीमंत व प्रसिद्ध होतो.


### कुंडली : श्री. नारायण गणेश देवधर

जन्म रविवार, दिनांक ३१ डिसेंबर १९१६ रोजी सकाळी १० वा. ४० मि. पेण येथे. अक्षांश १८° उ. ४५′ रेखांश ७३° ८′ पूर्व. अयनांश २२° ४२′ ९″. सां. स. १६ ता. ३७ मि. ४२ से.

कलाकार, पेणचे प्रसिद्ध मूर्तिकार. कारखानदार.

लग्नेश षष्ठात आहे. त्याचा अधिपती चंद्र द्वितीयात मीन राशीत आहे. द्वितीयातील चंद्र षष्ठातील शनी-नेपच्यून व दशमातील शुक्र यांचा महात्रिकोण आहे.

चंद्र शुक्र कलाकार व भाग्येश शुक्र दशमात कलाच्या माध्यमातून अर्थप्राप्ती, षष्ठांश शनी-नेपच्यून शिल्पकला, मूर्तिकार व शनीमुळे कारखानदारी. त्या मार्गाने संपत्ती, प्रसिद्धी मिळाली आहे.





**(५) सिंहेचा शनी :** षष्ठमस्थानी जर पाच हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'सिंहेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मीन या लग्नास शनी लाभेश व व्ययेश येतो आणि तो षष्ठात सिंह राशीत शत्रू क्षेत्री येतो. शनीची दृष्टी तृतीय, अष्टम स्थानावर येते. तेथे मित्राच्या राशी आहेत आणि व्ययस्थानी कुंभ ही शनीचीच रास आहे. तेव्हा भावंडे असतात. त्यांच्याशी संबंधही ठीक राहतात. व्ययस्थानावरील दृष्टी परदेश प्रवास दर्शविल. धनेश व भाग्येश मंगळ असतो. त्यामुळे मंगळाशी शुभसंबंध असता लाभेश धनेश संबंध प्रस्थापित होऊन प्राप्तिमान चांगले राहील. दशम बिंदूशी व दशमस्थ ग्रहाशी त्रिकोणयोग असतो. नोकरी-व्यवसाय प्रगतीचा राहील.

## कुंडली : सौ. दांडेकर

जन्म रविवार दिनांक १४ मार्च, १९२० रोजी सकाळी ७ वा. पुणे येथे. अक्षांश १८° उ. ३०′ रेखांश ७३° ५८′ पूर्व. अयनांश २२° ४४′ ४७″. सां. स. १८ ता. ११ मि. १० से.



जातकी M.A. गणितज्ञ, संशोधन परदेशगमन. परिवार मोठा. तीन भाऊ, पाच बहिणी. दोन मुलगे आहेत. नोकरी प्राध्यापक.

लग्न बिंदूवर चतुर्थेश व सप्तमेश बुध असून त्यावर उच्चस्थ गुरुची पंचमातून दृष्टी आहे. लग्नेश पंचमात उच्च नेपच्यूनचे युतीत. नेपच्यून मीनेचा अधिपती मानला जातो. तेव्हा लग्नेश नेपच्यून पंचमात दशमेश गुरुच्या युतीत. हा मोठा योग आहे. बुध-गुरु, बुध-नेपच्यून या योगावर बुद्धिमत्ता, आकलनशक्ती आणि (Intuition) असते. बौद्धिक गोष्टीत, वाचनात मन रमते. बुध-नेपच्यून योग उत्कृष्ट कल्पनाशक्ती व अंतःस्फूर्ती देतो. विनोदप्रचुर भाषा. समोरच्या माणसाची पारख पटकन होते व त्याच्या विचारांची व कृतीची गति-चाल कशी आहे हे पटकन लक्षात येते. यशस्वी जीवनाला बुध-गुरु, बुध-नेपच्यून चांगले ठरतात. दशमेश आणि पंचमेश अन्योन्य क्षेत्र योग आहे. शिक्षणक्षेत्राशी संबंध. त्यात संशोधन होते. बुध गणित प्रज्ञेचा कारक आहे व गुरु नेपच्यून योगात ती प्रज्ञा प्रकट होते. जातकी आपल्या क्षेत्रात तज्ज्ञ आहेतच पण विद्यार्थिवर्ग त्यांच्या शिकविण्यावर खूश असतो.

षष्ठातील शनीचा दशमस्थ चंद्राशी त्रिकोण योग आहे. वरिष्ठांची मर्जी संपादली गेली आहे.

**(६) कन्येचा शनी :** षष्ठमस्थानी जर सहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


मेष या लग्नास शनी दशमेश व लाभेश असतो आणि षष्ठस्थानात कन्या राशीत मित्रगृही येतो. दशमाचे दृष्टीने हे स्थान चांगले ठरते. नोकरीची सुरुवात येथून होते. शिवाय षष्ठस्थान हे दशमाचे नवमस्थान असते व सप्तमस्थान हे दशमस्थान असते आणि षष्ठेश व सप्तमेश यांचे परस्परसंबंधामुळे कनिष्ठ दर्जाचा का होईना पण राजयोग होतो. दशमेश व लाभेश असल्याने व्यवसायनिश्चितीसाठी या स्थानाचा विचार करावा लागतो. बुधाशी शुभसंबंध बुद्धिमत्ता दर्शवितो. तृतीय स्थानावरील शनीची दृष्टी फलदायी ठरते.

## कुंडली क्र. १ : श्री. हरदेव जोशी

जन्म शनिवार दिनांक १७ डिसेंबर, १९२१ रोजी दुपारी २ वा. ४५ मि. खांडू, जि. बन्सवाडा येथे. अक्षांश २३° ३०′ उ. रेखांश ७३° पू. ३०′. अयनांश २२° ४६′ ७″. सां. स. १९ ता. ५० मि. ४८ से.

जन्मकाळी गुरु महादशा भोग्य ० महिने ८ दिवस १२.

सन १९४१ पासून राजकारणात. सन १९५२ आमदार, राजस्थानात. सन १९६५ मंत्री राजस्थानात. सन १९७३ मुख्यमंत्री राजस्थान. नवयुग दैनिकाचे संस्थापक व संपादक.




रवी भाग्यस्थानात मित्रक्षेत्री, चंद्र चतुर्थात स्वगृही, दशमेश शनी व भाग्येश गुरु दोघे राहूसह षष्ठात आहेत. त्यांचा बुध शुक्राशी लाभयोग.

चंद्र केंद्रात स्वगृही असल्याने स्वातंत्र्यलढ्यात भाग. राजकारणात प्रवेश. प्रत्यक्ष सरकारशी संबंध. १९५२ पासून म्हणजे आमदार झाले. त्या वेळी बुध महादशेत राहू भुक्ती चालू होती. बुध तृतीयेश षष्ठेश, राहू कन्येत असल्याने तो बुध व शनीचे फल देणारा आहे. १९६५ मध्ये शुक्राची महादशा सुरू झाली तेव्हा ते प्रथम मंत्री - शुक्र महादशा शुक्र भुक्ती (शुक्र धनेश व सप्तमेश आहे) नंतर मंगळ भुक्तीत ते राजस्थानचे मुख्यमंत्री झाले. दशमेश शनी भाग्येश गुरु व राहू तिथे हस्तनक्षत्रात चंद्राचे तृतीयात आहे. शनी-राहू एके ठिकाणी असता शत्रू नसतात. कारण शत्रूचे यांचेपुढे काही चालत नाही.


मेष लग्नास षष्ठातील शनी शत्रूवर विजय मिळवितो. स्पर्धेत व न्यायालयीन खटल्यात जातकास लाभच होतात. त्याच्या संपत्तीत वाढ होते. जातक निरोगी असून त्यास दीर्घायुष्य लाभते. पण शनीच्या दशेत मात्र काही त्रास संभवतात. या कुंडलीत शनी दशा २० वे वर्षी संपली. येथे शनी-बुध-गुरुचा संबंध येत असल्याने जातक बुद्धिमान आहे. त्यास उच्च शिखर गाठता आले.

चंद्राचे तृतीयात बुधाच्या राशीत शनी आणि गुरु यामुळे जातकाने वर्तमानपत्र सुरू केले.

### कुंडली क्र. २ : श्री. क्ष

जन्म सोमवार दिनांक ४ सप्टेंबर, १९२२ रोजी रात्री ९ वा. १५ मि. अयनांश २२° ४६′ ३८″. सां. स. २० ता. ० मि. २४ से.

जातक श्रीमंत आहे पण त्यास कुष्ठरोग झाला आहे. षष्ठस्थान हे रोगस्थान आहे. तेथे राहू व बुध यांची युती आहे. जवळच शनी आहे म्हणजे राहू, बुध व शनी एकत्र आहेत.



लग्नेश मंगळ भाग्यात मेष नवांशी आहे. त्याचा चंद्र, शुक्र या दोघांशी लाभयोग, रवीचे व्ययात नेपच्यून समोर हर्षल रवी प्रतियोग. श्रीमंत, पैसा आहे पण हर्षल आणि रवीचे द्वितीयात राहू, बुध, शनी आहेत. लग्नेश मंगळाचा राहूशी केंद्रयोग आहे.

षष्ठेश बुध, राहू व शनी या दोन खलग्रहांचे मध्ये आहे. म्हणून लेप्रसी कुष्ठरोग आहे. बुध त्वचा दर्शवितो. षष्ठस्थान हे व्याधी दर्शविते. षष्ठेश बुध षष्ठात त्यामुळे त्वचेशी संबंधित व्याधी. बुध हा राहूचे युतीत आहे व शीनचेही युतीत आहे. या दोन्ही पापग्रहांचे साहचर्याने त्वचा पूर्ण दूषित झाली. त्यातच ही त्रयी मंगळाशी केंद्रयोग करीत आहे. त्यामुळे रक्त दूषित झाले व घातक झाले व त्वचा निकृष्ट झाली.

(७) **तुळेचा शनी :** षष्ठमस्थानी जर सात हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'तुळेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –


वृषभ या लग्नास शनी नवमेश व दशमेश असतो आणि षष्ठात तूळ या राशीत येतो. ही रास शनीची उच्च रास आहे. शनी राजयोगकारक असल्याने जातकास भरपूर संपत्तीचा लाभ असतो. त्यास दीर्घायुष्य लाभते. त्याचे भाऊ-बहिणीसुद्धा श्रीमंत असतात. पिताही श्रीमंत व प्रसिद्ध असतो.

## कुंडली : श्री. व्यंकटेश गोविंद पडसलगीकर

जन्म बुधवार २० मार्च, १८९५ रोजी सकाळी १० वा. ३० मि. स्था. वेळ सांगली येथे. अक्षांश १६° ५२′ उ. रेखांश ७४° ३७′ पू. अयनांश २२° २३′ ३७″. सां. स. २२ ता. ३९ मि. १३ से.

पंचमेश व द्वितीयेश बुध दशम बिंदूवर असून त्याचा शनीशी त्रिकोण आहे. हा त्रिकोण योग बुद्धिबळाच्या खेळास उत्तम असतो.

जातक व्यवसायाने अध्यापक असून तो लेखकही होता.




बुद्धिबळाच्या खेळाबद्दल माहिती असलेले 'बुद्धिबळाचा खेळ' हे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले व महाराष्ट्रात बुद्धिबळाच्या खेळास चालना दिली. सांगली येथे सामने भरवले जात असत. तेथूनच भा. प. म्हैसकर, नारायणराव जोशी, रा. भा. सप्रे हे पुढे आले.

नंतर पुण्यातही कै. रानडे बुद्धिबळ स्पर्धा सुरू झाल्या. आता विश्वनाथ आनंद जगात चमकतो आहे. भावी जगज्जेता आहे.

**(८) वृश्चिकेचा शनी :** षष्ठमस्थानी जर आठ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृश्चिकेचा शनी' म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मिथुन या लग्नास शनी अष्टमेश व नवमेश असतो आणि तो षष्ठात वृश्चिक या शत्रुराशीत येतो. अष्टमेश षष्ठात असणे हा हर्ष योग होतो. या योगावर जातक नशीबवान, सुखी, बलिष्ठ, शरीर, श्रीमंत, प्रसिद्ध आणि अपराजित असतो पण जातकास अल्सरसारखे व्याधी व्रण होतात.

## कुंडली : मरहूम झाकीर हुसेन


जन्म सोमवार दिनांक ८ फेब्रुवारी, १८९७ रोजी दुपारी ३ वा. १५ मि. हैदराबाद येथे. अक्षांश १७° २०′ उ. रेखांश ७८° ३०′ पूर्व. अयनांश २२° २५′ ११″. सां. स. ० ता. ३० मि. ३७ से.

केतू महादशा भोग्य वर्षे ० म. ५ दि. २३.

थोर शिक्षणतज्ज्ञ, प्रशासक, तत्त्वचिंतक, अलिगढ विद्यापीठाचे उपकुलगुरु, बिहारचे मंत्री, उपराष्ट्रपती, राष्ट्रपती असताना मृत्यू मे १९६९. १९६७ ते १९६९ दोन वर्षे राष्ट्रपती.

लग्न मिथुन, चंद्र मेष व रवी मकर अशी तीन केंद्रे आहेत.

लग्न विचार - पंचमेश शुक्र दशमात उच्च राशीत, दशमेश गुरु असून तो सिंह राशीत भाग्येश शनी षष्ठात. शनी-शुक्र त्रिकोण योग आहे.




चंद्र लग्न-चंद्र त्रिकोण गुरु. चंद्राचा पंचमेश रवी हा राजभुवनदर्शक मकर राशीत. भाग्येश गुरु पंचमात आहे.

चंद्राच्या दशमात रवीबरोबर राहूही आहे आणि रवीचा मंगळ - नेपच्यून या युतीशी त्रिकोण योग आहे.

रवी लग्न-पंचमेश व दशमेश शुक्र असून तो तृतीय स्थानी उच्च आहे. रवी लग्नेश लाभस्थानी आहे.

यावरून असे लक्षात येते की, पंचमस्थान व दशमस्थान एकमेकांशी निगडित आहेत. शिक्षणक्षेत्राशी संबंध येतो व त्यामध्ये उच्च पदही गाठले जाते.

झाकीर हुसेन शिक्षणतज्ज्ञ होते आणि अलिगढ विद्यापीठाचे उप कुलगुरूपद त्यांनी समर्थपणे सांभाळले होते. त्याचा कारभार, प्रशासन व्यवस्थित केले.

त्यांनी राजकारणातही भाग घेतला. बिहारचे राजकारणात सक्रिय होते. आमदार म्हणून निवडून येऊन बिहारचे मंत्रीपदही समर्थपणे भूषवले.

लोकसभेवरही निवडून आले आणि नंतर राज्यसभेवरही होते. राज्यसभेचे अध्यक्ष पद-उपराष्ट्रपती म्हणून त्यांनी काम केले. १९६७ साली त्या वेळचे राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांची मुदत संपली आणि त्यांची राष्ट्रपती म्हणून निवड झाली दिनांक १३.०५.१९६७.

लग्नाच्या दशमात पंचमेश उच्च शुक्र - शिक्षण क्षेत्र.

चंद्राच्या दशमात त्रिकोणाधिपती रवी हा राहूसह मकर राशीत शनीचे दृष्टीत - आमदार, खासदार, मंत्री.

रवीचा दशमेश शुक्र तो लग्नाचे दशमात उच्च. त्याने उपराष्ट्रपती व नंतर राष्ट्रपती पद देवविले.

गुरुच्या महादशेत राजकारण व त्यात उच्च पदे भूषविली. गुरु हा लग्नाचा दशमेश. चंद्राच्या पंचमात यामुळे ही दशा उत्तम सुरू झाली पण गुरु सप्तमेश असल्याने बाधक व मारकही आहे आणि या गुरुवर मंगळाची (षष्ठेश) दृष्टी, तसेच अष्टमेश शनीची दृष्टी यामुळे राष्ट्रपती पद पाच वर्षांपर्यंत भोगता आले नाही. शुक्र जसा पंचमेश आहे तसा तो लग्नाच्या व्ययेश, चंद्राचा द्वितीयेश वृश्चिक नवांशात यामुळे गुरुच्या महादशेतील रवीच्या अंतर्दशेत खुद्द. रवी अष्टमात. अष्टमेश शनीची गुरु व रवीवर पूर्ण दृष्टी आहे. गोचरीत शुक्र मीनेत, दशमातून शनी मेषेत आणि मंगळ वृश्चिकेत. षष्ठातून चालू होते.

दिनांक ०२.०५.१९६९ ची पौर्णिमा रवी मेषेत १८ अंश व चंद्र तुलेत १८ अंश या दोघांचा रवी लग्नातील राहूशी पूर्ण केंद्रयोग आणि दिनांक ३ मे, १९६९ रोजी चंद्र अष्टमस्थ रवीशी केंद्रयोग करीत होता. मृत्यू ३ मे, १९६९ रोजी झाला. त्या वेळी सप्तमेश गुरुच्या महादशेत शुक्राची अंतर्दशा संपून रवीची अंतर्दशा चालू झाली होती. रवी अष्टमात आहे. त्याच्या अंतर्दशेत मृत्यू.


**(९) धनुचा शनी :** षष्ठमस्थानी जर नऊ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'धनुचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कर्क या लग्नास शनी सप्तमेश व अष्टमेश असून तो षष्ठस्थानी धनु राशीत येतो. गुरुच्या राशीत शनी असता जातक विद्वान असतो. उत्तम वक्ता म्हणून तो प्रसिद्ध होतो. जातक महाबुद्धिमान असून त्यास जनतेकडून मान मिळतो. जनतेच्या आदरास पात्र होतो. लोकप्रिय असून सरकारदरबारी वजन असते. कर्क लग्नास सप्तमेश षष्ठात येतो व विवाहसुख लाभत नाही. अष्टमेशही असून षष्ठात असल्याने व्याधीने जर्जर होतो. त्याची दृष्टी तृतीय स्थान, व्ययस्थान व अष्टमस्थान यावर पडते. अष्टमेश षष्ठात हा एक हर्ष योग होतो. या योगावर जातक बलवान असतो. तो पापाचरण करीत नाही व प्रसिद्ध होतो.

### कुंडली : श्री. जयप्रकाश नारायण

जन्म शनिवार दिनांक ११ ऑक्टोबर, १९०२ रोजी मध्यरात्री १२ वा. ४२ मि. स्था. वेळ बिहारमधील सिताद्वियारा येथे. अक्षांश २५° उ. ११′ रेखांश ८५° पूर्व ३२′. अयनांश २२° ३०′ ५″. सां. स. १ ता. ५५ मि. ४६ से.

सुप्रसिद्ध समाजवादी व सर्वोदयी नेते, गुजरात व बिहारमध्ये आंदोलने केली. जनजागृती केली. त्यामुळे १९७५ मध्ये आणीबाणी जाहीर झाली व जयप्रकाश नारायण यांना तुरुंगात ठेवले गेले. आणीबाणीविरुद्धचा लढा चालूच राहिला आणि आणीबाणी उठवणे भाग पाडून निवडणुका घ्याव्या लागल्या. जनता पक्ष स्थापन करून लोकसभेच्या निवडणुका घेतल्या गेल्या व विजय मिळविला. १९७७ मध्ये सरकार स्थापन होऊन मुरारजी देसाई पंतप्रधान झाले. इकडे खुद्द जयप्रकाशांची प्रकृती बिघडली. त्यांना किडनीचा त्रास होत होता. डायलिसिसवर ठेवले होते. पण शेवटी दिनांक ०६.१०.१९७९ रोजी मृत्यू आला. लोकप्रिय, क्रांतिकारी नेता. अपूर्व स्वार्थत्याग, जनतेसाठी जीवन खर्च झाले. प्रभावती देवीशी विवाह झाला. पण म. गांधींनी शपथ दिल्यामुळे ब्रह्मचारी राहिले.




सप्तमेश शनी षष्ठात मंगळाशी षडाष्टकात प्लूटोशीही षडाष्टकात व कुटुंबेश रवीशी केंद्रयोग यामुळे कौटुंबिक जीवन नाही. आयुष्य सर्वोदयास वाहिले. शुक्र नीच राशीत नेपच्यूनच्या केंद्रयोगात यामुळे विवाहसुख नाही. षष्ठातील शनीची तृतीयातील शुक्र व रवीवर पूर्ण दृष्टी आहे.

कर्क लग्नाचा योगकारक मंगळ लग्नभावात आहे व लग्न, दशमेश मंगळ आणि रवी-शुक्र यांच्यावर गुरुची दृष्टी आहे.

पण सप्तमेश व अष्टमेश शनी षष्ठात असून त्याचा मंगळाशी षडाष्टक योग आहे. हा योग देहकष्ट व अपयश दर्शविणारा आहे.

लग्नेश चंद्र मकरेत असून त्याचा राहू-केतू यांच्याशी केंद्रयोग आहे. लग्नेश केंद्रात (सप्तम केंद्री) व लग्नेशाचे व्ययात आहे पण अंतराचे दृष्टिकोनातून दोघांमध्ये ७° अंतर आहे. म्हणजे त्यांची युतीच आहे.

व्ययस्थानात नेपच्यून आहे. व्ययेश केंद्रात आहे. लग्नेश केंद्रात (सप्तम केंद्री) व षष्ठेश गुरुही केंद्रात आहे. यामुळे बंधन योग आहे. हा बंधन योग आणीबाणीच्या काळात म्हणजे १९७५-७६ मध्ये झाला. जयप्रकाश पंजाबमध्ये तुरुंगात होते. त्यांच्या पत्रात ते लिहितात की त्यांना बर्फाचे लादीवर ठेवले होते व त्यांची किडनी काढून टाकली असावी.

कैदेतून सुटल्यावर जनता पक्ष स्थापन झाला व निवडणुका होऊन मुरारजी देसाईंना पंतप्रधान पद देवविण्यात त्यांचा पुढाकार होता.


**(१०) मकरेचा शनी :** षष्ठमस्थानी जर दहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सिंह या लग्नास शनी षष्ठेश व सप्तमेश असतो आणि षष्ठस्थानात मकरेत स्वगृही येतो. निसर्ग कुंडलीची दशम रास या ठिकाणी षष्ठस्थानात नोकरीच्या स्थानात येते. दशमावर शनीचा मित्र शुक्र याची वृषभ रास येते व दशमाचे दृष्टिकोनातून शनी दशमाचा

भाग्येश व दशमेश होतो. त्यामुळे येथे शनी उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने शुभ फले देतो. जातकास दीर्घायुष्य लाभते व त्याच्या व्यवसायात त्यास यश लाभते. मान मिळतो व संपत्तीचा लाभ होतो. संपत्तीचा लाभ शत्रूकडून वा न्यायालयीन खटल्यातून होतो. जातक वकिलीच्या व्यवसायात प्रवेश करतो व तेथेच यशस्वी होईल वा न्यायखात्यातही जाईल. जातकास आजार, व्याधी नसतात.

## कुंडली : श्री. वसंत एस. देसाई

जन्म मंगळवार दिनांक २७ डिसेंबर १९०४ रोजी रात्री १० वा. ३० मि. इंदूर येथे. अक्षांश २२° उ. ४४′ रेखांश ७५° ५३′ पूर्व. अयनांश २२° ३१′ ४५″. सां. स. ४ ता. २३ मि.




धनेश बुध पंचमात त्यावर भाग्येश व चतुर्थेश मंगळाची दृष्टी. मंगळ, शनी त्रिकोण योग आहे. शिक्षण B.A.L.L.B.

दशमेश शुक्र शनीसह षष्ठस्थानी व त्रिकोण योग मंगळ. सुरुवात वकिली आणि नंतर न्यायखात्यात नोकरी झाली. कनिष्ठ श्रेणीचे न्यायाधीश म्हणून सुरुवात व जिल्हा न्यायाधीश होऊन निवृत्त झाले.

शुक्र तृतीयेशही असल्याने कलात्मक लेखन आणि पंचमात बुध यामुळे लेखनात यश. यांनी नाटके लिहिली. नाटककार म्हणूनही प्रसिद्ध झाले.


**(११) कुंभेचा शनी :** षष्ठमस्थानी जर अकरा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कन्या या लग्नास शनी पंचमेश व षष्ठेश असतो व षष्ठात तो कुंभ या मूल त्रिकोण राशीत येतो. दशमेश बुध तर धनेश शुक्र असतो. या दोघांशी तो शुभसंबंधित असला तर उत्तम राजयोग होतो. जातकास दीर्घायुष्य लाभते. संततीसंबंधी चिंता दिसते. सप्तमाचे व्ययात येत असल्याने विवाहसुद्धा बिघडण्याची शक्यता दिसते.

## कुंडली : श्री. जयवर्धने

जन्म सोमवार दिनांक १७ सप्टेंबर १९०६ रोजी सकाळी ७ वा. २३ मि. कोलंबो येथे. अक्षांश ६° ५५′ उत्तर रेखांश ७९° ५०′ पूर्व. अयनांश २२° ३३′ ३″. सां. स. ६ ता. ५३ मि. २३ से.

केतू महादशा भोग्य वर्षे ० म. ५ दि. २४.





श्रीलंकेतील प्रसिद्ध राजकारणी. १९३२ पासून राजकीय जीवन चालू झाले आणि १९४७ पासून मंत्रिपदे. १९७७ साली पंतप्रधान व इंटरनॅशनल मोनेटरी फंडाचे गव्हर्नर होते. १९७८ पासून राष्ट्राध्यक्ष, पंचमेश शनी व भाग्येश शुक्र यांचा दशमबिंदूशी त्रिकोण योग व गुरुशीही त्रिकोण योग आहे. शुक्र धनेशही असून त्यावर गुरुची पूर्ण दृष्टी यामुळे जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्याशी संबंध आले. हे सर्व मानसन्मान व राजकीय कारकीर्द गुरुच्या महादशेत झाली. पंचमेश शनीची लग्नेश-दशमेश बुधावर व लाभेश चंद्रावर दृष्टी. चंद्र-मंगळ युती त्रिकोण हर्षल हा मोठा लक्षीदायक योग आहे. शनीची तृतीयावर, अष्टमावर आणि या दोघांचा अधिपती मंगळ यांच्यावर दृष्टी आहे. मंगळ दोन अशुभ स्थानांचा अधिपती असून त्याची षष्ठस्थ शनीवर दृष्टी आणि शनीच्या व्ययात केतू व षष्ठात राहू यामुळे कर्करोग झाला. सिंह व कुंभ या राशीतून शनी मंगळाचा योग यामुळे हृदयाचा कर्करोग, अष्टमेश मंगळामुळे शस्त्रक्रिया. पण दिनांक ०१.११.१९९६ रोजी ९१ वर्षांचे असताना जातकास मृत्यू आला. दीर्घ आयुष्य, प्रदीर्घ व उत्तम राजकीय जीवन व राष्ट्राध्यक्ष पद लाभले. शनीची महादशा व मंगळाची अंतर्दशा व गुरुची विदशा; मृत्युकाळी गुरु, शुक्र, शनी त्रिकोण मिथुन, तूळ, कुंभ या बौद्धिक राशीतून झाला आहे.

**(१२) मीनेचा शनी :** षष्ठमस्थानी जर बारा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मीनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तूळ या लग्नाचा शनी योगकारक असतो व तो चतुर्थ आणि पंचम या स्थानाचा अधिपती असून षष्ठस्थानात मीन राशीत मित्रक्षेत्री येतो. जातकास दीर्घायुष्य लाभते. परंतु संततीसंबंधात चिंता, कटकटी असतात. भावंडांशी संबंध चांगले राहत नाहीत. दशमाच्या नवमात येतो त्यामुळे व्यवसायाला योगकारक शनीचा भरपूर पाठिंबा लाभतो.

**कुंडली : श्री. स**

जन्म शुक्रवार १ ऑगस्ट, १८७९ रोजी मध्यान्ही दुपारी १२ वा. स्था. वेळ रत्नागिरी येथे. अक्षांश १७०° उ. रेखांश ७३° १८′ पू. अयनांश २२° १०′ ३१″. सां. स. ८ ता. ३८ मि. ६ से.




शनी मीनेत व गुरु कुंभेत असा परिवर्तन योग आहे. गुरु तृतीयेश आहे व तो बौद्धिक राशीत आहे. त्याची नवमावर व नवमेश बुधावर दृष्टी आहे. शनीची तृतीयस्थानावर दृष्टी आहे. गुरु तृतीयेश. साहित्यिक होते. त्यांनी वर्तमानपत्र काढले व त्यामध्ये अस्पृश्यता निवारणावर जोर दिला. झुणका-भाकर सहभोजनाचे ते सक्रिय प्रवर्तक होते. त्यामुळे त्यांनी ब्रह्मवृदांचा रोष ओढवून घेतला होता.

बुध-हर्षल युती यामुळे जातक नवमतवादी होते व त्यांनी सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केला. बुध-नेपच्यून त्रिकोण योग हा मोठा योग आहे. तसाच बुध-मंगळ त्रिकोण योग.

योगकारक शनीचा दशमाशी व दशमस्थ रवीशी त्रिकोण योग आहे.


त्यांच्या चळवळीमुळे शत्रू उत्पन्न झाले पण त्यांनी शत्रूला दाद दिली नाही.

बुध-हर्षलमुळे स्वतंत्र विचार, बुध-गुरुमुळे लेखन, वृत्तपत्र व्यवसाय. शनीमुळे तळागाळातील लोकांकरिता काम केले. मृत्यू १५ जून, १९३१.

७

# सप्तम भाव

**(विवाह-व्यापार-स्पर्धक स्थान)**




सोबतच्या कुंडलीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी सात हा अंक लिहिलेला आहे, त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीतील सप्तम स्थान किंवा सातवे स्थान म्हणतात.

कुंडलीतील सप्तम स्थान हे महत्त्वाचे स्थान आहे. निसर्ग कुंडलीतील सप्तमावर तूळ रास असते. त्याचे प्रतीक म्हणजे तराजू आहे. या प्रतीकाचे अनेक अर्थ आहेत.

तराजूला दोन तागड्या असतात. त्या दोन्ही समान वा समपातळीवर असणे उत्तम असते. प्रत्येक गोष्टीला नेहमी दोन बाजू असतात. प्रत्येक घटना घडण्यासाठी किमान दोघांची तरी आवश्यकता असते.

विवाहसौख्यात आयुष्याचे जोडीदार पती व पत्नी आहेत. व्यापारधंद्यात भागीदार असतात. व्यापार म्हणजे माल खरेदी-विक्री मालाचे माप व त्याची किंमत यांची सांगड असते.

उद्योगामध्ये प्रतिस्पर्धी असतो त्याशिवाय मजा नसते. खेळामध्ये प्रतिस्पर्धी वा स्पर्धक असले तरच चुरस असते व त्यातूनच पहिला दुसरा क्रमांक ठरतो.

न्यायालयीन खटल्यातही दोन बाजू वादी व प्रतिवादी, फिर्यादी व आरोपी असतात. त्यामध्ये बरोबर कोण ठरविणे, न्यायाचा समतोल राखणे हे न्यायाधीशाचे काम आहे. म्हणून न्यायदेवतेच्या हातात तराजू असतो व डोळ्यांवर पट्टी असते. शनी हा कायदा व त्यानुसार न्याय दर्शवितो व हा न्याय तराजूमधील दोन तागड्यांत तोलून-मापून द्यावा लागतो.

लग्न हे जातक तर सप्तम हे आयुष्याचे जोडीदार पती/पत्नीदर्शक आहे. व्यापारधंद्यात भागीदार असतात वा प्रतिस्पर्धी असतात.

सप्तमात शनी दिग्बली असतो. निसर्ग कुंडलीतील सप्तम स्थानदर्शक तूळ राशीत शनी उच्च असतो. म्हणून तो सप्तमात दिग्बली असतो. त्याची दृष्टी लग्न, चतुर्थ व नवम या तीन स्थानांवर आहे.

पण तो मंद म्हणजे विलंबाने, धीमेपणाने पण दीर्घकाळ काम करणारा असतो. त्यामुळे तो पापग्रह मानला आहे. तो सतावणारा व दु:ख देणारा आहे. म्हणून विवाह होण्यास विलंब, विवाहसुखात अडथळे, दु:खे उत्पन्न करतो. सप्तमातील शनी पति-पत्नीच्या वयात बरेच अंतर दर्शवितो. स्त्री कुंडलीत तो बीजवर पती दर्शवितो वा वयाने फार मोठा असलेला पती दर्शवितो.

वराहमिहीरांनी सप्तमस्थ शनीची फले सप्तमस्थ रवीप्रमाणे घ्यावी असे सुचविले आहे आणि सप्तमस्थ रवी विवाहसुख नीट देत नाही. सर्वच आचार्यांच्या मते सप्तमातील रवी विवाहसुख विघातक असतो. त्यास वासना खूप असते पण त्याचे समाधान होत नाही. सतत शयनसुखाचे विचार त्याच्या मनात असतात. जातक नेहमी असा गांजलेला असतो.

सारावलीमध्ये सप्तमस्थ शनीची फले खालीलप्रमाणे दिली आहेत.

**सततमनारोग्यंतनु मृतदारं धनवर्जितं जनयेत् ।**
**धूनेऽर्कजः कुवेषं पापं बहुनीच कर्मापाम् ।।**

**अर्थ :** जातकास नेहमी काहीना काही आजार होत असतात. त्याची पत्नी लवकर मरते. त्यास संपत्ती नसते. तो कपडेही चांगले व नीट घालत नाही. गबाळा असतो व नीच कृत्ये मात्र फार करतो.

सप्तमस्थ शनी असलेला जातक अशक्त व दुर्बल असतो. छाती व पोट दोन्ही आत असते. पण मांड्या मोठ्या असतात. तो किडकिडीत शरीराचा व त्रासिक असतो. त्यास मातृसुख व स्त्रीसौख्य फारसे लाभत नाही. शिक्षणात अडथळे येतात, नापास होतो. जातक कमनशिबी असतो. त्याच्या पत्नीसही बऱ्याच व्याधी असतात. तो नेहमी दुसऱ्याचे हाताखाली काम करतो. तो मोठा (मानाने) होत नाही. त्यास अनैतिक सहवासाची चटक असते. त्यास शत्रू बरेच असतात व वारंवार उद्‌भवणाऱ्या खटल्याने त्रस्त होतो.

जिच्या सप्तमात शनी आहे अशी स्त्री जातक आजारी, रोगट असते व त्यामुळे पती तिचा त्याग करतो. तिला मैत्रिणी चांगल्या करता येत नाहीत. (चांगल्या स्त्रियांशी मैत्री नसते) व ती पापी असते.

पण हे वर्णन सप्तमस्थ शनीच्या प्रत्येक कुंडलीस लागू पडत नाही. मकर, कुंभ, वृषभ, तूळ, धनु व मीन या राशीतल्या व्यक्तींचे बाबतीत अनुभव निराळा येतो तसेच सप्तमेशाचा व शुक्राचा विचार करूनच निर्णय घ्यावा लागेल. शनी पापयुक्त, पापदृष्ट वा पापमध्यस्थ असा सप्तमात असता वरील फले मिळतील. अन्यथा चांगली फले.

सप्तमस्थ शनीची लग्नावर दृष्टी असल्याने जातकास कष्टाचा, श्रमाचा बोजा उचलावा लागतो. आजारपण व नित्य हिंडणे, प्रवास यामुळे तो त्रासलेला असतो.

शुभसंबंधित असता अगर उच्च असता शुभ फले देतो. धर्मानुसार वागतो, कायदे जाणतो. मान मिळवितो. पण अशा जातकात मागे राहण्याची वृत्ती असते पण जबाबदारी जेव्हा घेतो तेव्हा मात्र निष्ठापूर्वक कार्य करतो. विरक्त होण्याकडे कल असतो.

सप्तमस्थ शनीबरोबर निरनिराळे ग्रह असतात.

**(१) रवी-शनी :** जातक आळशी, कमनशिबी, उदासीन असतो. विषयपूर्ती न झाल्याने त्याची पत्नी सदैव संत्रस्त असते. रवी पापराशीत असता द्विभार्या योग संभवतो. तो तुलेत असता त्यास अनेक दुःखे प्राप्त होतात.

सप्तमस्थ रवी असलेल्या स्त्रीचे बाबतीत तिचा नवऱ्याशी आदर केव्हाच कमी झालेला असतो. तीस कोणतेही सुख लाभत नाही. सदा त्रासिक, वातविकारी असते.

स्त्री जातकाच्या बाबतीत रवी-शनी सप्तमात असता तिचा विवाह झालाच तर बीजवराशी होतो व ती सुखी नसते. पहिल्या नवऱ्याचा त्याग करूनही दुसऱ्याशी संबंध ठेवते.

**(२) चंद्र-शनी :** जातकास पत्नी नसते. पण तो आपले गाव, नगर यामध्ये लौकिक मिळवितो, मोठा होतो व राजाकडून सन्मानित होतो.

पुरुष जातकाच्या बाबतीत चंद्र-शनी यांची युती कुंडलीतील पंचम, सप्तम, नवम वा अन्य भावांत असता अशा जातकास विवाह सुखाची आसक्ती नसते. अन्य ग्रह विवाहदर्शक असता त्याचा विवाह फार उशिरा होतो.

अध्यात्माकडे ओढ असलेले व त्याकडे वळलेल्या साधू-संतांचे कुंडलीत चंद्र-शनी युती आढळते. ते विरक्त असतात.

**(३) बुध-शनी :** श्रीमंतांचा चाकर, मूर्ख, दुसऱ्यास त्रास देणारा, दुर्गुणी व असत्य भाषी व मलीन वेषी असतो. असे ग्रंथोक्त फल आहे. पण बुध-शनी युती बुद्धिमत्तादर्शक, विद्वत्तादर्शक असते.

तसेच सप्तमस्थ बुध विद्वान व संपत्तिमान असतो. त्यास संततीही असते. त्याची पत्नी विद्वान, सुशिक्षित व देखणी असते. जातक स्वतः मोठा असतो. तो तेजस्वी असतो पण आपल्या पत्नीचे समाधान करू शकत नाही. तथापि तो श्रीमंत असतो. त्याची पत्नी हरिणाक्षी असते.

**(४) शुक्र-शनी :** दोघेही मित्र आहेत. त्यामुळे जातकास स्त्री, संपत्ती, रत्ने, कीर्ती व विवाहसुख लाभते. त्यास पत्नी सुंदर, पतिव्रता पत्नी मिळते. जातक विद्वान, अनेक विद्या जाणणारा, संपत्तिमान, मुत्सद्दी असतो. संततीदृष्ट्या सुखी होतो. व्यापार-उद्योगात उत्तम धनप्राप्ती होते.

स्त्री जातकी पतीची फार आवडती व श्रीमंत असते.

**(५) मंगळ-शनी :** विवाहसुख मिळत नाही. संततीही होत नाही. संपत्ती नसते. आजारी व व्यसनाधीन लोकांकडून अपमानित होतो.

**(६) गुरु-शनी :** स्त्रियांशी शत्रुत्वामुळे धननाश, जातक धाडसी असतो. षंढ, दुर्गुणी, कारस्थानी, वडिलांच्या संपत्तीचा अभिलाषी.

याचा अनुभव आला नाही तर संततीस प्रतिबंधक मात्र होऊ शकतो. पण जातकाचा ओढा विरक्तीकडे असतो व तो दुर्गुणी नसतो.

**(७) राहू-शनी :** दोघेही ग्रह विवाहसुखास प्रतिबंधक असतात व त्यांची युती विवाह होऊ देत नाही व झालाच तर तो सुखावह नसतो व लवकरच विभक्त होतात.

**(८) हर्षल-शनी :** विवाहास अडथळे, विवाह ठरून मोडणे, पती-पत्नीपैकी एकाचा स्वभाव लहरी, चमत्कारिक, भरपूर मतभिन्नता.

**(९) नेपच्यून-शनी :** कारस्थानीपणा, विवाहास अतिविलंब, विवाहात फसवणूक.


## सप्तमस्थ शनीची राशिनिहाय भावफले

**(१) मेषेचा शनी :** सप्तमस्थानी जर एक हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मेषेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सप्तमावर मेष रास, शनी चतुर्थेश व पंचमेश सप्तमात नीचक्षेत्री येतो पण त्याचा डिसपोझिटर मंगळ शुभ असता व शनीच्या नीचत्वाचा भंग अन्य तऱ्हेने झाला असता शनी अशुभ नसतो.

### कुंडली : पुरुष जातक

जन्म दिनांक १६ ऑगस्ट, १९११ रोजी दुपारी ११ वा. ३० मि. सां. स. ८ ता. ३४ मि. ८ से. अयनांश २२° ३७′ १३″.



त्रिकोण योग. दशमात रवी व लग्नी गुरु यशस्वी लष्करी कारकीर्द. निवृत्त लष्करी अधिकारी. सप्तमात शनी नीच पण तेथेच मंगळ व रवी दशम केंद्रात यामुळे नीचभंग झाला आहे. शनी-मंगळ युती पराक्रम, धाडस व जिद्द यांचा भाग्येश बुधाशी अंशसाम्याने त्रिकोण योग. दशमात रवी व लग्नी गुरु यशस्वी लष्करी कारकीर्द. चंद्र १३° ३१′ मेष व गुरु १४° ४९′ तूळ - प्रतियोग - गजकेसरी योग यामुळे व दशमस्थ रवीमुळे अधिकार योग.


**(२) वृषभेचा शनी :** सप्तमस्थानी जर दोन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सप्तमावर वृषभ रास येते आणि शनी तृतीयेश व चतुर्थेश असून सप्तमात वृषभेत येतो.

ही स्थिती शनीस चांगली नाही. जातकास वैवाहिक सुख मिळत नाही. संतती नसते. शनी एकटा सप्तमात असून पंचमात शुभ ग्रह वा शुभ ग्रहाची दृष्टी नसता जातकास वैवाहिक जोडीदार व संतती नसते असे अध्याय २३ श्लोक १ (बृहज्जातक) चा विचार करता वाटते.

## कुंडली : श्रीमती आशा पारेख

जन्म शुक्रवार २ ऑक्टोबर, १९४२ रोजी दुपारी १२ वाजता युद्ध वेळ मुंबई येथे. अक्षांश १८° ५४′ उ. रेखांश ७२° ५०′ पूर्व. अयनांश २३° ३′ १५″. सां. समय ११ ता. २ मि. १७ से.




सप्तम भाव मध्यावर शनी व थोडा मागे हर्षल. सप्तमेश शुक्र कन्येत नीच राशीत व नेपच्यूनचे युतीत. सप्तमात शुभ ग्रह नाहीत अगर सप्तमावर शुभ ग्रहांची दृष्टी नाही. तसेच पंचमात शुभ ग्रह नाहीत अगर पंचमावर शुभ ग्रहांची दृष्टी नाही. शनी-हर्षल यांच्यामध्ये सप्तमबिंदू आहे. पंचमेश अष्टमात आहे. आशा पारेख अविवाहित राहिली. विवाह नाही. संतती नाही.


आशा पारेख देखणी आहे. अभिनेत्री आहे. यशस्वी चित्रपटांची नायिकाही होती. शुक्र-नेपच्यून युतीने सिनेमा व्यवसायात पुढे आणले. रवी-मंगळ दशमेश लग्न यांची युती कन्येत आहे. त्यामुळे करीअर उत्तम झाले.

**(३) मिथुनेचा शनी :** सप्तमस्थानी जर तीन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सप्तमावर मिथुन रास येते आणि शनी द्वितीय व तृतीय स्थानांचा अधिपती होऊन सप्तमात मित्रक्षेत्री येतो. सप्तमाचा अष्टमेश शनी होतो आणि त्याची सप्तमातील उपस्थिती विवाहसुख बिघडविणारी ठरते. पत्नी लवकर मरते अगर ती जातकापासून विभक्त राहते. पण ही स्थिती शनीच्या इतर ग्रहांशी असलेल्या संबंधावर अवलंबून राहते. सर्व ग्रहयोगांचा अभ्यास करून निर्णय घ्यावा लागतो.

## कुंडली : श्रीमती मीरा मुकुंद

जन्म गुरुवार १२ जुलै, १९४५ रोजी सायं. ७ वा. ४५ मि. युद्धवेळ बडोदा येथे. अक्षांश २२° उ. १९′ रेखांश ७३° १४′ पूर्व. अयनांश २३° ५′ ३४″. सां. स. १३ ता. २९ मि. १५ से.




द्विपदवीधर, उच्चशिक्षित, उत्तम नोकरी पण विवाह झाला नाही. बहिणीचा विवाह होईपावेतो लग्न करणे नाही हा हट्ट आणि मग वयही वाढले.

पतिकारक रवी शनीच्या युतीत शुक्र-हर्षल युती यामुळे विवाह होऊ शकला नाही.


**(४) कर्केचा शनी :** सप्तमस्थानी जर चार हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कर्केचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सप्तमावर कर्क रास असते. शनी लग्नेश तसा द्वितीयेश असतो व सप्तमात तो निर्बली राशीत येतो. तेथे एकटा शनी वैवाहिक सुख साधारण दाखवितो.

येथे शनीबरोबर मंगळ असता चांगला धनवान असतो. पत्नी सुंदर व पतिव्रता असते. शनीबरोबर चंद्र असता मातेला अनिष्ट असते. भावंडांपासून त्रास होतो पण संपत्ती असते. शनीबरोबर रवी असता विवाहास विलंब लागतो. पिता लहानपणीच मरतो. स्त्री जातकाच्या बाबतीत विवाह होत नाही. अगर बीजवर मिळतो. बाकीचे ग्रह बरोबर असता ठीक असते.

### कुंडली : सौ. मीना

जन्म मंगळवार दिनांक ५ ऑगस्ट, १९४७ रोजी रात्रौ ७ वा. १५ मि. पुणे येथे. सां. स. १५ ता. ३३ मि. ५५ से. अयनांश २३° ७′ १६″.




कर्केमध्ये ५ ग्रह आहेत. त्यापैकी प्लूटो, शनी व रवी या तिघांची २० व्या अंशात युती असून ती सप्तमभाव मध्यावरच आहे. शनी-रवी युती स्त्रीचे बाबतीत विवाहास अनिष्ट असते किंवा विवाह झाला तर तो बीजवराशी होतो. सप्तमेश चंद्र द्वितीय भावात असून त्याचा मंगळ हर्षल या युतीशी ३ अंशात पूर्ण केंद्रयोग होत आहे. प्लूटो हा शनी व रवी दोन ग्रहांच्या अंशात्मक युतीत असा सप्तमभाव मध्यावर आहे. सप्तमस्थ प्लूटोबद्दल फ्रिटझ् ब्रूनह्यबनर आपल्या नामांकित संशोधन प्रबंधात पुढीलप्रमाणे विचार मांडतात -

In reference to marriage one can only say about the following : The partner is influenced by Pluto. The married life is full of strugles. The native seeks many acquaintances, but these seldom leed to desired goal, separation occurs for the purpose of making new union. Overturns crises adventures all come to married life. Enemies are made through marriage jealousy unfaith fulness may be shown.

If Pluto is adversely aspected in the 7th house, then it signifies heavy blows of fate, catastrophical events which cut deep into life its, if tendencer to accidents violent or disgraceful death.

या जातकीचा पहिला विवाह झाला. संतती झाली. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी ती घरातून निघून गेली व दुसरा घरोबा केला. त्यानंतर पहिल्या पतीने घटस्फोट घेतला व दुसरा विवाहही केला.

पंचमातील मंगळ-हर्षल युतीचेही हे परिणाम असावेत. कारण सप्तमेश चंद्र या युतीच्या केंद्रयोगात आहे.


**(५) सिंहेचा शनी :** सप्तमस्थानी जर पाच हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'सिंहेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सप्तमावर सिंह रास असते. शनी व्ययेश व लग्नेश असून सप्तमात शत्रुक्षेत्री येतो.

विवाह जोडीदारांशी शत्रुसंबंध उत्पन्न होतात. परंतु विवाह बंधन तोडले जात नाही व पती-पत्नी नीटही राहतात. विवाहानंतर भाग्य फळफळते. दोघेही समंजस असतात व एकमेकांना सांभाळून घेतात. मतभिन्नताही असतेच पण तुटेपर्यंत ताणावयाचे नसते.

**कुंडली : सौ. शशी (बुरटे) देशपांडे M. D.**

जन्म सोमवार दिनांक २७ मार्च, १९५० रोजी पहाटे ५ वा. ३० मि. प्र. वेळ सोलापूर येथे. सां. स. १७ ता. १८ मि. २७ से. अयनांश २३° ९′ ५६″.




शाळेपासून हुशार, पहिला वर्ग मिळवित M.B.B.S. होऊन M.D. ही झाली.

विवाह २० मार्च, १९७६. पतीही डॉक्टर आहे. सायन येथे स्वत:चे हॉस्पिटल आहे.

सुखी वैवाहिक जीवन व समृद्धीचे व्यावसायिक जीवन.

सप्तमात कन्या रास लुप्त आहे. पंचमेश बुध व सप्तमेश रवी यांची पूर्ण युती आहे. चतुर्थेश शुक्र व्ययात असून त्याचा चतुर्थ भाव बिंदूशी पूर्ण अंशात्मक त्रिकोण आहे. कन्या व मीन राशीत ६ ग्रह आहेत. रवी-बुध युती मीनेत उत्तराभाद्रपदा नक्षत्रात प्रतियोग मंगळ-दशमेश व धनेश.

दशमेश मंगळ कन्या या रोग बरे करणाऱ्या राशीत व वैद्यकशास्त्रदर्शक केतूच्या युतीत व रवीच्या प्रतियोगात आहे.


लग्नेश शनी आहे व तो सप्तमात सिंहेत आहे. त्याची दृष्टी लग्नावर, चतुर्थावर व नवमावर येते. लग्नेशाच्या लग्नावर दृष्टी - दीर्घायू योग, चतुर्थावर दृष्टी - स्थावर व वाहनाची प्राप्ती. मातृसुख, पितृसुख चांगले व समृद्ध जीवन आहे.

**(६) कन्येचा शनी :** सप्तमस्थानी जर सहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सप्तमावर कन्या रास येते. शनी लाभेश व व्ययेश होऊन सप्तमात मित्रक्षेत्री येतो. व्ययेश सप्तमात येणे वैवाहिक सुखाच्या दृष्टीने चांगले ठरत नाही. द्विभार्या योगाची शक्यता असते. पत्नी शरीराने दुर्बल असून किडकिडीत व रोगट असते.

**कुंडली : श्रीमती मनोरमा नारायण**

जन्म दिनांक १९ ऑक्टोबर, १९२३ रोजी सायंकाळी ४ वा. ५१ मि. कोल्हापूर येथे. अक्षांश १६° उ. ४२′ रेखांश ७४° पूर्व १६′. अयनांश २२° ४७′ २९″. सां. स. १८ ता. ५ मि. ३७ से.




विवाह १९४६. पती वैद्यकीय व्यवसाय करणारा. सप्तमेश बुध सप्तमात मंगळाच्या युतीत.

शनी तुलेच्या सुरुवातीस १०° ५′ तो सप्तम वा अष्टमभावात पूर्णपणे येत नाही. भावसंधीजवळ शनी तुलेत असला तरी तो रवीच्या युतीत आहे. रवी षष्ठेश आहे. पतीकारक रवी हा शनीच्या युतीत आहे. त्यामुळे बीजवराशी लग्न करावे लागले. पण शनी उच्च राशीत यामुळे पती चांगला मिळाला. सप्तमेश बुध हा मंगळ व शनी या दोन पापग्रहांच्या मध्ये आहे.


(७) **तुळेचा शनी :** सप्तमस्थानी जर सात हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'तुळेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सप्तमावर तूळ रास येते. शनी दशमेश व लाभेश असून तो सप्तमात उच्च राशीस येतो. सर्वसाधारणपणे तुळेतील शनी केंद्रात असता जातक श्रीमंत असतो. तो मृदुभाषी असून स्वत: पैसा मिळवितो. तसेच त्यास परदेशातून मान-सन्मान मिळतात. तो उत्तम विद्वान असतो व आपल्या क्षेत्रात ज्येष्ठ असतो व दीर्घायू असतो व उच्च पदास जातो. ही फले शनी तुळेत असून लग्नी वा दशमात असता मिळतील. त्यामानाने सप्तमात कमी व चतुर्थात आणखी कमी प्रमाणात मिळतील.

जातकाचे वैवाहिक जीवन सुखी जाते पण पत्नी लवकर जाते. बाकी सर्वसाधारणपणे ठीक राहते.

**कुंडली : पुरुष जातक**

जन्म शुक्रवार दिनांक ७ मार्च, १९२४ रोजी सकाळी ८ वा. ५५ मि. प्र. वेळ दिल्ली येथे. अक्षांश २८° उत्तर ४०′ रेखांश ७७° पूर्व १४′. अयनांश २२° ४७′ ५०″. सां. स. १९ ता. ३२ मि. १६ से.




जातक चांगल्या घराण्यात जन्मला. त्याने वडिलार्जित व्यवसाय पुढे चालविला व स्वत:चाही ठसा उमटविला.

सप्तम बिंदूजवळील शनी व लाभस्थ बुध यांचा अंश साम्याने त्रिकोण व दोघेही लग्नेश मंगळाच्या लाभांत. शिक्षण B.Com. LL.B. व्यवसाय वकिली. दिवाणी सहकारी व कामगार न्यायालयात उत्तमपैकी यशस्वी कामगिरी झाली. शनीची चतुर्थावर दृष्टी, वडिलार्जित स्थावरची प्राप्ती. वडील व आजोबाही नामांकित वकील होते. पत्नी अनुरूप व मोठ्या घराण्यातून आलेली. लग्नभावमध्याजवळ शुक्र त्रिकोण लग्नेश मंगळ (भाग्यात) शनी-शुक्र परस्पर दृष्टियोग. धनेश लग्नी असल्याने स्वत:च्या श्रमाने धन मिळाले, शिक्षण व बुद्धिमत्ता यांच्या जोरावर वकील-वर्गात नाव कमावले. कन्या संतती, तीही बुद्धिमान व हुशार. एकूण जीवन प्रगतीपर व सुखी. मातृ-पितृसुख १९७१-१९७४ पावेतो.

**(८) वृश्चिकेचा शनी :** सप्तमस्थानी जर आठ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृश्चिकेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

वृषभ व तूळ ही दोन लग्ने शुक्राची आहेत आणि शनी या दोन्ही लग्नांचा राजयोगकारक आहे आणि सप्तमावर वृश्चिक व मेष या दोन राशी येतात व तेथे शनी शत्रू राशीत येतो. पण शनी राजयोगकारक असल्याने वृश्चिक व मेष राशीत फारसी अशुभ फले मिळू देणार नाही. तसेच मंगळ व गुरू यांचे शुभसंबंध अन्योन्य योग असता शुभ फले मिळतात.


सप्तमावर वृश्चिक रास, शनी नवमेश दशमेश योगकारक असून सप्तमात वृश्चिकेत येतो. भावार्थ रत्नाकरमध्ये वृषभ लग्नाबद्दल सांगत असता - सप्तमात मंगळ अशुभ नसतो आणि रवी व भाग्येश लाभात असता दीर्घायुष्य देतात.

## कुंडली : श्रीमती लीला

जन्म शनिवार दिनांक १० एप्रिल, १९२६ रोजी सकाळी ८ वा. ३२ मि. प्र. वेळ पुणे येथे. अक्षांश १८° उ. ३०′ रेखांश ७३° ५८′ पूर्व. अयनांश २२° ४९′ २४″. सां. स. २१ ता. ७ मि.

येथे शनी सप्तमात आहे पण सप्तमेश मंगळ मकरेत उच्च राशीत दशमात आहे. शनी मंगळ अन्योन्य क्षेत्रयोग असल्याने सप्तमस्थ शनी दूषित नाही. शनी त्रिकोण हर्षल जून १९४४ मध्ये विवाह झाला. माहेर श्रीमंत, सासरही श्रीमंत. पती इंजिनिअर. जोडा अनुरूप. संतती एक मुलगी, चार मुलगे, सासर-माहेर दोन्हींकडे मोठे वाडे. जातकीचा आवाज गोड आहे. गाण्याची आवड.

लहानपणी शरीर कृश पण विवाहानंतर शुक्रामुळे शरीर चांगले लठ्ठ झाले.




शनी-मंगळ अन्योन्य क्षेत्रसंबंध व सप्तमेश मंगळ मकरेत उच्च यामुळे सप्तमस्थ शत्रू राशीतील शनी अशुभ ठरला नाही.

**(९) धनुचा शनी :** सप्तमस्थानी जर नऊ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'धनुचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सप्तमावर धनु रास असून शनी अष्टमेश व भाग्येश बनून सप्तमात येतो.

विवाह व वैवाहिक जीवन खडतर होण्याची शक्यता असते पण जातक स्वप्रयत्नाने यशस्वी होतो. शनी दूषित असला तर मात्र वैवाहिक जीवन त्रासदायक व दु:खी राहील. द्विभार्या योगाची शक्यता असते. पत्नी चांगलीच सुदृढ असते पण व्यक्तिमत्त्व देखणे व सुंदर नसते.


भाग्येश सप्तमात असल्याने व्यवसायास चांगला ठरतो.

## कुंडली : शम्मी कपूर

जन्म बुधवार २१ ऑक्टोबर, १९३१ रोजी रात्रौ १० वा. ३० मि. प्र. वेळ मुंबई येथे. अयनांश २२° ५४′ १६″. सांपतिक समय २३ ता. ४८ मि.

सप्तमेश गुरु द्वितीयात उच्च आहे. त्यामुळे पत्नी सुंदर आहे. भाग्येश शनी सप्तमात आहे. त्याचा हर्षलशी केंद्रयोग आहे. नेपच्यूनशी त्रिकोण आहे पण तो दीप्तांशाबाहेर दिसतो.

लग्नेश बुध पंचमात शुक्रासह आणि शुक्र-नेपच्यून पूर्ण लाभ योग. धनेश भाग्यात हाही योग व्यवसायाच्या दृष्टीने चांगला आहे. शिवाय चंद्र त्रिकोण बुध-शुक्र असा योग पंचम व नवमस्थानातून आहे. दशमेश नेपच्यून सिंह या नाटकी राशीत आहे. यामुळे नायक म्हणून गाजला व लोकप्रिय झाला.




**(१०) मकरेचा शनी :** सप्तमस्थानी जर दहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कर्क या लग्नास शनी सप्तमेश व अष्टमेश असतो आणि तो सप्तमात मकरेत स्वगृही येतो. ही स्थिती पत्नीच्या आयुर्मर्यादेस घातक ठरते. तसेच सप्तम हे मारक स्थान असल्याने खुद्द जातकासही सप्तमस्थ शनी अनेक अडथळे उत्पन्न करणारा ठरतो. जातकाचीही आयुर्मर्यादा कमी होते.

पण चंद्र अथवा रवी यांचा शनीशी शुभयोग असला तर वरील सारखे दुष्परिणाम दिसत नाहीत. पण त्यांची युती ठीक ठरत नाही. शनी एकटा सप्तमात असता जातक अशक्त व आजारी असतो व नेहमी काहीना काही व्याधी होतात.


स्त्रीयांच्या बाबतीत मासिक पाळीचे त्रास होतात.

## कुंडली : डॉ. काशीनाथ घाणेकर

जन्म बुधवार दिनांक १४ सप्टेंबर, १९३२ रोजी पहाटे ३ वाजता प्र. वेळ चिपळूण येथे. अक्षांश १७° उ. ३०′ २५″ रेखांश ७३° पूर्व ३०′. अयनांश २२° ५५′ ७″. सां. स. १ ता. ५४ मि. २७ से.

मराठी रंगभूमीवरील व चित्रपटातील एक जबरदस्त अभिनय सामर्थ्याचा आघाडीचा कलावंत होऊन गेला. योगकारक मंगळ लग्नी कर्केत आहे. त्याचा सप्तमस्थ सप्तमेश शनीशी प्रतियोग आहे.

मंगळ पंचमेश व शुक्र चतुर्थेश लाभेश लग्नी आहेत. बुध-नेपच्यून युती चंद्राच्या सप्तमात. यावरून अभिनय कलेचा आविष्कार दिसून येतो पण जातक व्यसनाच्या आहारी गेला व अल्पायू ठरला.





अष्टमेश शनी प्रतियोग मंगळ, चंद्र प्रतियोग नेपच्यून यामुळे अन्य स्त्रीशी संबंध व दारूचे व्यसन. मद्य-मदिराक्षीच्या नादी लागल्याने कलागुण वाया गेले व अल्पायू झाला.

**(११) कुंभेचा शनी :** सप्तमस्थानी जर अकरा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सिंह या लग्नास शनी षष्ठेश व सप्तमेश असतो आणि तो सप्तमात कुंभेत मूळ त्रिकोणी येतो. षष्ठेशाची लग्नावर दृष्टी ही व्याधी दर्शविणारी ठरते.

**कुंडली : श्री. गंगाधर सिद्रामप्पा कूचन**

जन्म गुरुवार १५ नोव्हेंबर, १९३४ रोजी मध्यरात्री १२ वा. १४ मि. प्र. वेळ ११.४७, स्था. वेळ सोलापूर. सां. स. ३ ता. २३ मि. ४० से. अयनांश २२° ५७′ ५″.




सोलापूरचे प्रसिद्ध काँग्रेस पुढारी व उद्योजक. दहा वर्षे खासदारकीची, उद्योग बँकेचे अध्यक्ष. सोलापूर सूत गिरणी, यशवंत सह. सूत गिरणी या दोन सूत गिरण्या उभ्या


करून यशस्वी करण्यात पुढाकार. दोन्हीचे अध्यक्ष पद. पॉवरलूम फेडरेशनचेही अध्यक्ष. दशमेश शुक्र व समाजकारण. मंगळाशी रवी-शुक्राचा लाभयोग. कारखानदारीशिवाय दोन पब्लिक लि. कंपन्याही काढल्या आहेत. शनी मकरेच्या शेवटी व वास्तविक तो सप्तम बिंदूचे युतीत १° २१′ फरकाने. षष्ठेश शनीच्या दृष्टीने सर्दीची व्याधी आहे.

**(१२) मीनेचा शनी** : सप्तमस्थानी जर बारा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मीनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सप्तमावर मीन रास येते. शनी पंचमेश व षष्ठेश असतो आणि तो सप्तमात मीनेत येतो. षष्ठेश सप्तमात व लग्न कन्या या दुर्बल राशीचे असल्याने जातकास विवाहसुख व संततीसुख लाभत नाही. लग्न शुभ ग्रहाने दृष्ट वा युक्त असता या फलात सुधारणा होते.

**कुंडली : सौ. सुलोचना**

जन्म गुरुवार १६ मार्च, १९३९ रोजी रात्रौ ८ वा. १७ मि. सोलापूर येथे. अयनांश २३° ०′ ४१″. सां. समय ७ ता. २३ मि. २२ से.





मातापित्याची एकुलती एक कन्या. या स्त्रीचा विवाह झाल्यावर सासरी तिला नीट वागणूक मिळाली नाही. वडील व्याह्याकडे जाऊन त्यांना समजावण्याचा प्रयत्न करून आले. पण फारसा फरक पडला नाही. ती गरोदर झाल्यावर बाळंतपणासाठी माहेरी आणले. दरम्यान तिला कर्करोगाने ग्रासण्यास सुरुवात झाली होती. ५ मार्च, १९६९ रोजी बाळंत झाली. मुलगा झाला. ७ मार्च, १९६९ रोजी स्तनाच्या कॅन्सरसाठी शस्त्रक्रिया झाली. त्यानंतर ही स्त्री माहेरीच होती. ३१ जानेवारी, १९७० च्या मध्यरात्री ती मरण पावली. तिचा मुलगा बापानेच दत्तक घेतला. बुध-शनी-युती, रवी-मंगळ केंद्रयोग गुरुचे पाठबळ मिळाले नाही. सप्तमाच्या मागे रवी व पुढे केतू हर्षल व बुध निर्बली राशीत आहेत. त्याच्या नीचांश मीनेचे १५ अंश असतात.

बुध गुरु लग्नी असावेत. अगर त्यांची दृष्टी लग्नावर असावी. रवीच्या द्वितीय स्थानात शुभ ग्रह असावा हे जे वराहमिहीरांनी सांगितले आहे ते पटते. वरील उदाहरणात गुरु लग्नात नाही अगर लग्नावर दृष्टी नाही तसेच बुध लग्नी नाही. पण त्याची दृष्टी लग्नावर येते पण तो निर्बल राशीत सप्तमात आहे. त्यामुळे बुध गुरुच्या दृष्टीरहित जातक दुर्दैवी ठरतो.

८

# अष्टम भाव

## (आयुष्य-मृत्यू-गंडांतर स्थान)




सोबतच्या कुंडलीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी आठ हा अंक लिहिलेला आहे, त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीतील अष्टम स्थान किंवा आठवे स्थान म्हणतात.

अष्टम स्थानावरून जातकाचे आयुष्य, मृत्यूच्या वेळची स्थिती, मृत्यूचा प्रकार, अपघात, विम्याची रक्कम, वारसाने प्राप्त होणारे धन, व्यवसाय वा आयुष्याच्या भागीदाराकडून प्राप्त होणारे धन, श्रम न करता मिळणारे धन, पराभव, अवनती, दुर्लौकिक यांचा विचार होतो.

शरीरावयवांपैकी जननेंद्रिये व गुद्द्वार, नितंब प्रदेश यांचा बोध होतो.

आयुष्याचा कारक शनी आहे. तो अष्टमात असता साधारणपणे दीर्घायुष्य देतो. वृद्धावस्था शनीने दर्शविली जाते. मेष लग्न व वृश्चिक लग्न यांच्या बाबतीत शनी दीर्घायुष्य देत नाही. इतर लग्नाच्या बाबतीत अष्टमस्थ शनी दीर्घायुष्य देऊ शकतो. अष्टमेशाची स्थिती, त्या वेळी होणारे शुभाशुभ योग तसेच शनीशी होणारे शुभाशुभ योग, युती, दृष्टी यांचा विचार करून आयुर्मर्यादा ठरते.

शंभर वर्षांचे वर जगणारे जातक थोडेच असतात. उदा., धोंडो केशव कर्वे, पंडित सातवळेकर, दि. ब. देवधर (क्रिकेटर), मुरारजी देसाई.

तसेच नव्वदी गाठलेले चक्रवर्ती राजगोपालचारी, एम. विश्वेश्वरय्या वगैरे त्यामानाने बरेच आहेत.

वारसारूपाने धन मिळविण्याच्या बाबतीत अष्टमेशाचा विचार करावा लागेल.

मृत्युकाळ ठरविताना अष्टमातील ग्रह, मारक ग्रह व लग्न, लग्नेश यांच्याशी अशुभ योग करणारे ग्रह यांचा विचार करावा लागतो.

आयुष्यात होणारे अपघात, व्याधी आदी गंडांतरे यांचाही बोध या स्थानावरून होतो. पराभव, दुर्लौकिक, अवनती हेही या स्थानावरून पाहिले जातात.

अष्टम स्थान हे दशमाचे लाभस्थान आहे. त्यामुळे व्यवसायाच्या बाबतीत या स्थानातील ग्रहांचा विचार केला जातो.

अष्टम स्थान हे सप्तमाचे धनस्थान आहे. सप्तम हे व्यापाराचे स्थान आहे. व्यापारधंद्यात भागीदार घेतले जातात. त्यांच्या मदतीने झालेल्या नफ्यातील हिस्सा या स्थानावरून पाहतात. पत्नीने आणलेला हुंडा वा श्वशुरगृहाकडून मिळालेले धन हेही या स्थानावरून पाहिले जाते.

येथील शनीची पंचमस्थान, द्वितीयस्थान आणि दशमस्थान यावर दृष्टी पडते. शिक्षणातील अडथळे, संततीवरील परिणाम आणि व्यवसायातील पराभव, अवनती दर्शविले जातात.

मृत्यूचे कारण, त्या वेळची अवस्था हे अष्टमस्थानावर परिणाम करणारे ग्रहयोग वा कुंडलीतील अरिष्ट योग यावरून पाहिले जातात.

अष्टमातील शनी दीर्घायुष्य देतो असे म्हटले जाते. दीर्घायुष्य म्हणजे वय वर्षे ७० चे पुढे आहे. पण या प्रदीर्घ आयुष्यात जातकाची स्थिती कशी होते ? तो विकलांग व्हावयास लागतो. व्याधी पाठीमागे लागतात. जराजर्जर होतो. नातेवाइकांना त्यांचा कंटाळा येतो, हे आपण बघतो. अशा जातकासाठी मग वृद्धाश्रम काढला जातो.

प्रत्येक लग्नाच्या अष्टमातील शनी दीर्घायुष्य देत नाही. मेष व वृश्चिक या मंगळाच्या लग्नाच्या बाबतीत अष्टमस्थ शनी दीर्घायुष्य देत नाही.

### अष्टमस्थ शनीची राशिनिहाय भावफले


**(१) मेषेचा शनी :** अष्टमस्थानी जर एक हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मेषेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कन्या या लग्नास शनी पंचमेश षष्ठेश असतो पण तो अष्टमात मेष राशीस येतो. मेषेत शनी नीच राशीत असतो. तेव्हा याच्या शुभ फलाची अपेक्षा करता येत नाही. त्यास सर्व तऱ्हेच्या त्रासांना तोंड द्यावे लागते. शिक्षणात अपयश येईल. नसत्या व्याधी येतात. शत्रूंचा ससेमिरा मागे लागतो. कर्जबाजारी होतो. त्यास अल्पायुष्य लाभते व संतती नसते.

### कुंडली : श्री. विलास

जन्म शनीवार दिनांक २० डिसेंबर १९४१ रोजी पहाटे १ वा. प्र. वेळ महाड येथे. अक्षांश १८° ६′ उत्तर रेखांश ७३° २६′ पूर्व. अयनांश २२° २′ ४५″. सां. स. ६ ता. १५ मि. ५६ से.

विवाह १ मार्च, १९७२. पत्नीस गर्भधारणा झाली १९७२ पण गर्भपात झाला. पंचमेश शनी अष्टमात नीच, संततीकारक ग्रह गुरु नवमात, गुरुच्या व्ययात शनी, शनीच्या व्ययात मंगळ, मंगळाच्या व्ययात केतू असा हा द्विर्द्वादश योग आहे. गुरु हा राहू-केतूच्या केंद्रयोगात आहे. चंद्राचे पंचमात नीच राशीस शनी आहे त्यामुळे संतती झाली नाही व होणारही नाही.




पंचमात शुक्र त्रिकोण गुरु, पंचमेश शनीची पंचमावर दृष्टी यामुळे गर्भधारणा झाली तरी पंचमेश मंगळाच्या राशीत नीच व शनीचे व्ययात मंगळ यामुळे गर्भपात व नंतरही संततीस प्रतिकूल.

(२) **वृषभेचा शनी :** अष्टमस्थानी जर दोन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तूळ या लग्नास शनी चतुर्थेश व पंचमेश असून अष्टमात वृषभ राशीत येतो. शनीचे अष्टमातील वास्तव्य, भाग्य, यश, नावलौकिक याबाबतीत ठीक नसते. पण लग्नेश शुक्र, भाग्येश बुध, दशमेश चंद्र यांची जोड असल्यास योगकारकत्व पूर्णपणे प्रत्ययास येते. अन्यथा चतुर्थेश अष्टमात यामुळे जवळची सर्व मालमत्ता नाहीशी होते व जातक हलाखीत येतो. संततीचेही सुख पूर्ण लाभत नाही.


### कुंडली : श्री. श्रीधर परशुराम मराठे

जन्म बुधवार दिनांक ९ जुलै, १९१३ रोजी दुपारी १ वा. ३० मि. स्था. वेळ चिपळूणजवळ. अक्षांश १७° उ. ३९′ रेखांश ७३° पू. २३′. अयनांश २२° ३८′ ५९″. सां. स. ८ ता. ३६ मि. दिवस ३.

सेनाधिकारी, पोलीस अधिकारी, अनेक संस्थांशी संबंध, सामाजिक व सांस्कृतिक कार्यात रस. अशा बहुविध व्यक्तिमत्त्वाच्या पुरुषाची ही कुंडली आहे.

१९३६ मध्ये एल्फिन्स्टन कॉलेजमधून संस्कृतची पदवी. नंतर विधी महाविद्यालयातून एल.एल.बी. सन १९३८ मध्ये.

चतुर्थेश व पंचमेश शनीची पंचमावर दृष्टी. भाग्येश बुधाची चतुर्थावर दृष्टी. शनी, बुध लाभयोग यामुळे वकिली. १९३८ ते १९४२ मुंबई उच्च न्यायालयात वकिली केली.




दुसरे महायुद्धात १९४२ साली सैन्यात दाखल. तेथे मेजर झाले. १९४२ ते १९४९ सैन्यदलात कामगिरी. सप्तमात मंगळ त्रिकोण गुरु तृतीयात, मंगळाची दशमावर दृष्टी व चतुर्थातून हर्षलची व अष्टमातून शनीची दशमावर दृष्टी. यामुळे धाडसी कामगिरीची आवड, सैन्यात प्रवेश. त्याच योगावर पोलीस खात्यात प्रवेश. १९४९ मध्ये I.P.S. झाले. कारवार, बेळगाव, सांगली, मुंबई या ठिकाणी मोठ्या हुद्द्यावर काम केले. नाशिकच्या ट्रेनिंग संस्थेचे (P.T.S.) चे प्रिन्सिपॉल म्हणूनही काम पाहिले. नंतर मुंबई कमिशनर म्हणून होते.

१९६७ ते १९७१ पुणे येथे तिसरे कमिशनर म्हणून काम केले व दिनांक ८ जुलै, १९७१ रोजी सेवेतून निवृत्त झाले.

त्यांचे चिरंजीव मनोहर हे कॅनडास पीएच. डी. साठी गेले होते. त्यास १९६७ मध्ये वाहन अपघात होऊन त्यातच मृत्यू आला. गुरुचे पंचमात मंगळ पुत्रशोक देतो. गुरुच्या मंगळावरील दृष्टीने जातकास यश, मान, समृद्धी लाभली त्याच मंगळामुळे पुत्रशोक. यातच पंचमाचे व्ययात हर्षल + पंचमेश शनीचे व्ययात मंगळ यांनीही भर घातली.

भाग्येश बुध दशमात लाभेश रवी भाग्यात गुरुची दृष्टी यामुळे करीअरमध्ये यश, प्रतिष्ठा लाभली.

द्वितीय स्थानावरून आर्थिक लाभाचे माध्यमदर्शक उद्योग-व्यवसायातून लाभ होतो. द्वितीयावर वृश्चिक रास आहे. भाग्येश बुधाचा द्वितीय भावाशी त्रिकोण, हर्षलचा द्वितीय भावाशी लाभयोग, योगकारक शनीची व द्वितीयेश मंगळाची द्वितीयावर पूर्ण दृष्टी आहे.

द्वितीयेश मंगळ मेष या अग्निराशीत रवी व गुरु यांच्या शुभयोगात म्हणूनच सैन्य दल व पोलीस दल यांत कामगिरी झाली.

मंगळ सप्तमात न्यायखाते मंगळाची बुधावर दृष्टी. मंगळ-बुध-शनी यावर चार वर्षे वकिली झाली.

निवृत्तीनंतर सांस्कृतिक व सामाजिक कार्यात भाग घेतला. टिळक विद्यापीठ, वैदिक संशोधन मंडळ, वेदशास्त्रोत्तेजक सभा, गीताधर्म मंडळ यांचे पदाधिकारी, विवेकानंद केंद्र कन्याकुमारी, यांचे पुणे केंद्रात काम. शारदा ज्ञानपीठम् स्थापले.

६ सप्टेंबर, १९९७ तपस्वी ऋषी म्हणून महापौरांचे हस्ते सत्कार झाला.


फेब्रुवारी १९९८ मध्ये निधन. बुध महादशेतील राहू अंतर्दशामध्ये निधन. ८५ वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभले.

**(३) मिथुनेचा शनी :** अष्टमस्थानी जर तीन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

वृश्चिक या लग्नास शनी तृतीयेश व चतुर्थेश असतो आणि तो अष्टमात मिथुन राशीत मित्रक्षेत्री येतो. त्याची दृष्टी द्वितीयातील धनु राशीवर येते. हा दृष्टियोग जातकाच्या डोळ्यांच्या दृष्टीने ठीक नसतो. डोळे अधू असतात. पंचमावर दृष्टी येते त्यामुळे संततीबद्दलचे प्रश्न उभे राहतात. संततीस प्रतिबंधक ठरतो अथवा एखादी संतती होते तसेच शिक्षणात अडथळे येतात. चतुर्थेश अष्टमात त्यामुळे मातृसुख बिघडते. गुरु शुभ नसता जातक गरीब राहतो. तृतीयेश षष्ठात येत असल्याने (तृतीय स्थानापासून अष्टम स्थान हे सहावे असते) भावंडांशी पटणार नाही.

## कुंडली : श्री. विलास पंडित कुलकर्णी

जन्म बुधवार दिनांक ८ मे, १९४६ रोजी रात्रौ ९ वा. प्र. वेळ परांडा येथे. अक्षांश १८° उ. १४′ रेखांश ७५° पू. ४२′. अयनांश २३° ६′ ७″. सां. स. ११ ता. ३६ मि. ५ से.





जन्मकाळी बुध महादशा भोग्य वर्षे ० महिने ६ दिवस १९ आहे. लग्नेश मंगळ नवम स्थानाजवळ आहे. पण तो कर्केत नीच राशीत येतो. मंगळ पंचमेशही आहे. बुध अष्टमेश पंचमात आहे. शिक्षण सरळ झाले नाही.

दशमावर सिंह रास नसून कन्येची सुरुवात आहे व त्याचा अधिपती मेषेत दशमाच्या अष्टमात येतो. व्यावसायिक जीवनसुद्धा सरळ दिसत नाही. बँकेत कारकून म्हणून सुरुवात झाली आणि चढत-चढत एका शाखेचे व्यवस्थापक झाले आहेत.

द्वितीयेश गुरु-लाभभावाजवळ आहे व त्याचा लाभेश शुक्र व हर्षल (हे दोघे सप्तमात वृषभ राशीत) यांच्याशी त्रिकोण योग आहे. या योगावर जातक पुढे येत आहे. रवी उच्च राशीत आहे. सिंह रास ही लुप्त आहे. रवी व शनी यांचा लाभयोग आहे.

जातक स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये असून एका शाखेचा शाखाधिकारी आहे. जातकास संतती नाही. शनीची पंचमावरील दृष्टी + शनी व गुरु यांचा केंद्रयोग + पंचमेश मंगळ नीच राशीत यामुळे संतती नाही. गुरु-नेप. योगामुळे intuition आहे. भाग्येश चंद्र भाग्यातच आहे. रवी व चंद्र यांचा त्रिकोण योग आहे. वृश्चिक लग्नास बुध व गुरु मिळून २, ५, ८, ११ स्थानांचे अधिपती होतात आणि त्यांचा परस्परसंबंध येत असता जातकास पैसा चांगला लाभतो. अष्टमेश बुध हा दशमेश आहे व त्याचा गुरुशी प्रतियोग होऊन बुध ६ अंश पुढे गेला आहे. तरी तो दीप्तांशात आहे. शिवाय दशमेश बुधाचा भाग्येश भाग्यस्थ चंद्राशीही ३° त त्रिकोण योग आहे. यामुळे जातकाचा आगामी काळ उज्ज्वल आहे.

**नवांश कुंडली**




लग्नेश शनी व भाग्येश शुक्र पंचमात धनेश गुरु सप्तमात त्याचा बुधाशी व नेपच्यूनशी त्रिकोण योग व शनी शुक्राशी लाभयोग. दशमात रवि-मंगळ वृश्चिकेत आहे. जातक मोठ्या अधिकारावर जाणार आहे.


सांप्रत जातकास राहू महादशा चालू असून राहूची अंतर्दशा ९/८/९९ रोजी संपून गुरुची अंतर्दशा सुरू. गुरु, शनी, बुध या तिन्ही अंतर्दशा चांगल्या जातील.

**(४) कर्केचा शनी :** अष्टमस्थानी जर चार हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला कर्केचा शनी असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी या लग्नास द्वितीयेश व तृतीयेश असतो आणि अष्टमात कर्केत येतो. येथे शनी दीर्घायुष्य देतो. व्यवसायातून चांगली संपत्ती मिळते पण शिल्लक थोडी राहते. व्यवसायात चढ-उतार होत राहतात. त्यामुळे संपत्तीतही चढ-उतार होतात. मधून-मधून अडचणी येतात. संतती नसते. शेवटी वृद्धावस्थेत कष्ट होतात व व्याधी होतात.

**कुंडली : श्री. नारायण श्रीपाद राजहंस उर्फ बालगंधर्व**

जन्म सोमवार २६ जून, १८८८ रोजी सायंकाळी ६ वा. २ मि. अयनांश २२° १८′. सां. स. १२ ता. २१ मि. ३४ से.




आपल्या अजोड स्त्री भूमिकांनी व स्वर्गीय कंठमाधुर्याने अलोट कीर्ती व यश संपादन केले. महान नटसम्राट. गंधर्व मंडळी ही नाट्यसंस्था काढली. भाग्येश रवी व लाभेश शुक्र यांची युती सप्तमात मिथुनेत.

लग्नेश व्ययात ४५° मंगळ व प्रतियोग नेपच्यून खर्चीक स्वभाव. लग्नावर शुक्राची दृष्टी. मंगळाची लग्नावर दृष्टी व द्वितीयातील चंद्राचा पंचमेश मंगळाशी त्रिकोण. (१२० अंशाचा) योग यामुळे रूपसंपदा.

पंचमेश मंगळ दशमात, त्याची लग्नावर दृष्टी, भाग्येश रवी सप्तमात. त्याची लग्नावर दृष्टी आणि लाभेश शुक्राचीही सप्तमातून लग्नावर दृष्टी यामुळे नाट्यक्षेत्र गाजविले गेले. दशमेश बुधावर लग्नेश गुरुची दृष्टी आहे.

व्ययस्थ गुरुमुळे सढळ हाताने खर्च, गुरु प्रतियोग नेपच्यून यामुळे विश्वासघात, फसवणूक यामुळे धनक्षय. कर्ज काढावे लागले. चंद्र व शनी अन्योन्य क्षेत्री त्यामुळे आर्थिक अडचणी आल्या. गंधर्व कंपनी गुंडाळली गेली. १९५५ साली कला अकादमी पुरस्कार, १९६४ साली पद्मभूषण सन्मान.


अष्टमातील शनी-राहू चंद्राच्या प्रतियोगात, त्यामुळे अर्धांगवायू झाला. दिनांक १५ जून, १९६७ रोजी ७९ व्या वर्षी मृत्यू.

**(५) सिंहेचा शनी :** अष्टमस्थानी जर पाच हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'सिंहेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मकर लग्नास शनी लग्नेश व धनेश आहे आणि अष्टमात सिंह राशीत शत्रुक्षेत्री येतो. शनी स्वत:च लग्नेश असल्याने त्याची दुसरे, पाचवे, दहावे भावावरील दृष्टी अशुभ राहणार नाही ती फलदायी ठरेल. धनेशाची धन स्थानावरील दृष्टी धनलाभ व्यवस्थित करणारी ठरते. पंचम व दशम ही शुक्राचीच स्थाने संतती होईल. व्यवसाय प्रगतीपर राहील.

## कुंडली : श्री. रामकृष्ण हरी बाकोलीकर

जन्म शनिवार १ नोव्हेंबर, १८९० रोजी दुपारी १२ वा. अयनांश २२° १९′ ५७″. सां. स. १४ ता. ७ मि. २४ से.




शिक्षक, तलाठी, ओव्हरसीअर, ज्योतिषी अशी कामे केली आहेत.

तीन लग्ने पहिले २२ व्या वर्षी, दुसरे २७ व्या वर्षी, तिसरे २९ व्या वर्षी. सप्तमेश चंद्र. मिथुनेत, मंगळ व गुरु यांची दृष्टी सप्तमावर, शुक्र केतू युक्त.

शुक्र वृश्चिकेत त्याचा अधिपती मंगळ मकरेत उच्च व गुरुचे युतीत. गुरुमुळे विवाहांची संख्या तीन झाली. गुरु चंद्राचा सप्तमेश आहे. गुरु सप्तमेश सप्तमाची वृद्धी करणारा.

संतती ११ मुलगे, २ मुली. लग्नाचा व चंद्राचा पंचमेश शुक्र आहे तो वृश्चिक या प्रसव राशीत आहे.

गुरु मकरेत नीच राशीत असला तरी मंगळ मकरेत उच्चस्थ आहे व दोघेही लग्नी आहेत. त्यामुळे गुरुचा नीचभंग झाला आहे. गुरुची पंचमावर पूर्ण दृष्टी आहे. तसेच पंचमेश शुक्राचीही पंचमावर दृष्टी आहे. शुक्र हा केंद्र कोनाधिपती म्हणून प्रबळ आहे. लग्नेश शनी अष्टमात आहे. तो संततीवर मर्यादा घालू शकला नाही. शनी कुटुंबेश आहे व त्याची कुटुंब स्थानावरील दृष्टी अशुभ नाही. शनी लग्नेश असल्याने तो आपल्या दृष्टीने स्थाने बिघडवत नाही.

कारण कुटुंब स्थान त्याचेच मालकीचे आहे. पंचम स्थान हे मित्राच्या राशीचे आहे आणि दशमस्थानी मित्राचेच व शनीच्या उच्चतेचे आहे.

संततीच्या बाबतीत आणखी एक विचार मांडतो. पहिल्या पत्नीचे स्थान सप्तम स्थान आहे. तेथे कर्क ही प्रसव रास व त्यांच्या पंचमावर वृश्चिक ही प्रसव रास आणि त्याचा अधिपती मंगळ हा मकरेत उच्च क्षेत्री आहे व तो गुरुसह आहे.

दुसऱ्या पत्नीचे स्थान नवम स्थान आहे. तेथे कन्या रास आहे. तेथून पंचम स्थान मकर असून तेथे मंगळ व गुरु आहेत.

तिसऱ्या पत्नीचे स्थान अकरावे तेथे शुक्राचे वास्तव्य आहे. त्याचा अधिपती मंगळ उच्चक्षेत्री असून तेथे गुरुही आहे. अकराव्या स्थानाचे पंचम स्थानावर मीन ही बहुप्रसव रास आहे. त्याचा अधिपती नेपच्यून आहे आणि त्याचा गुरु व मंगळाशी त्रिकोण आहे.

यांचा विचार करता तीनही पत्नींकडून एकूण तेरा संतती प्राप्ती झाली आहे. प्रत्येक पत्नीच्या संततीची संख्या सांगणे कठीण आहे.

**(६) कन्येचा शनी :** अष्टमस्थानी जर सहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


कुंभ लग्नास शनी लग्नेश व व्ययेश असून अष्टमात कन्या राशीस मित्रक्षेत्री येतो. जातकास दीर्घायुष्य लाभते. पण सर्वसाधारणपणे बालपण कष्टाचे जाते. पण नंतरचे जीवन सुख-समृद्धीचे जाईल.

### कुंडली : स्त्री जातक

जन्म गुरुवार, दिनांक ३१ जानेवारी, १९८० रोजी सकाळी ८ वा. २० मि. सोलापूर येथे. अक्षांश १७° उ. ४३′ रेखांश ७५° पू. ५६′. अयनांश २३° ३४′ ३६″. सां. स. १६ ता. २१ मि. ०० से.

जातकी अभ्यासात हुशार आहे. सांप्रत विधी महाविद्यालयात शिकत आहे.

धनेश लाभेश गुरु सप्तमात तृतीयेश दशमेश मंगळाबरोबर आहे. सर्व प्रकारचे लाभाचे द्योतक आहे. बुध व शनी अन्योन्य क्षेत्री आहेत.




शनीच्या एकादशात चंद्र असता तो बोधक अवस्थेत असतो. त्याचे फल अधिकार प्राप्ती, उत्तम लाभ, सरकार-दरबारी आदर व मान, उच्च विद्या, विनोदी बुद्धी, सर्व सुखे, मानसन्मान यांची प्राप्ती होते. चंद्राचे धनस्थानात मंगळ, गुरु हा उत्तम संपत्ती, उच्च विद्या, वक्तृत्व देणारा योग आहे. बुध महादशा महत्त्वाची आहे.

**(७) तुळेचा शनी** : अष्टमस्थानी जर सात हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'तुळेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


मीन या लग्नास शनी लाभेश व व्ययेश असून अष्टमात तो तूळ राशीत उच्च क्षेत्री येतो. लाभेश अष्टमात उच्च असल्याने संपत्तीचा ओघ चालू राहील पण तो शनी व्ययेशही असल्याने पैसा खर्च होईल. अनैतिक व्यवहार व दुर्गुणापायी पैशाचा व्यय होईल. जातकास आयुष्य भरपूर लाभेल. पण जातकास संसार-सुख लाभत नाही.

## कुंडली : श्रीमती

जन्म रविवार दिनांक ६ फेब्रुवारी, १९५५ रोजी सकाळी १० वा. अयनांश २३° १४′ ५″. सां. स. १८ ता. २८ मि. १० से.

शनी महादशा भोग्य वर्षे ६ म. ७ दिवस २१ लग्नी मंगळ आहे व त्याचा अष्टमय शनीशी षडाष्टक आहे. मंगळाची सप्तमावर दृष्टी आहे. अष्टमस्थ शनीची शुक्रावर दृष्टी आहे. पतीकारक रवीची शनीशी केंद्रयोग. शुक्र मूळ नक्षत्रात आहे. पतीचा अपघाती मृत्यू. सप्तमेश बुध सप्तमाच्या षष्ठात वक्री आहे.

दुसरा विवाह झाला. दुसरा विवाह नवमावरून बघतात. नवमेश मंगळ आहे. नवमाच्या व्ययात शनी आणि मंगळ षडाष्टक शनी यामुळे त्या विवाहाचे बाबतीतही त्रास झाला.




**(८) वृश्चिकेचा शनी :** अष्टमस्थानी जर आठ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृश्चिकेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –

मेष या लग्नास शनी दशमेश व लाभेश असतो आणि अष्टमात वृश्चिक राशीत येतो. मेष या चर लग्नास एकादश स्थानाचा अधिपती बाधकेश असतो. जातकाजवळची संपत्ती हळूहळू नाहीशी होते. त्याचे आयुष्य सुखाचे व मानाचे जात नाही. त्याचे नातेवाईकच त्यास जरूर योग्य तो मान देत नाहीत. २ या कुटुंबस्थानावर, ५ या संततिस्थानावर व दशमस्थानावर शनीची दृष्टी येते. यामुळे जातकाचे कौटुंबिक सौख्य बिघडते. पूर्वी मिळणारा मानसन्मान म्हातारपणी मिळत नाही. क्षयासारख्या व्याधी त्याच्या पाठीमागे लागतात.


सिंह राशीवर दृष्टी येत असल्याने हृदय दुर्बल असते व हृदयविकार बळावण्याची शक्यता असते. हा वृद्धावस्थेतील विकार असतो.

अष्टमातील शनी पापग्रहांचे युतीत वा अशुभ योगात असता मृत्यू सरळ येत नाही. घातपात, अपघात होतात. मृत्यू अपघाताने होतो.

### कुंडली : श्री. चिं. दा. गाडगीळ

जन्म शुक्रवार दिनांक २० एप्रिल, १९२८ रोजी सकाळी ७ वा. १५ मि. अक्कलकोट येथे. अक्षांश २७° उ. ३१′ रेखांश ७६° १३′ पू. अयनांश २२° ५१′ ६″. सां. स. २० ता. ४२ मि. ३० से.

सरदार घराण्यात जन्म. इनाम जमिनी होत्या. त्यावरही मोठी होती. जातक काही दिवस वकिली करून नंतर शिवाजी वर्क्समध्ये सेक्रेटरी. तेथून निवृत्त झाल्यावर पुणे येथे स्टॉक एक्सचेंजमध्ये नोकरी. तेथून निवृत्त झाल्यावर एका हॉस्पिटलमध्ये विनावेतन देखरेख. रक्तदानाचा उच्चांक गाठला. हसतमुख, मनमिळाऊ व मदत करण्यास तयार. हार्टफेलने मृत्यू डिसेंबर १९९५ मध्ये.




लग्नेश मंगळ लाभस्थानी त्याची दृष्टी पंचमावर, सिंह राशीवर - अष्टमात शनी त्याची दृष्टी सिंह राशीवर (पंचमावर) रवी-चंद्र युती केंद्रयोग नेपच्यून. शनी व मंगळ दोघांशीही राहू केतूचे योग. हे सर्व स्थिर राशीतून त्यामुळे हार्टफेल.

गुरुच्या महादशेत गुरुची अंतर्दशा संपत आली असता मृत्यू. चतुर्थेश चंद्र व पंचमेश रवी यांची युती योगकारक ठरते. ती चतुर्थाच्या नवमात येते आणि म्हणून पिता मोठ्या घराण्यात व मोठी स्थावर जन्मत:च होती.

**(९) धनुचा शनी :** अष्टमस्थानी जर नऊ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'धनुचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


शनी सर्वसाधारणत: नवमेश व दशमेश असतो व तो अष्टमात धनु राशीत येतो. नवमेश अष्टमात आल्याने नशीब फळफळत नाही, त्यावर मर्यादा पडते आणि खर्च आवाक्यात, नियंत्रणात राहतो व जो खर्च होतो तो चांगल्या कामाकरिताच होतो. अष्टमेश व लाभेश गुरु असतो. तो जर व्यवस्थित शुभदायी असला तर चांगले असते. येथे बुध शुक्रास जास्त महत्त्व येते. शनीची पंचमावरील दृष्टी शिक्षणात अडथळे दर्शविते. पण दशमावरील दृष्टी व्यवसायाच्या दृष्टीने चांगली ठरते.

### कुंडली : एक तरुणी (भयानक अंत)

जन्म गुरुवार दिनांक २६ नोव्हेंबर, १९५९ रोजी दुपारी ४ वा. ३० मि. अक्षांश २९° उ. २३′ रेखांश ७९° पूर्व २३′. अयनांश २२° १७′ ५०″.

चंद्र महादशा भोग्य वर्षे ५ महिने ४ दिवस २४.

वृषभ लग्न शनी योगकारक नवमेश व दशमेश असून तो अष्टमात धनु राशीत आहे. त्याचा अधिपती गुरु सप्तमात शनीच्या व्ययात आहे. पंचमात तृतीयेश चंद्र लग्नेश शुक्र व राहूसह आहेत व त्यावर शनीची दृष्टी. येथे दृष्टी अधिष्ठित केंद्रयोग चंद्र व शुक्राशी आहे.




चंद्राचा अष्टमेश मंगळ चंद्राच्या तृतीयात व रवीसह (रवी चंद्राचा व्ययस्थानचा अधिपती आहे) तसेच गुरु चंद्राचा चतुर्थेश व सप्तमेश आहे.

लग्नावर मंगळाची दृष्टी आहे. गुरु शुभ असला तरी तो अष्टमेश असल्याने दुर्बल आहे. लग्नेश शुक्र हा शनीच्या दृष्टीत असून राहूसह आहे व त्याचा रवीशी ४५° चा अशुभ अर्ध केंद्रयोग आहे. चंद्रसुद्धा राहूमुळे व शनीच्या दृष्टीमुळे बिघडला आहे.

द्वितीयेश बुध व सप्तमेश मंगळ यांची युती सप्तम या मारक स्थानात आहे.

दिनांक १९ डिसेंबर, १९७८ रोजी ही तरुणी भरधाव जाणाऱ्या ट्रकखाली चिरडली गेली व मेली. त्या वेळी राहू महादशेत शनीची अंतर्दशा चालू होती. राहू-बुधाच्या राशीत असल्याने मारकेश बुधाचे फल देईल म्हणून राहूच्या दशेत अष्टमस्थ शनीच्या अंतर्दशेत घात झाला. शनीची राहू, चंद्र व शुक्र यांच्यावर दृष्टी आहे. त्या दिवशी गोचर मंगळ अष्टमात शनीवरून जात होता आणि गोचर चंद्र हर्षलवरून.


**(१०) मकरेचा शनी :** अष्टमस्थानी जर दहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी अष्टमेश व नवमेश येतो आणि अष्टमात तो मकर राशीत येतो. तेथे नवमेशाची म्हणून काही फले मिळत नाहीत. उलट नवमेश अष्टमात म्हणून अशुभ फलेच मिळतात.

**कुंडली : श्री. ........**

जन्म मंगळवार दिनांक २५ ऑक्टोबर, १९०४ रोजी रात्रौ ८ वा. ५७ मि. स्था. वेळ. अक्षांश १५° उ. ३०′ रेखांश ०° पश्चिम ५′. अयनांश २२° ३१′ ३७″. सां. स. २३ ता. ११ मि. ५४ से.

शनी येथे वास्तविक नवम भाव बिंदूचे नजीक आहे. पण गुरुच अष्टमेश असून त्याचा लग्नेश बुधाशी प्रतियोग आहे व शुक्राशी षडाष्टक आहे. तसेच चंद्र हा शनीच्या केंद्रयोगात आहे.




हर्षलची लग्नबिंदूवर पूर्ण दृष्टी व प्रतियोग आहे. त्याचा शनीशी ४५° चा अर्धकेंद्रयोग आहे. हा अशुभ आहे पण त्याहीपेक्षा षष्ठेश मंगळ चतुर्थात राहूबरोबर असून शनीच्या अष्टमात आहे. येथे चतुर्थ स्थान (अपघाताचे स्थान) बिघडले आहे व ते सर्व पापग्रहांनी बिघडले आहे. लग्नराशीपासून शनी आठवा व त्याचे अष्टमात राश्याधिपती मंगळ राहूयुक्त आहे. चंद्र कुंडलीचा विचार करता मंगळ अष्टमेश व शनी दशमेश आहे व सप्तमेश शुक्र द्वितीयेशही असून तो अष्टमात आहे व त्यावर मंगळाची दृष्टी येते. शनीची रवीवर दृष्टी आहे. मोटार अपघाताने दिनांक २९/६/१९२७ रोजी मृत्यू झाला.


**(११) कुंभेचा शनी** : अष्टमस्थानी जर अकरा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कर्क या लग्नास शनी सप्तमेश व अष्टमेश असून तो अष्टमात कुंभेत स्वगृही येतो. परंतु सप्तमेश अष्टमात ही स्थिती वैवाहिक जीवनात अडथळे आणणारी, जोडीदाराचा अकाली मृत्यू होऊन जीवन एकटेपणाने जगावे लागेल. जातक दीर्घायुषी झाला तरी एकटेपणा सहन होत नाही. जातक कमनशिबी व दुःखी राहतो आणि आर्थिक प्रश्न भेडसावीत राहतात.

शनीची दशमावर दृष्टी येते. दशमेश मंगळ असतो व तो राजयोगकारक असल्याने त्याची सुस्थिती व शनीशी शुभयोग व्यवसायात प्रगती दर्शवेल. शेवटी कुंडलीतील एकूण ग्रहयोगावर जातकाचे नशीब व सुख अवलंबून राहते.

## कुंडली : श्री. पा. रा. देव

जन्म मंगळवार दिनांक १ जानेवारी, १९०७ रोजी रात्रौ ९ वा. १५ मि. पुणे येथे. अयनांश २२° ३३′ १६″. सां. स. ३ ता. १९ मि. २० से.





कंत्राटे घेण्याचा व्यवसाय. हा व्यवसाय शनीचा आहे. शनी अष्टमात आहे. त्याची दशमावर दृष्टी आहे. मिथुनेत गुरु-नेपच्यून त्रिकोण तुळेतील मंगळ व त्रिकोण कुंभेतील शनी.

वडील मृत्यू १८.०३.१९३३. आई मृत्यू नोव्हेंबर, १९४२.

दोन विवाह, पहिला विवाह २५ जून, १९३१ एक मुलगी. पत्नी क्षयाने मृत्यू १९३५. दुसरा विवाह १९३५. पाच मुली.


येथे भावचलित चंद्र कुंडली मांडावी लागेल.

भावचलित चंद्र कुंडली अक्षांश १४° सां. स. १ ता. ४७ मि.




सप्तमात केतू त्यावर मंगळाची दृष्टी. सप्तमेश अष्टमात व सप्तमाचे व्ययात हर्षल आहे. यामुळे पहिली पत्नी मृत होऊन दुसरा विवाह करावा लागला. तसेच शुक्र वृश्चिकेत शनीच्या दृष्टीत आणि मंगळ व रवी हर्षल यांच्यामध्ये पापमध्यस्थ आहे. समराशी व सम नवांशात ६ ग्रह - कन्या संतती.

लग्न कर्क या बहुप्रसव राशीच्या पंचमावरही वृश्चिक ही बहुप्रसव रास आहे. पंचमेश मंगळ व चतुर्थेश शुक्र अन्योन्य क्षेत्री आहेत. पंचमेश मंगळ मीन नवांशात आहे. नवांमाश कुंडली (जन्म कुंडली)




लग्न नवांश मीन या अतिप्रसव राशीचा आहे. तेथे मंगळ (मूळ पंचमेश) नवांश कुंडलीतील भाग्येश मीनेत, मीनेचा अधिपती नेपच्यूनही मीन नवांशात आहे. बुध मीन नवांशात समोर कन्या नवांशात चंद्र व शुक्र या सर्वांशी गुरु मकरेतून शुभ योग करतो. म्हणून सर्व कन्या.


**(१२) मीनेचा शनी :** अष्टम स्थानी जर बारा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मीनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सिंह या लग्नास शनी षष्ठेश व सप्तमेश असतो व अष्टमात मीन राशीत येतो. आर्थिक व्यवहारात गुरु व रवी यांचा शुभयोग असेल, त्यांची मदत होत असेल तर चांगले आयुष्य जाते. नाही तर आर्थिक व्यवहारात फटका बसतो. षष्ठेश अष्टमात येणे म्हणजे सरळ योग होतो. या योगावर जातक दीर्घायुषी होतो. तो विद्वान असून निधड्या छातीचा असतो. शत्रू त्याच्यापासून लांबच राहतात. तो प्रसिद्धीस येतो व समृद्धी असते.

**कुंडली : अमेरिकेचे माजी अध्यक्ष श्री. लिंडन जॉन्सन**

जन्म गुरुवार दिनांक २७ ऑगस्ट, १९०८ रोजी पहाटे ५ वा. १८ मि. स्टोनवॉल टेक्सास येथे. अक्षांश ३०° उ. १४′ रेखांश ९८° पश्चिम ४१′. अयनांश २२° ३४′ ३७″. सां. स. ३ ता. ३८ मि. ४९ से.

जॉन केनेडींचे वेळी जॉन्सन अमेरिकेचे उपाध्यक्ष होते. केनेडींची हत्या झाल्यावर अमेरिकेच्या घटनेनुसार उपाध्यक्ष हे अध्यक्ष होत असल्याने जॉन्सन अध्यक्ष झाले आणि मुदत संपल्यावरसुद्धा जॉन्सन अध्यक्ष म्हणून निवडून आले.




लग्न सिंह, रवी सिंहेत, चंद्र सिंहेत, तिघेही विषम राशीत असणे हा महाभाग्य योग गणला गेला आहे. याचा अर्थ जातक खरोखर नशीबवान ठरतो. जातक सद्‌गुणी, दुसऱ्यांना सुख देणारा, उदार, प्रसिद्ध व राजा अगर राजासम होतो व दीर्घकाळ जगतो. दीर्घायुषी होतो. यानुसार जॉन्सन यांना राजपद मिळाले. मान, प्रतिष्ठा व दीर्घायुष्य मिळाले.

लिंडन जॉन्सन यांनी व्हिएतनामबरोबर युद्ध सुरू केले. त्यात अमेरिकेचे सैनिक मारले गेले आणि अमेरिकेला पराभव स्वीकारावा लागला. अमेरिकन लोकमत लिंडन जॉन्सन विरुद्ध गेले. हे युद्ध म्हणजे लिंडन जॉन्सनच्या प्रतिष्ठेला धक्का बसला. अष्टमस्थ शनीने हा धक्का दिला. शनीवर मंगळाची दृष्टी. दशमेश शुक्र नेपच्यूनच्या युतीत व दोघे शनीच्या केंद्रयोगात. शुक्र-नेपच्यून यामुळे फसगत व वैफल्य येते. मानहानी. १९७३ मध्ये हृदयक्रिया बंद पडून निधन ६६ व्या वर्षी झाले.

मीनेचा अधिपती नेपच्यून मानला जातो. हा नेपच्यून या कुंडलीचा अष्टमेश आहे. त्याच्याशी दशमेश शुक्राची युती आहे. दशम स्थानावरून जातकाहून वरिष्ठ अधिकाऱ्याचा बोध होतो. केनेडी हे अध्यक्ष व लिंडन जॉन्सन हे उपाध्यक्ष होते. केनेडी यांची हत्या झाली म्हणजे दशमेश शुक्र हा अष्टमेश नेपच्यूनच्या युतीत व दोघेही हर्षलच्या प्रतियोगात व शनीच्या केंद्रात आहे. तेव्हा हे योग केनेडी यांचा अकस्मात मृत्यू दर्शवितो आणि त्या मृत्यूमुळे लिंडन जॉन्सन यांच्याकडे अध्यक्ष पद आले.

कै. राजीव गांधींच्या बाबतीत जवळजवळ अशीच घटना घडली. त्यांचेही सिंह लग्न – लग्नी गुरु, रवी, शुक्र, चंद्र, बुध असे पाच ग्रह व द्वितीय स्थानी कन्येत मंगळ-नेपच्यून युती. नेपच्यून अष्टमेश व मंगळ चतुर्थेश (मातृस्थानाधिपती) मातेची इंदिरा गांधींची हत्या झाली आणि राजीव गांधी पंतप्रधान झाले. त्यांचीही हत्या झाली. कारण द्वितीय या मारक स्थानातील मंगळ-नेपच्यून युती आणि एकादशातील शनीची अष्टमावर दृष्टी !!


लिंडन जॉन्सनचे कुंडलीत जन्मकाळी शुक्राची महादशा भोग्य वर्षे १४ महिने २ दिवस २१ होती. २८ व्या वर्षी अमेरिकन काँग्रेसमध्ये प्रवेश. पुन्हा ३२ व्या वर्षी. ४० व्या वर्षी सिनेटवर व ५२ व्या वर्षी उपाध्यक्ष झाले. ही कारकीर्द राहू महादशेत झाली. त्यानंतर १६ वर्षे गुरु महादशेची त्यात केनेडीच्या हत्येनंतर अध्यक्ष. मुदत संपल्यावर पुन्हा अध्यक्ष म्हणून निवडून आले. पण व्हिएतनामच्या युद्धामुळे त्यांची नाचक्की झाली. हा शनीचा दशमेश शुक्राशी केंद्रयोग व शनीची दशमावर दृष्टी यांचा परिणाम.

दिनांक २२ जानेवारी, १९७३ रोजी त्यांना हृदयविकाराचा झटका आला व त्यातच मरण पावले. यापूर्वी १९५५ मध्येही त्यांना एक झटका आला होता. तो राहू महादशेतील मंगळ अंतर्दशेत आला. १९७३ मध्ये गुरु महादशेत (अष्टमेश गुरु) शुक्र अंतर्दशा व राहू विदशा चालू होती.

**९**

# नवम भाव

**(भाग्य - धर्म - गुरुस्थान)**




सोबतच्या कुंडलीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी नऊ हा अंक लिहिलेला आहे, त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीतील नवमस्थान किंवा नववे स्थान म्हणतात.

कुंडलीच्या नवम स्थानावरून धर्म, पुण्य, तप, ज्ञान, गुरु, आचार्य, संस्थापन, वेदाध्ययन, अंतर्ज्ञान, साक्षात्कार, परोपकार, शील, तीर्थयात्रा, दूरचे प्रवास, पित्याव्यतिरिक्त अन्य वडीलधारे, पितर-पौत्र आणि प्रामुख्याने मागील जन्मातील चांगल्या कर्माचे 'फलस्वरूप' जे भाग्य जातक या जन्मासाठी घेऊन आलेला असतो, ते नशीब अगर दैवी साहाय्य. ज्यास सर्वंकष रीतीने भाग्य असे म्हणता येईल त्याचा विचार होतो. म्हणून या स्थानास भाग्यस्थान असे सूत्ररूपाने संबोधिले आहे.

या स्थानाचे महत्त्व एवढे आहे की कुंडलीतील इतर स्थानांचा विचार करण्याअगोदर नवम भावाचा अग्रक्रमाने विचार केला पाहिजे. सारावलीकार असे आग्रहाने प्रतिपादन करतात की,

**सर्वमपहाय चिन्त्यं भाग्यर्क्षं प्राणिनां ।**
**भाग्यं विना न जन्तुर्यस्माद्यन्ततो वक्ष्ये ।।**
**(फोड-जन्तुः यस्मात् वलतो वक्ष्ये)**

दैवाची अनुकूलता, पूर्वपुण्याचा पाठिंबा म्हणजेच भाग्य, याचा विचार करून मग कुंडलीतील इतर भावांचा विचार केला जावा. कारण भाग्य नसताना, ते दैव अनुकूल नसताना जीवन सुखदायी, यशस्वी कसे होईल ?

या नवम भावाचा कारक ग्रह, 'गुरु' आहे. गुरुची कुंडलीतील स्थिती पूर्वजन्मीचे पुण्यकर्म, सत्कृत्ये, दैवाची अनुकूलता यांची शिदोरी कशी आहे याचे दिग्दर्शन करते.

नवम स्थान, नवमेश व नवमस्थ ग्रह अनुकूल, शुभ असता जातक जीवनोपाय, संपत्ती, स्त्री, संतती वगैरे बाबतीत सुखी होतो.

ज्योतिषशास्त्रात लग्न व चंद्र यांना सारखेच महत्त्व दिलेले आहे. (पण रवी म्हणजे आत्मा याकडे मात्र दुर्लक्ष झालेले आहे.) लग्न वा चंद्र यांपैकी कोण जास्त बलवान आहे हे पाहण्यासाठी जन्मकुंडलीबरोबरच राशिकुंडली (चंद्र कुंडली) मांडून दोन्हीची तुलना करून फलदेश करावा असे सारावलीकर सांगतात -

**लग्नान्निशाकाराद्वा यन्नवमं तद्ग्रहं भवेद् भाग्यम् ।**
**अनयोर्यो बलवतो भाग्यफलं चिन्तयेदस्मात् ।।**

जन्मकुंडली व चंद्र राशिकुंडली या दोन्हींचा विचार करून कोणती जास्त बलवान व परिणामकारक दिसते त्या कुंडलीच्या नवम स्थानास भाग्यस्थान मानावयाचे व त्यावरून जातकाचे नशीब-भाग्य वगैरे जाणून घ्यावयाचे असते आणि तो भाग्यस्थानाधिपती कसा आहे यावरून फलनिश्चिती करावयाची असते म्हणून -

**भाग्यर्क्षपतिः कस्मिन् को वा भाग्यर्क्षमाश्रितो विहगः ।**
**बलवान् मन्दबलो वा तस्याधिपतिस्तु कारको ज्ञेयः ।।**

नवमेश कोण आहे, कोणत्या भावात आहे, तो भाव तसेच नवमात कोणता ग्रह आहे, त्यांचे राशिबल व योगबल यावरून भाग्यकारक कोण ठरतो - फल देण्यास कोण व किती समर्थ आहे यावरून जातकास त्याचे फल उत्तम, मध्यम वा कनिष्ठ मिळेल हे जाणून घ्यावयाचे असते. ते जर दुर्बल असतील तर भाग्यात विघ्ने येतात. नवमस्थ ग्रह जर दुःस्थानेष नसेल व सुस्थानेश असेल तरीही उत्तम फल मिळते. नशिबाची श्रेणी ठरविण्याचा हा नियम आहे. तसेच -

**स्वस्वामियुक्तंदृष्टं स्वदेशफलदायकं मुनिभिरुक्तम् ।**
**अन्येन सहित दृष्टं परदेशफलप्रदं भवति भाग्यम् ।।**

नवमेशाची नवमावर दृष्टी असता व नवमेश नवमात असता जन्मदेशातच भाग्य उदयास येते. नवमेशाव्यतिरिक्त ग्रहांची दृष्टी असता अगर नवमेशाव्यतिरिक्त ग्रह नवमात असता परदेशात भाग्योदय होतो. हे जाणून घेतल्यावर कोणत्या ग्रहाची पूर्ण दृष्टी नवमावर येते हे पाहावयाचे -

**दुश्चिक्यगतो भाग्यं पंचमभवनस्थितो ग्रहः पश्येत् ।**
**होरागतश्च बलवान् येषां ते मानवाः श्रेष्ठाः ।।**

दृष्टी टाकणारे ग्रह तृतीयावरून, पंचमावरून वा लग्नातून नवम भावावर पूर्ण दृष्टी करतात. अशांच्याच दृष्टीमुळे भाग्यवृद्धी होते व तो जातक श्रेष्ठ होतो. तृतीय स्थानावरून सर्वच ग्रह नवमावर पूर्ण दृष्टीने पाहतात पण गुरु हा एकच ग्रह तृतीय, पंचम या लग्नातून नवमावर पूर्ण दृष्टी टाकतो.

शनीची दृष्टी नवमावर सात व बारा स्थानातून येते. तर मंगळाची सहा व दोन या स्थानावरून नवमावर दृष्टी येते.

नवम भाव बिंदूशी त्रिकोण व लाभयोग सर्वच ग्रह करू शकतात तेव्हा असाही विचार केला जावा असे मी सुचवितो.

त्याचप्रमाणे लग्नकुंडली व चंद्रकुंडलीइतकीच रवीकुंडलीसुद्धा महत्त्वाची आहे व त्याचाही विचार केला जावा आणि तीनही कुंडल्या भावचलित स्पष्ट भावासह मांडल्या जाव्यात व त्यावरून जी कुंडली बलवान व परिणामकारक ठरते त्याचा नवम स्थानावरून विचार केला जावा असेही सुचवितो. तसेच या तीनही कुंडल्यांचे कार्यक्षेत्र निरनिराळे आहे का याचाही अनुभव तज्ज्ञांनी घ्यावा असेही सुचवितो.

नवम स्थानावरून भाग्याव्यतिरिक्त तप, धर्माचरण, परदेश प्रवास यांचाही विचार होतो. तसेच औषधीचाही विचार होतो. असे उत्तर कालामृतात सुचविले आहे. तसेच वडिलार्जित संपत्ती, नातू व नाती (पौत्र) यज्ञ, तीर्थयात्रा आणि विद्या ज्ञानार्जनाकरिता करावे लागणारे श्रम, प्रयास आदि पदव्युत्तर शोधनिबंध, उच्च विद्या यांचाही विचार या स्थानावरून करण्याचा प्रघात पडला आहे.

दक्षिणेत पित्याचा विचार नवम स्थानावरून केला जातो पण महाराष्ट्र व उत्तरेत पित्याचा विचार दशम स्थानावरून केला जातो तेच योग्य आहे.

शरीरावयांपैकी मांड्यांचा विचार या स्थानावरून होतो. मैदानी खेळांचा विचारही नवम स्थानावरून होतो. दानशूरत्व याच स्थानावरून दिसते.

सारावली

**धर्मरहितोऽल्पधनिकः सहजसुतविवर्जितो नवमसंस्थे ।**

**रवीजे सौख्यविहीनः परोपतापी च जायते मनुजः ।।**

जातक धार्मिक नसतो, त्याजपाशी संपत्ती थोडी असते. त्यास भावंडे नसतात, संतती नसते व सुखही लाभत नाही. जातक दुसऱ्यांनाच त्रास देतो.

त्याची पत्नी लवकर जाते व उत्तरायुष्यात जातक अध्यात्माकडे वळतो. जातक सार्वजनिक ठिकाणे जी जीर्ण झालेली असतात त्यांचे नूतनीकरण करण्याचा प्रयत्न करतो.

स्त्री जातकीस विद्या नसते व दैव प्रतिकूल असते.

डॉ. रामन यांच्या मते, जातक मित्रमंडळीत मिसळत नाही. एकटाच राहतो. पण रणक्षेत्रावर पराक्रम गाजवितो व धार्मिक संस्था स्थापन करतो.

शनीची तृतीयावर दृष्टी म्हणून भावंडे नाहीत. तो पंचमाच्या पंचमात पापग्रह म्हणून संतती सौख्य नाही.

शनी कोणत्या भावाचा अधिपती आहे व नवमात कोणत्या राशीत येतो, नवमेशाची स्थिती कशी आहे व त्याचे कोणाशी शुभाशुभ योग आहेत यावरून फलाचा अंदाज घेतला जावा.

साधारणत: धर्म, तत्त्वज्ञान, परदेश प्रवास, अध्यात्म, शास्त्राचे ज्ञान, तीर्थक्षेत्रे, दीक्षा देणारा गुरु, तप, योग यापासून मिळणाऱ्या सिद्धी यांचा विचार नवम स्थानावरून होतो. या सर्व गोष्टीस शनी स्वभावत: योग्य असतो. पण स्वक्षेत्री उच्च असल्यास उत्तम फले मिळतात. सर्वसाधारणत: लग्नेश ज्या भावात असेल त्या भावास बल प्राप्त होते व जीवनक्रमात त्यास महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. मकर व कुंभ लग्नास नवम स्थानातील शनी वर नमूद केलेल्या गोष्टींमध्ये गती, प्रावीण्य दर्शवितो.

स्वामी विवेकानंद यांच्या कुंडलीत शनी कन्या राशीस नवमात आहे. तर रामकृष्ण परमहंस यांच्या कुंडलीत शनी तुलेचा नवमात आहे. जगप्रसिद्ध जे. कृष्णमूर्ती यांचाही शनी तुलेतच नवमात आहे. गौतमबुद्ध व आद्य शंकराचार्य यांच्याही कुंडलीत शनी नवमात आहे.

तसेच शनी केंद्र कोणाधिपती असून तो नवमात असता योगकारक असतो.

शनी शुभ असल्यास धार्मिक असतो. तत्त्वज्ञान व विज्ञान यांचा अभ्यास होतो व परदेश प्रवासही होतो व ते प्रवास यशस्वी होतात.

अशुभ असता जातक अधार्मिक होतो. संततिसुख नसते. बंधुवर्गापासून बाजूस पडलेला असतो. दु:खी, एकटा व एकलकोंडा असे आयुष्य काढण्याचा प्रसंग येतो. काटकसरी असतो. पण संपत्ती फारसी मिळत नाही.

## नवमस्थ शनीची राशिनिहाय भावफले

**(१) मेषेचा शनी :** नवम स्थानी जर एक हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मेषेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


शनी षष्ठेश व सप्तमेश असून नवम स्थानात मेष राशीत नीचक्षेत्री येतो. सप्तमेश नवमात नीचराशीत हे वैवाहिक सुखास प्रतिकूल ठरते. तसेच व्यवसायात नुकसानीस कारणीभूत होतो. व्यापारधंद्यात भागीदारामुळे मोठे नुकसान होते. स्त्री जातकींचे बाबतीत शनी विवाहाला प्रतिबंधकच ठरतो.

लग्नेश रवी, योगकारक मंगळ व गुरु यांची साथ शनीस असता मात्र शुभफलदायी शनी ठरतो.

### कुंडली : श्री. वामन हरी काटकर

जन्म सोमवार दिनांक ८ जानेवारी, १९१२ रोजी रात्रौ १० वा. ३९ मि. प्र. वेळ सोलापूर येथे. अक्षांश १७° उ. ४३′ रेखांश ७५° पू. ५४′. अयनांश २२° ३७′ ३५″. सां. स. ५ ता. १९ मि. ३० से.

शुक्र महादशा भोग्य वर्षे ६ महिने १० दिवस ३.




शिक्षण मॅट्रिक फक्त, १९३३ पुढे नाही. विवाह १७.०६.१९३७. संतती १९३९ मुलगा झाला व गेला. पुतण्यास दत्तक घेतले. २६.१०.४१ वडील वारले. १९३४ पासून व्यापार सुरू केला व तो चांगला चालला. १९४३ पर्यंत पैसा खूप मिळविला. २१.०२.१९४३ नवीन मोठा सुंदर वाडा विकत घेतला. १९४३-४७ भागीदारीत धंदा. पैसा मिळविला. पण भागीदाराने फसविले. त्यामुळे १९४८ भागीदारी बंद झाली पण १९४९-५२ मिळालेला सर्व पैसा गेला. नुकसान झाल्यामुळे.

१९५२-५४ वाईट परिस्थिती - मानहानी - स्थावर विकावी लागली. भांडणे व वाटण्या झाल्या. १९५५-५६ धान्याचा व्यापार. १९५८-५९ नुकसान.

शेवटी हार्ट फेलने मृत्यू. सप्तमेश शनी नीच राशीत नीचभंग नाही. त्यामुळे भागीदारीत नुकसान. षष्ठेश शनी त्याची षष्ठावर दृष्टी व लाभस्थानावरही दृष्टी असल्याने नुकसान तर झालेच पण कर्जही झाले. योगकारक मंगळ नवम-दशमच्या भाव संधीवर आहे.

गुरु-शुक्राचे साहाय्य मिळाले नाही.

राहू महादशेत शनी-बुध-केतू या अंतर्दशा व त्यानंतर मंगळाची अंतर्दशा वाईट गेल्या - मानहानी, नुकसान, भागीदाराची फसवणूक या गोष्टी झाल्या.


**(२) वृषभेचा शनी :** नवमस्थानी जर दोन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी पंचमेश व षष्ठेश असतो व नवमात वृषभ राशीस मित्रक्षेत्री येतो. लग्न बुधाच्या राशीचे म्हणजे मित्राचेच असते. त्यामुळे शनी नवम स्थानात जातकाची भाग्यवृद्धी करतो. बुध लग्नेश तसाच दशमेशही असतो आणि त्याची व शनीची दृष्टी एकमेकांवर असता अगर बुध शनीमध्ये लाभयोग, त्रिकोणयोग असता व्यवसायात प्रगती होते.

तसेच नवमेश शुक्राशीही शनीचा शुभयोग होत असता उत्तम धनलाभ होतो कारण शुक्र नवमेश तसा धनेशही असतो. एकूण समग्र ग्रहयोगांचा विचार करून नवमस्थ शनीबाबत निर्णय घ्यावा लागेल.

### कुंडली : डॉ. ..................

जन्म शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर १९१३ रोजी पहाटे ३ वा. २० मि. बागुसराई (बिहार) येथे. अक्षांश २५° उ. ३५′ रेखांश ८६° ८′ पूर्व. अयनांश २२° ३९′ २०″. सां. स. ७ ता. २१ मि. ६ से. (General Medical Practitioner).




लग्नेश बुध व व्ययेश रवी यांची युती वृश्चिकेत व समोर नवमात शनी वृषभेत. परस्पर दृष्टियोग.

कन्या ही आरोग्याची रास. त्याचा अधिपती व व्ययेश रवी यांची युती मंगळाच्या वृश्चिक राशीत. त्यांचा त्रिकोण योग हॉस्पिटलांचा कारक ग्रह नेपच्यून याच्याशी आहे म्हणजे कन्या-वृश्चिक-मीनेच्या त्रिकोणास महत्त्व आले. नवमस्थ शनी स्वत: षष्ठेश तेथे राहू आणि व्ययात केतू यांच्याशी केंद्रयोग. हे सर्व वैद्यकीय व्यवसाय दर्शवितात. शनीची दृष्टी कुंभ, कर्क व वृश्चिक यांच्यावर येते. यास महत्त्व आहे.

नवमेश व धनेश शुक्र द्वितीयाजवळ तुळेत आहे. गुरुची चतुर्थातून दशमावर पूर्ण दृष्टी आहे. त्यामुळे समृद्धी आहे.

**(३) मिथुनेचा शनी** : नवमस्थानी जर तीन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


शनी योगकारक असून चौथ्या व पाचव्या भावाचा अधिपती असतो व नवम स्थानात मिथुनेत मित्रक्षेत्री येतो. चतुर्थेश नवमात येणे हे विद्याप्राप्तीचे दृष्टीने, परदेशगमनाचे दृष्टीने उत्तम ठरते. त्याचप्रमाणे स्थावर मालमत्तेचे सुख लाभते. शनी शुभ वर्गात असता जातक गर्भश्रीमंत असतो. एरवीसुद्धा हा शनी भाग्यकारक - नशीबवान ठरतो.

नवम स्थान हे जसे आधिभौतिकदृष्ट्या चांगले असते तसेच मोक्षप्राप्ती वा आध्यात्मिकदृष्ट्याही उत्तम असते. याच स्थानावरून धर्म, तत्त्वज्ञान, अध्यात्मशास्त्रज्ञान, तीर्थक्षेत्रे, दीक्षा देणारा गुरु, साक्षात्कार, तपयोग यांच्या प्रभावाने मिळणाऱ्या सिद्धी, होणाऱ्या घटनांचे स्वप्नाद्वारे मिळणारे दिग्दर्शन अशाही गोष्टी अनुभवास येतात. यासाठी विरक्तीदर्शक व तत्त्वज्ञानी शनी नवम स्थानात चांगला ठरतो.

## कुंडली : श्रीमान अंबुराव महाराज

जन्म सोमवार दिनांक २२ सप्टेंबर १८५६ रोजी सकाळी ८ वा. जिगपेणी, ता. इंडी येथे झाला. अक्षांश १७° उ. १०′ रेखांश ७६° पूर्व. अयनांश २१° ५१′ ३१″. सां. स. ८ ता. ४ मि. ३५ से.

जन्मकाळी राहूची महादशा भोग्य वर्षे २ महिने ५ दिवस ५ तास




भाऊसाहेब उमदीकरांचे शिष्य. आजानुबाहू, डोळ्यांचे दुखणे. योगकार शनी भाग्यात दशमेश चंद्रासह, भाग्येश बुध लग्नी आहे.

लग्नेश शुक्र व्ययात केतूचे युतीत. त्यावर गुरुची मीनेतून दृष्टी. नवमात चंद्र. शनी युती, विवेकानंद, रामकृष्ण परमहंस या दोघांच्या कुंडलीत पाहण्यास सापडते. ३६ व्या वर्षी दीक्षा मिळाली. त्या वेळी शनीची महादशा व गुरुची अंतर्दशा चालू होती. योगकारक शनीची गुरुवर दृष्टी आहे. त्या वेळी गोचर शनी व्ययातून कन्या राशीत भ्रमण करीत होता व गोचर गुरु षष्ठात मीनेत चालू होता.


**(४) कर्केचा शनी :** नवमस्थानी जर चार हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कर्केचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

नवमावर कर्क रास येते व शनी तृतीय व चतुर्थ भावाचा अधिपती असून नवमात कर्केत निर्बली राशीत आहे. चंद्रास पक्षबल नसता शनीच्या येथील उपस्थितीने भाग्य

उदयात अनेक अडथळे व अडचणी येतात पण पक्षबल असता चंद्राची स्थिती जसजशी चांगली होत जाईल तसतशी यांत सुधारणा होत जाते. शनी दशमाच्या व्ययात येतो व पिता व व्यवसाय यास अनिष्ट बनतो.

### कुंडली : पुरुष जातक

जन्म शुक्रवार दिनांक २ मे, १९४७ रोजी रात्रौ ७ वा. २० मि. प्र. वेळ. अक्षांश २३° उ. २१′ रेखांश ८२° पू. २१′. अयनांश २३° ७′ ३″. सां. स. ९ ता. ५७ मि. ५० से.




ही कुंडली खालील पुस्तकातून घेतली.

How to judge a Horoscope by Dr. B. V. Raman V of II P 202/3

चंद्र महादशा भोग्य वर्षे ४ म. ९ दि. १९

शनी नवमात आहे. तो कर्केत आहे. त्याचा अधिपती चंद्र लाभस्थानात नेपच्यूनच्या युतीत आहे.

पितृस्थानाधिप व पितृकारक रवी मेषेत आहे पण तो षष्ठस्थानात आहे. दशमाच्या व्ययात शनी व पुढे नेपच्यून आहे. दशम पापमध्यस्थ आहे.

पितृकारक व पितृस्थानाधिप रवी हा शनीच्या दृष्टीत आहेच पण त्याशिवाय त्याच्या मागे मंगळ व पुढे राहू, हर्षल आहेत. रवीवर कोणाची शुभ दृष्टी नाही की दशमावर शुभ दृष्टी नाही. या सर्व कारणांनी पितृसुख लवकर हरपले. त्या वेळी मंगळ महादशेत. शनी अंतर्दशा चालू होती. रवीच्या व्ययात मंगळ व शनी रवीच्या चतुर्थात तसेच दशमाच्या अष्टमात मंगळ व व्ययात शनी. यामुळे मंगळ महादशा व शनी अंतर्दशेत पित्याचा मृत्यू होणे हे बरोबर बसते.

(५) **सिंहेचा शनी :** नवमस्थानी जर पाच हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'सिंहेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


शनी द्वितीयेश व तृतीयेश असून नवमात सिंह राशीत शत्रुक्षेत्री येतो. शनी धनेश असल्याने संपत्ती चांगली मिळेल. स्वकर्तृत्वावर व श्रीमंत लोकांकडून धनलाभ होईल. सिंहेत असल्याने सरकारकडूनही पैसा मिळेल. सरकारी नोकरीतून धनलाभ होईल.

या लग्नास बुध दशमेश असल्याने त्याचा शनीशी शुभयोग. दशमेश-धनेश शुभयोग होत असताना व्यवसायात धनलाभ व त्यामुळे समृद्धी होईल. शुक्र लाभेश असल्याने त्याच्याही शुभयोगाचा फायदा व्यावसायिकदृष्ट्या होईल.

तसेच खुद्द लग्नेशाची दृष्टी असता जातक संपत्तिमान, गावात लौकिक मिळविलेला होतो.

## कुंडली : स्त्री जातक डॉक्टर

जन्म सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी १९४७ रोजी पहाटे ४ वा. ३० मि. प्र. वेळ. अंदाजे ॲ. मॅगेझीन १९८६ पान क्र. ७९८ कुं. क्र. १२. अयनांश २३° ६′ ४९″. सां. स. २ ता. ५० मि. ९ से.




नवमेश रवी द्वितीयात मकरेत आहे. रवी व शनी अन्योन्य क्षेत्र योग. त्यामुळे शनीचे अशुभत्व कमी होऊन शुभत्व प्राप्त झाले आहे. रवी धनस्थानी दशमेश बुधाचेही युतीत आहे.

मंगळ धनभाव बिंदूजवळ मकरेत आहे. त्याची शनीवर दृष्टी येते. नवमेश-दशमेश व पंचमेश व्ययेश हे धनस्थानी मकरेत आहेत. लग्नेश गुरु वृश्चिकेत आहे. यामुळे जातकी वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी होत आहे.

अष्टमेश चंद्र सप्तमात शनीच्या लाभयोगात आहे. तसेच दशमबिंदूवर नेपच्यून ग्रह (हॉस्पिटलदर्शक) आहे. व्ययात केतू हा ग्रह वैद्यकीय क्षेत्रच दाखवितो. चंद्र हा औषधे व

शुश्रूषा यांचा कारक आहे. चतुर्थेश नेपच्यून व दशमेश बुध यांचा त्रिकोण उच्च वैद्यकीय शिक्षण दर्शवितो.

**(६) कन्येचा शनी :** नवमस्थानी जर सहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

या लग्नास शनी लग्नेश व द्वितीयेश असतो आणि नवमात कन्या वा तूळ राशीत येतो. धनु लग्न १७/१८ अंशाच्या पुढे असल्यास दशमावर तूळ रास येते. तसेच मकर लग्न सुमारे २० अंशाच्या आत असता दशमावर तूळ रास राहते पण त्यापुढील अंश लग्नी असता दशमावर वृश्चिक रास व नवमावर तूळ रास येते.

लग्न मकर म्हटल्यावर नवमावर कन्या रास व दशमावर तूळ रास असतेच असे गृहीत धरले जाऊ नये. आकडे कुंडलीत तसे मांडण्याचा प्रघात आहे पण भावचलितांत नवमावर कन्या अगर तूळ रास येऊ शकते. भावचलित कुंडलीच ग्राह्य धरून ग्रह कोणत्या राशीत प्रत्येक भावमध्यास येतो ते पाहूनच भावेश ठरवून त्यानुसार फले वर्तवली पाहिजेत.


मकर लग्नाच्या वेळी नवमावर कन्या रास असता आर्थिक लाभ उत्तम होतो. पण जातकास पित्याचे सुख लाभत नाही आणि त्याचे संगोपन अन्य नातेवाईक करतात.

पण नवमावर तूळ रास येत असता शनी आपल्या उच्च राशीस येतो व तो नशीबवान ठरतो. धनेशही उच्च असल्याने उत्तम धनलाभ होतो. तसेच लग्नेश शनी उच्च असल्याने जातक दीर्घायुषी होतो. परदेश प्रवासही होतो. तो विद्वान, उच्च-विद्याविभूषित असतो व त्यास सरकारात मानाच्या उच्च जागा मिळतात.

### कुंडली : श्रीमती सुशीला चौराशिया

जन्म रविवार १ नोव्हेंबर, १९२३ रोजी १ वा. ३० मि. प्र. वेळ विजापूर येथे. अक्षांश १६° उ. ५१′ रेखांश ७५° ४४′ पू. अयनांश २२° ४७′ ३०″. सां. स. १५ ता. ४१ मि. २० से.

शिक्षण B.A.L.L.B. केंद्र सरकारात विविध खात्यांत काम केले. १९४९ पोस्ट खात्यात प्रथम नोकरी. राजपत्रित अधिकारी म्हणून सुरुवात. हिंदुस्थानभर व परदेशातही प्रवास. कॉमनवेल्थ कौन्सिलचे सभासद म्हणून अमेरिका व कॅनडास जाणे. १९७८ मध्ये कॉमनवेल्थ रीजनल सेमिनारमध्ये भाग घेण्यास कोलंबो येथे प्रयाण. संरक्षण खात्यात उपसचिव व त्यानंतर २४.०५.१९७९ रोजी पोस्ट मास्तर जनरल. गुरु-शुक्र ४° त युती दशमबिंदूजवळ. बुध-शनी नवमबिंदूवर. लग्नेश शनी पंचमेश बुध युती. त्यांची तृतीय स्थानावर दृष्टी. म्हणून पोस्टखात्यात नोकरीस सुरुवात व उच्च पदापर्यंत पोहोचून मग निवृत्त. तृतीयेश-दशमेश मंगळ कन्या राशीत. चंद्र त्रिकोण गुरु व दशम बिंदू दशमेश मंगळ द्विस्वभाव राशीत. एकापेक्षा अनेक खात्यात काम व नोकरीचा शेवट. मूळच्या टपालखात्याचे डायरेक्टर. नवमात ४ ग्रह - अनेक प्रवास.





**(७) तुळेचा शनी :** नवमस्थानी जर सात हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'तुळेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –

कुंभ लग्न उदित असता मकर रास व्ययात असते. शनी लग्नेश तसा व्ययेश असून नवमस्थानात तुळेत येतो. येथे व्ययेशाचेही फल मिळते. पण त्यासाठी शनी अशुभ योगातही असावा लागतो.

## कुंडली : श्री. यशवंत नामदेव अत्रे

जन्म रविवार १ फेब्रुवारी, १९२५ रोजी सकाळी ७ वा. ४७ मि. स्था. वेळ पंढरपूर येथे. अक्षांश १७° उ. ३९′ रेखांश ७५° २०′ पू. अयनांश २२° ४८′ २७″. सां. स. १६ ता. ३० मि. ११ से.




लग्नेश शनी तुलेत लाभयोग गुरु-बुध-शुक्र म्हणून B.A.L.L.B. वकिली व्यवसाय. उत्तम काम करणारे.

शनीची चंद्रावर व षष्ठस्थ राहू व नेपच्यूनवर दृष्टी.

रवी केंद्रयोग शनी, शनी केंद्रयोग राहू-नेपच्यून आणि शनी प्रतियोग चंद्र ३, ६, ९, १२ या स्थानातून अंशात्मक केंद्र व प्रतियोग आहे.

जातक स्कूटरवरून सोलापूर-पंढरपूरला जात असता एक बाई बसचे मागून एकदम पुढे आली. तिला वाचविण्याचे प्रयत्नात स्कूटर पडली व जातकही चांगलाच आपटला गेला व पाठीस व हातापायास जबरदस्त दुखापत. त्वरित उपचार झाले पण मज्जारज्जूचे स्नायूंना व मणक्यास दुखापत. कमरेत मार, पाय पंगू व एक हातही अधू झाला. शनी केंद्रयोग नेपच्यून शनी व्ययेश बिघडला त्यामुळे पंगुत्व.

**(८) वृश्चिकेचा शनी :** नवमस्थानी जर आठ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृश्चिकेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी लाभेश व व्ययेश असून तो नवमात वृश्चिक या मंगळाच्या राशीत येतो. वृश्चिक ही गूढ रास आहे आणि शनी कुंभ या तत्त्वज्ञानाच्या राशीचा अधिपती. तो मोक्षस्थानाचा अधिपती आहे. मीन लग्न हेच मुळी मोक्षदर्शक बारावी रास आहे.

शनी शत्रुराशीत असल्याने तो भौतिक लाभ देणारा ठरत नाही.

मीन लग्नास मंगळ धनेश व भाग्येश असतो, त्याची दृष्टी शनीवर असता धनेश-लाभेश संबंध शुभ ठरतो. तसाच भाग्येश लाभेश असाही संबंध शुभ ठरेल.


त्याचप्रमाणे गुरु लग्नेश व दशमेश असतो. त्याचाही शनीशी शुभ संबंध असता दशमेश-लाभेश योग होतो व तो उद्योग-व्यवसायात चांगली फले देईल.

एकूण भोग का मोक्ष यांचा विचार एकूण ग्रहस्थितीवर व ग्रहयोगावर अवलंबून राहील.

## कुंडली : श्री. एम. एस. पुरंदरे


जन्म शुक्रवार २५ फेब्रुवारी, १९२७ रोजी सकाळी ८ वा. ४१ मि. प्र. वेळ बेळगाव येथे. अक्षांश १५° उ. ५२′ रेखांश ७४° ३४′. अयनांश २२° ५०′ ६″. सां. स. १८ ता. २५ मि. १२ से.

पंचमेश चंद्र लाभेश व व्ययेश शनीसह नवमात आहे. त्यावर नवमेश व धनेश मंगळाची दृष्टी आहे. मंगळ पराक्रम स्थानात असून त्याची व शनीची दृष्टी षष्ठस्थानावर आहे. षष्ठेश रवी व दशमेश गुरु यांचीही दृष्टी षष्ठस्थानावर आहे. मंगळ कृत्तिका नक्षत्रात आहे. नवांश कुंडलीत लग्न वृश्चिक असून त्यातील तृतीयेश शनी लग्नी येतो. या सर्वांचा विचार करता मंगळाचे व्यवसायास प्राधान्य येते. शिवाय राश्याधिपतीही मंगळ आहे. यामुळे लष्कर वा पोलीस खात्यात नोकरी लागेल. जातक पोलीस खात्यात नोकरीस. सबइन्स्पेक्टर म्हणून नोकरीस होता.




**कुंडली : श्री. निसर्गदत्त महाराज**

जन्म शनिवार दिनांक १७ एप्रिल, १८९७ रोजी पहाटे ५ वा. २० मि. मुंबई येथे. अक्षांश १८° उ. ५४′ रेखांश ७२° ५०′ पूर्व. अयनांश २२° २५′ २०″. सां. स. १९ ता. १ मि. ३५ से.




श्री सिद्ध रामेश्वरमहाराजांचे शिष्य. ३६ व्या वर्षी सद्गुरू भेट. देशपर्यटन. पारंपरिक ग्रंथांवर निरुपणे. ५४ व्या वर्षापासून नाममंत्र.


लग्नेश गुरु पंचमात त्रिकोण रवी लग्नी गुरुवर शनीची दृष्टी आहे. शनी व्ययेश आहे. रवी गुरु, रवी ८ चंद्र, चंद्र पंचमेश आहे. त्याचा रवीशी प्रतियोग व त्या दोघांशी गुरुचा शुभयोग. व्ययेश हर्षल व मोक्षकारक केतू यांचा त्रिकोण अध्यात्मदृष्ट्या बलवत्तर. शनी विरक्ती दर्शवितो.

**(९) धनुचा शनी :** नवमस्थानी जर नऊ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला ‘धनुचा शनी’ असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

नवमावर धनु रास येते. शनी दशमेश व लाभेश असून नवमात गुरुच्या राशीत येतो. येथे शनीची शुभ फले मिळावयास पाहिजेत. त्यातून गुरुची दृष्टी वा सहयोग अधिक उत्तम फले देईल. शनी येथे शुभ व बलवान असल्याने जातकाचा पिता सुखी व धनवान असतो. शनी दशमेश भाग्यात यामुळे जातकास व्यवसायात यश व समृद्धी होते. त्याची भरभराट होते. त्याच्या हातून अनेक व उत्तम कामे पार पडतात. जातक चांगलाच नशीबवान ठरतो. तो धार्मिक असतो व आरोग्य उत्तम राखले जाते. पण शनी जर दूषित व पीडित असेल तर वरीलसारखी फले मिळत नाहीत. न्यूनता येते.

## कुंडली : श्री. सुमनलाल दीपचंद व्होरा

जन्म सोमवार ११ मार्च, १९२९ रोजी सकाळी ९ वा. ५ मि. अकलूज येथे. अक्षांश १८° उ. रेखांश ७५° पूर्व. अयनांश २२° ५१′ ५२″. सां. स. १९ ता. ४७ मि. ४७ से.




अकलूज, सोलापूर, सांगली व अन्य ठिकाणी व्होरा भाईचंद हेमचंद या नावाची मोठी व्यापारी पेढी होती. त्यातल्या एका भागीदाराचे सुपुत्र यांना आणखी दोन धाकटे भाऊ होते. सर्व बंधू सुशिक्षित पदवीधर. जातक इंजिनिअर, एक भाऊ डॉक्टर, एक भाऊ बी. फार्मा.

जातक इंजिनिअर. B.E. झाल्यावर १९५३ साली परदेशात उच्च शिक्षणास गेले होते. शनी दशमेश नवमात - लग्नेश मंगळाच्या दृष्टीत व नवमेश गुरुच्या दृष्टीत. शनी त्रिकोण शुक्र (धनेश) शुक्र लाभयोग मंगळ, त्रिकोण नेपच्यून.

नवमस्थ शनीने परदेश प्रवास व उच्च शिक्षण दिले. जातक संपत्ती, स्त्री व संततीयुक्त आहे. व्यक्तिमत्त्व चांगले आहे.

शनी महादशेत मंगळाची अंतर्दशा असता परदेश प्रवास झाला.


**(१०) मकरेचा शनी :** नवमस्थानी जर दहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

वृषभ या लग्नास शनी योगकारक असून तो नवमेश व दशमेश असतो आणि नवम स्थानात मकरेत स्वगृही येतो. शनी येथे बलवान असतो. जातक सर्वसाधारणपणे नशीबवान असतो पण पितृसुखाचे बाबतीत तो योग्य ठरत नाही. अर्थात रवीच्या शुभाशुभ स्थितीवर हे अवलंबून राहील. चंद्र कृष्णपक्षात असता जातक भावंडांच्या बाबतीतही सुखी नसतो. भावंडे जातात. अगर त्यांच्याशी संबंध फारसे सलोख्याचे नसतात.

जातक आपल्या व्यवसायात सुदैवी असतो व यशस्वी होतो.

## कुंडली : स्त्री जातक

जन्म शनिवार दिनांक १४ ऑक्टोबर, १९३३ रोजी रात्रौ ८ वा. ३८ मि. बफॅलो न्यूयॉर्क - अमेरिका. अयनांश २२° ५६′ ६″. अक्षांश ४२° उत्तर ५३′ रेखांश ७८° पश्चिम ५३′. सां. स. २१ ता. ५१ मि. ३० से.




व्यवसाय नर्सचा. ५ वर्षे विश्वविद्यालयात B.Sc. व नर्सिंगचा अभ्यास पुरा करण्यात गेली. क्लिनिक व हॉस्पिटलमध्ये व्यवस्थापकाच्या जागेसाठी तयारी करण्यासाठी हे शिक्षण. षष्ठेश शुक्र व व्ययेश मंगळ यांची युती सप्तमाजवळ व त्या युतीचा भाग्येश शनीशी लाभयोग आहे व गुरुशी लाभयोग आहे. गुरु त्रिकोण शनी व मंगळाची दशमावर दृष्टी यामुळे व्यवस्थापकाची नोकरी झाली. मंगळ-शुक्र युती ही नर्सिंगचा व्यवसाय (त्यांच्या भावाधिपत्यामुळे) व मंगळाच्या दशमावरील दृष्टीमुळे अधिकार योग. बुध द्वितीयेश षष्ठात त्रिकोण योग दशम भाव.


**(११) कुंभेचा शनी :** नवम स्थानी जर अकरा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी मिथुन या लग्नास अष्टमेश व नवमेश असतो आणि तो नवमात कुंभ या मूलत्रिकोण राशीत येतो. शनीची तिसरी दृष्टी लाभातील मेष राशीवर, दहावी दृष्टी षष्ठातील वृश्चिक राशीवर व तृतीयातील सिंह राशीवर येते. तीन, सहा व अकरा यांचे अधिपती शनीचे शत्रू आहेत. त्यामुळे या स्थानातील ग्रहांची अशुभ फले मिळतील. शनी अष्टमेश तसा नवमेश असतो तेव्हा शनीची मिश्र फले मिळतील.

## कुंडली : श्रीमती अंजली

जन्म मंगळवार दिनांक १९ ऑक्टोबर १९६५ रोजी रात्रौ १० वा. ५५ मि. प्र. वेळ अक्कलकोट येथे. अक्षांश १७° उ. ३१′ रेखांश ७६° पूर्व १४′. अयनांश २३° २२′ ३०″. सां. स. ० ता. १९ मि. ५५ से.

जन्मकाळी बुध महादशा भोग्य वर्षे २ महिना ० दिवस २२.




लग्नेश बुध तुलेत त्रिकोणयोग. नवमेश शनी योग अंशात्मक आहे.

सप्तमेश गुरु मिथुनेत वक्री व त्याची सप्तमावर पूर्ण दृष्टी तशीच बुध व शनी यांच्यावरही पूर्ण दृष्टी. विवाहकारक शुक्र षष्ठात मंगळाच्या युतीत व शनीच्या दृष्टीत.

दिनांक २५.०६.१९८८ विवाह शुक्रमहादशा शनीभुक्ती बुध अंतर.

दिनांक १५.०६.१९८९ पतीस स्कूटरवरून पडून अपघात व मृत्यू. शुक्र-शनी-रवी-शुक्र हे मंगळाच्या युतीत व शनीच्या दृष्टीत. तसेच पतिकारक रवी शनीशी १३५° चा अशुभ योग. तसाच मंगळाशी ४५° चा क्रूर योग. शनीच्या नवमेशत्वाने विवाह घडविला पण शनीच्या अष्टमेशत्वाने विवाह खंडित झाला. शुक्रही बिघडला व पतिकारक रवीही बिघडला.

पुनर्विवाह १९९४ साली. शुक्र महादशा बुधभुक्तीत. दिनवर्ष पद्धतीनुसार त्या वेळी चलित शुक्र सप्तमाशी युती व बुध-शनीबरोबर लाभयोग करीत होता.


**(१२) मीनेचा शनी :** नवम स्थानी जर बारा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मीनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी सप्तमेश व अष्टमेश असून नवमात मीन राशीत येतो. सप्तमेश भाग्यस्थानात. ही स्थिती विवाहसुखाच्या दृष्टीने चांगली असते. जातकाची पत्नी अंगापिंडाने धष्टपुष्ट व दणकट असते व ती नशीबवान ठरते. चंद्र मंगळाचा शनीशी शुभयोग. संपत्ती, विवाहसुख व कौटुंबिक सुखाच्या दृष्टीने चांगलेच ठरतात. गुरुची दृष्टी जातकास मंत्री, न्यायाधीश वगैरे पदाधिकार देववते. गुरुची युती त्या दृष्टीने उत्तमच ठरते.

## कुंडली : पुरुष जातक

जन्म मंगळवार २० एप्रिल, १८८० रोजी दुपारी १२ वा. स्था. मद्रास येथे. अक्षांश १३° उ. ४′ रेखांश ८०° १८′ पू. अयनांश २२° ११′ ८″. सां. स. १ ता. ५५ मि. २७ से.

पंडितभूषण सुब्रह्मण्यम शास्त्री यांची उत्तरकालामृतावरील पान १०५ वरील कुंडली.




मद्रास सरकारच्या न्यायखात्यात जिल्हा न्यायाधीशाच्या पदापर्यंत पोहोचून तेथून निवृत्त झालेल्या जातकाची ही कुंडली आहे. त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांना दिवाणबहादूर ही पदवी इंग्रज सरकारकडून प्राप्त झाली होती.

रवी दशमात उच्चांशाचे निकट आहे. सप्तमेश शनी नवमात वर्गोत्तम आहे व तो गुरुच्या राशीत आहे. गुरु व शनी दशमापासून नवमेश व दशमेश आहेत. हा मध्यम प्रतीचा राजयोग आहे. (उत्तरकालामृत अध्याय ४ श्लोक ४ प्रमाणे हा राजयोग आहे).


तसेच श्लोक १६ अनुसार रवी व शनी धर्मस्थानी असणे शुभ फलदायक आहे. त्यातच असे म्हटले आहे की, शनी आपल्या उच्च राशीत, स्वराशीत अथवा गुरुच्या राशीतही शुभच असतो. शनीच्या राशीशिवाय अन्य राशीत शुक्र व्ययात असतानासुद्धा शुभप्रद असतो.

जातक मोठ्या व उदार मनाचा व परोपकारी, धार्मिक वृत्तीचा व दानधर्म करणारा होता. कर्क लग्नाचा राजयोगकारक मंगळ व्ययात कोणाच्याही शुभदृष्टीत नसल्याने आणखी उच्च पद प्राप्त झाले नाही.

# १०

# दशम भाव

## (कर्म - व्यवसाय - मान - कीर्ती - पितृस्थान)




सोबतच्या कुंडलीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी दहा हा अंक लिहिलेला आहे, त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीतील दशम स्थान किंवा दहावे स्थान म्हणतात.

या स्थानावरून उपजीविकेसाठी जे कर्म, जो व्यवसाय करावा लागतो त्याबद्दल मिळणारा मान, त्यातील यश, कीर्ती यांचा प्रामुख्याने विचार होतो. या स्थानास आज्ञा असे म्हणतात. आज्ञा देण्याचा मान असणारा, तो अधिकारी, त्यावरून मिळणारी प्रतिष्ठा, प्रसिद्धी, यश, कीर्ती व होणारा सन्मान राजदरबारी अगर लोकमानसात यांचा विचार होतो.

नातेवाइकांपैकी जनक पित्याचा विचार याच स्थानावरून होतो. महाराष्ट्र व त्याच्या उत्तरेस या दशमभावास पितृस्थान अशी संज्ञा आहे. पण दक्षिणेकडे पित्याचा विचार नवम स्थानावरून केला जातो. जननी-आईचे स्थान चतुर्थात आहे. त्यास आपण मातृस्थान म्हणतो. दक्षिणेकडेही तेच मातृस्थान आहे. चतुर्थाचा सप्तम म्हणजे आई - जननीचा पतिदर्शक आहे. ते स्थान वास्तविक दशम हेच आहे. म्हणून दशम हे पितृस्थान मानले आहे व तेच संयुक्तिक आहे. पित्याखेरीज अन्य वडीलधारी, आजोबा, पणजोबा वगैरे पितरांचा विचार नवम स्थानावरून करणे योग्य होईल.

शरीरावयवांपैकी गुडघे - ज्याचे आधारावर सर्व शरीर उभे राहते व कर्म करते, त्या गुडघ्यांचा विचार दशमावरून होतो.

जीवन चांगल्या तऱ्हेने जगण्यासाठी जे कर्म करावे लागते, म्हणजे उपजीविकेसाठी जो उद्योग करावा लागतो. व्यवसाय, व्यापार, उदीम, उद्योग, कारखानदारी करावी लागते, त्यांचा विचार याच स्थानावरून केला जाईल. कर्म जेवढे चांगले होईल, सुकर्म होईल तेवढा अधिकार वाढत जातो. यश मिळते, कीर्ती पसरते व मान मिळतो व सन्मानही होतो. शासन, प्रशासन यांतील यश, मुत्सद्दीपणा, अधिकारयोग, वरिष्ठांची मर्जी आणि आत्मगौरव व उद्योगातून प्राप्त होणारा मान-सन्मान यांचा विचार याच स्थानावर करावा लागतो. जातकाची उन्नती, अवनती, चढ-उतार यांचाही विचार याच स्थानाच्या संदर्भात करणे क्रमप्राप्त आहे.

कुंडलीमध्ये अर्थ त्रिकोण सर्वांत महत्त्वाचा आहे. त्या त्रिकोणाचे मकर (दशम) हे केंद्रस्थान, त्यापासून होणारा लाभ व द्रव्यसंचय यांचा विचार वृषभ (द्वितीय) या कणखर स्थानाचा आणि उद्योगास साहाय्यभूत होणारे नोकर-चाकर यांचे स्थानदर्शक कन्यारास (षष्ठस्थान) या आपोक्लीम स्थानाचाही विचार करावा लागतो व त्यामुळे ते स्थान साहाय्यक - पोषक स्थान आहे.

दशमात रवी व मंगळ हे जास्त बलवान असतात. कारण स्वभावत:च रवी हा राजा तर मंगळ हा सेनापती आहे. त्यांना या ठिकाणी मान आहे. गुरु हा मंत्री आहे. राजा व सेनापती रवी व मंगळ यांना दशम या बलाढ्य केंद्रस्थानात दिग्बल असते. गुरु हा गुरुत्व - मोठेपणा देणारा, समृद्धी देणारा आहे. तोही दशमाचा एक कारक ग्रह आहे.

रवी हा निसर्गत:च जीवनोपाय कर्माचा कारक व राजा आहे. शनी हा निसर्गत:च सेवक आहे. त्यास अस्तकालाचा स्वामी केले गेले आहे. शनीस पश्चिम दिशेस दिग्बल आहे. निसर्ग कुंडलीतील सप्तमावर तूळ रास आहे व तेथे शनी बलवान असतो.

सारावलीमध्ये दशमस्थ शनीचे फल असे दिले आहे -

**धनवान् प्राज्ञ: शूरो मंत्री वा दण्डनायको वाऽपि ।**
**दशमस्थे रवितनये वृन्दपुरग्रामनेता च ।।**

ज्याच्या दशमात शनी आहे असा जातक पराक्रमी, धनाढ्य, विद्वान असून तो मंत्री वा न्यायाधीश - दंडाधिकारी असतो. अगर तो गटप्रमुख, ग्रामप्रमुख - गावाचा नेता, महानगरचा पुढारी - नेता होतो.

तरीपण शनी दशमात असता पितृसुख लवकर संपते आणि वडिलार्जित मालमत्ता नसते. याचा अर्थ जातक धनाढ्य होतो. तो स्वकमाईवरच आणि आर्थिक समृद्धी हळूहळू प्राप्त होते. तो न्यायाधीश पदावर जातो पण त्याचे पुत्र उधळे निघतात.

सेवक ते अत्युच्च शिखर ही चढण कठीण आहे व धिम्या गतीनेच जावे लागते. दशमस्थ शनी असलेला जातक उच्च पदास पोहोचतोच असे मानले जाते. अशा जातकास महत्त्वाकांक्षा असते व लोभही असतो. नेपोलियन, हिटलर, स्टॅलिन हे शून्यातून अत्युच्च पदावर गेल्याची उदाहरणे आहेत.

पण शनी जातकास जसा उच्च पदास नेतो तसेच तो जातकाची अवनतीही करतो, त्यास खाली आणतो, त्याची मानहानी होते असेही काही ज्योतिषांचे मत आहे. नेपोलियन वा हिटलर हे असेच उंचावरून खाली आपटले. (कोठे थांबावयाचे हे कळले नाही) हे आलंकारिक पतन असले तरी बऱ्याच ठिकाणी उंचावरून पडून हाडे मोडणे, मरण येणे असेही प्रकार पाहण्यास मिळतात.

उद्योग-व्यवसायाचा विचार करताना कुंडलीचे यथायोग्य मूल्यमापन करावे लागते. चार केंद्रस्थानातील ग्रह हे बलवान असून चरराशीत जास्त कार्यरत असतात. महात्मा गांधींचे कुंडलीत लग्नात ३, सप्तमात २ व दशमात १ असे ६ ग्रह होते. हिटलरच्या कुंडलीत सप्तम केंद्रात ४ ग्रह, दशमात १ ग्रह असे ५ ग्रह होते. त्यापैकी रवी व मंगळ जास्त बलवान होते. चार्ली चॅपलीनच्या कुंडलीत लग्नात, १, सप्तमात ३ व दशमात १ असे पाच ग्रह होते. हे सर्व जगद्विख्यात झाले.

उद्योगपतींच्या कुंडल्यात उदित गोलार्धात वा क्षितिजाच्या वर बहुसंख्य ग्रह असतात. क्षितिजाच्या खालील ग्रह व्यक्तीस डोके वर काढू देत नाहीत पण राजयोग बलवत्तर असता जवाहरलाल नेहरू पुढे आले आहेत.

डॉ. बी. व्ही. रामनांच्या कुंडलीत चतुर्थात २, दशमात १ व सप्तमात ३ ग्रह असे ६ ग्रह केंद्रात आहेत. तेही जगद्विख्यात ज्योतिषी झाले.

व्यवसायनिश्चिती करताना कुंडलीत सर्वांत प्रभावी ग्रह कोण आहे, त्यास साथ देणारा दुय्यम ग्रह काय दर्जाचा आहे, याचा विचार करून निर्णय घ्यावा लागतो. तसेच धनप्राप्ती कोणत्या माध्यमातून होणार आहे यासाठी द्वितीय स्थान व द्वितीयेश यांचा विचार करावा लागतो. दशांश कुंडली व्यवसायाच्या दृष्टीने अभ्यासावी असाही एक मतप्रवाह आहे.

एकट्या लग्नाच्या दशमाचा विचार करून चालत नाही. चंद्र व रवी यांच्या दशमाचाही विचार करावा असे वराहमिहीर सांगतात. लग्न रवी व चंद्र यांचा दशमेश कोणत्या नवांशात आहे त्या नवांश राशीचा अधिपती कोण आहे यावरून व्यवसाय व धनप्राप्तीचे मार्ग शोधावे असे वराहमिहीर बृहज्जातकाच्या दहाव्या अध्ययात सुचवितात.

असा विचार करून व्यवसाय निश्चिती केली जावी. शिक्षण व व्यवसाय यांचा संबंध असेलच असे नाही.

म्हणजे व्यवसाय व अर्थप्राप्तीचे माध्यम काय हे ठरविणे सोपे काम नाही.

गॉकेलीन यांच्या पद्धतीप्रमाणे विविध व्यावसायिकांच्या अनेक कुंडल्या जमवून त्यांचा अभ्यास करून निष्कर्ष काढावे लागतील. मॉरिस वेमिस यांनी प्रत्येक अंशाचा विचार करून राशीचा प्रत्येक अंश व ग्रह यांची सांगड घालून व्यवसायनिश्चितीचा प्रयत्न केला आहे. वेमिसनी अनुमानित ग्रह घेतले आहेत त्यामुळे त्यांच्या राशींचे अंश व ग्रह यांची सांगड याचा उपयोग आपणास करता येणार नाही. अमेरिकेत एलबर्ट बेंजामीन या ज्योतिर्विदाने २०० व्यवसायांचा संख्याशास्त्राचा अवलंब करून पृथक्करण केले आहे. पण त्यांचे अनुभव आपल्यास माहीत होऊ शकले नाहीत.

अनेक ज्योतिषाभ्यासूंनी एकत्र येऊन अचूक वेळेच्या स्पष्ट ग्रहासहित भावचलित कुंडल्या मांडून षष्ठ्यंशाकडे वळाले तर व्यवसायनिश्चितीचा मार्ग सापडू शकेल. अयनांश मात्र एकाच पक्षाचे वा पद्धतीचे घ्यावयास हवेत.

शनी हा मूलतः सेवक आहे. सर्व प्रकारची कष्टाची कामे, श्रम व त्रास होणारी कामे शनीकडे असतात. स्वच्छता, सॅनिटेशनची कामे, खाण कामगार, खोदकाम करणारे, बांधकाम करणारे कंत्राटदार, गवंडी, माळी, चामड्यांच्या वस्तू बनविणारे व विक्रेते, कोळसा विक्रेते, बर्फाचे कारखानदार व बर्फ विक्रेते, रेफ्रिजरेटरचे कारखानदार, विक्रेते, दुरुस्ती करणारे, घड्याळांचे कारखानदार, विक्रेते अशी कामे शनीकडे असतात.

माइनिंग इंजिनिअर, शेतमजूर, शेतकरी, इस्टेट एजंटस्.

दुःखितांशी संबंध येणारे व्यवसाय - शुश्रूषा करणारे, वैद्यकी व्यवसाय.

शनी हा बंधने, मर्यादा घालणारा आहे. हल्लीचे कायदे अशा मर्यादा उत्पन्न करणारे असतात. गुन्हेगारीचा बीमोड करणे, समाजाच्या व राष्ट्राच्या हितासाठी व्यक्तींवर निरनिराळ्या मर्यादा पडणारे कायदे सरकार करते. त्यामुळे कायद्याचा कारक शनी आहे. म्हणून न्यायदंडाधिकारी, न्यायाधीश व न्यायालयातील कर्मचारी व वकिली हे व्यवसाय शनीकडे आहेत. भूगर्भशास्त्रानुसार काम करणारे धातुकाम, अभियांत्रिकी, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, वनस्पतीशास्त्र यांच्याशीही शनीचा संबंध येतो. शिल्पकार असतो.

शनी उच्च असता मंत्री होतो, दंडाधिकारी, न्यायाधीश होतो. आपल्या गावात ग्रामसेवक, नगरसेवक, महापौर होऊ शकतो.

कायद्याचा संबंध शनीशी येतो. कायद्याची अंमलबजावणी व कायदा मोडणाऱ्यांविरुद्ध कारवाई करणे ही पोलिसांची कामे आहेत.

## दशमस्थ शनीची राशिनिहाय भावफले

**(१) मेषेचा शनी :** दशमस्थानी जर एक हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मेषेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

दशमावर मेष रास येते व शनी सप्तमेश व अष्टमेश असून तो दशमात नीच राशीस येतो. त्याचे नीचत्व भंग झाल्याखेरीज त्या जातकास मान, प्रतिष्ठा, यश लाभत नाही. तो विवाहसुखासही पारखा होतो. जातकाच्या आयुष्य मर्यादेवर परिणाम होतो. अष्टमेश नीच राशीत येतो. चंद्र जर अशा वेळेस तुलेत चतुर्थात, व्ययात वा सप्तमात असता लग्नच होत नाही.

दशमातील शनीबरोबर रवी असता जातक हलक्या नोकरीत व जन्मस्थानाव्यतिरिक्त प्रदेशात राहतो पण शासनातील हलकी नोकरी मिळते. त्याचे धन चोरीस जाते व तो गरीबच राहतो.

परंतु शनी हा रवीच्या दृष्टीत असता तो शेतीवर उपजीविका करतो व संपत्ती चांगली मिळवितो. ही दृष्टी चतुर्थातून येते तेथे रवी तुलेत नीच असतो व त्यामुळे नीचभंग दोघांचाही होतो. रवी धनेश चतुर्थात असल्याने संपत्ती मिळते. जातक उद्योगी व नशीबवान ठरतो.

चंद्र लग्नेश असतो. त्याची चतुर्थातून शनीवर दृष्टी असता मातृसुख नसते व संपत्ती मिळत नाही.

पण चंद्र दशमातच शनीबरोबर असता जातक शत्रूंचा पराभव करतो. तो एका गटाचा प्रमुख होतो व प्रसिद्ध होतो.

मंगळ शनीबरोबर असता सरकारी नोकरीत पैसा मिळवितो. पण तो खोटे बोलतो व गुन्हेगार ठरतो व त्यास शिक्षा होते. पण मंगळाची नीचस्थ शनीवर दृष्टी असता जातक दरोडेखोर, घरफोडी करतो वा कत्तलखाना चालवितो व व्यसनी असतो.


शनीबरोबर बुध असता आपल्या शत्रूंचा नायनाट करतो. त्यास बंधुवर्ग, नातेवाईक चांगले असतात. वाहन योग व संपत्ती योग असतो पण कर्क लग्नास बुध व्ययेश असल्याने त्यास बरेच नुकसान सोसावे लागते.

बुधाची दृष्टी शनीवर असता तो खोटे बोलतो व चौर्यकर्म करतो.

गुरुची दृष्टी वा सहयोग शनीची परिस्थिती चांगली सुधारते. तो उच्चपद गाठतो व पैसेही चांगले मिळवितो.

## कुंडली : श्री. प्र. बा. कुलकर्णी

जन्म रविवार दिनांक ७ जुलै, १९४० रोजी सकाळी ८ वा. १५ मि. प्र. वेळ अक्षांश १८° उ. ३६′ रेखांश ७६° ३′ पू. अयनांश २३° १′ ४३″. सां. स. २ ता. ४८ मि. ५३ से.




द्वितीयात नेपच्यून, द्वितीयेश रवी व्ययात मिथुनेत असून तो राहू व केतू यांचे पूर्ण केंद्रयोगात आहे. शिवाय रवीवर शनीची दृष्टी आहे. रवी राशीचा अधिपती बुध हा कर्केत पुष्य या शनीच्या नक्षत्रात असून मंगळाच्या युतीत आहे. यामुळे द्वितीयेचे स्थान द्वितीयेत व वाचाकारक बुध बिघडले आहेत. जातकाचे बोलणे अस्पष्ट व बोबडे आहे. वाचादोष आहे. पण सवयीने बोलणे कळते.

सर्व ग्रह राहू केतूच्या मध्ये सापडले आहेत. हा काळसर्प योग आहे. आयुष्यात विशेषत: व्यवसायात अडथळे, चढ-उतार व करिअर सरळ राहत नाही. त्यातच शनी दशमात मेष राशीत आहे. पण भाग्येश गुरुची युती आहे. दशम बिंदूवर होणारी ही दोन मोठ्या व तत्त्वज्ञ ग्रहांची युतीची फले शूरो वित्तसमृद्धो. यशस्वी अशी सारावलीकार देतात.

दशमातील युती बहुवाहन अर्थच अशी सुफला आहे. सप्तमेश व नवमेश यांची ही युती शुभ फलदायीच ठरावी. श्री, स्त्री, संततीयुक्त, स्थावर वाहन असणारी आहे. शनी नीच असल्याने फार जरी नाही तरी मध्यम फलदायी ठरते.

जातक बँकेत नोकरीस कारकून म्हणून लागला पण आपल्या कर्तबगारीने चढत-चढत व्यवस्थापक झाला. त्या बँकेच्या बऱ्याच शाखाही निघाल्या. पण एक वेळ अशी आली की संचालकांची मर्जी बिघडली व जातकास नोकरीवरून तडकाफडकी काढले. न्यायालयात काम चालून त्यास पुन्हा कामावर घेतले. ३/४ वर्षे कठीण काल होता.

**(२) वृषभेचा शनी :** दशमस्थानी जर दोन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

दशमावर वृषभ रास येते. शनी षष्ठेश व सप्तमेश असून तो दशमात मित्रक्षेत्री येतो.

येथे शनीस शुभ योग असतात. जातक शासकीय क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात वा न्यायखात्यात अति उच्च पदावर जाऊ शकतो. अशा शनीस अवनती, मानहानी अशा अवस्था येत नाहीत. जातक उत्तम संपत्ती कमावतो. त्यास स्थावर व वाहनांचाही लाभ होतो. आपल्या क्षेत्रात तो प्रवीण असतो व लोकप्रिय होतो. दशमेश अशुभ भावात वा अशुभ दुष्ट असला तरच येथील शनी तापदायक ठरतो. कारण दशमेश शुक्रच असल्याने व शनीची सप्तमावर दृष्टी असल्याने कौटुंबिक सुख बिघडण्याची शक्यता असते.

शनीबरोबर चंद्र असता शुभच असल्याने व शनीची सप्तमावर दृष्टी असल्याने कौटुंबिक सुख बिघडण्याची शक्यता असते.

शनीबरोबर चंद्र असता शुभच ठरतो. तो उच्च क्षेत्री येतो. त्याच्या पुढे शत्रू टिकत नाहीत.

मंगळ राजयोगकारक असल्याने त्याचे शनीबरोबरचे साहचर्य शुभ फलदायी ठरते. मंगळास येथे दिग्बलही असते. शनी-मंगळ हे अनुक्रमे सप्तमेश व भाग्येश असतात आणि त्यांनी दशम केंद्रात (उपचय स्थानात) एकत्र येणे एक प्रकारचा राजयोगच होतो. जातक शासकीय क्षेत्रात उत्तम काम करतो.


बुध कुंडलीचा धनेश व लाभेश असल्याने त्याचे साहचर्य, लाभ वा त्रिकोणयोग उद्योग-व्यवसायात उत्तम धनप्राप्ती देणारे ठरतात.

शुक्र दशमेश असल्याने त्याचे साहचर्य, लाभ वा त्रिकोणयोग यामुळे जातक आपल्या क्षेत्रात कौशल्य दर्शवितो. तो मंत्री होतो.

गुरुचा त्रिकोणयोग त्याची दृष्टी असता जातक राजासम होतो. गुरु येथे पंचमेश असतो पण त्यामुळे संतती मर्यादित होते. वाहने, स्थावर याने युक्त होतो.

## कुंडली : पुरुष जातक

जन्म मंगळवार ६ मे, १९१३ रोजी दुपारी १ वा. ३० मि. स्था. वेळ इंदोर येथे. अयनांश २२° ३८′ ४८″. सां. स. ४ ता. २४ मि. ५५ से. अक्षांश २२° उ. ४२′ रेखांश ७५° ५४′ पू.




Retired Inspector General of Police.


शनी दशमात त्रिकोण हर्षल हा योग. पोलीस अधिकाऱ्याला जरूर असणारे धाडस, धैर्य व कौशल्य दर्शवितो. शनी हा कायद्याचा कारक आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध कारवाई करणे व सुव्यवस्था राखणे हे पोलीस खात्याचे काम आहे. मंगळ-राहू युती हे daring व गुन्हेगाराशी टक्कर द्यावयास असणारे धाष्टर्य दर्शवते. चंद्र व रवी भाग्यात आहे. सरकारी नोकरीत उत्कर्ष दाखवितो. रवी उच्च राशीत आहे. त्याचा गुरुशी त्रिकोण हा वेळोवेळी बढती, पदोन्नती व नशीब दर्शवतो. मंगळाची तृतीय या पराक्रम स्थानावर दृष्टी आहे. राश्याधिपती मंगळ आहे म्हणून व दशमस्थ शनी यांचे साहचर्याने पोलीस खाते.

**(३) मिथुनेचा शनी :** दशमस्थानी जर तीन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

दशमावर मिथुन ही बुधाचीच रास आहे. शनी पंचमेश व षष्ठेश असून दशमात मिथुनेत येतो. साधारपणे द्विस्वभाव दशमावर असता जातक व्यवसाय बदलतो अगर स्थाने बदलतो. त्यास जोडव्यवसायही असतो. कन्या लग्नाच्या व्यक्ती उत्तम समीक्षक असून पृथक्करणाचे कौशल्य असते आणि मिथुनेतील शनी उत्तम बुद्धिमत्ता देतो. व्यासंग चांगला असतो. आर्थिक लाभ व नुकसान होत राहते. यात समतोल राखला जातो. पत्नीस काही पीडा असते.

## कुंडली : डॉ. श्री. ग. गोगटे

जन्म गुरुवार ४ मे, १९१६ रोजी दुपारी ४ वाजता सोलापूर येथे. अक्षांश १७° उ. ४३′ रेखांश ७५° ५५′पू. अयनांश २२° ४१′ ३३″. सां. स. ६ ता. २० मि. ५४ से.




दशमात शनी आहे, त्याची सप्तमस्थ मीनेतील गुरुवर दृष्टी आहे. व्ययस्थानावर दृष्टी आहे. शनी षष्ठेश दशमात आहे. व्ययेश रवी अष्टमात उच्च आहे. लग्नेश बुध नवमात आहे. तो व लाभेश चंद्र यांची युती आहे. जातक M.B.B.S. असून नेत्रतज्ज्ञ होता. त्यांचा रोगाचा अचूक अंदाज असावयाचा. आजाराची रास लग्नी आहे. षष्ठ (आजाराचे स्थान) स्थानाचा अधिपती शनी दशमात आहे. हॉस्पिटलदर्शक मीन राशीत गुरु आहे व व्ययेश रवी अष्टमात आहे. त्याचा शनीशी लाभयोग आहे. चंद्र उच्च नवमात आहे. त्याच्या तृतीयात मंगळ गुरुच्या दृष्टीत आहे. नेत्रकारक रवी व चंद्र दोघेही उच्च राशीत आहेत यामुळे नेत्रतज्ज्ञ.


पंचमात हर्षल नीच मंगळाच्या प्रतियोगात आहे. पंचम स्थानावरून शेअर्स गुंतवणूक यांचा विचार होतो. हर्षल-मंगळ योगामुळे त्यात सुरुवातीस पैसे मिळाले पण नंतर नुकसानही आले. दशमातील शनी हा पंचमेशही आहे. म्हणजे दशमाचा अष्टमेश शनी दशमात त्यामुळे काही वर्षांनंतर व्यवसायही जवळजवळ बंद होण्याचा योग आला. १९६२ च्या मे महिन्यात जातक २५ फूट खड्ड्यात पडला व हात-पाय फ्रॅक्चर झाले. नंतर बरे झाले तरी व्यंग राहिले. पूर्वीसारखा व्यवसाय डोळ्यांच्या शस्त्रक्रिया करता येईनात. आजारात दीड-दोन वर्षे गेली. उंचावरून पतन-शनीमुळे अपघात. हर्षल-मंगळ प्रतियोगाने वाचले. गुरुच्या दृष्टीने व रवी व चंद्र उच्च असल्यामुळे मृत्यू ८० वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभले. वडिलार्जित स्थावर मोठी होती. स्वत:चे वाहन. सुंदर सुशिक्षित पत्नी २ मुलगे, २ मुली अशी संतती. गावात नामांकित.

**(४) कर्केचा शनी :** दशमस्थानी जर चार हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कर्केचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तूळ या लग्नास शनी चतुर्थ व पंचम स्थानाचा अधिपती म्हणून तो राजयोगकारक असतो. दशमात कर्क रास तेथे शनीचे वास्तव्य. शनी स्वसन्मुख राशीत येतो व त्यास राशिबल नसते. शनीसारख्या ग्रहास चंद्र बुध-शुक्र यांचे योगबल वा गुरुची शुभ दृष्टी मिळाल्यास जातकास आपले कर्तृत्व दाखविण्यास वाव मिळतो. शनी-बुधाची युती त्रिकोणयोग बुद्धिमत्तादर्शक रवी लाभेश असल्याने त्याचे साहचर्य लाभदायक ठरते.

**कुंडली : श्री. विजय**

जन्म शुक्रवार दिनांक १४ फेब्रुवारी, १९४७ रोजी रात्रौ ११ वा. २३ मि. प्र. वेळ पुणे येथे. सां. स. ८ ता. २४ मि. २९ से.




जातक बुद्धिमान व हुशार. ग्वाल्हेरच्या पब्लिक स्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण. B.E. Civil, महाराष्ट्र प. स. क. मधून निवडला गेला व सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात सुरुवात. एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर झाले व त्यानंतर पुढील बढतीही मिळाली आहे. दशमात शनी असला तरी मंगळ चतुर्थात मकरेत उच्चांशाच्या निकट व दशमेश चंद्र द्वितीयात वृश्चिकेत यांचा अंशसाम्याने लाभयोग आहे. हा योग खरा अभियांत्रिकीचा.

लग्नेश शुक्र तृतीयात व भाग्येश बुध पंचमात यांचा लाभयोग आहे. भाग्येश बुध कुंभ या बौद्धिक राशीत आहे. गुरुची दशमावर व शनीवर पूर्ण दृष्टी आहे.

सुविद्य पत्नी लाभली असून संततीही बुद्धिमान व हुशार आहे. एक मुलगी व एक मुलगा. संगणक व अभियांत्रिकीकडेच आहेत. जातकाचे कुटुंब इंजिनिअरांचे आहे. वडील माइनिंग (Minining) इंजिनिअर, थोरला भाऊही बी. ई. होऊन रेल्वे इंजिनिअर होऊन मोठ्या पदावरून निवृत्त. मधला भाऊ इलेक्ट्रिकल इंजिनिअर. जातकाचे दोन्ही मामाही इंजिनिअर्स.

या कुंडलीत राजयोगकारक शनी दशमात असला तरी मंगळ चतुर्थात मकरेत उच्चांशाचे निकट असल्यामुळे तो शनीपेक्षा प्रभावी आहे. चंद्र दशमेश असून तो द्वितीयात मंगळाच्या राशीत व अंशासाम्याने लाभयोगात आहे. मंगळ प्रभावी-चंद्र दुय्यम व शनी तिसऱ्या दर्जाचा ठरतो म्हणून इंजिनिअर.

**(५) सिंहेचा शनी :** दशमस्थानी जर पाच हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'सिंहेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

वृश्चिक या लग्नास दशमावर सिंह रास येते. शनी तृतीयेश व चतुर्थेश असून तो सिंहेत शत्रुक्षेत्री येतो. दशमातील शनी आयुष्यात चांगली स्थिती देऊ शकतो पण जातकाची मानहानी, अवनती होते. शिक्षण सरळ होत नाही. अडथळे येतात.

शनीबरोबर रवी असता जातकास संपत्ती फारशी नसते. त्यास सुखही मिळत नाही. तो उदात्त व उदार नसतो. त्याची शरीरयष्टी चांगली नसते. जातकाच्या भावना दडपल्या जातात व त्यास कर्तव्य तेवढे करावे लागते. रवी शनी केंद्रयोगात वा प्रतियोगात असता जातकाचे वडिलांशी नीट पटत नाही. वडील स्वभावाने कडक असतात. लहानपण चांगले जात नाही. आयुष्यात यश मिळणे कठीण जाते.

चंद्राची दृष्टी असता जातकास संपत्ती चांगली मिळते. चंद्र या लग्नास भाग्येश असतो. दशमात चंद्र शनी वा मंगळाबरोबर असता तो शुभ ठरतो व तो लष्करात वरच्या दर्जास पोहोचतो.

मंगळ शनी दशमात एकत्र असता लग्नेश व तृतीयेश-चतुर्थेश यांची युती चांगली ठरते. त्यास सरकारदरबारी मान मिळतो. जातक सरकारी नोकरीत जातो.


बुध-शनी दशमात एकत्र असता जातक शत्रूंचा पराभव करतो. जातक बुद्धिमान पण आळशी असतो.

गुरुची दृष्टी शनीवर असता जातक आपल्या कुटुंबात वा नगरात प्रसिद्ध होतो. त्याजपाशी स्थावर व वाहने असतात. गुरु वृश्चिक लग्नास धनेश-पंचमेश असतो व त्यास संपत्ती चांगली मिळते.

**कुंडली : स्त्री जातक - श्रीमती अग्निहोत्री** (श्रीमती हेच नाव)

जन्म शुक्रवार दिनांक २ सप्टेंबर, १९४९ रोजी सकाळी ११ वा. ५५ मि. प्र. वेळ सोलापूर येथे. अक्षांश १७° उ. ४०′ रेखांश ७५° पूर्व ५६′. अयनांश २३° ९′ १०″. सां. स. १० ता. १२ मि. १८ से.

शालेय शिक्षण बेताचे. आयुर्वेद महाविद्यालयात आयुर्वेदाचे संपूर्ण शिक्षण घेतले. तेथेच आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये नोकरी व नंतर व्यवसाय. चंद्राचा शनी व रवी युतीशी त्रिकोणयोग.




सप्तमेश शुक्र नेपच्यून व केतू यांचे मध्ये तसेच पतिकारक रवीची शनीशी युती. यामुळे ४०/४१ वर्षांपर्यंत विवाह झाला नाही. १९९१ मध्ये बिजवराशी विवाह. भाग्येश चंद्र धनस्थानातून रवी-शनीशी त्रिकोणयोग करतो त्यामुळे स्वत:च्या पायावर उभी आहे. आयुष्य कष्टी.

**(६) कन्येचा शनी :** दशमस्थानी जर सहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कन्या रास दशमावर येते. शनी द्वितीयेश व तृतीयेश असून दशमात कन्या राशीत येतो. शनी हा बलवत्तर आहे व तो जातकाची उन्नती व मोठे पद देणारा ठरतो. जातक संपत्तिमान व सुखी असतो. मंगळाचा व रवीचा संबंध. दृष्टियोग आल्यास दशमस्थ शनी राजकारणाकडे नेतो. शनी दशमात उच्चाभिलाषी असतो म्हणूनही त्यास महत्त्व येते. जेवढा कन्येच्या अखेरीस शनी येतो तेवढा तो उच्च राशीचे निकट येतो. असा उच्चाभिलाषी शनी जातकास उच्च पदास जरूर नेईल.


बेनझीर भुट्टोंची कुंडली या ठिकाणी चपखल बसते. बेनझीर भुट्टोंचे भवितव्य या नावाने एक लेख १९९३ च्या ब्रह्मज्ञानाच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्ये बेनझिर भुट्टो पंतप्रधान होईल पण १९९५ साल तिचे कारकिर्दीस विघातक ठरेल असे दिनवर्ष पद्धती व विशोत्तरी दशा यावरून अनुमान काढले होते. ते बरोबर ठरले.

२०° अक्षांश व त्याच्या उत्तरेकडील कुंडल्यात धनु लग्न १५° चे पुढे उदय पावत असता दशमावर तूळ व पंचमावर वृषभ रास येते. भावचलित कुंडलीचा विचार करूनच निर्णय घ्यावा लागतो. तसेच भावचलित चंद्र कुंडली वा भावचलित रवी कुंडलीचाही मागोवा घ्यावा लागतो. तसा त्या लेखात प्रयत्न केला होता. येथेही भावचलित लग्न कुंडली व भावचलित रवी कुंडली देत आहे.

## कुंडली : श्रीमती बेनझीर भुट्टो


जन्म रविवार २१ जून, १९५३ रोजी सायंकाळी ८ वा. ४५ मि. कराची येथे. अक्षांश २४° उ. ५२′ रेखांश ६७° ५′ पू. अयनांश २३° १२′ ४०″. जन्म लग्न कुंडली सां. स. १३ ता. ४१ मि. ५ से.

शनीची वक्र गती संपून तो स्तंभी आहे. २४ जून रोजी मार्गी होतो. रवी मंगळाची लग्नावर दृष्टी. चंद्रही दशमावर त्यामुळे राजकारणात भाग घेतला.




शनी नेपच्यून युती दशमबिंदूचे मागे ६।। अंश आहेत. म्हणजे ते दशम मध्याचे निकट आहेत व सप्तमात रवी-मंगळ-हर्षल आहेत. बेनझीरमध्ये हुकूमशाही प्रवृत्ती आहे. १९८८ मध्ये जन. झियाचा मृत्यू. त्यानंतर भुट्टो पंतप्रधान झाली. १९९३ च्या निवडणुकीत भरघोस यश. पण १९९५-९६ मध्ये पंतप्रधान पद गेले.

भावचलित रवी कुंडली अक्षांश २१° उ. सां. स. १२ ता. ३८ मि. ७ से.



सौर कुंडलीचा विचार करता दशमात शनी नेपच्यून व सप्तमात रवी मंगळ हर्षल mundane square हाही एक प्रकारचा केंद्रयोग होतो. सप्तम व दशम स्थानातून गुरूचा दशमबिंदूशी त्रिकोण आहे. शनी-नेपच्यूनवर पूर्ण दृष्टी आहे.

शनी-मंगळ परस्पर दृष्टी. नेपच्यून शनीबरोबर दोघांचा हर्षलशी केंद्रयोग आहे. हिटलरचा शनी दशमात, सप्तमात मंगळ, रवी, श्रीमती इंदिरा गांधी शनी-नेपच्यून लग्नी प्रतियोग हर्षल साम्यस्थळे. शनी नेपच्यून लग्नी प्रतियोग हर्षल साम्यस्थळे. शनी-नेपच्यून युती कुलंगडी, कारस्थाने यामुळे व भ्रष्टाचारामुळे पदावनती झाली.

दशमातील शनी रवी-मंगळाच्या केंद्रयोगाने बिघडतो. त्यातच नेपच्यूनचा सहयोग कारस्थानीपणा दर्शवितो. शनीने उच्च पद मिळते पण रवी-मंगळ केंद्रयोगाने जातक खाली येतो. अवनती होते. रवी-मंगळ यांचा शनीशी केंद्रयोग - हिटलरच्या कुंडलीत आहे. शनी-नेपच्यून यांचा हर्षलशी प्रतियोग इंदिरा गांधींच्या कुंडलीत, असाच शनी-नेपच्यूनचा रवी-मंगळ युतीशी केंद्रयोग, प्रथम उन्नती मग अवनती. बेनझीरचे कुंडलीत, आता बेनझीरचे कोर्ट खटले चालू झाले आहेत व त्यास तोंड देण्यातच तिचे आयुष्य जाईल.

**(७) तुळेचा शनी** : दशमस्थानी जर सात हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'तुळेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


दशमावर तूळ रास येते. लग्नेश शनी दशमात असणे हा मोठाच योग असतो. त्यात तो धनेशही आहे. म्हणजे व्यवसाय उत्तम. त्यात उच्च स्थान, त्यातून मिळणारा भरपूर पैसा. एवढ्या गोष्टी शनीच्या स्थितीवर अपेक्षित राहतात. जातकास वडिलार्जित मालमत्ताही असते व तो स्वत:च्या कर्तबगारीने व्यवसायातून भरपूर कमाई करतो. यशस्वी गृहस्थ होतो. श्री, स्त्री व संतती, स्थावर वाहने या सर्वांनी युक्त असतो. जातक अनेक धार्मिक स्थळांना भेट देतो व भेटीही देतो. धार्मिक संस्थांच्या कामात सहभागी होतो. बोलणे मृदू पण ठाम असते. परदेशातूनही संपत्ती व मान प्राप्त होतो. तो विद्वान असतो. जातक दीर्घायुषी असतो.

### कुंडली : श्री. वामन गणेश

जन्म शनिवार दिनांक २० डिसेंबर, १९२४ रोजी सकाळी ९ वा. ४५ मि. प्र. वेळ अहमदनगर येथे. अक्षांश १९° उ. ५′ रेखांश ७४° ४८′ पू. अयनांश २२° ४८′ २१″. सां. स. १५ ता. ७ मि. ५५ से.

दशम भावबिंदूजवळ शनी, मीन नवांशात, भाग्येश बुध व्ययात कन्या नवांशात. बुध शनी लाभयोग आहे. लग्नेश व भाग्येश यांचा हा शुभयोग उत्तम बुद्धिमत्ता व वक्तृत्व देणारा आहे. जातक B.Com. व चार्टर्ड अकौंटंट आहे व कराबद्दलच्या व्यवसायात उत्तम

नाव कमावले आहे. अनेक मोठमोठी कामे हाताळली आहेत. यशस्वीपणे मुद्देसूद व अभ्यासू युक्तिवाद असतो. विक्रीकर, आयकर यांचा प्रमुख व्यवसाय. लग्न वृषभ नवांशी व रवी आणि चंद्र हेही वृषभ नवांशीच आहेत. नवांश कुंडलीत पंचमात बुध, लाभात शनी मंगळ कन्या नवांशात म्हणजे बुध मंगळ नवांशात युती. उत्तम तर्कशास्त्र व ठासून पण नम्र युक्तिवाद असतो.




स्वत:ची स्थावर मोठी आहे. पत्नी सुंदर व सुशिक्षित आहे. बुध-शनी शुभयोग. शनी दशमात असता वकिलीचा व्यवसाय पण हाही व्यवसाय वकिली व्यवसायासारखाच आहे.


**(८) वृश्चिकेचा शनी :** दशमस्थानी जर आठ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृश्चिकेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

दशमावर वृश्चिक रास असते. शनी दशमात शत्रुक्षेत्री असला तरी तो लग्नेश असून दशम या बलाढ्य केंद्रात आहे. असा जातक आपल्या व्यवसायात यशस्वी असतो व संपत्ती मिळवतो. पण त्यास पाहिजे तसे status मिळत नाही. म्हणजे तो अतिउच्च पदास जाऊ शकत नाही. जातक संपत्ती मिळवितो. रवीच्या दृष्टीत असता संपत्तीचे माप चढत राहते. येथे मंगळ स्वगृही असतो व लग्नेश व दशमेश यांची दशमात युती चांगली ठरते. तो जातक सरकारी नोकरीत असतो.

### कुंडली : श्री. पटवर्धन

जन्म मंगळवार दिनांक ३ जानेवारी, १९२८ रोजी सकाळी १० वा. २० मि. बागलकोट येथे. अक्षांश १६° उ. १४′ रेखांश ७५° ४७′ पू. अयनांश २२° ५०′ ५४″. सां. स. १६ ता. ३९ मि. २० से.

भाग्येश शुक्र दशम बिंदूचे १२ अंश मागे आहे. तो दशमाची फले फारच थोड्या प्रमाणात देईल. शनी दशम बिंदूचे अगदी निकट आहे. त्याचे थोडे पुढे केतू व मंगळ आहेत. पण ते शनीचे युतीत आहे.




शुक्र व गुरु हर्षल यांचा त्रिकोण आहे. शुक्र चतुर्थेश आहे. वडिलार्जित स्थावर होती. स्वत:ही घेतली आहे. शनी-मंगळ युती दशमात प्रभावी आहे. शनी मकर नवांशी व मंगळ कुंभ नवांशी आहे. जातक न्यायखात्यात कनिष्ठ श्रेणीत न्यायाधीश म्हणून लागले व जिल्हा न्यायाधीश पदापर्यंत पोहोचले व त्याच पदावरून निवृत्त झाले.

**(९) धनुचा शनी** : दशमस्थानी जर नऊ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'धनुचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

येथे दशमावर धनु रास येते. शनी लाभेश व व्ययेश असून दशमात धनु राशीत येतो. असा जातक व्यवहारचतुर असतो. तो अध्यापनही करतो. तो प्रसिद्ध होतो. उत्तरायुष्यात पुष्कळ समृद्धी होते व जातक चांगला समाधानी असतो. पत्नी चांगली व साथ देणारी मिळते. बुद्धिमान असून लोकमान्य होतो.


जातक आपल्या व्यवसायात तज्ज्ञ असून त्यापासून उत्तम लाभ होतो. पण कधी-कधी नुकसानही होते.

### कुंडली : डॉ. अरुण बा. मनगोळी

जन्म शुक्रवार दिनांक २७ नोव्हेंबर १९५९ रोजी दुपारी २ वा. २० मि. प्र. वेळ. अक्षांश १२° उ. १८′ रेखांश ७६° ३७′ पू. म्हैसूर येथे. अयनांश २३° १७′ ५०″. सां. स. १८ ता. ५ मि. ५ से.

दशमात शनी दशमेश गुरु नवमात षष्ठेश रवीचे युतीत आहे.

बुध-मंगळ युती भाग्येश व चतुर्थेश सप्तमेश याचा लग्नाशी त्रिकोणयोग आहे. रवी त्रिकोणयोग आहेच. रवी त्रिकोण लग्न आहेच, कर्क वृश्चिक मीनमधील ग्रहयोग व कन्येचा चंद्र यामुळे वैद्यकीय व्यवसाय आहे. लग्नी केतू लग्न बिंदूवरच आहे. शनीची चतुर्थावर सप्तमावर दृष्टी व व्ययेश दशमात जातक हॉस्पिटल उभे करण्याच्या प्रयत्नात आहे व तो हॉस्पिटल करील.




**(१०) मकरेचा शनी :** दशमस्थानी जर दहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

दशमावर मकर रास येते. शनी हा दशम व एकादश स्थानाचा अधिपती असून दशमात मकरेत स्वगृही येतो. शनीची दृष्टी चतुर्थ व दशमावर तशी व्ययस्थानावर येते. असा शनी आपल्या बंधुवर्गामध्ये श्रेष्ठ होतो. त्यास अनेक शास्त्रांचे ज्ञान असते. अष्टपैलू असतो. तो इतरांचाही यथायोग्य मान राखतो व प्रसिद्ध होतो. आपल्या कामात, व्यवसायात कौशल्य दाखवितो. धैर्यवान असून विनम्र स्वभावाचा असतो.

जातक आपल्या जन्मगावीच व्यवसाय करतो. लहानपण सुखात जाते व शिक्षणही चांगले होते. प्रगतिपथावर असतो. महत्त्वाकांक्षी असतो व जिद्दीने, कुशलतेने काम करतो. प्रकृती निरोगी असते व शरीरसंपदा चांगली ठेवतो. शनीच्या दशेत राजयोग घडतो.


## कुंडली : डॉ. सुरेश काशीनाथ जोशी

जन्म मंगळवार दिनांक २८ जून १९३२ रोजी पहाटे २ वा. ५८ मि. मालेगाव येथे. अक्षांश २०° उ. ३२′ रेखांश ७४° पूर्व ३८′. अयनांश २२° ५३′ ५९″. सां. स. २० ता. ४८ मि. ३७ से.

M.D. Medicine शनी-मंगळ अंशात्मक त्रिकोण. रवि-शुक्र युती.

चंद्र हर्षलने युक्त व्ययस्थानात आश्विनी नक्षत्रात आहे. त्याचा व्ययेश (मीनेचा अधिपती) नेपच्यूनबरोबर त्रिकोणयोग व रवीचा नेपच्यूनशी लाभयोग आहे. चतुर्थात गुरु, मीन नवांशी. त्याची आठ व बारा स्थानावर दृष्टी आहे.

उच्च शिक्षण चतुर्थस्थ उच्च गुरुमुळे, गुरु नवमेश चतुर्थात उच्च आहे.




**(११) कुंभेचा शनी :** दशमस्थानी जर अकरा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –

वृषभ व तूळ या दोन्ही शुक्रांच्या लग्नाचा शनी एकटा राजयोगकारक असतो. त्यामुळे त्याचे दशम या प्रमुख केंद्रातील वास्तव्य जातकास उच्च पदास नेईल. समृद्धी देईल. नावलौकिक मिळेल.

दशमावर सर्वसाधारणपणे कुंभ रास येते. पण ही काही उत्तर अक्षांशावर मकर रासही दशमावर येते. तशी एक कुंडली पुढे दिली आहे. शनी नवमेश व दशमेश असल्याने त्याची दृष्टी चतुर्थावर येते. सप्तमावर येते. जातकाचे शिक्षण चांगले होते. त्यास संपत्ती मिळते. तो स्त्री व संतती यांनी युक्त असून स्थावर स्वत:ची असते.

**कुंडली : श्री. नारायण व्यंकटेश झळकी**


जन्म मंगळवार २४ ऑक्टोबर १९३३ रोजी सायंकाळी ७ वा. ३० मि. पुणे येथे. अयनांश २२° ५६′ ८″. सां. स. २१ ता. १० मि. ६ से.

रवी नीच राशीत आहे पण शुक्र व शनी दोघेही केंद्रात असल्याने त्याचा नीचभंग झाला आहे.

चतुर्थेश चंद्र नवमात धनु राशीत आहे. चंद्र नेपच्यून त्रिकोणयोग हा मोठा योग आहे व तो अतींद्रिय शक्ती व अध्यात्मात प्रगती करणारा योग आहे.

दशमात शनी आहे. त्यावर भाग्येश गुरुची दृष्टी व त्रिकोणयोग आहे. हा योग जातकास उच्चपदी नेण्यास व समृद्धी देण्यास कारणीभूत आहे. लग्नेश शुक्र व योगकारक शनी यांचा पूर्ण लाभयोग (६०°) आहे.

जातक अबकारी खात्यात नोकरीस लागला. प्रामाणिकपणे काम केले. वरच्या पदावर जाऊन निवृत्त झाला.




जातकास सुविद्य पत्नी लाभली असून दोन मुले आहेत. स्वत:चा छोटेखानी बंगला एका सोसायटीत आहे.

जातक कारकून म्हणून सेंट्रल एक्साईजमध्ये लागला व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर पदावरून निवृत्त झाला.

**(१२) मीनेचा शनी :** दशमस्थानी जर बारा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मीनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मिथुन व कन्या ही बुधाची लग्ने आहेत. शनी या लग्नाला अनुक्रमे अष्टमेश व नवमेश व पंचमेश-षष्ठेश असतो. त्याच्या ६ व ८ या स्थानांचे आधिपत्यामुळे जातकास अडचणी येत राहतात.


दशमावर मीन रास येते व शनी अष्टमेश व नवमेश असतो. शनी नवमेश बनून दशमात येतो. (नवमभावात शनीची मूळ त्रिकोण राशी आहे) त्या वेळी दशमाची उत्तम फले मिळताना दिसतात. दशमेश गुरुचा शुभयोग व दृष्टियोग जास्ती फलदायी ठरतो. चंद्र धनेश असतो. तो व दशमेश गुरु एकत्र आल्यास संपत्तीचा उत्तम लाभ होतो. आपल्या नातेवाइकात व मित्रांत श्रेष्ठ असतो. धोरणी असतो व अधिकार पदावर येतो.

## कुंडली : नेदरलँडची राणी ज्युलियाना


जन्म दिनांक ३० एप्रिल, १९०९ रोजी सकाळी ६ वा. ४७ मि. स्था. वेळेनुसार हाग येथे झाला. अक्षांश ५२° उ. ५′ रेखांश ४° पूर्व २०′. अयनांश २२° ३४′ ११″. सां. स. २१ ता. १७ मि. ४९ से.

मिथुन लग्न म्हटल्यावर आपण दशमावर मीन रास मांडतो. फार उत्तर अक्षांशात कशी राशींची गडबड होते, भाव बदलले जातात हे लक्षात घेतले जात नाही. पुस्तकात दिलेले आकडे कुंडलीवर विश्वासून मी भावचलित कुंडली तयार केली तेव्हा माझ्या

लक्षात आले. या राणीजवळ ६० कोटी डॉलर्स एवढी संपत्ती आहे आणि धनेश चंद्र व दशमेश गुरु यांची युती तिसऱ्या स्थानांत येते व त्यांचे रवी-बुध-शुक्र यांचेशी त्रिकोणयोग आहे. हे कारण पुढे गेले आहे. हे आकडे कुंडलीवरून बरोबर दिसतात. कसे ते पाहा.




आकडे कुंडली अशी आहे.




धनेश चंद्र व संपत्तीचा कारक गुरु यांची युती सिंहेत, सिंहेचा अधिपती लाभस्थानात उच्च बुध व शुक्रासह. शुक्र पंचमेश रवीच्या युतीत. उच्च मंगळाची लाभांतील रवी-शुक्र-बुधावर पूर्ण दृष्टी आहे. (मंगळ लाभेश आहे) म्हणून एवढी प्रचंड संपत्ती !!!

ही संपत्ती जातकीला मिळाली आहे. ती वारसाहक्काने मिळालेली आहे. चंद्र भावचलित कुंडलीचा. चतुर्थेश (मातृस्थान) आहे व गुरु अष्टमेश आहे. त्यांची युती पंचम या संपत्ती स्थानाजवळ आहे व त्याचा अधिपती उच्च राशीला आहे व त्यावर दशमातील उच्चस्थ मंगळाची दृष्टी आहे. मंगळाची मेषेतील रवीवरही दृष्टी आहे.

याशिवाय हर्षल व नेपच्यून या नवीन ग्रहांचा व त्यांना ज्यांचे अधिपतित्व दिले आहे त्यांचा विचार केला असता काय दिसून येते ? द्वितीयात नेपच्यून आहे व अष्टमात हर्षल आहे. लाभस्थानचा बिंदू कुंभ २३° आहे. त्याचा अधिपती हर्षल हा अष्टमात आहे. त्यावर गुरुची दृष्टी व नेपच्यूनची दृष्टी आहे. म्हणजे २, ५, ८, ११ ही स्थाने हर्षल-नेपच्यून-चंद्र-गुरुने भारलेली आहेत. हर्षल लाभेश आहे. अकस्मात व आश्चर्यचकित करणारा ग्रह हर्षल आहे व तो तेथे अष्टमात आहे.

नेदरलँडची राणी विल्हेलमिना ही दिनांक ३१ ऑगस्ट, १८८० रोजी सायंकाळी ६.३० मि. वाजता जन्मली व तिच्या जवळ अफाट संपत्ती होती. तिचीच मुलगी राणी ज्युलियाना आहे व विल्हेलमिनानंतर तिची सर्व संपत्ती ज्युलियाना हिलाच मिळाली. ज्युलियानाचा पिता १९३४ मध्ये मरण पावला.

लग्नेश बुध मेषेत २६° १५′ असून त्याचा अष्टमस्थ हर्षलशी पूर्ण त्रिकोणयोग व धनस्थ नेपच्यूनशी लाभयोग आहे.

तेव्हा असा विचार भावचलित कुंडलीवरून व त्यातील भाव बिंदूवर ज्यांचे आधिपत्य आहे त्यावरून करता येतो.

ज्या पुस्तकात ज्युलियानाच्या कुंडलीचा विचार केला आहे त्याच पुस्तकात पान १०२ वर राणी विल्हेल्मिनाचे अफाट संपत्तीचा विचार केला आहे आणि पान १०९ वर ज्युलियानाची कुंडली देऊन विचार मांडला आहे.

श्री. जे. एन. भसीन या ज्योतिर्विदाने Dispositers in Astrology या नावाचे पुस्तक लिहिले आहे व ते उपयोगी आहे. पण त्यात केवळ आकडे कुंडलीवरून अनुमाने काढली आहेत.


ग्रह ज्या राशीत पाहुणा असतो त्याचा यजमान ग्रह कोठे आहे व तो बलवान असून शुभ फल देणारा असेल तर त्या ग्रहावरून फलादेश घेतला जातो. ही एक साखळी आहे. ती कोठपर्यंत नेता येते हे पाहावयाचे असते. थोडक्यात, ग्रह एकमेकांना खो देत असतात. हा खोखो चा खेळ कोठपर्यंत न्यावयाचा. शेवटचा ग्रह हा प्रभावी व फल देणारा ठरतो.

❂ ❂ ❂

## ११

# एकादश भाव

**(लाभ - इच्छापूर्ती - मित्र स्थान)**




सोबतच्या आकृतीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी अकरा हा अंक लिहिलेला आहे. त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीतील एकादश स्थान किंवा अकरावे स्थान म्हणतात.

अकराव्या भावावरून सर्व प्रकारचे सांपत्तिक लाभ, उद्योगापासूनची धनप्राप्ती, मित्रपरिवार, वैभव, सार्वजनिक कार्य, सहकारी संस्था, कंपन्या, मंडळे, क्लब, पत्नीच्या माहेराकडील कुटुंबीय या गोष्टींचा प्रामुख्याने विचार होतो. वाहनसुखाचा विचार करताना तृतीय व चतुर्थ भावाबरोबर या स्थानांचा विचार करावा लागतो. सोने व संपत्तीची प्राप्ती, प्रज्ञा, शाहणपण, मंत्रिपद, आईचे आयुष्यमान, लेखन व चित्रकला यामध्ये नैपुण्य हेही पाहावे असे उत्तर कालामृतात म्हटले आहे.

शरीरावयवांपैकी डावा कान, पोटऱ्या, घोटे यांचा विचार या स्थानावरून होतो.

नातेवाइकांपैकी मोठे बहीण, भाऊ, श्‍वशुर गृहाकडील नातेवाईक.

जातकाच्या संततीचा विचार करताना एकादश स्थानातील ग्रहांची दखल घ्यावी लागते कारण ते पत्नीचे/पतीचे पंचमस्थान असते.

एकादश स्थान हे उपचय स्थानांपैकी एक स्थान आहे. या स्थानात शुभ, अशुभ सर्वच ग्रह चांगली फले देतात. मात्र पापग्रह येथे जास्त श्रमात कमी संपत्ती देतात असे काही आचार्यांचे म्हणणे आहे.

शनीबद्दलच्या भावविचारात एकादशातील शनीबद्दल सारावलीकार -

**बह्मयु: स्थिरविभव: शूर: शिल्पाश्रयो विगतरोग: ।**
**आयस्थे भानुसूते धन-जनसम्पद्यूतो भवति ।।**

असे सांगतात, अर्थ - एकादशस्य शनी असलेला जातक दीर्घायुषी असतो. पराक्रमी, कायम राहणारी संपत्ती असते, शिल्प वगैरे कलांचे उत्तम ज्ञान असते. जातकास आजार होत नाहीत. निरोगी असतो व जातक धन-जन (मित्रपरिवार) - संपत्ती यांनी युक्त असतो.

पण त्यास संतती नसते. जातक नशीबवान, सुखी व प्रसिद्ध होतो परंतु त्याचे मोठ्या बहीण-भावाबरोबर चांगले संबंध नसतात.

पण स्त्री जातक धुष्टपुष्ट असते. पण शहाणपणा कमी असतो, असे भाषांतरकार सांगतात.

परंतु अध्याय ३४ मध्ये एकादश भावांतील प्रत्येक ग्रहाचे फल सांगताना श्लोक ६४ मध्ये पुढीलप्रमाणे प्रतिपादन सारावलीमध्ये आहे.

**नगरपुरवृन्दयोगैः स्थावरकर्मक्रियाभिरपि वित्तम् ।**
**लोहखरमहिषबहुलं रविजेऽपि तथाऽस्य वर्गे च ।।**

**अर्थ** - एकादश स्थानाशी संबंधित शनी अथवा त्याचे वर्ग असता गाव, शहर याशी निगडित स्थावरासंबंधीच्या सर्व कामामुळे संपत्तीचा लाभ तसेच लोखंड, म्हैस, गाढवे यांचे उपयोगाने धनलाभ होतो. म्हणजे बांधकामासंबंधी सर्व कामाचे मोबदल्यात पैसा मिळतो. आताच्या परिस्थितीत बिल्डर व बांधकाम कंत्राटदार यांच्या व्यवसायातून धनप्राप्ती असा अर्थ होऊ शकेल आणि अनेक कामगार, कारागीर यांच्याकरवी कामे होतात.

एकादश भावासंबंधीच्या फलामध्ये शुभ ग्रहांच्या दृष्टीने वृद्धी व अशुभ ग्रहांच्या दृष्टीने कमतरता अनुभवास येते. शुभ व अशुभ ग्रहांचे संबंध असता मिश्र फले मिळतील.

एकादशस्थानी बहुसंख्य ग्रह असता अथवा त्यांची दृष्टी असता अनेक मार्गांनी धनप्राप्ती होते. यामध्ये जो बलवान असेल त्याचा वाटा जास्त राहतो.

ग्रह स्वगृही वा मित्रक्षेत्री असता अर्धे फल मिळते. पण ग्रह उच्च असता पूर्ण फल, ग्रह अस्तंगत असता अगदी कमी प्रमाणात व शत्रुक्षेत्री असता १/४ फले मिळतील.

एकादश स्थानातील ग्रहांची फले जन्मापासूनच मिळतात असे यवनाचार्य सांगतात पण अन्यांच्या मते राजे वा मांडलिक यांनाच भरपूर धनलाभ होतो. त्या मानाने सामान्य जनांस कमीच मिळतो.

एकादशातील शनीची लग्नावरील दृष्टी प्रकृतीचे दृष्टीने चांगली. कारण जातक निरोगी असतो. अष्टमावरील दहावी दृष्टीही उत्तम ठरते. कारण जातक दीर्घायू होतो आणि पंचमावरील दृष्टी मात्र अशुभ ठरते कारण संतती होत नाही.

शनी हा निसर्ग कुंडलीचा दशमेश असतो व तो लाभस्थानी असता उद्योग-व्यवसायापासून होणारा लाभ, सरकारी व प्रशासकीय नोकरीद्वारा लाभ, वकिली व्यवसायापासूनचा लाभ आणि कायदा व सुव्यवस्था यांचे रक्षण करण्यासाठी व गुन्हेगारावर वचक व त्यांचा बंदोबस्त करणे, त्यांना न्यायालयात खेचणे ही कामे शनीची आहेत. त्यासाठी मंगळ व रवी यांच्याशी संपर्क असावा लागतो. व्यवसायाचा विचार करताना मकर रास व शनी यांचाही विचार करावा लागतो.

## एकादशस्थ शनीची राशिनिहाय भावफले

**(१) मेषेचा शनी :** एकादशस्थानी जर एक हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मेषेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -


शनी अष्टमेश व नवमेश असतो आणि तो एकादशात मेष राशीत नीचक्षेत्री येतो. येथे पंचमस्थान जास्त बिघडते तसेच एकादश स्थानही बिघडते. दोन्ही ठिकाणी मंगळ व शुक्र यांच्या भूमिकेवर बरेच अवलंबून राहते. शनी अष्टमेश तसा नवमेश असल्याने शुभाशुभ वा संमिश्र फले मिळतात.

दशमावर मीन रास येते व त्यांचा संबंध अशुभ फले कमी करण्यात होतो. गुरु व चंद्र यांची स्थिती चांगली असल्यास व लग्नेश प्रबल असल्यास व्यवसाय उत्तम चालतो. नावलौकिक मिळतो.

एकादशातील शनी उद्योगातून पैसे दर्शवितो. तसेच कुंडलीच्या दर्जानुसार व ग्रहयोगानुसार राजकीय क्षेत्रात जातक जातो व दीर्घायुष्य लाभते.

### कुंडली : श्रीमती विजया

जन्म गुरुवार २१ नोव्हेंबर १९४० रोजी रात्री ९ वा. ३० मि. प्र. वेळ जुन्नर येथे. अक्षांश १९° उ. १२′ रेखांश ७३° ५८′ पू. अयनांश २३° २′ ३″. सां. स. ० ता. ५८ मि. ० से. बुध महादशा भोग्य वर्षे ८ महिने ४ दिवस २९




मोठ्या दोन बहिणी व धाकटी एक बहीण - भाऊ. विवाह २४.१२.१९५८ दोन मुली. पहिली २१.१२.१९६२ व दुसरी १३.१०.१९६३. १९६५ घटस्फोट, पहिली मुलगी मृत. ०४.१२.१९६९ नर्सिंग शिक्षण व नर्स म्हणून नोकरी. शुक्राच्या महादशेत सर्व घटना घडल्या. मोठ्या भावंडांचा कारक गुरु-गुरु युती शनी म्हणून भाऊ नाहीत. लाभेश मंगळ तूळ राशीत शुक्रासह व पंचमात बुध प्रतियोग गुरु शनी. चंद्राचा लाभेश शुक्र स्त्रीग्रह व वृषभ स्त्री रास म्हणून दोन बहिणी मोठ्या.

लग्नेश बुध व सप्तमेश गुरू समसप्तक योग विवाह झाला पण गुरू शनीच्या युतीत व मंगळाच्या दृष्टीत यामुळे विभक्त व घटस्फोट. पंचमेश शुक्र तूळ राशीत कन्या संतती तसेच बुध युती पंचम बिंदू व गुरुची पूर्ण दृष्टी असल्याने कन्या संतती. गुरू युती शनी पुत्र नाहीत पण पंचमावर व पंचमस्थ बुधावर शनीचीही दृष्टी त्यामुळे पहिली संतती मृत. किडनी दोषामुळे दुसरी संतती सप्तमावर - अधिपती गुरू त्यामुळे व सप्तमाशी शनीचा संबंध नसल्याने आणि गुरुची दृष्टी असल्याने दुसरी संतती जगली - तिचा विवाहही १९८३ मध्ये झाला.

दशमकेंद्री केतू आहे व चंद्र त्रिकोण दशम बिंदू मीनेत. दशमेश गुरु शनीच्या युतीत त्यामुळे नर्सिंगचा व्यवसाय. धनेश चंद्र मीन रास व केतू यांचा संबंध हॉस्पिटल्स, नर्सिंग यांच्याशी येतो. त्याच्या माध्यमातून पैसा मिळविला जात आहे. चारितार्थ उत्तम चालत आहे.

घटस्फोटास आणखी एक कारण आहे. पतिकारक रवी हा वृश्चिकेत पण पंचमभावात त्याचा हर्षलशी प्रतियोग.

**(२) वृषभेचा शनी :** एकादशस्थानी जर दोन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी सप्तमेश व अष्टमेश असून एकादश स्थानात वृषभ या मित्रराशीत येतो.


सप्तम स्थान स्वतंत्र उद्योग, व्यापार व व्यवसाय यांचे स्थान आहे. निसर्ग कुंडलीचे सप्तम स्थानावर तूळ रास येते. तुळेचे प्रतीक तराजू आहे म्हणून व्यापार, न्यायालयीन खटले, न्यायखाते व त्याच्याशी संबंध असलेले व्यवसाय यांचाही संबंध सप्तम स्थानाशी येतो. सप्तमेश लाभात येतो तेव्हा वरील गोष्टींपासून संपत्ती लाभ होतो. भागीदारीपासूनचा लाभ अष्टम स्थानावरून कळतो. शनी त्याचाही अधिपती आहे व त्याची दृष्टीही अष्टमावर येते. या लग्नास मंगळ राजयोगकारक आहे. त्याच्याशी शनीचे संबंध कसे आहेत व शुक्र आणि गुरु यांचाही विचार घ्यावा लागेल.

### कुंडली : श्री. के. रघुरामय्या

जन्म मंगळवार दिनांक ६ ऑगस्ट, १९१२ रोजी पहाटे ४ वा. ५० मि. प्र. वेळ जि. गुंटूर येथे. अक्षांश १६° उ. १८′ रेखांश ८०° ३०′ पू. अयनांश २२° ३८′ ८″. सां. स. १ ता. ३८ मि. ३१ से.

M.A. L.L.B. Bar - at Law वकील. नंतर राजकारणात प्रवेश. मद्रास उच्च न्यायालयात व सर्वोच्च न्यायालयात वकिली केली. राजकारणात १९५७ पासून मंत्रिपदे.

भाग्येश पंचमात मंगळ व शनी या दोघांच्याही दृष्टी योगात. मंगळ राजयोगकारक त्याच्या भाग्येशावरील दृष्टीमुळे जातक राजकारणी झाला व मंत्री बनला. शनी त्रिकोण हर्षल हा महत्त्वाचा योग सप्तम - अकरा भावातून होत आहे. गुरुची शनीवर दृष्टी व गुरु लाभयोग.




हे महत्त्वाचे दृष्टियोग आहेत. लग्नेश दशमात दशमेश द्वितीयात त्रिकोणयोग आहे. मंगळ-बुध युती शनी बुध केंद्रयोग वकिली. शिक्षणासाठी परदेश प्रवास - गुरुची भाग्यस्थानावर दृष्टी व योगकारक मंगळाचीही नवमावर दृष्टी - यामुळे झाला. शुक्र कर्केचे शेवटी व द्वितीय भावबिंदूचे फक्त २° ३०′ मागे. लाभेश व चतुर्थेश द्वितीय भाव मध्यावर उत्तम वक्तृत्व. लाभस्थ शनीमुळे भाग्येश गुरुचे त्यावरील दृष्टीने शनीने शुभ फले दिली.


**(३) मिथुनेचा शनी** : एकादशस्थानी जर तीन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

सिंह या लग्नास शनी षष्ठेश व सप्तमेश असतो आणि तो एकादश स्थानात मिथुन राशीत मित्रक्षेत्री येतो. षष्ठेश त्या स्थानापासून सहाव्या स्थानी येतो. ही स्थिती शरीरप्रकृतीच्या दृष्टीने चांगली ठरते. प्रकृती निरोगी राहते. षष्ठस्थानाचा संबंध नोकरीशी येतो. तेव्हा नोकरीचे माध्यमातून भरपूर लाभ घडतात. शनी षष्ठेश व सप्तमेश असल्याने गुन्हेगारीशी संबंध. गुन्ह्यांना आळा घालणे, सप्तम स्थानाचा संबंध कब्जे, खटले, भांडणे यांच्याशी येतो. शांतता, सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांना शोधणे अशा तऱ्हेची कामे करावी लागतात.

## कुंडली : श्री. श्रीपाद गणेश गोखले

जन्म मंगळवार दिनांक १ ऑगस्ट, १९१६ रोजी सकाळी ८ वा. ४० मि. मिरज येथे. अक्षांश १६° उ. ५०′ उ. रेखांश ७४° ४२′ पू. अयनांश २२° ४१′ ४६″. सां. स. ४ ता. २६ मि. २२ से.

सिंह लग्नाचा योगकारक मंगळ धनस्थानी असून त्याचा दशमाशी त्रिकोणयोग आहे व लग्नेश रवीशी लाभयोग आहे. रवीच्या दशमास गुरु आहे. षष्ठेश शनी लाभात आहे व लाभेश व धनेश बुध रवीच्या युतीत असून त्यांची दृष्टी षष्ठस्थानावर आहे.




नवमाशात मंगळ मेषेत आहे व गुरु कर्केत आहे. शनी वर्गोत्तम आहे. मंगळ बलिष्ठ आहे व त्यास लाभस्थ शनीची साथ आहे. मंगळाची व शनीची पंचम भावावर तसेच अष्टम भावावर दृष्टी आहे. चंद्र व रवी अन्योन्य क्षेत्र संबंध आहे. जातक शासकीय नोकरीत होता. पोलीस खात्यात नोकरी व तेथेच जातक पोलीस कमिशनर या उच्च पदास पोहोचला. लग्न वर्गोत्तम बली आहे. ७ ग्रह क्षितिजाचे वर पूर्ण प्रकाशात आहेत व त्यामुळे जातक लवकर-लवकर बढती घेत मोठ्या पदावर आरूढ झाले.


शनी सामान्य जनता व पब्लिक दर्शवितो. २ व ११ ही स्थाने त्यांचा अधिपती एकच बुध आहे व त्या दोन्ही स्थानांशी मंगळ व गुरु यांचा संबंध आहे. नवमांशात शनी लाभात मिथुनेत व पंचमस्थ बुधाच्या दृष्टीत आहे.

**(४) कर्केचा शनी :** एकादशस्थानी जर चार हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कर्केचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी पंचमेश व षष्ठेश असून एकादश स्थानात कर्क या शत्रू राशीत येतो. पंचमेश लाभ स्थानात असता अधिकार योग होतो. जातक सुशिक्षित व विद्वान असतो व संपत्ती चांगली मिळवितो. संतती चांगली असते. येथे शनीबरोबर चंद्र असता उद्योगधंद्यातून उत्तम लाभ व संपत्ती प्राप्त होते अथवा द्वितीयेश शुक्र उच्च राशीस असता नशीब चांगले फळफळते. संपत्तीचा ओघ येतो. सरकारी नोकरी मिळते पण शनी प्रतिकूल नवांशात असता व्यवसायात नुकसान, नोकरीत अवनती होते. निराशा होते. लाभेश शुभ स्थानात असता उत्तम फलदायी होतो.

## कुंडली : श्री. म. दा.

जन्म बुधवार दिनांक २८ ऑगस्ट, १९१८ रोजी सकाळी ८ वा. ५५ मि. प्र. वेळ अक्कलकोट येथे. अक्षांश १७° उ. ३१′ रेखांश ७६° १२′ पू. अयनांश २२° ४३′ ३०″. सां. स. ६ ता. ५२ मि. ११ से.




वर्ण गोरा, उंची ६ फूट, चौरस रुंद खांदे, हसतमुख, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, स्वभावाने दिलदार. भावंडांत मोठा, चार धाकटे भाऊ व एक बहीण. विवाह २०.०२.१९४२. संतती, दोन मुली व एक मुलगा. सर्व हुशार. मोठे मित्रमंडळ, खानदानी घराण्यात जन्म, शेतीवाडी मोठी, स्थावरही मोठे घर, B.A.L.L.B. प्रथम वकिली. १४.११.१९५१ रोजी न्यायखात्यात कनिष्ठ श्रेणीचे न्यायाधीश म्हणून नोकरीस सुरुवात. असिस्टंट जज्ज - औद्योगिक न्यायालयात न्यायाधीश गुरु युती दशम बिंदू त्रिकोण मंगळ लाभयोग बुध.

दशमात गुरू लाभयोग दशमेश लग्नेश बुध आणि त्रिकोण योग मंगळ भाग्येश शुक्र लाभात, लाभेश चंद्र भाग्यात उच्चांशी आहे. पंचमेश शनी कर्केत, धनेश भाग्येश शुक्राच्या युतीत.


लग्नावर व पंचमावर शनीची दृष्टी. पंचमेश शनी कर्केत दोन मुली. पंचमावर मंगळाची दृष्टी. एक मुलगा.

**(५) सिंहेचा शनी :** एकादशस्थानी जर पाच हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'सिंहेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी चतुर्थेश व पंचमेश असून तो एकादशात सिंह राशीत येतो. त्यास मान, प्रसिद्धी, संपत्ती मिळते. पण संतती नसते. दत्तक घेतला जातो. या जातकास श्रीमंत व्यक्तीपासून लाभ होत राहतात. संधीवातासारखे विकार होतात व वातविकार होतात.

### कुंडली : श्री. बद्रीप्रसाद पोतदार

जन्म गुरुवार दिनांक ३ जून, १९२० रोजी दुपारी ३ वा. स्था. वेळ कलकत्ता येथे. अक्षांश २२° उ. ३३′ रेखांश ८८° २४′ पू. अयनांश २२° ४४′ ५७″. सां. स. ७ ता. ४६ मि. १२ से.




उद्योगपती, ताग, चहा, संगमरवर, पोलाद, टेक्सटाईल, कोळसा, विद्युत, जमीन सुधारणा, मोटारकार्स इत्यादी विविध उद्योगांशी संबंध, अनेक कंपन्यांचे संचालक, आमदार. राजयोगकारक शनी सिंहेत लाभस्थानी आहे. लग्नेश व लाभेश अष्टमात आहेत व दोघेही शनीच्या दृष्टीत आहेत. शिवाय शनी-हर्षल प्रतियोग आहे. मंगळ लग्नबिंदूचे युतीत तर भाग्येश बुध नवम बिंदूचे युतीत आहे. भाग्येश बुध व धनेश मंगळ यांचा पूर्ण त्रिकोणयोग आहे. गुरु दशमात कर्केत तर दशमेश चंद्र धनु राशीत आहे. दशमेश चंद्राचा शनीशी त्रिकोण आहे.

म्हणजे शनीचा संबंध दशमेश चंद्र. लग्नेश शुक्र, लाभेश रवी व हर्षल यांचेशी प्रत्यक्षपणे आहे. लाभ स्थानावरून कंपन्या, मंडळे यांचा बोध होतो. म्हणून शुक्राने दर्शविलेला टेक्सटाईल, हर्षलने दर्शविलेला विद्युत, शनीने दर्शविलेला कोळसा, चंद्राने दर्शविलेला चहा, शुक्र-हर्षलमुळे मोटारकार्स, धनेश मंगळ लग्नबिंदूवर त्यांचा संबंध. पोलाद अशा निरनिराळ्या उद्योगांशी संबंध. संचालक म्हणून आला. रवीच्या राशीत शनी म्हणून राजकारणात आमदारकी. जमीन व खाणी यांचा संबंध खास शनीशी येतो.


हे सर्व लाभातील शनीने उत्तम संपत्ती, अनेक कंपन्या, मान, प्रसिद्धी दिली.

**(६) कन्येचा शनी :** एकादशस्थानी जर सहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी तृतीयेश व चतुर्थेश असतो आणि एकादशात कन्या राशीस येतो. असा जातक नशीबवान, प्रसिद्ध व दीर्घायुषी असतो. शनीची दशा आयुष्यात आल्यास फार उत्तम ठरते. एक प्रकारचा राजयोग होतो. राजयोगासारखाच अनुभव येतो.

## कुंडली : श्री. केशवराव कोठावळे

जन्म सोमवार दिनांक २१ मे, १९२३ रोजी रात्रौ ७ वा. ३० मि. प्र. वेळ मुंबई येथे. अक्षांश १८° उ. ५४′ रेखांश ७२° ५०′ पू. अयनांश २२° ४७′ ६″. सां. स. १० ता. ४३ मि. ४६ से.




भाग्येश चंद्र भाग्यस्थानात व रवीच्या (दशमेश) लाभयोगात आहे. तृतीयेश व चतुर्थेश शनी लाभस्थानी कन्येत २१° ८′ वर असून त्याचा बुधाशी त्रिकोणयोग आहे. सप्तम स्थान हे व्यापार व स्वतंत्र व्यवसायाचे स्थान असून लाभेश बुध तेथेच मिथुन नवांशात आहे. शुक्रही मिथुन नवांशातच आहे. मिथुन नवांशातील बुध शुक्र रसिकता, लेखन, साहित्य, पुस्तके व गोष्टी दर्शवितो. तसेच तृतीय स्थान व शनी मुद्रण, छापखाना यांचाही दर्शक आहे. पुस्तक छपाई, प्रकाशन व विक्री असाच स्वतंत्र व्यवसाय आहे. जातक सुप्रसिद्ध मॅजेस्टिक बुक डेपोचा मालक व प्रकाशक होते.

महाराष्ट्र लॉटरीचे प्रमुख एजंट होते.

येथे रवी-बुध योग आदित्य योग नावाने ओळखला जातो. याचे फल मोठा बुद्धिमान, कार्यकुशल असून जातकाबद्दल प्रेम व आदर निर्माण होणे असे आहे. जातक नावलौकिक मिळवितो व सुखी असतो.

या कुंडलीत षष्ठ स्थान ते द्वादश स्थान अशा सात स्थानांत सर्व पारंपरिक ग्रह ओळीने आहेत. हा अर्धचंद्र योग नावाचा योग आहे. त्याचे फल जातक नशीबवान असून तेजस्वी व्यक्तिमत्त्व दर्शवितो व तो आपल्या क्षेत्रात प्रमुख होतो.

आणखी एक योग 'पारिजात योग' या नावाचा येथे झाला आहे. लग्नेश ज्या राशीत असेल त्या राशीचा अधिपती जर केंद्रात वा त्रिकोणात असेल तर हा योग होतो. असा जातक मध्यम व उत्तरायुष्यात सुखी होतो. त्यास मान्यवरांकडून मान, आदर मिळतो आणि तो उदार व दिलदार असतो.

येथे लग्नेश मंगळ मिथुनेत आहे. त्याचा अधिपती बुध सप्तम केंद्रात आहे. बुधाची लग्नावर दृष्टी आहे व शिवाय तो स्वनवांशी शुक्रासह आहे.

'मॅजेस्टिकच्या गप्पा' या व्याख्यानमालेत अनेक प्रसिद्ध लेखकांचा सहभाग होता. कोठावळे यांचा मित्रपरिवारही मोठा होता.

वृश्चिक लग्नास बुध व गुरू हे संपत्तिदायक स्थानांचे अधिपती असून बुध-शनी त्रिकोण गुरु-हर्षल त्रिकोण असे महत्त्वाचे योग बुध व गुरु यांचेमुळे झाले आहेत.


लाभस्थ शनीचा त्यास बराच हातभार लागला आहे.

**(७) तुळेचा शनी :** एकादशस्थानी जर सात हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'तुळेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

धनु या लग्नास शनी द्वितीयेश व तृतीयेश असून लाभस्थानी तूळ या उच्च राशीत येतो. द्वितीय या संपत्तीच्या स्थानाचा अधिपती अकराव्या या लाभस्थानात (सर्व प्रकारचे लाभ देणाऱ्या) भरपूर धनप्राप्ती दर्शवितो. त्यातून धनेश हा आपल्या उच्च राशीत येतो. जातक तरुणपणीच संपत्ती कमावतो व संचयही पुष्कळ होतो. तृतीयेशही उच्च असल्याने जातक चांगला बुद्धिमान, नशीबवान असतो. शिवाय त्याच्यापाशी वक्तृत्वही असते. आयुष्यात तो प्रसिद्ध होतो आणि उत्तम प्रतिष्ठा लाभते व उच्चपदी जातो.

**कुंडली : श्री. व्ही. के. कृष्ण मेनन**

जन्म रविवार दिनांक ३ मे, १८९६ रोजी रात्री ९ वा. ३० मि. कालिकत येथे. अक्षांश ११° उ. १५′ रेखांश ७५° ४९′ पू. अयनांश २२° २४′ ३२″. सां. स. १२ ता. १८ मि. २१ से.




प्रसिद्ध वकील, लेखक, पत्रकार व मुत्सद्दी, खुप शिकलेले. साम्यवादी विचारसरणीचे पुढारी. १९४७-५७ ब्रिटनमध्ये राजदूत. नंतर संरक्षणमंत्री १९६२ च्या चीनने केलेल्या आक्रमणानंतर त्यांच्या गाफीलपणाबद्दल देशभर कोलाहल. मंत्रिपद सोडावे लागले. राष्ट्रसंघाचे आमसभेत प्रदीर्घ भाषण.

तीन ग्रह उच्च-लग्नेश गुरु अष्टमात उच्च धनेश शनी लाभात उच्च भाग्येश रवी पंचमात उच्च. उत्तम वक्तृत्व द्वितीयेश शनी उच्च. द्वितीयात चंद्र त्रिकोण बुध-गुरुची द्वितीयावर दृष्टी व बुधाशी लाभयोग. दशमाशी चंद्र बुध त्रिकोण, गुरुलाभ योग. शनी त्रिकोण मंगळ वकिली.


कम्युनिस्ट चीन आक्रमण करणार नाही ही ठाम विचारधारा त्यामुळे उत्तर सरहद्दीचे संरक्षणाबद्दल केंद्रसरकार व नेहरू गाफील राहिले. पण चीनचे १९६२ मधील आक्रमण झाल्यावर मेननवर टीकेची झोड. राजीनामा द्यावा लागला. मंत्रिपद जाईल हे डॉ. बी. व्ही. रामन यांनी एक वर्ष अगोदर सांगितले होते. कुंडलीचे वैशिष्ट्य म्हणजे केंद्रात एकही ग्रह नाही पण २/५/८/११ या स्थानात चरराशीत ५ ग्रह आहेत. २, ५, ८, ११ या संपत्तिदायक स्थानात उच्च ग्रह त्यामुळे वकिली, लेखन, पत्रकारिता यावर भरपूर संपत्ती लाभ झाला. दशमेश बुधाचे सर्व व्यवसाय त्यांनी केले.

**(८) वृश्चिकेचा शनी :** एकादशस्थानी जर आठ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृश्चिकेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी लग्नेश व धनेश असून एकादशात तो वृश्चिक या शत्रुराशीत येतो. धनेश लाभात असल्याने प्राप्ती उत्तम राहते. शुक्र राजयोगकारक असल्याने त्याचा शुभयोग. उत्कर्षदर्शक राहील. बुध भाग्येश असल्याने त्याचा शुभयोगही व्यवसायात प्रगती दर्शविल. पण बुध षष्ठेशही असल्याने त्याची लग्नेशावरील दृष्टी वा अशुभ योग आजार-व्याधी दर्शविल.

## कुंडली : श्रीयुत

जन्म शनीवार दिनांक ६ मार्च, १९२६ रोजी पहाटे ३ वा. ५५ मि. प्र. वेळ पुणे येथे. अक्षांश १८° उ. ३०′ रेखांश ७३° ५८′ पू. अयनांश २२° ४९′ १९″. सां. स. १४ ता. १२ मि. २६ से.




पंचमेश व दशमेश शुक्र गुरुच्या युतीत आहे. तसेच लग्नेश शनी व भाग्येश बुध यांचा त्रिकोणयोग आहे. यामुळे शिक्षण पदव्युत्तरसुद्धा झाले आहे.

षष्ठेश बुध त्रिकोण शनी (धनेश) या योगावर उत्तम नोकरी आहे. परंतु चंद्र-शनी युती आहे. शनी लग्नेश वक्री आहे तो शत्रुराशीत आहे. चंद्र वृश्चिक राशीत परमनीचांशी आहे. चंद्र सप्तमेश परमनीचांशी व शनीच्या युतीत हा योग विवाहास प्रतिबंधक वा अतिविलंब दर्शवितो. चंद्र नेपच्यून केंद्रयोग आहे. सप्तमेश शनी व नेपच्यून यांनी पूर्ण बिघडला आहे. वक्र शनीची पंचमावरील दृष्टी व मंगळाची सप्तमावर दृष्टी यामुळे संतती, विवाहसौख्य यावर पूर्णपणे अशुभ परिणाम झाला आहे.

मकर चर लग्न आहे. त्यास एकादशेश मंगळ हा बाधक आहे. तो व्ययस्थानात आहे आणि त्याची दृष्टी सप्तमावर. विवाहसुखास पूर्ण बाधक ठरते. मंगळ सप्तमाच्या प्रतियोगापासून फक्त ५° १३′ मागे आहे. म्हणजे मंगळ सप्तम भावावर पूर्ण परिणाम करणार आहे.

गुरु लग्नी नीच राशीत असून तो व्ययेश आहे. तेव्हा त्याची सप्तमावरील दृष्टी अशुभ परिणाम करणारी ठरते. सगळे अशुभ योग सप्तम व सप्तमेशावर एकवटले आहेत.

**(९) धनुचा शनी :** एकादश स्थानी जर नऊ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'धनुचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

शनी लग्नेश आहे. तसा व्ययेशही आहे. पण एकादशात धनु राशीत येतो. गुरु हा धनेश व लाभेशही आहे. तो लाभ स्थान नियंत्रण करणारा आहे. तो लाभकारक ग्रह आहे. लग्नेश शनी लाभभावात असता व्यापार-उद्योगात संपत्ती मिळते. जातकाच्या भरभराटीस त्याच्या भावाची उत्तम मदत होते. जातक संततीचे बाबतीतही सुखी राहील.

एकादशात शनीबरोबर शुक्रही असता शुक्र उत्तम लाभ देणारा ठरतो. भावार्थ रत्नाकरमध्ये कुंभ लग्नाच्या विचारात -


**कुश्भे तु जायमानस्य शनी शुक्रै तु लाभगौ ।**
**शुक्रदाये संप्राप्ते शुक्रो भवति योगदः ।।**

शुक्र व शनी लाभात एकत्र असता शुक्राच्या दशेत भरपूर लाभ प्राप्त होतो.

## कुंडली : एक उच्च पोलीस अधिकारी

जन्म मंगळवार ११ नोव्हेंबर १९२९ रोजी १२ वा. ५५ मि. प्र. वेळ. अक्षांश २७° उ. ११′ रेखांश ७८° २′ पू. अयनांश २२° ५२′ ३०″. सां. स. १६ ता. २८ मि. २२ से.

कुंभ लग्न, लग्नेश शनी लाभस्थानी धनु राशीत आहे. त्याची लग्नावर व षष्ठेश चंद्रावर पूर्ण दृष्टी आहे. दशमेश मंगळाची लग्नावर व चंद्रावर पूर्ण दृष्टी आहे. रवी व मंगळ युती आहे.




दशम युती मंगळ, प्रतियोग गुरु व त्रिकोण हर्षल. गुरु हा धनेश व लाभेश असून त्याची दशमावर पूर्ण दृष्टी आहे. तेव्हा मंगळ-रवी प्रथम व प्रभावी असून गुरु धनेश व लाभेश आणि हा लाभ मिळविणारा लग्नेश शनी हे दुय्यम आहेत. मंगळ तृतीयेश असल्याने पराक्रम, शौर्य व धाडस दर्शविणारा व्यवसाय म्हणजेच सैनिकी अथवा पोलीस असा होतो. रवी मंगळाजवळ आहे व शनी या दोघांमुळे प्रशासकीय सेवेत पोलीस खात्यात. दशमेश दशमात व गुरुच्या दृष्टीत यामुळे मोठ्या अधिकार पदावर जातक चढतो. शनी व धनु या अग्निराशीत व मूळ नक्षत्रांत आहे तर रवी मंगळ जलत्त्व राशीत असून शनीच्या अनुराधा नक्षत्रात आहे व त्याचे काम लग्नेश शनी अग्निराशीतून करीत आहे.

**(१०) मकरेचा शनी :** एकादशस्थानी जर दहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मीन या लग्नास शनी लाभेश व व्ययेश असतो व तो लाभ स्थानात असल्याने मकरेत स्वगृही येतो. शनी चतुर्थाच्या अष्टमात येत असल्याने मातेला दीर्घायुष्य लाभते व आईकडूनही वारसारूपाने धन, मालमत्ता मिळते.


लाभस्थ शनीची अष्टमावर दृष्टी असल्याने जातकासही दीर्घायुष्य मिळते पण अष्टमात पापग्रह नसता व शनी पापदृष्ट नसता आयुष्य भरपूर लाभेल. अन्यथा मधोमधच मृत्यू येईल.

जातकास मोठे भाऊ असतात व ते जातकास आयुष्यभर मदत करतात. जातकाचा मित्रपरिवारही मोठा असतो. जातकास स्त्री, संतती, संपत्ती व सर्व सुखे प्राप्त होऊन सुखी आयुष्य लाभते.

मीन लग्नास चंद्र पंचमेश असतो. तो जर शनीबरोबर अकराव्या स्थानात असेल तर गरीब कुटुंबात जन्मलेलाही राजासमान होतो असे डॉ. बी. व्ही. रामन अकराव्या स्थानाबद्दलच्या विश्लेषणात म्हणतात.

## कुंडली : श्री. टी. एन. शेषन

जन्म सोमवार १५ मे, १९३३ रोजी पहाटे ३ वा. २७ मि. प्र. वेळ पालघाट येथे. अक्षांश १०° उ. ४६′ रेखांश ७६° ४७′ पू. अयनांश २२° ५४′ ४३″. सां. स. १८ ता. ३२ मि. ३० से.




निवृत्त निर्वाचन प्रमुख, जातकास तीन मोठे भाऊ. आय. ए. एस. शाळेपासून आय. ए. एस. पर्यंतच्या प्रत्येक परीक्षेत पहिला क्रमांक.

शासकीय सेवेत प्रवेश आणि स्वत:च्या गुणवत्तेवर बढती होत-होत केंद्रीय मंत्रिमंडळाचे सचिव झाले. १९८८-८९ पासून मुख्य निवडणूक आयुक्त. या पदावरील त्यांची कामगिरी सर्वश्रुत आहे. निवडणुकीत शिस्त लावली. चतुर्थेश बुधाचा भाग्येश मंगळ, नेपच्यून व लग्नेश दशमेश गुरु यांच्याशी त्रिकोणयोग. यामध्ये बुद्धिमत्ता, प्रथम क्रमांक स्पष्ट होतो. लाभांतील स्वगृहीच्या शनीने सरकारी नोकरीत प्रवेश व अंतिमत: स्वतंत्र असे निवडणूक आयुक्तचे पद दिले. पंचमेश चंद्रही लाभात शनीबरोबर आहे. चंद्र-शनी युती पूर्ण असती तर राजासमान झाले असते. द्वितीय स्थानातील बुध व षष्ठातील मंगळ (भाग्येश) नेपच्यून (आधुनिक लग्नेश) व दशमेश गुरू यांचा परस्परातील त्रिकोण आहेच. पण या चारही ग्रहांचा दशमबिंदूशी अंशसाम्याने त्रिकोणयोग आहे. दशमेश गुरू मंगळाबरोबर आहे त्यामुळे प्रशासकीय सेवेत आयुष्य, मान व लाभ झाला.

लाभेश शनी लाभात असल्याने त्यांना तीन मोठे भाऊ होते. मोठ्या भावंडाचा कारक गुरु व शनी षडाष्टक आहे पण चंद्राकडून लाभेश मंगळाची लाभ स्थानावर (जन्मकुंडलीतील नवम) पूर्ण दृष्टी व मंगळ-गुरु यांची युती आहे. त्यामुळे मोठी भावंडे आहेत.


**(११) कुंभेचा शनी :** एकादशस्थानी जर अकरा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मेष या लग्नास शनी दशमेश व लाभेश असतो आणि तो एकादशात कुंभ या मूलत्रिकोण राशीत येतो. उद्योग-व्यवसाय यांच्या दृष्टीने ही स्थिती उत्तम फलदायी ठरते.

पण पंचमाच्या दृष्टीने अशुभ ठरते. जातकाचे वैवाहिक जीवन सुखाचे नसते व त्यास पोट व गुदद्वाराच्या व्याधी असतात. पचन नीट होत नाही आणि मूळव्याधीची तक्रार असते.

## कुंडली : श्री. या. वि. जोशी

जन्म शनिवार दिनांक २८ एप्रिल, १९०६ रोजी सकाळी ५ वा. ४३ मि. अक्षांश १८° उ. रेखांश ७५° पू. अयनांश २२° ३२′ ४५″. सां. स. १९ ता. ३८ मि. १० से.




भाग्येश गुरु द्वितीयात असून त्याचा तृतीयेश बुधाशी लाभयोग आहे. स्वत: दशमेश शनीचा रवी व हर्षलशी लाभयोग आणि तृतीयस्थ नेपच्यूनशी त्रिकोणयोग आहे. शुक्र व मंगळ यांची द्वितीय भावबिंदूशी युती आहे. गुरुच्या माध्यमातून पैसा, गुरु व बुध दोन्ही मिळून प्रकाशनाचा अगर जाहिरातीचा व्यवसाय दर्शवितात. जातकाने व्यवसायात उत्तम पैसा कमावला पण कौटुंबिक सुख बिघडले.

सप्तमेश शुक्र सप्तमाच्या अष्टमात मंगळाच्या युतीत व शनीच्या केंद्रयोगात आहे. जातकाने पहिली पत्नी टाकली व दुसरे लग्न केले. दुसऱ्या पत्नीने जातकास सोडले व मग पहिल्या पत्नीस घरी आणले. दोन लग्नांनीही संतती झाली नाही. पंचमावर सिंह ही वंध्या रास व पंचमेश रवी व पंचमस्थान यावर शनीची दृष्टी यामुळे संतती नाही. मुलगी दत्तक घेतली. पण तीही निघून गेली. मंगळ-शुक्र युती दोन बायका पण संतती नाही.


**(१२) मीनेचा शनी :** एकादशस्थानी जर बारा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मीनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

वृषभ व तूळ लग्नास शनी हा एकटा राजयोग करणार असतो आणि त्याचे लाभ स्थानातील वास्तव्य उत्तम लाभ, मित्रमंडळ, वाहनसुख, स्थावर व सुखी जीवन या दृष्टीने महत्त्वाचे व समृद्ध ठरते.

शनी नवमेश व दशमेश असतो आणि एकादश स्थानात तो गुरूच्या मीन राशीत येतो. असा जातक आपल्या नातेवाईक व मित्र परिवारात प्रमुख असतो. त्याचा धनसंचय वाढत असतो. जातक सुखी असून त्यास सर्व प्रकारचे लाभ प्राप्त होतात. समुद्रापासून आयात-निर्यातीच्या व्यापारातून मोठा लाभ होतो व त्याचप्रमाणे मीठ, मच्छी, मोती, बोटी व समुद्रामुळे मिळणाऱ्या अन्य पदार्थांचा व्यापार-उद्योगात पैसा मिळेल. हॉस्पिटले, दवाखाने, आश्रयगृहे, सुधारगृहे या माध्यमातून लाभ होतो.

## कुंडली : डॉ. काशिनाथ बा. चिंदरकर

जन्म शनीवार १९ सप्टेंबर, १९०८ रोजी रात्रौ ११ वा. ४६ मि. सोलापूर येथे. अक्षांश १७° उ. ४२′ रेखांश ७५° ५४′ पू. अयनांश २२° ३४′ ५५″. सांपतिक समय २३ ता. १ मि. ३ से.





शनी नवमेश व दशमेश आहे व तो लाभात मीन राशीत येतो. शनीचा शुक्राशी पूर्ण त्रिकोण आहे. व्ययेश शुक्र कर्केत व दशमेश शनी मीनेत. शिवाय शनीची दृष्टी कन्येतील बुधावर आहे.

मेष व तूळ राशी लुप्त आहेत. मंगळ षष्ठेश चतुर्थात असून त्याची दृष्टी शनीवर आहे. दशमेशाचा संबंध ६ व १२ या स्थानांशी आहे व तो कन्या मीन राशीतून आहे. व्यवसाय वैद्यक क्षेत्रात. उत्तम लाभ मिळविला. स्वमूत्रचिकित्सा शिवांबू यांचाही प्रचार जातक करीत होते.

१२

# द्वादश भाव

**(व्यय - भोग - मोक्ष स्थान)**




सोबतच्या कुंडलीमध्ये दाखविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी बारा हा अंक लिहिलेला आहे, त्या स्थानाला पत्रिकेमधील किंवा कुंडलीतील द्वादश स्थान किंवा बारावे स्थान म्हणतात.

या स्थानावरून संपत्तीचा व्यय, शयनसुखादी सुखोपभोग, गुप्तशत्रू, शरीरव्यंग, दान संस्था, हॉस्पिटले, कारागृहे, संन्यास, एकांतवास, मोक्ष यांचा विचार होतो. या स्थानास नाशस्थान अशीही संज्ञा काही ज्योतिर्विद देतात.

वास्तविक हे स्थान जातकाने स्वत:चा नाश ओढून घेण्याचे आहे असे पाश्चात्त्य ज्योतिर्विद म्हणतात. तसेच हे भोग आणि त्यागाचे स्थान आहे. नाशस्थान यामध्ये सर्व प्रकारचा नाश, ऱ्हास, आर्थिक, शारीरिक, मानसिक, मान, दर्जा यांच्या ऱ्हासाचा संबंध येतो.

मोक्षस्थानही आहे. मोक्ष मिळण्यासाठी सर्व प्रकारच्या भौतिक सुखाचा आपण होऊन विरक्तीमुळे केलेला त्याग असतो. त्यासाठी एकांतवास पत्करला जातो.

कायद्याविरुद्ध वागल्याने न्यायालयाने दिलेली शिक्षा भोगण्यासाठी कारागृहात पाठविले जाते. कारागृहाचे स्थान हे आहे. केलेल्या कर्माचे फल भोगून सुधारणा होण्यासाठी येथे पाठविले जाते.

आजार, व्याधी यांतून पूर्ण बरे होणे, मुक्त होणे यासाठी हॉस्पिटलचा मार्ग धरावा लागतो. हॉस्पिटलचा विचारही याच स्थानावरून केला जातो.

आपल्या राहत्या घराचा, नातेवाइकांचा त्याग करून अज्ञातस्थळी निघून जाणे, पळून जाणे यांचाही विचार याच स्थानावरून केला जातो.

व्यय हा शब्द मुख्यत: संपत्तीचा व्यय - नाश - खर्च यांसाठी वापरला जातो. यासंबंधी एक संस्कृत सुभाषित आहे.

**दानै भोगो नाश: तिस्त्रो गतयो भवंति वित्तस्य ।**

**यो न ददाति न भुक्ते तस्य तृतीया गतीर्भवति ।।**

संपत्तीचा योग्य उपयोग स्वत:साठी, सर्व सुखोपभोगासाठी करणे अगर शिक्षणसंस्था, धार्मिक व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था यांना देणग्या देणे, दान देणे यासाठी करावा. यापैकी काही न करता कंजूसपणा करून संपत्ती तशीच ठेवल्यास कालांतराने ती नाश पावते. असे हे सुभाषित सांगते.

हल्ली पैसे कज्जे खटले यासाठी खर्च होतात. खंडणी द्यावी लागणे हाही पैसे नाशाचा प्रकार आहे. वाममार्गाने वा भ्रष्टाचाराने मिळविलेला पैसा खंडणी देणे, दरोड्यात हिरावला जाणे, चोरी होणे, फसवणूक होणे याही मार्गाने संपत्तीचा ऱ्हास होतो. नातेवाइकांकरिता खर्च होतो. मालमत्तेच्या वाटणीबरोबर रोकडचीही विभागणी होते. व्यापारात नुकसान होते. असे अनेक मार्ग धननाशाचे आहेत. दान देणे ही कामे सात्त्विक गुरुची आहेत. स्वत: व कुटुंबीय यासाठी पैसे खर्चणे हे शुक्र वा चंद्र करतात.

व्यापारात नुकसान येणे हे काम बुधाचे आहे. फसवणुकीचे पैसे बुडणे नेपच्यूनमुळे होते. सरकारी दंड वा करवसुली यासाठी रवीचा संबंध येतो. आजार, शस्त्रक्रिया, अवयवरोपण यासाठी सध्या बराच खर्च होतो. याचा शनीशी संबंध असावा. खटले वगैरेत खर्च होणे याचा संबंध मंगळाशी येतो. खंडणी व दरोडे यांचा संबंध प्लुटो या ग्रहाशी येईल.

शनीचे व्यय स्थानातील वास्तव्य नैराश्य आणते. दु:खदायक ठरते. जातकास आजार, व्याधी होतात. धडपडल्यामुळे हात-पाय मोडतात. व्यंग येते. शनी तुरुंगवासही दर्शवितो.

शनी व्ययात असता त्याची दृष्टी द्वितीय स्थानावर येते त्यामुळे दृष्टिदोष, वाचादोष उत्पन्न होतात. षष्ठावर सातवी दृष्टी येते. व्यापारात नुकसान, गुन्ह्यात अडकणे व तुरुंगवास ही फले व्ययस्थ शनीची साधारणपणे आहेत. नवमावरील दृष्टी पराजय, अवनती दर्शवेल, शरीरसुख, कुटुंबसौख्य व धनसौख्य तिन्ही बिघडतात.

व्ययात असलेला दुर्बल शनी अशुभ, दृष्ट वा दूषित शनी प्रवासात अपघात दर्शवितो तसेच शरीरव्याधी व पैशाची ओढाताण दर्शवितो. स्त्री जातकीचे बाबतीत गरोदरपणी त्रास होतो. व्ययात शनीबरोबर चंद्र असता मतिभ्रम होतो. शनीबरोबर रवी असता दुर्दैव, व्यवसायात पीछेहाट, वरिष्ठांबरोबर वा पित्याबरोबर गैरसमजामुळे त्रास होतो.

शनीबरोबर मंगळ, राहू वा केतू असता पश्चात, क्षय, गाठी होणे असे विकार होतात.

शनीबरोबर नेपच्यून असता कटकारस्थानाचा बळी ठरतो.

गुरुबरोबर असता तत्त्वज्ञ, मठाधिपती व संन्यास, विरक्ती अशी फले मिळतात.

सर्वसाधारणपणे शनी व्यय स्थानात अशुभ फलेच दर्शवितो. पण तो अशुभ भावाधिपती नसता व शुभसंबंधित असता शुभ फले मिळतात.

शनी स्वत:च व्यय भावाचा अधिपती असून व्यय भावात असता व्ययेश व्ययात असता 'विमल योग' होतो.

शनी अष्टमेश असून व्ययात असता 'सरल योग' होतो.

सहा, आठ, बारा स्थानांचे अधिपती एकमेकांचे स्थानात असता विपरीत राजयोग होतो.

शनी ज्या राशीत (व्ययात) आहे त्याचा अधिपती उच्च राशीत असता अथवा त्या अधिपतीची वा गुरुची दृष्टी व्ययस्थ शनीवर असता अशुभ फले मिळत नाहीत. शनी आपले अशुभत्वाचा त्या परिस्थितीत त्याग करतो.

तरी परंतु शनी आपली उपस्थिती जाणवण्यापुरता एखादा उणेपणा दाखवतोच.

सर्वसाधारणपणे कोणताही ग्रह नीच राशीत, शत्रुक्षेत्री अगर ६, ८, १२ स्थानात असता दुर्बल असतो. पण तो जर उच्च राशीत वक्री, स्वगृही अगर मित्रक्षेत्री असता (शुभग्रहाच्या) व मित्र नवांशात, उच्च नवांशात, स्वनवांशात असता तो ग्रह त्या मानाने बलवान होत असतो व त्यामुळे दुःस्थानातले त्याचे अशुभ परिणाम कमी-कमी होत जातात.

शनी हा सर्वांत जास्त पापग्रह आहे व तो नैसर्गिकच अशुभ असतो व त्यामुळे कोणत्याही राशीच्या लग्नास अशुभ फलेच देतो. मात्र त्या अशुभत्वावर निर्बंध, मर्यादा व निग्रह - संयम आला तर तीव्रता कमी होते. शनी जर शुभ ग्रहाच्या राशीत, नक्षत्रात आला तर अगर शुभयुक्त वा शुभ दृष्ट असता अशुभ फले देत नाही. गुरुचे वर्चस्व शनीवर असते व त्याच्या अशुभ फलावर नियंत्रण आणतो व शनी हा शुभ फलदायी होतो व त्याचे सुप्तपण व अध्यात्माच्या प्रवृत्ती दिसून येतात. म्हणून व्ययातील शनी प्रवज्या संन्यास योग देतो व त्या वेळी गुरुशी संबंध असता जातक संन्यासी मठाधिपती होतो.

तसेच शनीच्या dispositor वर शुभाशुभ फले अवलंबून राहतात.

## द्वादशस्थ शनीची राशिनिहाय भावफले


**(१) मेषेचा शनी** : द्वादशस्थानी जर एक हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मेषेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

वृषभ व तूळ या लग्नराशींचा शनी एकटा राजयोगकारक आहे व राजयोगकारक ग्रह ज्या स्थानात पडतो त्याची शुभ फले मिळतात असे म्हटले जाते. पण तसे अनुभवास ६, ८, १२ स्थानांच्या बाबतीत येत नाही.

व्यय स्थानावर मेष रास असते. येथे शनी आपल्या नीच राशीत येतो व कुंडलीतील अन्य शुभ योगांची फले मिळू देत नाही. दोन, सहा व नवम या स्थानावर शनीची दृष्टी येते. नीचस्थ शनीमुळे संपत्तिलाभ होत नाही. कौटुंबिक सुख बिघडते. आजार, व्याधी होतात. पिता व नशीब या बाबतीत दुर्दैवच उभे राहते. पण त्यातून तो तूळ नवांशात २०° ते २३° २०′ या भागात असता वरील अडचणीतून मार्ग निघू शकतो. गुरुची दृष्टी मंगळाची शुभस्थिती यामुळेही चांगला फरक होतो.

## कुंडली : श्री. शाम केशव केळकर

जन्म शुक्रवार दिनांक १५ सप्टेंबर, १९३९ रोजी रात्रौ ११ वा. ३० मि. प्र. वेळ सोलापूर येथे. अक्षांश १७° उ. ४२′ रेखांश ७५° ५५′ पू. अयनांश २३° १′. सां. स. २२ ता. ४५ मि. १२ से.




B.E. Civil Engineer खासगी बांधकामाच्या कॉन्ट्रॅक्टरचा व्यवसाय होता. सोलापूर येथील सिव्हिल हॉस्पिटल व अन्य मोठ्या बांधकामाची कॉन्ट्रॅक्ट्स घेऊन यशस्वीरीत्या पुरी केली.

स्वभाव मनमिळाऊ, हसतमुख, स्वत:ची स्थावर वाहने कमावली. शनी व्ययात नीच राशीत आहे. मेषेत आहे. पण त्याचा अधिपती मंगळ मकरेत उच्च राशीत नवमस्थानी आहे. त्याची दृष्टी शनीवर. त्यामुळे व्यावसायिक यश. पत्नी सुशिक्षित संतती. आई-वडील दीर्घायू. परंतु त्यांच्या हयातीतच जातक मूत्रपिंडाच्या विकाराने १९९० साली मरण पावला. शनीच्या षष्ठावरील दृष्टीचे परिणाम.


**(२) वृषभेचा शनी** : द्वादशस्थानी जर दोन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृषभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

मिथुन व कन्या या बुधाच्या मालकीच्या राशी आहेत. या दोन्ही लग्नांना शनी पूर्णपणे शुभ नसतो. मिथुन लग्नास तो अष्टमेश व नवमेश तर कन्या लग्नास तो पंचमेश व षष्ठेश असतो. शनीच्या बाबतीत मूलत्रिकोण राशी कुंभ असल्याने त्या राशीचीच फले प्रामुख्याने मिळतात.

व्ययात वृषभ रास येते. शनी हा अष्टमेश व नवमेश असतो आणि व्यय स्थानात वृषभ राशीत येतो. शनी अष्टमेश असून तो व्ययात येतो हा सरल योग होतो. जातक दीर्घायू असतो. विद्वान असतो. समृद्धी असते व प्रसिद्ध होते. अष्टमेश व्ययात हा सरळ योग आहेच शिवाय नवमेशही व्ययात ठीक असतो. वृषभ राशीत येत असल्याने नक्षत्र स्वामी व शुक्र यांच्याशी असलेल्या योगाचा विचार करावा लागेल. खर्च फार होतो व त्यामुळे जातक अतिशय जेरीस येतो.

## कुंडली : श्री. वसंतराव नाईक

जन्म मंगळवार दिनांक १ जुलै, १९१३ रोजी पहाटे ५ वा. पुसद येथे. अक्षांश १९° उ. ५७′ रेखांश ७७° ५०′ पू. अयनांश २२° ३८′ ५८″. सां. स. २३ ता. १५.




महाराष्ट्राचे मुख्यमंत्री १९६३ पासून मध्य प्रदेशाचे आमदार व मंत्री. नंतर मुंबई राज्याचे मंत्री. १९५२ पासून आमदार, मंत्री, मुख्यमंत्री असा चढता क्रम.

शनी व्यय स्थानात आहे व तो चंद्राच्या रोहिणी नक्षत्रात असून चंद्रही तेथेच उच्चांशी आहे. चतुर्थेश रवी लग्नी गुरुच्या दृष्टीत त्यामुळे राजकारणात. शनी दशमेशही आहे व तो रोहिणी नक्षत्रात चंद्रासह आहे. लग्नेश धनस्थानी धनेश व्ययात उच्चांशी.

जातकास दीर्घायुष्य लाभले. उच्चपद लाभले व प्रतिष्ठा व प्रसिद्धी लाभली.

**(३) मिथुनेचा शनी :** द्वादशस्थानी जर तीन हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मिथुनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्ययस्थानी मिथुन रास असते. शनी सप्तमेश व अष्टमेश असतो व त्याचा व्ययस्थानातील निवास शुभ फलदायी ठरत नाही. बुध कर्क लग्नास तृतीयेश व व्ययेश असल्याने तो शुभ फलदायी ठरत नाही. रवीची शनीवर दृष्टी असता सुखी नसतो. संपत्तीही नसते. पण जातक सद्गुणी असतो. तापट नसतो. धैर्यवान व क्लेश सहिष्णू असतो.

पण चंद्राची दृष्टी असता राजासम, तेजस्वी कांती व संपत्ती मिळवितो. मान मिळवितो.

मंगळाची दृष्टी असता जातक मल्लविद्या जाणतो व आश्चर्यचकित असतो. भार वाहतो. पण कुरूप असतो.

बुधाची दृष्टी असता विश्वासू असून प्रशासनात असतो. सर्व सद्गुण असतात. सज्जनांचा आवडता असून संपत्ती उत्तम मिळते.


शुक्राची दृष्टी असता योग शिक्षक, संत होतो व स्त्रियांचा आवडता होतो.

ही सर्व शुभ फले शनी व्यय स्थानाव्यतिरिक्त अन्य स्थानात असता मिळतील.

शनीचे अष्टमेशत्वाने बंधन योग मात्र होऊ शकतो.

## कुंडली : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

जन्म बुधवार दिनांक २३ जुलै, १८५६ रोजी सकाळी ६ वा. २५ मि. चिखली, ता. दापोली येथे. अक्षांश १७° उ. ३९′ रेखांश ७३° १४′ पूर्व अयनांश २१° ५०′ १४″. सां. स. २ ता. २८ मि. ७ से.




लोकमान्य टिळकांबद्दल येथे विशेष सांगावयाची आवश्यकता नाही. व्ययभाव मध्यावर बुध व शनी यांची मिथुन राशीत युती आहे. या युतीमुळे व नवमस्थ गुरु-चंद्र योगामुळे प्रकांड पांडित्य, कायदेतज्ज्ञ, गणिती, लेखक, संपादक झाले. मिथुनेतील बुध-शनीचे कर्तृत्व फार मोठे आहे. पण शनी सप्तमेश व अष्टमेश आहे व टीकात्मक लेखांमुळेच टिळकांना दोन वेळा तुरुंगवास घडला. शनीची लग्नेश चंद्रावर दृष्टी तसेच बुध-शनी दोघे राहू-केतूच्या केंद्रयोगात आहेत. चंद्र-राहू युतीही आहे व त्यावर शनीची पूर्ण दृष्टी आहे. मंडालेचा तुरुंगवास व त्यात उद्भवलेला मधुमेहाचा विकार कर्क लग्न पुढे चालू.


ही सर्व व्ययस्थ शनीची अशुभ फले आहेत. शनीने एकांतवास दिला. ते तत्त्वज्ञ होतेच पण शनीमुळे मोठ्या धैर्याने विरह सहन केला व तुरुंगवास भोगला. तेथेच 'गीतारहस्य' या ग्रंथाची रचना झाली. हे सर्व चंद्राच्या महादशेत घडले आहे. चंद्र-गुरु योग ग्रंथरचना. चंद्र-राहू-शनी योग, तुरुंगवास, व्याधी. सप्तमेश शनीमुळे टिळकांना अनेक खटल्यांना तोंड द्यावे लागले. अष्टमेश व्ययात हा विमला योग होतो. जातक काटकसरी, सुखी, स्वतंत्र बाण्याचा, उदात्त व थोर स्वभावाचा होतो.

**(४) कर्केचा शनी :** द्वादशस्थानी जर चार हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कर्केचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्यय स्थानात कर्क रास व शनी षष्ठेश व सप्तमेश असतो व कर्केत शत्रुराशीत येतो. षष्ठेश व्ययात ही स्थिती थोडी बरी असली तरी शनी सप्तमेश असतो व तो मारकेश असल्याने व्ययस्थानात आयुष्याच्या दृष्टिकोनातून व सप्तमाच्या दृष्टिकोनातून तो अशुभ ठरतो. पत्नीस सर्दी व थंडीचे आजार होतात. जठराग्नी प्रदीप्त नसतो आणि शनी जलराशीत असल्याने दूषित पाण्याने विकार, व्याधी होतात.

### कुंडली : श्री. जगदीश विश्वास शिवरकर

जन्म शुक्रवार दिनांक ९ जुलै, १९४८ रोजी सकाळी ८ वा. ५३ मि. स्था. वेळ पुणे येथे. अयनांश २३° ८′ ६″. सां. स. ४ ता. १० मि. ५९ से.





व्यय स्थानात चंद्र, शनी युतीत कर्क या जलराशीत आश्लेषा या बुधाचे नक्षत्रांत, मारकेश बुध युती हर्षल व केंद्रयोग मंगळ अपघातदर्शक. अष्टमेश नेपच्यूनचा लग्नेश रवीशी केंद्रयोग. यामुळे पाण्यात नदीत बुडून मृत्यू. दिनांक २८ ऑगस्ट, १९६० रोजी त्या वेळी गोचरीने हर्षल जन्मस्थ चंद्र-शनीवर होता.

**(५) सिंहेचा शनी :** द्वादशस्थानी जर पाच हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'सिंहेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्ययात सिंह रास येते व शनी पंचमेश व षष्ठेश असतो आणि सिंह राशीत येतो. शनी या राशीत चांगली फले देत नाही पण त्याच्या राश्याधिपतीवर आणि शुक्र, गुरु यांच्या स्थितीवर अवलंबून राहते. षष्ठेश व्ययात असता विमला योग येतो.

### कुंडली : मार्क स्पिटल्स

जन्म शुक्रवार दिनांक १० फेब्रुवारी, १९५० रोजी रात्री ९ वा. ३० मि. पॅ. स्टॅ. टा. मॉडेस्टो, कॅलिफोर्निया येथे. अक्षांश ३७° उ. ३७′ रेखांश १२१° पश्चिम. अयनांश २३° ९′ ३४″. सां. स. ६ ता. ४७ मि. ३० से.





अमेरिकन जलतरणपटू, १९६८ साली ३२ वेळा विश्वविक्रम मोडले. १९७२ च्या म्युनिक येथील ऑलिंपिक गेम्समध्ये ७ सुवर्णपदके विजेता.

लाभेश चंद्र तृतीयात व तृतीयेश मंगळ लग्नी चंद्र मंगळ लाभयोग, नेपच्यून गुरु त्रिकोण.

येथे विमला योग होतो. जातक काटकसरी, सुखी, स्वतंत्र विचाराचा, उदात्त व थोर गुण असतात. येथे व्ययेश रवी शनीच्या मकर राशीत आहे. अन्योन्य क्षेत्र योग आहे. शनीची अशुभ फले नाहीत.

## कुंडली : स्त्री जातक

जन्म गुरुवार दिनांक १९ जानेवारी, १९५० रोजी रात्री ११ वा. ३० मि. पुणे येथे. अक्षांश १८° उ. ३०′ रेखांश ७३° उ. ५२′ पूर्व. अयनांश २३° ९′ २८″. सां. स. ६ ता. ४९ मि. ४८ से.




मकर राशीत बुध, रवी, गुरु, चंद्र, शुक्र पंचग्रही शनीच्या राशीत आहेत. रवी-शनी परिवर्तन योग. शिक्षण B.Sc. L.L.B. अभ्यासात हुशार, सिंहेतील शनीचा रवीशी १३०° चा योग आहे व चंद्राशी १५०° चा योग यामुळे अलीकडे पाठ, कंबर दुखते. विवाहसुख चांगले आहे. एक कन्या तीही हुशार आहे.

**(६) कन्येचा शनी :** द्वादशस्थानी जर सहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कन्येचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

तूळ या लग्नासही शनी योगकारक आहे. व्ययावर कन्या रास येते आणि चतुर्थेश पंचमेश शनी व्ययस्थानी कन्या राशीत येतो. खुद्द चतुर्थेशच (सुख स्थानाधिपती) व्ययात येतो. तेव्हा भौतिक सुखांना जातक पारखा होतो. संतती सुख, कौटुंबिक सुख मिळत नाही. जातक सर्व अडचणींना तोंड देऊन शिक्षण पुरे करतो. एवढेच नव्हे तर काही विषयांमध्ये पारंगतही असतो. परंतु व्यावसायिक यश लाभत नाही. परंतु गुरुची दृष्टी शनीवर असून अन्य ग्रहांशी शुभ योग असता अगर व्ययेश शुभ असून तो शुभ स्थानात असता शनीचे योगकारकत्व फलदायी होते. नक्षत्राचाही विचार केला पाहिजे.

## कुंडली : पुरुष जातक

जन्म बुधवार दिनांक ११ ऑक्टोबर, १९२२ रोजी सकाळी ७ वा. ३७ मि. स्टॅ. टा. त्रिवेंद्रम येथे. अक्षांश ८° उ. ४१′ रेखांश ७६° ५१′ पू. अयनांश २२° ४६′ ४०″. सां. स. ८ ता. २१ मि. ५४ से.




जातकाचे वडील साधे शिक्षक होते. गरिबी असतानाही वडिलांनी जातकास उत्तम शिक्षण प्राप्त करण्यास मदत केली. जातक C.A. झाला व एका आंतरराष्ट्रीय व्यवसायात अकौंटंटपासून सुरुवात केली व शेवटी तो डेप्युटी चेअरमन झाला. गुरुच्या दशेत गुरु षष्ठेश असून तो लग्नी व्ययेश बुधाच्या युतीत. चंद्र वृषभेमध्ये उच्च. चंद्राच्या षष्ठात बुध-गुरु व सप्तमात शुक्र. चंद्राधियोग झाला. व्ययेश बुध व षष्ठेश गुरु यांची युती लग्नी.

शनी हा हस्त नक्षत्रात आहे. चंद्राच्या नक्षत्रात व चंद्र उच्च राशीस आहे तो उच्च आहे. यामुळे व्ययस्थ शनीची अशुभ फले न मिळता शुभच फले मिळाली आहेत.

१९७४ मध्ये जातक त्या कंपनीचा अध्यक्ष झाला.

चतुर्थेश व पंचमेश शनीची लग्नेश व चंद्र लग्नेश शुक्रावर पूर्ण दृष्टी आहे. त्यामुळे शिक्षण पूर्ण झाले.


शनीच्या नक्षत्राधिपतीची किमया !!

**(७) तुळेचा शनी :** द्वादशस्थानी जर सात हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'तुळेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्यय स्थानावर तूळ रास येते. शनी तृतीयेश व चतुर्देश असून व्यय स्थानात आपल्या उच्च राशीत असतो पण तो पूर्णपणे शुभ फल देणारा ठरत नाही. चतुर्थेश व्ययात असणे व तो उच्च असणे शुभ असते. यावर आई मोठ्या घराण्यातून, खानदानी घराण्यातून आलेली असते. पण शनी तृतीयेशही असतो व ते आधिपत्य ठीक राहत नाही. तेव्हा शनी अंशत: शुभ आहे. शनी एकूण ७५ टक्के शुभ फल देणारा राहील.

**कुंडली : श्री. अटलबिहारी वाजपेयी**

जन्म गुरुवार २५ डिसेंबर, १९२४ रोजी पहाटे ५ वा. ग्वाल्हेर येथे. अक्षांश २६° उ. १४′ रेखांश ७८° १०′ पू. अयनांश २२° ४८′ २२″. सां. स. १० ता. ५४ मि. २० से.




भारताचे पंतप्रधान उच्च पदाला पोहोचण्यात अनेक अडथळे आले. एकदा १३ दिवस, नंतर १३ महिने अशी अल्प कारकीर्द झाली. दशमेश रवी व धनेश पंचमेश यांची युती आहे.

व्ययस्थानी शनी उच्च आहे. तो ७५% शुभ म्हणून दोन वेळा पंतप्रधान पदाचा योग. पण २५% अशुभ म्हणून अल्प कारकीर्द. दशमेश रवीवर शनीची तिसरी दृष्टी आहे.

त्यामुळे हे अपयश आले. भाग्येश चंद्र लग्नी आहे व त्याचा नवमस्थ नेपच्यूनशी त्रिकोणयोग आहे. पाच वर्षांचा कालावधी शनीने संपवू दिला नाही. मधूनच पदावरून बाजूस काढले. पण पुन्हा पंतप्रधान पद ५ वर्षांकरिता लाभले.

**(८) वृश्चिकेचा शनी :** द्वादशस्थानी जर आठ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'वृश्चिकेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे –


व्यय स्थानावर वृश्चिक रास असून शनी द्वितीयेश व तृतीयेश आहे. त्यामुळे शनी अशुभच आहे व असा अशुभ शनी वृश्चिक या शत्रुराशीत आहे.

अशा जातकास जरूरीपुरता पैसा मिळतो. पण तोही तो उधळून टाकतो. त्याचे कौटुंबिक जीवन दु:खपूर्ण असते व तो इतरांशी नेहमी भांडत असतो.

शनी स्वत:च धनेश असून तो व्ययात शत्रुक्षेत्री असता धनलाभ यथातथाच होणार. शनीची द्वितीयावर दृष्टी असल्याने कुटुंबसौख्यही नासले जाते. त्याची षष्ठावरील दृष्टी शत्रू उत्पन्न करणारी ठरते.

### कुंडली : पुरुष जातक

जन्म सोमवार दिनांक १६ मे, १९२७ रोजी रात्री ८ वा. ४५ मि. नी झाला. अक्षांश ८° उ. ४४′ रेखांश ७७° पू. अयनांश २२° ५०′ १७″. सां. स. १२ ता. १८ मि. १७ से.




जातक श्रीमंत कुटुंबात जन्मला. गर्भश्रीमंत, त्याचे आई-वडिलांनी त्याचे लाड केले आणि त्यामुळे जातक उधळ्या झाला. तो अत्यंत आळशी होता. फारसे शिकलाही नाही. त्यास एक हलकी नोकरी लागली. पण विवाह चांगल्या घराण्यातील स्त्रीबरोबर झाला. नोकरीत वरिष्ठांची मर्जी त्याजवर बसली नाही व त्यास वारंवार निलंबित केले गेले. जातक वाममार्गाने पैसा मिळवून तो वाईट मार्गाने खर्च करी. अनैतिक संबंध व बेदरकारपणे आयुष्य घालवतो.


व्ययात शत्रुराशीत शनी त्याची दृष्टी द्वितीयावर. शिक्षण अत्यंत बेताचे. बापाचा पैसा उधळला व मग हलकी नोकरी पत्करावी लागली. भाग्यस्थान व भाग्येश रवी यावर शत्रुराशीतील शनीची दृष्टी त्यामुळे भाग्य हिरावले गेले. व्ययेश मंगळ सप्तमात शुक्राबरोबर. अनैतिक संबंध व व्यसनात उधळलेला पैसा गुरुच्या दृष्टीचा उपयोग एवढाच की श्रीमंत घराण्यात जन्म. लग्नावर मंगळ राहूची दृष्टी. रवी-बुध युती. बुध अस्तंगत आहे. नोकरीत वारंवार निलंबित केले गेले. दशमेश बुध व रवीवर शनीची पूर्ण दृष्टी तसेच षष्ठ स्थान व नवम स्थानावर शनीची दृष्टी यामुळे नोकरीत असे प्रसंग आले.

**(९) धनुचा शनी :** द्वादशस्थानी जर नऊ हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'धनुचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्ययस्थानी धनु रास, शनी लग्नेश व द्वितीयेश असून धनु राशीत येतो.

### कुंडली : पुरुष जातक

जन्म सोमवार दिनांक १२ मे, १९३० रोजी रात्री ११ वा. ३० मि. प्र. वेळ. अक्षांश ९° उ. रेखांश ७७° पूर्व अयनांश २२° ५२′ ५४″. सां. स. १४ ता. १७ मि. ७ से.




माता-पिता लवकर मृत झाले. जातक पोरका झाला. त्यास शिकण्याची संधी मिळाली नाही. प्राथमिक शाळेतसुद्धा गेला नाही. पण जातक बुद्धिमान आहे आणि व्यवहारज्ञानही चांगले आहे. द्वितीयेश शनी व्ययात - शिक्षण नाही. पण जातक उधळ्या आहे. व्ययातील शनी, बुध - गुरुच्या अष्टमात व त्याची दृष्टी द्वितीय व नवम स्थानावर आहे. त्यातच शनीचा मंगळ-हर्षलशी केंद्रयोग आहे.


चतुर्थाचे व्ययात मंगळ हर्षल त्यामुळे माता-पित्यांचे सुख नाही. वळण लागले नाही. पिताकारक रवीचे व्ययांत मंगळ व हर्षल. तसेच चंद्राच्या षष्ठातही मंगळ, हर्षल यामुळे मातृ-पितृसुख नाही.

**(१०) मकरेचा शनी :** द्वादशस्थानी जर दहा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मकरेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

कुंभ लग्नास व्ययस्थानी शनी मकरेत स्वगृहीच असतो. लग्नेश व्ययात येतो. ही स्थिती शुभदायक असते. शनी अशुभ फले देत नाही. जातकास संतती चांगली व दीर्घायू अशी होते. पण त्याचा खर्च वाढत असतो व आर्थिक अडचणी वाढतात आणि काही आजारसुद्धा होतात.

## कुंडली : श्री. आर. के. खाडीलकर

जन्म गुरुवार दिनांक १५ डिसेंबर, १९०४ रोजी सकाळी ११ वा. ४५ मि. नारिंग्रा, देवगड येथे. अक्षांश १६° उ. २२′ रेखांश ७३° पू २३′. अयनांश २२° ३१′ ४३″. सां. स. १७ ता. १९ मि. १० से.




महाराष्ट्रातील डाव्या विचारसरणीचे पुढारी. राजकीय व सामाजिक कार्य. संसद सदस्य केंद्रीय कॅबिनेट दर्जाचे मंत्री. परदेश प्रवास. दशमात रवी-हर्षल युती आहे. त्यामुळे राजकीय व सामाजिक कार्य. संसद सदस्य व मंत्री. लग्नेश शनी व दशमेश मंगळ याच्यात त्रिकोणयोग आहे. शनी व गुरु यांचाही लाभयोग असून दोघांचाही दशम बिंदूशी शुभयोग आहे.


लग्नेश स्वराशीत असून गुरु-मंगळ व दशम यांच्याशी शुभयोग आहे. व्ययस्थ शनीचे अशुभ फल नाही.

**(११) कुंभेचा शनी :** द्वादशस्थानी जर अकरा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'कुंभेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्ययात कुंभ रास येते. शनी लाभेश व व्ययेश असून तो व्ययात स्वगृही येतो. म्हणजेच १२ व्याचा अधिपती १२ व्या स्थानात असता 'विमल' योग होतो. हा योग उत्तम व शुभ असतो. या योगावर जातक काटकसरी, सुखी, स्वतंत्रतेने काम करणारा व सद्‌गुण असणारा असतो. तसेच शनी व्ययात आपल्या मूलत्रिकोण राशीत असल्याने तो बलवान झाला आहे व त्यामुळे त्यास प्रतिष्ठा प्राप्त होते. येथे शनी अशुभ फले देत नाही.

## कुंडली : पुरुष जातक

जन्म मंगळवार दिनांक २७ जून, १९०५ रोजी रात्री ११ वा. ५० मि. प्रमाण वेळ. अक्षांश ८° उ. ३१′ रेखांश ७७° पूर्व अयनांश २२° ३२′ ७″. सां. स. १७ ता. ४८ मि. २५ से.




जातकाची शरीरयष्टी भरदार, काटक व बलिष्ठ, लग्नेश वृषभेत मंगळाच्या दृष्टीत. जातक फारसा शिकला नाही व हुशार नव्हता. कारण शनीची द्वितीयावर दृष्टी अधिक मंगळाचीही द्वितीयावर व द्वितीयस्थ ग्रहावर दृष्टी व द्वितीयेश मंगळ अष्टमात असणे.

परंतु चतुर्थावर बुध स्वराशीत आहे व त्याचा शनी व मंगळ यांच्याशी त्रिकोणयोग आहे. हा त्रिकोण बौद्धिक राशीतून आहे. त्यामुळे जातक बुद्धिमान होतो. बुध षष्ठेश रवीचे युतीत यामुळे उच्च शिक्षण बेताचे. या युतीची दशमावर दृष्टी आहे त्यामुळे जातक केंद्र सरकारच्या नोकरीत राजपत्रित अधिकारी पदापर्यंत पोहोचला. भाग्येश मंगळावर पंचमेश चंद्राची पूर्ण दृष्टी आहे.

अशा तऱ्हेने जातकाचा आयुष्यक्रम झाला. पण व्ययात शनी व केतू यांची युती व त्यांची षष्ठावर दृष्टी आहे. यामुळे जातकास अर्धांगवात झाला. त्यातच तो मरण पावला.

शनी आपले शस्त्राचा प्रभाव केव्हा तरी दाखवतोच.


**(१२) मीनेचा शनी :** द्वादशस्थानी जर बारा हा अंक असेल तर तेथे असलेल्या शनीला 'मीनेचा शनी' असे म्हणतात. त्याचे फल पुढीलप्रमाणे -

व्ययात मीन रास येते. शनी दशमेश व लाभेश असतो आणि तो गुरुच्या राशीत येतो. जातक भरपूर पैसा कमावतो पण व्यसनापायी धनाचा नाश होतो. वाटेल तसा पैसा खर्च होतो. नेत्रविकार होतात. दिवसा जन्म असता पिता अकाली मरण पावतो पण रात्री जन्म असता पितृसौख्य मिळते.

या शनीवर गुरुची दृष्टी असता जातक त्याच्या सद्‌गुणांनी प्रसिद्ध होतो. दीर्घायू होतो व निरोगी राहतो. राजाश्रय असतो.

## कुंडली : न्यायमूर्ती दिवाणबहादूर ए. रामचंद्रीयर

जन्म शुक्रवार दिनांक ८ मे, १९०८ रोजी पहाटे सुमारे ५ वा. ३० मि. अक्षांश ९° उ. रेखांश ७७° पू. अयनांश २२° ३४′ २०″. सां. स. २० ता. १२ मि. ५४ से.





मद्रासचे नामांकित वकील. म्हैसूर उच्च न्यायालयात न्यायमूर्ती झाले.

दशमेश शनी व्ययात असून उच्च न्यायालयात गेले. याचे प्रमुख कारण मीनेचा अधिपती गुरु आहे. तो चतुर्थ केंद्रात उच्च राशीत आहे. गुरुची दशमावर व दशमेश शनीवर पूर्ण दृष्टी येते. शनीचा dispositor गुरु असून तो उच्च असल्याने त्याच्या राशीतील शनीनेही जातकास उच्च पदावर नेले. गुरु नवमेशही आहे व तो चतुर्थात उच्च आहे. रवी बुध युती त्रिकोण, बुध-हर्षल त्रिकोण हा वक्तृत्व समयसूचकता यांचा द्योतक आहे. पंचमेश रवी लग्नी उच्च यामुळे सरकारी न्यायखात्यात अधिकार पद.

गुरु-शनी त्रिकोणयोग उच्च पदास नेण्यास कारणीभूत झाला. पण गुरुचे नवमातील शनीमुळे संततीयोग झाला नाही.

## कुंडली : स्वामी मुक्तानंद

जन्म शनीवार दिनांक १६ मे, १९०८ रोजी पहाटे ५ वा. ११ मि. मंगळूर येथे. अक्षांश १२° उ. ५४′ रेखांश ७४° ५१′ पू. अयनांश २२° ३४′ २१″. सां. स. २० ता. १३ मि. ३० से.




परमहंस नित्यानंदांचे शिष्य. वज्रेश्वरी येथे भव्य आश्रम स्थापन झालेला आहे. अनेक विदेशी व देशी शिष्य आहेत. परदेशगमन झालेले आहे.

शनी व्ययस्थानी मीनेत, नवमेश गुरु चतुर्थात उच्च व गुरु शनी अंशपूर्ण त्रिकोण आहे. बलवान गुरु शनीस योग्य त्या मार्गावर आणतो. त्याचे हातून चूक होऊ देत नाही. गुरु हा शनीचा आचार्य आहे. म्हणून शनी जेव्हा गुरुचे अमलाखाली येतो तेव्हा शनी हा शुभ ग्रह होतो व त्याच्यातील आध्यात्मिक प्रवृत्ती जागृत करतो.

या ठिकाणी चंद्र जवळ जवळ वृश्चिकेमध्ये शिरत आहे. तो नीचांशाकडे जात आहे. आधीच्या कुंडलीतील चंद्र स्वराशीत होता व आता तो शुक्राच्या राशीत पण गुरुचे नक्षत्रात पण नीचांशाचे निकट आहे व दुसरेच दिवशी कर्क वृश्चिक, मीन मधून चंद्र गुरु शनी हा मोक्ष त्रिकोण पुरा होत आहे. मुक्तानंदांनी अनेकांना दीक्षा दिल्या आहेत.